04-02-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

APR/ 10:00

02-04-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

APR/ST 10:00

सभापतीस्थानी - माननीय उप सभापती

पृ.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागास वर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे

मु.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे या विषयावर सर्वश्री. सुभाष चव्हाण, हेमंत टकले,भाई जगताप,विनायक मेटे, उल्हास पवार,रमेश शेंडगे, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे,राजन तेली,सतीश चव्हाण,मोहन जोशी, किरण पावसकर, प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी,श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री. एम.एम.शेख, एस.क्यू.जमा, ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, आदिवासी, अल्पसंख्यांक, भटक्या जाती व विमुक्त जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होऊन त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शासनाने शिष्यवृत्ती तसेच, अन्य विविध योजना राबविणे, परंतु अलीकडच्या काळात या योजनांचे लाभ वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, या विद्यार्थ्यांना 2/2 वर्षे उलटून गेल्यानंतर शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येणे, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश मोफत देण्यात येतो, तो सुध्दा वेळेवर देण्यात येत नसणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठविण्याच्या योजनेमध्ये फारच कमी प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणे, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत दरवर्षी मागावर्गीयांच्या कल्याणासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, त्याचप्रमाणे महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदा यांनी देखील त्यांच्या अर्थसंकल्पात यासाठी वेगळी तरतूद करणे, परंतु प्रत्यक्षात त्यापैकी फारच कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . . .

रक्कम खर्च करण्यात येणे, कोट्यावधी रुपये अखर्चित राहून मागासवर्गीय या योजनांपासून वंचित राहणे, यावर गांभीर्याने विचार करण्याची निर्माण झालेली परिस्थिती, मागासवर्गीय व अल्पसंख्यांक समाजातील लोकांच्या विकासासाठी नेमण्यात आलेल्या महामंडळासाठी फारच अपुरी तरतूद करण्यात येणे, त्यामुळे या योजनांचा म्हणावा तसा लाभ मागासवर्गीय व अल्पसंख्यांक समाजातील लोकांपर्यंत पोहचलेला दिसून येत नसणे, मागासवर्गीय उमेदवारांना व लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी मिळण्यासाठी विविध स्तरावर होणारा विलंब, यात मोठ्या प्रमाणात येत असलेल्या तक्रारी व वाढत असलेला भ्रष्टाचार, या सर्वांमध्ये ज्या योजना आहेत त्या योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी व या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक ती सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता, यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, 19 व्या शतकातील बहुजन समाजाला लागलेले दोन मोठे रोग आहेत. ते म्हणजे अज्ञान व दारिद्र्य. याचे मूळ कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव म्हणजे अविद्या. अशा या क्षुद्रातील क्षुद्र समाजात याची पहिली जाणीव करुन देणारे थोर पुरुष महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज आणि दलितांचे कैवारी व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे बहुजन समाज, दीन-दलित बांधव शिक्षणाचा प्रवाहात आले. म्हणून भारत वर्षावर असलेला अन्याय, अंध:कार घालविण्यासाठी ज्यांनी अथक प्रयत्न केले, त्यांना वंदन करुन मी माझ्या भाषणास सुरुवात करीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण .....

"विद्येविना मति गेली, मतिविना निती गेली
नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले
वित्त विना क्षुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."

शिक्षणा अभावी बुध्दी गंजली, नितीमत्ता लयाला गेली, गती संपुष्टात आली, वित्त विना कंगाल बनलेले हे मागासवर्ग समूह सर्वांगीण, उपेक्षित आणि सत्ता,संपत्ती प्रतिष्ठा नसलेले जीवन जगू लागले असे महात्मा जोतिबा फुले यांनी म्हटलेले आहे. बारा बलुतेदार, बलुतेदार, माळी, कुणबी, धनगर, असा क्षूद्र वर्ग आणि महार, चांभार,भटका विमुक्त समाज, आदिवासी समाज म्हणजे अतिक्षुद्र वर्ग. असा बहुसंख्य समाज ज्ञानापासून वंचित राहिल्याने मागासलेला राहिलेला आहे.

सभापती महोदय, स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. या पुरोगामी राज्याचे ते पहिले मुख्यमंत्री होते. स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक परिवर्तन केले. मागासवर्गीयांना मोफत शिक्षण, शिक्षणात सवलती असा घटनेने हक्क दिला आहे आणि हा हक्क आम्हाला मिळाला पाहिजे. त्यामध्ये तडजोड नको. भेदभाव नको, जातीय विषमता नको.

सभापती महोदय, ब्रिटीश पूर्व काळात शिक्षण ही वैयक्तिक बाब मानली जात होती. ब्रिटीश राजवटीत प्रथमच आपल्याकडे शिक्षण व्यवस्थेला सरकारी यंत्रणेचे स्वरुप प्राप्त झाले होते. ज्ञान व गुणवत्ता ही स्वभावत: मुक्तीदाई नसते. त्यासाठी शील व प्रज्ञेची आवश्यकता असते. शीला शिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे. ज्ञान हे तलवारी सारखे आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनासाठी ज्ञानासोबत सामाजिक सामुदायिक हित लक्षात घेऊन अन्यायाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या आणि सरस्वतीची किरणे पोहचू न शकणाऱ्या सर्वसामान्य माणसांच्या झोपडीपर्यंत ज्ञानाची किरणे पोहोचविण्याचे महान कार्य केले आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, तो पिणारा गुरगुरणारच, डरकाळी फोडणार. त्यांनी शिक्षणाची नाडी ओळखली होती. म्हणून विकासाच्या प्रक्रियेपासून शंभर हात दूर असणाऱ्या उपेक्षित समाजातील दुर्बल घटक,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण .....

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी, अल्प संख्याक, भटक्या विमुक्त जाती /जमाती व इतर मागासवर्ग या सर्वांना शिक्षण मिळालेच पाहिजे आणि तो त्यांचा हक्क आहे.

सभापती महोदय, सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा याचे समान वाटप झाले पाहिजे. सर्वांना शिक्षण मिळवून देण्याचा अधिकार भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला आहे. विद्या हे एक शस्त्र आहे, ती तलवारी सारखी आहे. परंतु तिचे महत्व धारण करणाऱ्यावर अवलंबून असते.

सभापती महोदय, घटनेने सर्वांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे. मोठे उद्योगपती टाटा व बिर्ला यांच्या मताला जेवढी किंमत आहे तेवढीच किंमत समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तीच्या मताला आहे आणि हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य घटनेने दाखवून दिलेले आहे. माझी शासनाला नम्र विनंती आहे की, श्रीमंताच्या तोंडाकडे पाहून राज्य कारभार करण्यापेक्षा गरिबांच्या पायाकडे पाहून, सामान्य माणसाला केंद्र बिंदू ठेवून राज्य कारभार केला पाहिजे. जशी मानवाला जगण्याकरिता अन्नाची आवश्यकता असते, तशी विद्येचीही आवश्यकता असते. विद्येशिवाय माणसाला शांतता नाही. शासनाची धोरणे ठरवित असताना सामान्य माणसाला विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणले पाहिजे. परिपत्रके काढून समाज परिवर्तन होणार नाही. त्यासाठी अंमलबजावणीची गरज आहे. प्रथम त्या संबंधीची मानसिकता तयार केली पाहिजे. मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी खास सामाजिक न्याय विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

सभापती महोदय, श्री. शिवाजीराव मोघे हे या विभागाचे मंत्री आहेत तसेच या विभागाला एक राज्य मंत्री सुध्दा आहेत. प्रत्येक राजकीय पक्षात मागासवर्गीय सेल आहे. विधिमंडळात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अशा स्वतंत्र कल्याणकारी समित्या आहेत. या समित्या राज्यात ठिकठिकाणी भेटी देतात, अधिकाऱ्यांच्या साक्षी घेतात आणि त्यासंबंधीचे अहवाल विधिमंडळाला सादर करतात पण त्यानंतर त्या अहवालाचे काय होते याची आपल्याला कल्पना आहे. सर्वपक्षीय आमदारांसाठी महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जाती फोरम आहे. त्या फोरमचा मी स्वत: अध्यक्ष आहे. पक्षातंर्गत मागासवर्गीय सेल आहे त्यासाठी एका अध्यक्षांची निवड केली जाते. राज्य जिल्हा पातळीवर एक सेल आहे, या सेलचे अध्यक्ष आणि कार्यकारिणी आहेत. केंद्र शासनाने राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग नेमलेला आहे. प्रत्येक घटक राज्यात त्याची नियुक्ती केली जाते. त्यामुळे शासनाने मागासवर्गीयांकरिता केलेल्या नवनवीन योजना व त्याचा निधी कसा वापरला जातो, यावर या आयोगामार्फत अंकुश ठेवला जातो. आदिवासी विकास विभाग आहे. त्यासाठी एक स्वतंत्र मंत्री आणि राज्यमंत्री आहेत. अल्पसंख्याक विकास विभाग आहे त्यासाठी सुध्दा एक स्वतंत्र मंत्री आणि राज्य मंत्री आहेत. पक्षांतर्गत अल्पसंख्याक आदिवासी सेल आहे इत्यादी माध्यमातून या मागासवर्गीयांचे संरक्षण केले जाते.

सभापती महोदय, या चालू अर्थसंकल्पात राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 45 हजार कोटी रुपये आहे. त्यापैकी अनुसूचित जाती उपाययोजनेसाठी 4,509 कोटी रुपये इतके म्हणजे 10.9 टक्के इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.तरी देखील लोकसंख्येच्या प्रमाणात 915 म्हणजे एक हजार कोटी रुपये अजून तरतूद होणे आवश्यक आहे. यामध्ये बौध्द समाजाचा समावेश करण्यात आलेला नाही. आदिवासी उपाययोजनेसाठी 4005 कोटी रुपये म्हणजे 8.9 टक्के तरतूद करण्यात आलेली आहे. तरी देखील लोकसंख्येच्या प्रमाणत 955 कोटी रुपये तरतूद कमी आहे. अनुसूचित जाती व जमातीसाठींच्या उपाययोजनेसाठी या अर्थसंकल्पात 8595 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती व जमाती उपाययोजनेसाठी अजून 1870 कोटी रुपये निधी मिळणे आवश्यक आहे. या खर्चाचे विवरण व वितरण माननीय मंत्री महोदयांनी आपल्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

उत्तरात सुस्पष्टपणे जाहीर करावे अशी मी विनंती करतो. या समाजातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी एकूण किती रुपये तरतूद करण्यात आलेली आहे, शिक्षणासाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे, आश्रमशाळेसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे, घरकूल योजनेसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे, दलित वस्तीसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे याचा उहापोह होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माध्यमिक शाळांमधील हुशार व गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांसाठी शासनाने एक शिष्यवृत्ती योजना दिनांक 29 ऑगस्ट, 1966 पासून सुरु केलेली आहे. माध्यमिक शाळेतील इयत्ता पहिली ते इयत्ता 10 मधील प्रत्येक इयत्तेमधील 50 टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. सन 2005 ते 2010-2011 पर्यंत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात 7 कोटी 65 लाख 68 हजार तरतूद करण्यात आलेली आहे परंतु सुधारित अंदाजपत्रकात ती कमी झालेली आहे. ती 6 कोटी 26 लाख 76 हजार रुपये इतकी आहे. प्रत्यक्षात 7 कोटी रुपयांपैकी खर्च 2 कोटी 47 लाख 92 हजार रुपये इतका झालेला आहे. हा खर्च का झालेला नाही तसेच हा निधी का वापरला नाही याची विभागाने चौकशी करावी. मागासवर्गीय विद्यार्थी शालांत परीक्षेनंतर शिक्षण घेण्यास उद्युक्त व्हावेत, त्याकरिता त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून भारत सरकारने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक योजना सुरु केलेली आहे. या योजनेत पालकांचे उत्पन्न एक लाख रुपयावरुन दोन लाख रुपये करण्यात आलेले आहे. शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा पाच लाख रुपयांपर्यंत नेण्यात यावी जेणेकरुन या योजनेचा फायदा जास्तीत जास्त मागसवर्गीय विद्यार्थ्यांना मिळेल अशी मी अपेक्षा करतो. या योजनेसाठी अभ्यासक्रमाच्या वर्गीकरणानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नव बौध्दांसहीत वसतिगृहात न राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना दरमहा भत्ता दिला जातो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

ते सध्याच्या वाढत्या महागाईच्या दृष्टीने अत्यंत अल्प आहे. त्यामध्ये 190 रुपये, 250 रुपये म्हणजे बरेच कमी पैसे दिले जातात. त्यामध्ये भरीव वाढ करावी अशी माझी सूचना आहे. यासाठी 2010-2011 मध्ये 46354.70 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आणि 2010-2011 मध्ये 463054.70 रुपये खर्च झालेले आहेत. 2011-2012 मध्ये जास्त म्हणजे 58280 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. राज्यातील निवासी आश्रमशाळा, वसतिगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी परिपोषण आहाराच्या रक्कमेमध्ये 630 रुपयांवरुन 930 रुपयांपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, या ठिकाणी प्रस्ताव आल्यामुळे कदाचित ही वाढ केली असेल. त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी शुक्रवारी विधानसभेत या बाबत घोषणा केली. पूर्वी देण्यात येणारी रक्कम फारच अल्प होती. गेली चार पाच वर्षे सर्व सन्माननीय सदस्य आणि पालक मागणी करीत होते. माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात घोषणा केलेली आहे. परंतु 900 रुपये ही रक्कम सुध्दा कमी आहे. ती वाढवून 1500 रुपयांपर्यंत करावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने काही घोषणा केलेल्या आहेत. महाराष्ट्र विधान मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित केलेला स्मृतिगंध सकाळी वाचत होतो. त्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी फार चांगला लेख लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, सत्ता समाज हितासाठी आणि सामाजिक समता व आर्थिक न्याय द्यावयाचा म्हणून हे राज्य शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गाने चालविण्याचा त्यांनी निर्णय घेतला आणि राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला त्यांनी सामाजिक न्यायाचे अनेक महत्वाचे निर्णय विधिमंडळात जाहीर केले. त्यांनी सामाजिक न्यायाचे काही ऐतिहासिक निर्णय घेतले. भूमिहीनांना जमिनी देणे, अल्पसंख्यांकांसाठी अल्पसंख्यांक आयोग निर्माण करणे यासारखे अतिशय महत्वाचे निर्णय त्यांनी घेतले होते. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता असून सुध्दा आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. त्यांना परदेशी शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. अशा विद्यार्थ्यांची संख्या राज्य शासनाने 50 ठरविलेली आहे. 50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

ही विद्यार्थी संख्या कमी आहे. त्या संख्येमध्ये शासनाने वाढ करावी. आपल्याला जास्त लाभार्थी मिळतील. ज्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देतो त्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 2 लाख 50 हजार रुपये ठरविलेली आहे. ही मर्यादा शासनाने 5 लाख रुपयांपर्यंत वाढवावी. 1 नोव्हेंबर, 2003 पासून ही योजना अमलात आलेली आहे. या योजनेचा फायदा 172 विद्यार्थ्यांनी घेतलेला आहे. 2010-2011 मध्ये यासाठी 1000 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. 2010 मध्ये 701 लाख रुपये खर्च झालेला आहे. 2011-2012 मध्ये यासाठी भरीव तरतूद केलेली आहे. हे 172 विद्यार्थी एकाच समाजाचे नसावेत. यामध्ये सगळ्या समाजाचा समावेश करावा. ती यादी शासनाने सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

सभापती महोदय, आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शाळेत गळती होते. गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून इयत्ता पाचवी ते सातवी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे. मुली नियमितपणे शाळेत याव्यात म्हणून त्याच धर्तीवर इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना शासनाने सुरु केलेली आहे. त्या अंतर्गत 100 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. ही रक्कम 100 रुपयांवरुन 150 रुपये करावी अशी मी सूचना करतो. राज्यातील अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमच्या राज्य शासनाने, आघाडी सरकारने 8 फेब्रुवारी, 2008 रोजी स्वतंत्र अल्पसंख्यांक विभाग सुरु केलेला आहे. अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीयांना योग्य तो न्याय देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. सन 2011 मध्ये अल्पसंख्यांक विभागासाठी विधानमंडळातील दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची एक स्वतंत्र समिती गठीत करण्यात आलेली आहे. युतीचे सरकार गेल्यानंतर आणि आमचे सरकार आल्यानंतर सर्व अल्पसंख्यांक, आदिवासी, मागासवर्गीय यांना लोकशाही आघाडी सरकारने योग्य तो न्याय दिलेला आहे. दलित, आदिवासी, मुस्लीम हे परंपरागत काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे मतदार आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

आरपीआयचे श्री.रामदास आठवले यांचा विश्वासघात केलेला आहे. कृपया दलितांना शासनाने अशी वागणूक देऊ नये. त्यांचा विश्वासघात करु नका.

सन 1991 सालातील जनगणनेच्या तुलनेत राज्यातील अनुसूचित जातीतील साक्षरतेमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. 1991 ते 2001 या 10 वर्षांच्या कालावधीत 15.4 टक्क्याने वाढ झालेली आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीतील साक्षर लोकांची टक्केवारी वय वर्षे 7 व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या लोकांची टक्केवारी 71.60 टक्के होती. त्यामध्ये वाढ होऊन ती 76.90 टक्के इतकी झालेली आहे. म्हणजे साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे.

सभापती महोदय, व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक शुल्काची परंतु इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांच्या 50 टक्के शैक्षणिक शुल्काची जबाबदारी शासनाने 5 वर्षापूर्वी घेतली आहे. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून एकही रुपया न घेता प्रवेश देण्याच्या सूचना सर्व संबंधित संस्थांना देण्यात आल्या आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क संबंधित संस्थांना परस्पर देण्याची व्यवस्था होती. परंतु गेली 5 वर्षे या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करुन पैसे दिले नसल्यामुळे संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी खाजगी, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेचे व्यवस्थापक, मुख्याध्यापक यांच्याबरोबर चर्चा करुन फीची रक्कम हप्त्याहप्त्याने किंवा एकरकमी देण्याचा निर्णय घेतला.

सभापती महोदय, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने विविध योजना राबवून देखील या समाजातील साक्षरतेचे लक्ष्य पूर्ण झाले नसून राज्यात 55 टक्के आदिवासी समाज अजूनही निरक्षर असल्याचे निदर्शनास आले आहे. या समाजातील लोकांना जातीचे दाखले मिळण्यामध्ये अडचणी येत आहेत. जात पडताळणी समितीकडून मुस्लीम समाजातील लोकांची अडवणूक केली जाते. चुकीच्या पध्दतीने, अवाजवी पुराव्यांची मागणी केली जाते. 1967

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

सालातील पुराव्याची मागणी केली जाते, शाळा सोडल्याच्या दाखल्यात पोट जातीचा उल्लेख, रक्त नात्यातील नातेवाईकांच्या दाखल्याची मागणी केली जाते. अशा प्रकारे त्यांचा छळ केला जातो. जात पडताळणी समितीकडे हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. त्या समितीवर शासनाचे नियंत्रण नाही. तसेच शासकीय परिपत्रकांचे जात पडताळणी समितीकडून अंमलबजावणी होत नाही. हायकोर्टाने सुध्दा जात पडताळणी समितीवर ताशेरे ओढले आहेत. संबंधित अधिकारी व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर सामाजिक न्याय विभागाने बैठका बोलवून या समाजाच्या समस्या जाणून घ्याव्यात.

मुस्लीम मेहतर, खाटीक, मुक्री व गारुडी या जमातींना अनुसूचित जातीच्या सवलती मिळण्यासाठी राज्य शासनाने ठराव मंजूर करुन तो केंद्र सरकारकडे पाठविला पाहिजे. मागास मुस्लीमांना वेगळे संरक्षण द्यावे. राज्यातील काही विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांची आदिवासी जमातींची, इतर मागासवर्गांची केंद्र शासनाच्या यादीमध्ये नोंद नाही त्याचा समावेश होण्यासाठी शासनाने शिफारस करावी.

सच्चर समितीने राज्य शासनाला सुचविल्याप्रमाणे राज्य व केंद्र शासनाच्या योजनेतील 15 टक्के हिस्सा अल्पसंख्याकांना दिला पाहिजे, याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांनी मानसिकता बदलली पाहिजे व शासनाच्या आदेशानुसार जे अधिकारी काम करीत नसतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांच्या सोयीनुसार तालुका पातळीवर वसतिगृहे स्थापन केली पाहिजेत. शासकीय समित्या, निवड मंडळे, राज्य मागासवर्ग आयोग इत्यादी महामंडळांवर मुस्लीम समाजातील प्रतिनिधींची निवड केली पाहिजे. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत जी 10-12 मंडळे किंवा महामंडळे आहेत त्यावरील सदस्यांच्य नेमणुका ताबडतोब करुन अनुशेष भरुन काढण्यात यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो. बाकीच्या विभागांच्या किंवा समाजासाठी असलेल्या महामंडळांवरील नियुक्त्या होतील तेव्हा होतील.

अशुद्धीत प्रत / शिक्षणासाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. सुभाष चव्हाण...

महात्मा फुले विकास महामंडळ, चर्मोद्योग विकास महामंडळ अशी जी काही 7-8 महामंडळे आहेत या महामंडळावरील नियुक्त्या माननीय मुख्यमंत्र्यांना सांगून त्वरित करण्यात याव्यात. ग्रामीण भागात मुस्लीमबहुल क्षेत्रात अंगणवाड्या काढण्यात याव्यात, प्रत्येक वर्गासाठी पूर्णवेळ शिक्षक नेमण्यात यावेत. सर्वशिक्षा अभियानअंतर्गत येणा-या निधीपैकी अल्पसंख्याकाच्या शिक्षणासाठी वर्ग काढण्यात यावेत. अल्पसंख्याक शिक्षकांना अनुदानित परवानगी देण्यात यावी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रमाणे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व टयुशन फी देण्यात यावी. शिक्षण संस्थांना मूलभूत गरजासाठी रुपये 2 लाखावरुन 5 लाखा पर्यन्त निधी देण्यात यावा. मुस्लीम विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात यावेत. या वर्षी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सायकल दिलेली आहे ही अतिशय अभिनंदनीय गोष्ट आहे. मौलाना आझाद महामंडळाची मर्यादा 2 लाख आहे ती 5 लाखापर्यन्त वाढवावी. प्राथमिक व उच्च शिक्षणापर्यन्त अल्पउत्पन्न व बीपीएल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी. 15 कलमी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी अल्पसंख्याक समित्यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात याव्यात. महाराष्ट्रात 1970 साली झालेल्या निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची फी भरण्याची जबाबदारी शासनाने घेतली. अचानक 2007 पासून हा निर्णय बदलून ही फी संस्थांना देणे व त्यांच्या मार्फत ती विद्यार्थ्यांना देणे बंद करण्यात आले. दलित, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त इत्यादी समाजातील शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांवरचा बोजा राज्य शासनाने कमी करावा अशी मी कळकळीची विनंती या निमित्ताने करीत आहे. राज्य शासनाने या पूर्वी मागासवर्गीयासाठी राखीव निधी ठेवला होता. परंतु तो दुसरीकडे वर्ग केलेला आहे. राष्ट्रकुल खेळामंध्ये मागासवर्गीयांसाठी निधी वर्ग केला होता. ही बाब राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या निदर्शनास आली. खबरदार, मागासवर्गीयांच्या निधीला स्पर्श कराल तर. हे पाप आहे.

सभापती महोदय, औद्योगिक क्रांती झाली पाहिजे. मागासवर्गीय लोक उद्योगपती झाले पाहिजेत. त्यांच्यातील जातीयता, विषमता नष्ट झाली पाहिजे. 1974मध्ये चर्मोद्योग महामंडळाची स्थापना करण्यात आली. आता त्या महामंडळाचे नाव बदलून संत रोहिदास चर्मविकास महामंडळ असे केलेले आहे. दलितांचे कैवारी आणि भारताचे उप पंतप्रधान बाबू जगजीवनराम यांचे प्रमुख

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

कार्यकर्ते स्वर्गीय आमदार रा.अ.खैरे हे होते. त्यांच्या प्रयत्नाने या महामंडळाची स्थापना झालेली होती. त्यांनी त्यावेळी मोर्चे काढले होते. या महामंडळाला पहिल्यांदा दिलेले भागभांडवल 5 लक्ष रु. होते आणि आताचे वसूल भागभांडवल 467 कोटी 24 लक्ष इतके झालेले आहे. चर्मोद्योगासाठी उद्योजक, कच्च्या मालाची उपलब्धता, मालाच्या उत्पादनाची व्यवस्था, परदेशी बाजारपेठ, इत्यादी गोष्टी उपलब्ध झाल्या पाहिजेत. धारावीमध्ये चर्मोद्योग करणारे लोक जास्त आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने अंबरनाथ येथे चर्मोद्योग प्रकल्प उभा रहात आहे. त्या ठिकाणी गटई कामगारांच्या बाबतीत कोणताही विचार केलेला नाही. तेव्हा महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, चर्मोद्योग विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ या विविध महामंडळांचे कर्ज 2008 मध्ये शासनाने माफ केले. परंतु आजतागायत फक्त 280.95 कोटी रुपये कर्जफेड झालेली आहे. अजून 1500 कोटी रुपयाचे कर्ज मार्फ केलेले नाही. हे 1500 कोटी रुपयाचे कर्ज शासन केव्हा माफ करणार आहे ? ही कर्जमाफी लवकरात लवकर करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. या महामंडळांना जास्तीत जास्त भागभांडवल द्यावे. पिढयानपिढया या उपेक्षित समाजाला समाजाच्या मुख्यप्रवाहात घेता आले नाही. ज्याला शासनाच्या कोणत्याही सवलतींचा फायदा झाला नाही, ज्यांच्या घरातील कुणी शाळेचा उंबरा कधी पाहिला नाही अशा लोकांच्या कल्याणासाठी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांच्याकडे सामाजिक न्याय विभाग आहे. सामाजिक न्याय विभाग हा राज्याला दिशा देणारा असतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

आपण जातीव्यवस्था मोडून काढणार आहात की नाही ? जातीमध्येच हलका आणि भारी, अक्करमासे आणि बारमासे, 100 टक्के आणि 97 टक्के असे प्रकार आजही सुरु आहेत ते पुढेही असणार, याचा विचार होण्याची गरज आहे.

मी जिल्हा परिषदेला निवडणुकीसाठी उभे असताना तसेच मी 100 टक्के वंजारी समाजाची असल्यामुळे 97 टक्के म्हणविणाऱ्या मागासवर्गीय वंजाऱ्यांनी मतदान केले नाही. मी स्वत: जात मानत नाही परंतु माझी जात मात्र समाज विसरायला तयार नाही. माझा विश्वास नाही पण समाजही विसरण्यास तयार नाही. त्यामुळे फक्त समाजालाच शिव्या देऊन चालणार नाही तर यात बदल करण्याची गरज आहे. चातुर्वण्य जात व्यवस्था निर्माण झाली व नंतर त्यात समाजाची विभागणी होऊन कमी श्रम करणारे आणि जास्त श्रम करणारे, कमी प्रतीचे काम करणारे आणि उच्च काम करणारे असे निरनिराळे वर्ग तयार झाले. अशा प्रकारे सरंजामी राजवट कशी निर्माण होईल असेच प्रयत्न झाले. राजकारणात सुध्दा आपल्याला अशाच प्रकारची सरंजामी राजवट तयार करावयाची काय याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे. अशा प्रकारे आपली पोळी भाजून सामान्यांचा विचार कोणी करीत नाही याचा विचार करणे गरजेचे आहे. यात उच्चभ्रू समाजाला स्वत:ची मानसिकता बदलून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व्हीजेएनटी आणि अल्प संख्यांकांसह स्वत:च्या खांद्याला खांदा लावून या समाजाला सहभागी करुन घेण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. तेवढ्याच आत्मविश्वासाने सर्व मागासवर्गीय समाजाने आपल्यात जो न्यूनगंड आहे की आम्ही या उच्चभ्रू समाजाबरोबर कसे काम करायचे, त्यांच्या डोक्यात कसे जायचे, त्यांच्या घरात कसे जायचे, आम्ही स्पृश्यता कशी करायची अशी मानसिकता आहे, हा न्यूनगंड झटकून पुढे येणे आवश्यक आहे.

महोदय, शाळेत असतांना माझ्या मैत्रिणीच्या घरी मी एकदा गेले होते. तिच्या घरी गेल्यानंतर त्यांच्या घरातील पाण्याच्या माठावर माझी सावली पडणार नाही, याची दक्षता तिची आई घ्यायची. मी वकील झाल्यानंतर देखील एका वकील भगिनीच्या घरी गेले होते. ती माझ्या घरात आल्यानंतर आमच्या स्वयंपाक खोलीपर्यंत येत होती, तेव्हा मात्र माझ्या डोक्यात ती जात नव्हती पण मी तेथे गेल्यानंतर सरळ तिच्या घरी ताई-ताई करीत तिच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिने मला सांगितले की, मी सोवळ्यात आहे, तू जरा ऑफिस मध्ये बसतेस काय ? त्या

.. 2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .. .. ..

दिवसापासून आजपर्यंतही मी त्यांच्या घरी गेले नाही. असा विचार करुन आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची घटना अमान्य करायची काय, महात्मा फुले यांचा विश्वास, त्यांचा सन्मान या विचाराने जगणार नाहीत काय, डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने जगणार नाही काय, असा प्रश्न पडतो.

शाहू महाराजांनी एका कांबळे नावाच्या माणसाला कोल्हापूरच्या चौकात हॉटेल काढून दिले होते. इतर समाजाचे लोक त्याच्या हॉटेलमध्ये येणार नाही आणि त्याला अस्पृश्य समजतील म्हणून कोणी चहा पिणार नाहीत, त्याचे आर्थिक नुकसान होऊ नये हे ओळखून स्वत: शाहू महाराज त्याच्या हॉटेलमध्ये दररोज सकाळचा पहिला चहा घेत होते. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले", यालाच म्हणतात मानवता. असे सर्व आदर्श आपल्यासमोर असतानाही आज आपण कोणत्या दिशेने चाललो आहोत, याचा विचार होणे आवश्यक आहे. 24 सप्टेबर, 1874 रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तत्पूर्वी महात्माजींचे स्वप्न होते की सार्वजनिक सत्य धर्म निर्माण करणे, ते स्वप्न आपण पूर्ण करणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. मंडल आयोगाच्या शिफारसीनुसार ओबीसींसाठी जर 52 टक्के आरक्षण असेल तर 57 टक्के आरक्षण का याचा विचार करणे गरजेचे आहे. जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही, केवळ आरक्षण म्हणजेच आमचे आयुष्य असे म्हणत असू तर आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, श्रम हे सुध्दा समान मिळाले पाहिजे या सर्व बाजूंनी विचार झाला पाहिजे. मूळ समाज जो आपल्या देशात आहे तो ओबीसी असाच आहे, ही गोष्ट कोणी मानायला तयार नाही.

यासंदर्भात "मी ओबीसी बोलतोय" हे पुस्तक माझ्याकडे आहे. त्यात असे म्हटले आहे की, "समाजव्यवस्थेत व्यवसायानुसार जातीची नावे दिली गेली. सुतार, शिंपी, नाभिक, साळी, कोष्टी, कुंभार, सोनार आदि पुढे या जातींच्या आजही सर्व चालीरिती सारख्या असल्या तरी ते विविध जातीमुळे विभागलेले आहेत. म्हणजेच हे मूळ रहिवाशी नागवंशी असून व्यवसायांनी ते जातीत विभागले आहेत, राज्यात विखुरलेले आहेत. पण ओबीसींची खरी ओळख म्हणजे ओबीसींची लॉंग फॉर्म "अदर बॅकवर्ड क्लास" बरोबर ओरिजिनल भारतीय कम्युनिटी असा असला तरी ओबीसी स्वत:ला मागासलेला किंवा मूळ रहिवाशी समजत नाही, हा समाज जातीमध्ये, वर्गामध्येच

.....3

असुधारित मत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

घुटमळतो, ही फार मोठी शोकांतिका आहे. मी माझा देश, खालच्या जातीतला असे म्हणतो, का तर मी उच्च आहे, मी उच्च आणि तो खालचा. दुर्दैवाने सर्व मागासवर्गीय एकत्र येण्याची गरज आहे पण तसे न होता आपापसात भांडणे लावण्याचे काम या समाजव्यवस्थेने केले आहे म्हणून ही चळवळ पुढे जाण्यात अडथळे येतात.

(नंतर श्री. जुन्नरे .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

मागासवर्गीय जातींनी पुढे येऊ नये, त्यांनी आपापसात भांडत बसावे असे ज्यांना वाटते तेच लोक यांच्यामध्ये भांडणे लावण्याचे काम करीत आहेत. परंतु ही भांडणे मिटणे काळाची गरज आहे.

उप सभापती : या प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी 25 सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे या चर्चेसाठी जो वेळ ठरवून दिलेला आहे त्या वेळेमध्ये भाषणे पूर्ण होऊ शकणार नाहीत त्यामुळे सर्व पक्षाच्या प्रतोदांना विनंती आहे की, आपण माझ्याकडे जी नावे दिलेली आहेत ती एक तर कमी करावी किंवा सदस्यांना कमी बोलण्यास सांगावे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, ज्या सदस्यांची नावे आपल्याकडे देण्यात आलेली आहे त्या सदस्यांना विचार मांडण्यासाठी वेळ देण्यात यावा. त्यांची भाषणे पूर्ण झाली नाहीत तर शेवटची जी नावे दिलेली आहेत ती कमी केली तरी चालतील.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सद्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 63 हजार लोकप्रतिनिधी ओबीसी व मागासवर्गीयांचे आहेत. या लोक प्रतिनिधींनी स्वत:ची मानसिकता बदलून शासनाच्या योजनांचा फायदा सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम केले तरी सुध्दा या लोकांना न्याय मिळू शकतो. 1992-93 पूर्वी महाराष्ट्रातील ओबीसींसाठी 10 टक्के आरक्षण होते. परंतु 1993 मध्ये इंदर साहनी यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये रिटपिटीशन दाखल केले व सर्वोच्च न्यायालयाच्या 9 न्यायाधीशांनी 50 टक्के आरक्षणाची लक्ष्मण रेषा आखून दिली. ही जी 50 टक्क्याची लक्ष्मणरेषा आखून दिलेली आहे तिला घटनात्मक तरतूद नसतांना सुध्दा सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान करुन महाराष्ट्र शासनाने ही 50 टक्क्याची लक्ष्मण रेषा मान्य केलेली आहे. मंडल आयोग लागू होण्यापूर्वी अनुसूचित जाती 15 टक्के, अनुसूचित जमाती 7.5 टक्के असे एकूण 22.5 टक्के व बी.पी.मंडल यांनी ओबीसींना 52 टक्के तसेच एस.सी, एस.टी. प्रमाणे आरक्षण द्या अशी शिफारस केली होती. सर्वोच्च न्ययालयाच्या निर्णयाप्रमाणे जे 50 टक्क्याचे आरक्षण देण्यात आले होते त्या मधून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे 22.50 टक्के आरक्षण गेले तर खाली 27 टक्के आरक्षण रहाते. या 27 टक्के आरक्षणामध्ये एनटी (अ) साठी 2 टक्के, एन.टी.(ब)-2 टक्के, एन.टी.(क) मध्ये 2 टक्के, एस.बी.सी.मध्ये 2 टक्के व ओबीसीसाठी 19 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

महाराष्ट्रामध्ये माळी, धनगर, वंजारी व बंजारी या जातींना माधव असे संबोधले जाते. महाराष्ट्रातील 12 कोटी जनतेमध्ये 6 कोटी मागासवर्गीय आहेत व 6 कोटी मागासवर्गीयांमध्ये 2 कोटी माधव आहेत त्यामुळे यासंदर्भात आपण विचार करणार आहात की नाही ? महाराष्ट्रामध्ये साधारणत: 700 च्या वर मागासवर्गीयांच्या संघटना आहेत. या सर्व मागासवर्गीय संघटनांची मानसिकता शाहू, फुले व आंबेडकरांच्या विचारापर्यंत नेणे गरजेचे आहे. सद्या आम्हाला ज्या सवलती मिळतात त्या सर्व सवलती आर्थिक स्वरुपाच्या आहेत व त्यासुध्दा फार कमी प्रमाणात मिळतात. मंडळे, आयोग निर्माण करणे तसेच शैक्षणिक स्कॉलरशिपसाठी शासनाने जे काही पाऊल उचलले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे शैक्षणिक सवलती वाढवणे, शिष्यवृत्ती वाढविणे व आमच्या गरजा कशा भागतील यासाठी शैक्षणिक, आरोग्य विषयक, सामाजिक समता नष्ट कशी होईल त्या पध्दतीने आधार देण्याची मानसिकता ठेवून या सर्व गोष्टींची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. शिक्षण संस्था, कारखाने, बँका, विद्यापीठामध्येही आम्हाला समान अधिकार मिळाले पाहिजेत.

सभापती महोदय, नचिअप्पन कमिशनच्या ओबीसींचा अहवालातील शेवटचा पॅरा मी या ठिकाणी वाचून दाखवते. नचिअप्पन कमिशन अहवाल हा ओबीसीच्या सर्व जातींच्या हिताचा आहे तसेच नचिअप्पन हे सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील व माजी खासदार आहेत. तसेच नचिअप्पन हे पब्लिक ग्रिव्हेन्स कमिटीचे चेअरमनही आहेत. इ.स. 2006 मध्ये केंद्र सरकारला त्यांनी आरक्षणाबाबत मानवतावादी अहवाल सादर केला होता. यामुळे आरक्षणामुळे होणारा तणाव निवळेल. त्यांनी केंद्र सरकारकडे त्यांच्या अहवालात मुख्य शिफारशी खालीलप्रमाणे केलेल्या आहेत.

अ) भारतातील आरक्षणाचा वाद मिटविण्यासाठी भारतातातील असणा-या सर्व जातींना त्यांच्या संख्येनुसार आरक्षण द्यावे.

ब) 50 टक्के आरक्षणाची सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मर्यादा शेडयूल 9 चा वापर करुन काढून टाकावी.

मुळातच 50 टक्क्याची मर्यादा घटनाबाहय आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

क्रिमी लेअरची अट काढून टाकावी आणि सर्व जाती निहाय जनगणना करावी, ही मागणी आहे. मी आपल्या समोर सर्व परिस्थिती ठेवली आहे. आमच्या समाजामध्ये एकलव्याचा अंगठा काढला जातो. तसा आमच्या शिक्षणाचा अधिकार काढून घेतला जातो. वर्तमान शिक्षण पद्धतीमध्ये आम्हाला अवंचित केले जाते. अर्जूना पेक्षा कर्ण श्रेष्ठ असताना सूत पुत्र म्हणून त्याच्या विरोधात सर्व इतिहास लिहिला जातो. हे सर्व बदलण्याची गरज आहे. शासन व्यवस्था, समाज व्यवस्था, लोकप्रतिनिधी आणि सामान्य वर्ग हे सर्वजण मिळून शाहू-फुले-आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करतील व समाजाला सार्वजनिक सत्तेत आणण्याचा प्रयत्न करतील, या विषयी मला खात्री वाटते. या विषयी मी आशावादी आहे. चळवळीचा हा लढा अजून पर्यंत पुढे जाण्याची गरज.

स्वत: झालासी दगड घाव टाकीचा सोसला
अरे स्वत:मध्ये त्याले देव दिसीला दिसीला.

ही गोष्ट ओबीसींनी मान्य केली पाहिजे. आमच्या मध्ये स्वत: देव होण्याची हिंमत आहे. देव ही एक कल्पना आहे. आपल्याला देव मानणारा, माणसाला देव मानणारा, परिपूर्ण माणूस होण्याची हिंमत आहे, त्या ओबीसींचे मी स्वागत करून चळवळीला शुभेच्छा देऊन आपणा सर्वांची रजा घेते. धन्यवाद.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

या प्रस्तावामध्ये तीनच मुद्दे महत्त्वाचे आहेत. शिष्यवृत्ती कोणाला मिळते यासंबंधी मी आग्रही आहे. सदर शिष्यवृत्ती कोणाला मिळते यासंबंधी शासनाने अभ्यास केला पाहिजे, अवलोकन केले पाहिजे. शिष्यवृत्ती ज्या कुटुंबाना मिळाली आहे त्यांच्याच कुटुंबातील पाल्यांना आता पर्यंत शिष्यवृत्ती मिळत आली आहे, असे माझे म्हणणे आहे. एक विशिष्ट वर्गच याचा फायदा घेत आहे. हा वर्ग कुठला आहे ? हा शासकीय वर्ग आहे. जे शासनामध्ये सचिव दर्जावर आहेत, डॉक्टर आहेत, त्यांच्याच मुलांना जास्त प्रमाणात फायदा होतो. याचे अवलोकन व अभ्यास राज्य शासनाने करण्याची आवश्यकता आहे. जे तळातील लोक आहेत त्यांना ही सवलत मिळत नाही. जे तळातील लोक आहेत, दबलेले आहेत यांना कुठल्याही परिस्थितीत सवलती मिळाल्या पाहिजेत. त्याची आकडेवारी आम्हाला आर्थिक पहाणीद्वारे कळली गेली पाहिजे, अशी अपेक्षा या चर्चेच्या निमित्ताने मी व्यक्त करीत आहे. आज परदेशी कोण जात आहे ? सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचाच मुलगा परदेशी जात आहे. माननीय श्री.रा.सु.गवई यांचाच मुलगा परदेशी जात आहे. पण वाडीतील खालचा तळागाळातील मुलगा परदेशी जात नाही. याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष दिले पाहिजे

सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी गेल्या अधिवेशनात देखील हा प्रस्ताव आणला होता. त्यास सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, शिष्यवृत्ती ऑगस्ट महिन्याच्या आत देऊ. मार्च अखेर पर्यंत मागच्या वर्षीची शिष्यवृत्ती अद्याप पर्यंत विद्यार्थ्यांना मिळालेली नाही. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळण्याची सोय आपण केली पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बजेमध्ये तरतूद केली जाते. पण त्यावर प्रत्यक्षपणे जाणूनबुजून खर्च केला जात नाही. कालच मी जिल्हाधिकारी यांना भेटलो. त्यांनी काल ठराविक कंत्राटदरांना असलेली तरतूद फिरविण्याचे काम केले आहे. यासंबंधी मी आज संध्याकाळी बिलावर बोलताना त्याचा उल्लेख करणार आहे. मागासवर्गीयांसाठी असलेली तरतूद ज्या अधिकाऱ्यांनी खर्च केली नाही त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्याची

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

वेतनश्रेणी खंडित केली पाहिजे, त्याला पदावनत केले पाहिजे. असे कुठे तरी शासनाने आम्हाला सांगितले पाहिजे. मी येथे शेवटचा मुद्दा सांगून खाली बसणार आहे. मी आपल्याला तीन मिनिटांमध्ये भाषण पूर्ण करण्याचा शब्द दिलेला आहे.

उप सभापती : आपण एकमेकांना दिलेले शब्द नेहमीच पाळतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सभापती महोदय, आपले शब्द मी नेहमीच पाळतो असे मला वाटते.

उप सभापती : धन्यवाद.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महामंडळ हे नाटक आहे. सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे साहेब नेहमी शेळी-मेंढी महामंडळाचा उल्लेख करतात. त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. त्यांना लाल दिव्याची गाडी दिली आहे. पण या मंडळाकडे पेट्रोल भरण्यासाठी देखील पैसे नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना स्वत:च्या पैशातून पेट्रोल भरावे लागत आहे. ही कसली महामंडळे आहेत, त्यांना तरतूद नाही. पैसे नाहीत. सर्वच आमदारांना लाल दिव्याची हौसच आहे ना मग उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, दिल्ली येथे सर्व आमदार ज्याप्रमाणे लाल दिव्याची, निळ्या दिव्याची गाडी घेऊन फिरतात त्याप्रमाणे आपल्या येथेही त्यांना अशी सोय उपलब्ध करून द्यावी.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

मी उत्तर प्रदेशमध्ये जाऊन आलो, तेथील महामंडळाच्या गाडयांवर लाल दिवा लावलेला आहे. तसेच, त्या गाडयांमध्ये पेट्रोल देखील महामंडळामार्फत भरले जाते. परंतु आपल्या राज्यामध्ये या महामंडळांची जी चेष्टा सुरु आहे ती थांबविली गेली पाहिजे. आपण अनेक सन्माननीय सदस्यांना महामंडळावर अध्यक्ष म्हणून नियुक्त केले आहे, त्यांना लाल दिव्याची गाडी दिली आहे. ती गाडी देत असतांना गाडीमध्ये इंधन भरण्यासाठी देखील शासनाने तरतूद केली पाहिजे. आज शेळी-मेंढी विकास महामंडळाच्या वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी आपण तरतूद केली आहे काय? शासनातर्फे तरतूद केली जात नाही या बाबत गेल्या पाच वर्षापासून माननीय सदस्य या सभागृहामध्ये आवाज उठवीत आहेत. जर आपल्याला इंधनासाठी तरतूद करावयाची नसेल तर ही महामंडळे आपण रद्द केली पाहिजेत.

उप सभापती : लाल दिव्याची गाडी ही त्यांच्यासाठी नसून ती शेळया-मेंढयांसाठी आहे. मी देखील त्यांच्या गाडीमध्ये बऱ्याच वेळा बसलो आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही सुरु असलेली चेष्टा थांबविण्याकरिता कुठे तरी या बाबत चर्चा झाली पाहिजे. माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मांडलेल्या ठरावाबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. ते दर वर्षी ठरावाच्या माध्यमातून शासनाचे अभिनंदन करीत असतात. या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला एकच विनंती करावयाची आहे की, ऑगस्ट महिन्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांपर्यन्त किंवा त्या विद्यालयापर्यन्त शासनाची शिष्यवृत्ती पोहोचली पाहिजे. त्या बाबत शासनाने या सभागृहामध्ये स्पष्टपणे आश्वासन द्यावे अशी या चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी एक अतिशय चांगला विषय सभागृहामध्ये मांडला आहे त्याबद्दल मी पहिल्यांदा त्यांचे अभिनंदन करतो.

माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त सभागृहातर्फे अभिष्टचिंतन

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांचा आज वाढदिवस असल्यामुळे सभागृहातर्फे त्यांचे अभिष्टचिंतन झाले पाहिजे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांचा आज वाढदिवस आहे. सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, सभागृहाने माझे अभिष्टचिंतन केल्याबद्दल मी सभागृहातील सर्व माननीय सदस्यांना धन्यवाद देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागास वर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे

मु.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे या विषयावर सर्वश्री. सुभाष चव्हाण, हेमंत टकले,भाई जगताप, विनायक मेटे,उल्हास पवार,रमेश शेंडगे,जयप्रकाश छाजेड,प्रकाश बिनसाळे,राजन तेली,सतीश चव्हाण,मोहन जोशी, किरण पावसकर, प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी,श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री.एम.एम.शेख, एस.क्यू.जमा, ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या ठरावाच्या निमित्ताने मला दोन-तीन महत्त्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. आज या राज्यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता जी वसतिगृहे बांधण्यात आलेली आहेत त्यांची झालेली अवस्था आपण पाहिली पाहिजे. त्या वसतिगृहांकरिता नियमितपणे निधीचे वितरण होत नाही. महागाईच्या प्रमाणात तो निधी वाढवून मिळत नाही. त्या वसतिगृहामध्ये असलेले अधीक्षक व इतर कर्मचारी वर्गासाठी वेतनश्रेणी वाढवून दिली जात नाही. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शासनाने निर्माण केलेली सुविधा यामध्येच जर आपण धन्यता मानणार असाल तर ते बरोबर होणार नाही. जर आपल्याला खरोखरच त्या वसतिगृहामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हित करावयाचे असेल तर त्यांना आपण सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्या सुविधा त्यांच्यापर्यन्त पोहोचतात की नाहीत हे सुध्दा पाहण्याची आवश्यकता आहे. आपल्या समाज कल्याण खात्यामधील झारीतील शुक्राचार्य असलेले अधिकारी किंवा संस्थाचालक हे जर त्या विद्यार्थ्यांना सुविधा मिळू देत नसतील तर त्यांच्याविरुध्द कडक उपाय योजना केली पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे ज्यावेळी सुरु करण्यात आली त्यावेळची स्थिती पाहिल्यानंतर आज त्यांची अवस्था दिवसें दिवस खालावत चालली आहे. तेथील विद्यार्थ्यांनी अनेक आंदोलने केली तरी सरकारने त्यांना दाद दिली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. भगवानराव साळुंखे.....

माझे मित्र माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी सुध्दा गेल्या वर्षी त्या विद्यार्थ्यांचे आंदोलन हातामध्ये घेतले होते परंतु त्याला सुध्दा सरकारकडून प्रतिसाद मिळाला नाही.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा की, महाराष्ट्र शासनाने एक चांगली गोष्ट केली आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. एमसीव्हीसीच्या विद्यार्थ्यांकरिता शासनाने आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांना ज्या ज्या सुविधा दिल्या जातात त्या त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. मधल्या मध्येच त्या कुठेतरी हडप होत असतात. ही गोष्ट या सदनामध्ये अनेक आयुधांच्या माध्यमातून लक्षात आणून देण्यात आली आहे. मध्यंतरी शासनाने विद्यार्थ्यांची पट पडताळणी बाह्य यंत्रणेमार्फत केली. तशाच प्रकारे या आश्रमशाळांची सुध्दा शासनाने अचानकपणे तपासणी करण्याची आवश्यकता आहे. तसे केले तर त्या आश्रमशाळांमध्ये, वसतिगृहामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे जे प्रचंड शोषण सुरु आहे ते आपल्या लक्षात येईल. त्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधा लाभार्थ्यांना न मिळता संस्थाचालक मात्र कमाई करीत आहेत हे दिसून येईल. त्या शाळा म्हणजे पान मळा म्हणून वापरल्या जात आहेत. मी या बाबतीत सर्वच संस्थां चालकांवर टीका करु इच्छित नाही. आश्रमशाळा चांगल्या प्रकारे चालविणारे देखील संस्था चालक आहेत त्यांचे मी त्रिवार अभिनंदन करतो. त्यांचा गैरफायदा जे लोक घेत आहेत त्यांच्याविरुध्द शासनाने कडक उपाय योजना केली पाहिजे. या करिता ही बाब मी शासनाच्या लक्षात आणून देत आहे

त्याचप्रमाणे आदिवासींकरिता दोन प्रकारच्या आश्रमशाळा सुरु आहेत. यामध्ये एक आश्रमशाळा ही आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने चालविली जाते आणि दुसरी आश्रमशाळा खाजगी संस्थांच्या माध्यमातून चालविली जाते. गेल्या वर्षी मोठया प्रमाणावर आदिवासींकरिता चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांच्या मान्यता काढून घेण्यात आल्या.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे . . ..

या बाबत माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते साहेबांना कडक निर्णय घ्यावा लागेल. याबाबतीत अनेक वेळा चर्चा झाल्यानंतर त्यातून थोडी परिस्थिती सुधारली. परंतु अजून ती पूर्णपणे सुधारलेली नाही. म्हणून यामध्ये अशी फारकत करण्यात आलेली आहे की, खाजगी शिक्षण संस्थांच्या आदिवासी मुला-मुलींच्या ज्या आश्रमशाळा आहेत, त्यांच्यावर चांगल्या प्रकारे निगराणी करणे, तसेच त्याठिकाणी सर्व सुविधा पोहोचत आहेत की नाही हे पहाणे आणि त्यामध्ये जर कोणी गैर मार्गाचा वापर करीत असेल तर त्या आश्रमशाळा संबंधितांकडून काढून घेऊन आदिवासी विकास महामंडळाला जोडता येतील काय किंवा अन्य काही उपाययोजना करता येतील काय हे पहाण्याची गरज आहे. माझ्या स्वत:च्या मतदार संघातील आश्रमशाळा मी पाहिलेल्या आहेत. आदिवासी विकास महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेल्या ज्या आदिवासींच्या शासकीय आश्रमशाळा आहेत, त्यामध्ये सुध्दा तेथील लाभार्थींना काही सुविधा दिल्या जात नाहीत. तेथे असलेला कर्मचारी वर्ग, शिक्षक किंवा मुख्याध्यापक वगैरे असतील ते देखील गैरफायदा घेत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर देखील चांगल्या प्रकारचे नियंत्रण ठेवण्याची नितांत गरज आहे हे देखील मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, अनुसूचित जातीच्या आश्रमशाळा, केंद्रीय आश्रमशाळांसाठी राज्य शासनाने गेल्या वर्षी 14 कोटी 13 लाख 40 हजार रुपयांची तरतूद केली आणि राज्य शासनाच्या अधिपत्याखाली 100 शाळा बांधण्याची प्रक्रिया सुरु आहे.याबाबतीत शासनाने घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे हे मान्य करुन देखील महाराष्ट्रामध्ये 288 केंद्रीय आश्रमशाळा या गेल्या दहा वर्षापासून सुरु आहे आणि त्या खाजगी शिक्षण संस्थांच्या आहेत. त्यातत्या ज्या आश्रमशाळा चांगल्या नाहीत त्याकडे जरुर दुर्लक्ष करावे.परंतु बाकीच्या आश्रम शाळांना मात्र अनुदान दिले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि वेळेअभावी मी माझे भाषण येथेच थांबवितो. मात्र मला भाषण करण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

. . . .एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी एक अतिशय महत्वाचा विषय चर्चेसाठी मांडण्यात आलेला आहे आणि त्याबद्दल मी प्रथम सन्माननीय सदस्य श्री.सुभाषजी चव्हाण यांचे मनापासून अभिनंदन करते.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही फुले-शाहू-आंबेडकर व संत महंतांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे.या सर्व महापुरुषांच्या व संतांच्या चळवळीमुळे पूर्ण भारताला नव्हेतर संपूर्ण जगाला मानवतेचा संदेश दिलेला आहे. मानवता येण्यासाठी समता प्रस्थापित झालीच पाहिजे यासाठी या भूमीमध्ये अथक प्रयत्न करण्यात आले आहेत. याचाच परिपाक म्हणून क्रांतीबा ज्योतिराव फुले यांच्या संकल्पनेतील सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे स्वप्न आज साकार झाले आहे काय ? आम्ही फुले-शाहू-आंबेडकरवाद स्वीकारण्याऐवजी मनुवाद स्वीकारला आहे काय असा एक महत्वाचा प्रश्न समाज व्यवस्थेमध्ये निर्माण झालेला आहे.या राज्यात ओबीसींची संख्या 52 टक्क्यांपेक्षा जास्त असून सुध्दा त्यांना फक्त 27 टक्के आरक्षण दिलेले आहे आणि ओबीसींवर जाणीवपूर्वक अन्याय करण्यात आलेला आहे असे मला वाटते. मी केंद्र शासनाचे मनापासून अभिनंदन करते. कारण त्यांनी एक ऐतिहासिक आणि क्रांतीकारक असा निर्णय घेतला की, ओबीसींची जनगणना करण्यात यावी. कारण खरोखरच एकदा दूध का दूध आणि पानी का पानी व्हावयाची गरज आहे. कोण म्हणते ही संख्या 52 टक्के आहे तर कोणी म्हणते की ही संख्या कमी आहे. आमचे म्हणणे असे आहे की, आता ओबीसींची संख्या 60 टक्क्यापर्यंत पोहोचलेली आहे. त्यामुळे ज्या प्रमाणात ओबीसींची संख्या आहे किंवा ज्या प्रमाणात जो समाज आहे, त्याप्रमाणात संबंधितांना रिझर्वेशन मिळावे अशी माझी याठिकाणी मागणी आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य अनेक विषयांवर बोलले आहेत. पण आमच्यावर जात पडताळणीमुळे जे अन्याय होत आहेत, तो विषय घेऊन मी प्रामुख्याने बोलणार आहे. कारण आता माझ्यासमोर आकडेवारी आहे आणि काही वर्षांपूर्वी एक जी.आर.निघाला होता की, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी यांचा ओबीसी मध्ये समावेश करण्यात यावा. पण त्यामुळे ओबीसी समाजाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. म्हणून तो जी.आर.रद्द करण्यात यावा अशी मी याठिकाणी प्रामुख्याने मागणी करीत आहे. आता माझ्याकडे जी आकडेवारी आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर अनेक ठिकाणी एकही ओरिजनल ओबीसी उमेदवार निवडून आलेले नाहीत. मग आपला महाराष्ट्र कुठे चालला आहे? आपल्या सर्वांच्या स्वप्नातील तसेच महात्मा फुले यांच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी . . ..

स्वप्नातील जो महाराष्ट्र होता, तो हाच आहे काय ? मी याठिकाणी सांगू इच्छिते की, अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये 20 ओबीसींच्या जागा होत्या पण त्याठिकाणी 20 कुणबी समाजाचे प्रतिनिधी निवडून आलेले आहेत.ओबीसींच्या अठरापगड जाती आहेत. 250 ते 300 जातींपैकी तुम्हाला याठिकाणी एकही ओबीसी उमेदवार मिळाले नाहीत काय? त्याठिकाणी सगळे कुणबी समाजाचे उमेदवार कसे निवडून येतात? पुणे महानगर पालिकेमध्ये 44 पैकी 25 कुणबी समाजाचे उमेदवार आहेत. याबाबतीत माझ्याकडे संपूर्ण आकडेवारी आहे. याबाबतीत राजकीय नेत्यांनी देखील विचार करण्याची गरज आहे की, ओबीसी समाज कुठे गेला ? मग आपल्या महाराष्ट्रात ओबीसी समाजच नाही काय? कुणबी समाजाला आरक्षण देण्यात येऊ नये असे आमचे अजिबात म्हणणे नाही. पण कोणी जर आमच्या हक्कावर गदा आणली तर ती आम्ही सहन करणार नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी...

गेल्या अनेक वर्षापासून या समाजाचा आवाज दबला गेला आहे. तेव्हा त्यांचा आवाज दबण्याची कारणे शोधण्याची आवश्यकता आहे.(अडथळा) ज्याचे जळते त्यालाच ते कळते आपल्याला आमच्या वेदना कशा समजणार ?

सभापती महोदय, सन 2001 मध्ये शासनाने जातपडताळणी सबंधी ॲक्ट मंजूर केला आहे. हे काम न्यायालयीन स्वरुपाचे असून या बाबत आजवर उच्च न्यायालय आणि सुप्रीम कोर्टाचे निकाल आलेले आहेत. त्यामुळे या प्रकाशामध्ये चर्चा झाली पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, राज्यात एकूण 25 जात पडताळणी समित्या काम करीत आहेत. अलीकडेच शासनाने कामाचा वाढलेला बोजा लक्षात घेऊन काही नवीन समित्या स्थापन केल्या आहेत. तथापि, या समित्यां मधील कर्मचाऱ्यांना व समितीतील सदस्य मग त्यामध्ये चेअरमन असतील, सदस्य सचिव असतील त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिलेले नाही. परिणामी प्रमाणपत्र देताना अनेक चुका होतात. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार असे प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे. तेव्हा शासनाने "यशदा" संस्थेमार्फत जात पडताळणी समितीमध्ये काम करणाऱ्या सर्वांना प्रशिक्षण द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या समितीचे अध्यक्ष अतिरिक्त जिल्हाधिकारी असतात. त्यांच्याकडे इतर कामांचा ताण भरपूर असतो आणि या कामासाठी त्यांना कमी वेळ देण्यात येतो. तेव्हा या कामाचे क्वासी ज्युडिशिअल स्वरुप लक्षात घेता या समित्यांच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायाधींशांची नियुक्ती करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, राज्यात दरवर्षी सुमारे चार ते पाच लाख जातपडताळणी प्रमाणपत्रे द्यावी लागतात. हे पाहता या कामाचे कर्मचारीनिहाय मूल्यमापन करुन त्या प्रमाणात शासनाने कर्मचारी वर्ग पुरविल्या शिवाय गरजूंना वेळेवर प्रमाणपत्र मिळणार नाहीत. आज वर्षानुवर्षे काही प्रकरणे प्रलंबित आहेत. तर काही प्रकरणे राजकीय वा आर्थिक कारणाने एका दिवसात निकाली काढली जातात. तेव्हा इतरांवरील हा अन्याय दूर केला पाहिजे. त्यासाठी "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" हेच तत्व वापरले जावे अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी...

सभापती महोदय, या सर्व कामांचे संगणकीकरण करुन हे काम ऑनलाईन असावे जेणेकरुन त्यामध्ये अधिक पारदर्शकता येईल.

सभापती महोदय, माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या कामाची पाहणी करण्या संदर्भात "सुमोटू" लक्ष घालून शासनाला त्या बाबत एक वर्षापूर्वीच निर्देश दिले होते. त्या प्रमाणे शासनाने उच्चाधिकार समिती स्थापन केली. या समितीच्या काही बैठका देखील झाल्या. परंतु अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. तेव्हा शासनाने या उच्चाधिकार समितीला आपले काम दोन महिन्यात पूर्ण करावे अशा सूचना द्याव्यात अशी मी शासनाला विनंती करते. प्रत्येक मागासवर्गीयांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.परंतु या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, असत्य प्रमाणपत्र जातपडताळणी समितीकडून रद्द होतात. परंतु दरम्यानच्या काळात त्यास उच्च न्यायालयात आव्हान देऊन वेळ काढला जातो. परंतु तांत्रिक करामतीच्या आधारे पाच वर्षे सत्ता भोगून झालेली असते. तेव्हा अशी असत्य प्रमाणपत्रे देणाऱ्यांना आणि घेणाऱ्यांना कठोर कारावासाची शिक्षा करण्याची तरतूद कायद्यामध्ये केली पाहिजे त्या शिवाय या गोष्टींना आळा बसणार नाही असे मला येथे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, जातपडताळणी संबंधीची बाब अनेक न्यायालयीन निकालांनी अधिक गुंतागुंतीची बनलेली आहे. तसेच शासनाने अनेक जी.आर.काढलेले आहेत त्यामुळे देखील किचकटपणा वाढलेला आहे. ओबीसी जातींच्या बाबतीत 1967 चे पुरावे पाहिले जातात. परंतु कुणबी-मराठा, मराठा-कुणबी यांच्या बाबतीत 1920 च्या आधीचे पुरावे मागवून त्यांच्या बाबतीत भेदभाव आणि पक्षपात केला जात आहे. जो काही नियम असेल तो दोघांच्या बाबतीत सारखाच असावा त्या मध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करु नये. माधुरी पाटील प्रकरणाचा सोयीस्कर आणि एकांगी अर्थ लावून ही कार्यपध्दती वापरली जाते ती बंद झाली पाहिजे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी...

सभापती महोदय, या वर्षी या कामात लाखो रुपयांच्या उलाढाली झाल्याच्या चर्चा वर्तमानपत्रातून व चॅनेलवरुन कान्ी आल्या. तेव्हा अशा गोष्टींना पायबंद घालण्यासाठी जातपडताळणी समितीच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, वेगवेगळ्या जात पडताळणी समित्या परस्परविरोधी भूमिका घेताना दिसतात. समजा पुण्यातील समितीने एखाद्याचे जात प्रमाणापत्र अवैध ठरविले तर तो नाशिकमध्ये जाऊन प्रमाणपत्र मिळवितो. तेव्हा या जातपडताळणी समित्यांमध्ये सुध्दा एकसूत्रीपणा व ताळमेळ रहावा यासाठी शासनाने एक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करुन,

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

सर्व समित्यांचे कामकाज संगणकीकरणामार्फत जोडून ते या अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिल्यास विरोधाभास व विसंगती दूर करुन सर्व समित्यांमध्ये एकसूत्रीपणा आणता येईल. एका समितीने प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर लगेच तो माणूस दुसरीकडे जातो या गैरप्रकारांना पायबंद बसायला हवा.

समित्यांच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी आणि या समित्यांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर सहा सदस्यांची एक "इन्स्पेक्शन समिती" स्थापन करण्यात यावी.या समितीचे उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेले न्यायमूर्ती अध्यक्ष असावेत आणि या समितीवरील 6 सदस्यांपैकी किमान चारजण, ओ.बी.सी., भटके, विमुक्त अनुसूचित जाती यातील प्रत्येकी एक प्रमाणे मागासवर्गीय असावेत. तसेच हे सर्व सदस्य माननीय उच्च न्यायालयात किमान पंधरा वर्षांचा अशा केसेस चालविण्याचा अनुभव असलेलेच असावेत. बनावटरित्या तयार करुन मिळणाऱ्या अनधिकृत प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी अधिकृत प्रमाणपत्रांवर क्रमांक घालण्यात यावा, त्यावर एन्ब्लेम कोरावा, लॅमिनेशन करुनच ही प्रमाणपत्रे दिली जावीत आणि एस.एस.सी. बोर्ड किंवा पासपोर्ट ऑफिस ज्या प्रमाणे कागदपत्र इश्यू करताना काळजी घेतात तशी काळजी घेतल्या शिवाय बाजारात उपलब्ध होणाऱ्या प्रमाणपत्रांना पायबंद घालता येणार नाही.

सभापती महोदय, आज एक अतिशय महत्त्वाचा विषय सभागृहासमोर चर्चेला आलेला आहे. या ठिकाणी मला एक सांगावेसे वाटते आणि ती अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. आमच्या ओबीसी समजापैकी एका अधिकाऱ्याने पुणे शहरामध्ये फार मोठी रक्कम घेऊन एका दिवसात कागदपत्रे दिलेली आहेत. ती रक्कम ऐकली तर आपल्याला आश्चर्य वाटेल. अशा प्रकारे कागदपत्रे अपूर्ण असताना 'खोटी' प्रमाणपत्रे कशी काय देण्यात येतात? या ठिकाणी 'खोटी' हा शब्दच वापरणे उचित होईल कारण वर्षानुवर्ष ओरिजनल लोक प्रमाणपत्र मागतात पण त्याना लाईनमध्ये उभे केले जाते आणि जेथे आर्थिक व्यवहार होतो तेथे मात्र ही प्रमाणपत्रे ताबडतोब दिली जातात तेव्हा हे बंद झाले पाहिजे अशा प्रकारची विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद, जयहिंद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु केलेली आहे त्याबद्दल मी त्यांना प्रथम धन्यवाद देतो.

सभापती महोदय, समाजिक समता, सामाजिक न्याय, प्रत्येकाला समान शिक्षण व संधी मिळण्याच्या दृष्टीने, मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्याची नितांत आवश्यकता आहे आणि त्या दृष्टिकोनातून सुधारणा करणे आवश्यक आहे. या संदर्भात आतापर्यंत महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने खूप प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण संचालनालयामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व्ही.जे.एन.टी, ओ.बी.सी. व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण व्हावी, त्यांना शिक्षणाची संधी मिळावी, त्यांना शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती आणि विविध योजना राबविण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनामार्फत चांगले काम होत आहे. मात्र दोन-दोन वर्षे शिष्यवृत्ती दिली जात नाही त्यामुळे महाविद्यालयाच्या माध्यमातून निकाल राखून ठेवले जातात. शिष्यवृत्ती ऑन लाईन पध्दतीने देण्यास सुरुवात करण्यात आली मात्र ही पध्दती देखील त्रासदायक ठरलेली आहे. बँकेत खाते उघडण्यासाठी इंटरनेट असावे लागते पण ही इंटरनेटची सुविधा बऱ्याचशा महाविद्यालयात आणि विद्यालयात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना खाजगी संगणक केंद्रावर जावे लागते. त्या ठिकाणी 100 ते 150 रुपये भरुन फॉर्म भरावा लागतो पण त्या फॉर्ममध्ये त्रुटी दाखविल्या जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागते.

सभापती महोदय, बँकेमध्ये शून्य बॅलन्सवर खाते उघडून देण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे परंतु विद्यार्थ्यांना अनेक वेळा बँकेकडे फेऱ्या माराव्या लागतात व त्यांच्याच शिष्यवृत्तीमधून 100 ते 250 रुपये कापले जातात. ओ.बी.सी., अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात जी यंत्रणा राबविण्यात येत आहे तीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. एक तर विद्यालयात, महाविद्यालयात इंटरनेटची व्यवस्था करणे आवश्यक आहे किंवा पूर्वीच्याच पध्दतीने शिष्यवृत्ती देण्याची व्यवथा करण्याची आवश्यकता आहे. समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून, शासनाच्या माध्यमातून शिष्यवृत्तीच्या संदर्भात खूप मोठया प्रमाणात खर्च करण्यात येत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनावणे ...

सर्वांना मोफत शिक्षण आणि शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्याची संधी महाविद्यालयांना किंवा विद्यालयांना संधी दिली आणि त्या ठिकाणच्या स्टाफला प्रशिक्षण दिले तर विद्यार्थ्यांना होणारा त्रास होणार नाही असे मी या निमित्ताने सूचवू इच्छितो. ओबीसींच्या प्रमाणप्रत्रांच्या संदर्भामध्ये किंवा ओबीसींना आरक्षणामध्ये जे प्रमाण दिलेले आहे त्या आरक्षणाच्या संख्येच्या संदर्भात तशा प्रकारची संधी दिली गेली पाहिजे. कुणबी समाज असेल, मराठा समाज असेल, त्यांचा देखील हक्क आहे. ओबीसींना 52 टक्केपर्यंत आरक्षण देणे आवश्यक आहे, असे मला वाटते. त्या पध्दतीने यामध्ये सुधारणा करण्यात यावी आणि प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश आणि शालेय साहित्य देण्याची व्यवस्था आपल्या शासनाच्या माध्यमातून केली जाते परंतु त्याला विलंब होतो. वर्ष संपेपर्यंत विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. तो लाभ वेळेच्या आधी मिळण्याची व्यवस्था होणे अत्यंत गरजेचे आहे. वसतिगृहामध्ये देखील विद्यार्थ्यांना ज्या प्रमाणात सुविधा मिळावयास पाहिजेत त्या सुविधांपासून त्यांना वंचित राहावे लागते. त्या सुविधा देण्याच्या संदर्भात आणि त्यांना चांगल्या सुविधा मिळण्याच्या बाबतीत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. त्याचप्रमाणे जात प्रमाणपत्राचा विषय फार महत्वाचा आहे. जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये जो काही विलंब होतो त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशापासून तसेच त्यांना मिळणाऱ्या सवलतींपासून वंचित राहावे लागते. या संदर्भात देखील लक्ष देणे आवश्यक आहे. ज्या पध्दतीने हेलपाटे मारावे लागतात, त्या ठिकाणी ज्या पध्दतीची उत्तरे मिळतात, जी पैशाची अपेक्षा केली जाते त्यामुळे या नागावलेल्या विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही. जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात अनेक कटू अनुभव येताना दिसतात. एखाद्या कुटुंबामध्ये भावाला प्रमाणपत्र मिळाले असेल तरी दुसऱ्या भावाला प्रमाणपत्र मिळत नाही. रक्ताचे नाते असेल, कागदपत्रे बरोबर असतील तरीही त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विचार न करता विलंब केला जातो त्यामुळे लाभार्थ्याला संधी मिळत नाही. या संदर्भात जो काही कामाचा बोजा आहे तो कमी करण्याच्या संदर्भात जिल्हा स्तरावर जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यालये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे ...

उघडणे नितांत गरजेचे आहे. मी या निमित्ताने विनंती करु इच्छितो की, जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारची कार्यालये निर्माण करावीत.

सभापती महोदय, मागासर्गीयांच्या कल्याणाच्या संदर्भामध्ये शासनाच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तसेच केंद्र शासन, राज्य शासन, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या तरतुदी होतात परंतु त्या खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांना मिळतात का हा भाग देखील महत्वाचा आहे. त्यामध्ये फारच कमी खर्च होतो. अखर्चित रक्कम परत जात असते. अशा पध्दतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि संधी मिळण्यासाठी जास्तीत जास्त त्यांच्यापर्यंत लाभ कसे मिळतील याची व्यवस्था व्हावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो. मागासवर्गीयांसाठी जी महामंडळे आहेत त्या आठ-दहा महामंडळांच्या संदर्भामध्ये फार कमी प्रमाणात निधी मिळत असतो. त्यांना निधीची चांगली उपलब्धता करुन दिली तर त्यामुळे जास्तीत जास्त मागासवर्गीयांना संधी मिळेल. अशा पध्दतीच्या जर आपण सुधारणा केल्या तर निश्चितपणे वंचित असलेला जो मागासवर्गीय समाज आहे त्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी शोषित, आणि पिछड्या वर्गांचा प्रश्न पुन्हा एकदा या सभागृहात उपस्थित केला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. यामध्ये तक्रार आहे ती वाट्याची. जी संख्या आहे तितका वाटा सत्तेत, शिक्षणात किंवा कोणत्याही क्षेत्रात मिळत नाही, ही मुख्य तक्रार आहे. मग जात पडताळणीपासून शिष्यवृत्तीपर्यंत सगळ्या तक्रारी असल्या तरी वाटा न मिळण्यासंबंधीची जी व्यवस्था आहे ती अशा प्रकारे केली जाते. हे अडथळे का निर्माण केले जातात ? हे अडथळे आपली व्यवस्थाच निर्माण करते.

सभापती महोदय, शासनाच्या नोकरीमध्ये ओबीसींसाठी जे आरक्षण मंडल आयोगाने दिलेले आहे ते राज्य सरकारने पूर्ण केलेले नाही. यशवंतरावजी चव्हाण यांची जन्म शताब्दी आपण साजरी करीत आहोत. यशवंतरावजी चव्हाण यांनी राज्य स्थापन करीत असताना हे राज्य कोणासाठी आहे, हे स्वच्छपणे सांगितले होते. आपण किती वाटा त्या वर्गापर्यंत पोहोचविला हे या सभागृहाला सांगण्याची आवश्यकता आहे. शिक्षणात किती वाटा दिला, नोकरीमध्ये किती वाटा दिला, व्यवसायाच्या क्षेत्रात किती वाटा दिला आणि अन्य जी क्षेत्रे आहेत त्या क्षेत्रात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, भटके विमुक्त यांना किती वाटा दिला या संदर्भातील श्वेत पत्रिका राज्य शासनाने काढावी अशी सर्वप्रथम मागणी करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फी माफीची सवलत दिली जाते असे शासनाकडून सांगितले जाते. प्रत्यक्षात व्यावसायिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठी शासनाकडून एक रुपयाही सवलत दिली जात नाही. या वर्गातील विद्यार्थ्यांना 50 टक्के शैक्षणिक शुल्काची सवलत असल्याची भाषा केली जाते. परंतु मान्यताप्राप्त कोर्सेसच्या यादीचे वर्षअखेरीस एक परिपत्रक काढले जाते. ज्या कोर्सेससाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेला असतो त्याची फी महाविद्यालयाकडून स्वीकारली जात नाही आणि वर्षाच्या शेवटी फी भरावी त्यांना असे सांगितले जाते. हा मोठा अन्याय आहे. यामध्ये ताबडतोब सुधारणा झाली पाहिजे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये व अन्य भागामध्ये विद्यार्थ्यांची आंदोलने झालेली आहेत. प्रवेश घेत असताना आम्हाला फी माफ आहे असे सांगितले गेले होते, परंतु वर्षअखेरीस शिष्यवृत्ती दिली जाणार नसल्यामुळे फी भरावी असे सांगितले आहे असे या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. म्हणून शासकीय महाविद्यालयात किंवा शासनमान्य संस्थेमध्ये कोणत्याही जातीतील मागासवर्गीय विद्यार्थी असतील त्यांची पूर्ण फी माफ केली पाहिजे. त्याची हमी शासनाने घेतली पाहिजे. यासंबंधी आजच सभागृहात घोषणा करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अल्पसंख्याक समाजातील लोकांसंबंधी सभागृहाचे लक्ष वेधले आहे. या समाजातील समुहाने काळाच्या ओघामध्ये अन्य धर्म कबूल केले आहेत ते इतर धर्मात गेले म्हणून सवलती नाकारल्या जातात हे होता कामा नये. महाराष्ट्र शासनाने यापूर्वी दोन मोठे निर्णय घेतलेले आहेत. माननीय श्री.शरदराव पवार हे मुख्यमंत्री असताना त्यांनी इतर मागासवर्गासंबंधी स्वच्छ निर्णय घेतला होता की, धर्माचे बंधन न घालता जे ज्या प्रवर्गातील आहेत त्या त्या प्रवर्गात असलेल्या जातीच्या लोकांना सर्व सवलती मिळाल्या पाहिजेत. सवलत मागासवर्गीय जातीला दिली जाते, धर्माला दिली जात नाही. धर्माचे बंधन न घालता मागासवर्गीयांना सवलती दिल्या पाहिजेत. त्याची काळजी घेण्याची आवश्यकता

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

आहे. 1950 पर्यंत अनुसूचित जातीतील अन्य धर्मीयांना सवलती मिळत होत्या. परंतु 1950 साली प्रेसिडिन्शिअल ऑर्डर्समुळे त्या सवलती मिळणे बंद झाले. 1934 ते 1950 पर्यंत अनुसूचित जातींना सवलती मिळत होत्या. पण ज्यांचा धर्म वेगळा होता त्यांच्या सवलती नंतर बंद करण्यात आल्या. महाराष्ट्रात तरी किमान त्यांना या सवलती देण्याची व्यवस्था केली पाहिजे. केंद्र सरकारला तशी शिफारस केली पाहिजे की, या समाजाला सवलती दिल्या पाहिजेत.

काही जातींचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी केला. मेहतर, भंगी, मुक्री, जातघर या दलित जाती आहेत. या जातीच्या लोकांचा धर्म वेगळा आहे. काही जातीच्या लोकांचा धर्म कोणता आहे ते सांगता येणार नाही. राज्यात काही जाती अशा आहेत की, रात्री देवीपुढे लग्न लावतात आणि सकाळी निकाह केला जातो. या सगळया जमातींच्या लोकांना ते त्या जमातीचे आहेत असे गृहित धरुन त्यांना सवलती दिल्या पाहिजेत. कारण त्यांचा धर्म कोणता आहे ते त्यांनाही आणि शासनालाही माहिती नाही. अशा वेळी धर्माची तपासणी न करता मग मातंग समाजातील लोक असोत किंवा अन्य समाजातील लोक असोत त्यांना त्या सवलती दिल्या पाहिजेत.

जाती पडताळणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी. शाळेत प्रवेश मिळण्यापूर्वी विशिष्ट मुदतीत जात पडताळणी प्रमाणपत्र योग्य कारणाशिवाय दिले नाही तर संबंधित अधिकारी जबाबदार राहतील असे आदेश काढणे आवश्यक आहे. जाणीवपूर्वक त्या विद्यार्थ्यावर अन्याय केला असेल, त्याच्याकडे पैसे मागितले असतील तर त्या अधिकाऱ्यांना जबर शिक्षा झाली पाहिजे याची काळजी घ्यावी अशी मागणी करतो आणि येथे थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अतिशय संवेदनशील विषयावर या सदनाचे सन्माननीय सदस्य व आमचे मित्र श्री.सुभाष चव्हाण यांनी चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी या विषयाला वाचा फोडण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न केलेला आहे आणि आज पुन्हा ते प्रयत्न करीत आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक या समाजातील लोकांच्या संवेदनशील प्रश्नावर चर्चा होत असल्यामुळे या विभागांशी संबंधित असलेल्या सर्व मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे अपेक्षित आहे. (अडथळा) सन्माननीय आदिवासी विकास राज्यमंत्री आता सभागृहात उपस्थित झाले आहेत.

सभापती महोदय, मी विधानसभेच्या सभागृहात आणि याही सभागृहातही या विषयावर माझे मत मांडलेले आहे. या समाजातील लोकांना सामाजिक न्याय देण्याची सर्वांची मानसिकता आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आपण पाहिले तर आपल्या रेकॉर्डवर किंवा अर्थसंकल्पात या सगळया गोष्टींसाठी तरतुदी केलेल्या आहेत. परंतु ह्या तरतुदी त्या घटकापर्यन्त पोहोचतात का, त्या पोहोचत नसतील तर मध्ये झारीतील शुक्राचार्य कोण आहेत, त्यांच्यावर कारवाई का होत नाही ? हे खरे महत्वाचे प्रश्न आहेत.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी फक्त एक दोन मुद्देच मांडणार आहे. आदिवासी विभाग आणि शिष्यवृत्ती या विषयावरच मी बोलणार आहे. अन्य सन्माननीय सदस्यांनी बाकीच्या प्रश्नांवर या ठिकाणी भाष्य केलेले आहे. आपल्या राज्यामध्ये 1991 सालापासून आदिवासी विकास विभागासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते. ही तरतूद 8.9 टक्के इतकी आहे. माननीय मंत्री महोदयांना या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, यामध्ये दोन गोष्टी आहेत. ही तरतूद साधारणत: 3700 कोटीच्या दरम्यान आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ही तरतूद 3700 कोटी आणि मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ही तरतूद 3400 कोटी इतकी आहे. आपण अशा प्रकारे 1991 ते 2012 पर्यन्तची आदिवासी विकास विभागासाठी करण्यात आलेली तरतूद पाहिली तर ती 25 हजार कोटी रुपयापर्यन्त किंबहुना त्याही पेक्षा अधिक झालेली असेल. या सगळया आदिवासी कुंटुंबांची एकूण संख्या लक्षात घेतली तर प्रत्येक कुटुंबाच्या नावावर जर 25-30 कोटी रुपये ठेवले असते तर त्यांना आयुष्यभर कसलीही ददात पडली नसती. मग हा आदिवासी विकास विभाग कशासाठी आहे ? या विभागासाठी केलेली तरतूद कोठे खर्च होते, ज्या अदिवासींना ख-या अर्थाने मदतीची गरज आहे त्यांना ती दिली जाते काय ? आता मायक्रोन्यूट्रीन गोळया आश्रमशाळेला देण्याची काय गरज होती ? आश्रमशाळांना बाकीच्या सर्व सुविधा दिल्या जातात. मग हा खर्च तेथे दाखवून ते पैसे जातात कुठे, याचा कुठे तरी शासन विचार करणार आहे की नाही ?

आम्ही समतेच्या गोष्टी करतो. सर्व विभागांना त्यांच्या कामामध्ये एक दिशा ठरवून दिलेली आहे. त्या दिशेने आपण जाण्याचा प्रयत्न करतोय का ? आदिवासींसाठी केलेली तरतूद ख-या अर्थाने त्यांच्या पर्यन्त पोहोचते काय ? या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. मायक्रोन्यूट्रीन गोळया असो किंवा ब्लॅन्केट असो. आपल्याकडे अनेक विभाग आहेत. डोंगरी विभागासाठी काही सुविधा शासनाने दिलेल्या आहेत. आश्रमशाळांसाठी देखील सोईसुविधा शासनाने निर्माण केलेल्या

..2..

श्री. भाई जगताप...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. मी एक उदाहरण देतो. आश्रमशाळांतील मुलांना संगणकाचे ज्ञान व्हावे म्हणून संगणक खरेदी करण्यात आले. पण संगणक शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नाहीत. या संगणक खरेदीच्या बाबतीत मी तर असे म्हणेन की, त्यामधील भ्रष्टाचार हा शेकडो कोटींच्या घरात जाईल. आपण छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करीत असतो आणि तो करणे आवश्यक आहे. या महात्म्यांनी समाज घडविण्याचा आपल्याला मंत्र दिलेला आहे. त्या मंत्रानुसार आपण वाटचाल करतो का हे आपण जाणणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, आता एक नवीन प्रथा निर्माण झालेली आहे. आदिवासी विकास विभाग असेल, सामाजिक न्याय विभाग असेल, या विभागांना दिलेले पैसे वाचवून ते दुसरीकडे वळविले जात आहेत. जर अशा प्रकारे पैसे वळविण्यात येत असतील तर मग त्या विभागासाठी तरतूदच कशासाठी केली जाते ? याला जर काही स्पेसिफिक कारणे असतील तर त्यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

मी 1991 पासूनची माहिती विचारणार नाही, परंतु गेल्या पाच वर्षात आदिवासी विभागाला प्रत्यक्षात किती निधी दिला गेला आणि त्यापैकी किती निधी खर्ची पडला याची माहिती मंत्रीमहोदयांनी सभागृहाला द्यावी. आश्रमशाळा असतील, शैक्षणिक योजना असतील, आदिवासींच्या उत्थानासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्या माध्यमातून किती निधी खर्च केला याची आकडेवारी मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. आदिवासी विभागासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात 8.9 टक्के बजेट मंजूर केले जाते. परंतु ख-या अर्थाने त्यातील किती रक्कम खर्ची पडते हा महत्वाचा विषय आहे.

सभापती महोदय, शिष्यवृत्तीबाबत शासनाने घोषणा केल्यानंतर आम्ही आमची पाठ थोपटून घेतली. वृत्तपत्रात रकाने भरुन बातम्या प्रसिध्द झाल्या. प्रत्यक्षात काय घडते याची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. जात पडताळणीचा विषय असेल, शिष्यवृत्तीचा विषय असेल, हे सर्व एकमेकाशी निगडित विषय आहेत. शिष्यवृत्ती हवी असेल तर जात पडताळणीचा विषय येतो. जात प्रमाणपत्राची पडताळणी करायची म्हणजे कागदपत्रे सादर करण्याचा प्रश्न येतो. प्रत्येक वर्षी जवळजवळ लाखो विद्यार्थ्यांना या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेला सामोरे जावे लागते. या व्यवस्थेमध्ये सुसूत्रीकरण करण्यात येणार आहे की नाही? विकास गतीशील झाला पाहिजे असे आम्ही वारंवार म्हणतो. या व्यवस्थेमध्ये एक खिडकी योजना असली पाहिजे असे कधीतरी ठरविणार की नाही? आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्याक विकास विभागामध्ये या व्यवस्थेसाठी दहा दहा टेबले निर्माण केली आहेत. या टेबलावर बसणारे जे अधिकारी आहेत त्यांना कोणती जबाबदारी दिली? जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत निवडणुका आल्या की धावपळ केली जाते. कारण वेळेवर जात प्रमाणपत्र सादर करावे लागते. अन्यथा चार वर्षे त्या संदर्भात कोणी लक्ष द्यायला तयार नाही. जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विशिष्ट असे धोरण निश्चित करुन एक खिडकी योजना असली पाहिजे. कायद्यामध्ये याची तरतूद आहे. ठराविक कालावधीत जात प्रमाणपत्राची पडताळणी झाली पाहिजे, अन्यथा ते दिले गेले असे ग्राह्य धरले जावे अशा प्रकारची कायद्यात तरतूद आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत असल्याचे मला तरी आठवत नाही. या तरतुदीची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी महिना, दोन महिने कालावधी ठरवून दिला पाहिजे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवून दिल्यानंतर 15 दिवसात कागदपत्रांची पूर्तता केली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

परंतु जी कागदपत्रे सादर करावयाची असतात ती मिळविण्यासाठी दुसऱ्या विभागाकडे पाठपुरावा करावा लागतो. त्या ठिकाणी पैसे दिल्याशिवाय कागदपत्रे मिळत नाहीत. म्हणून आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्याक विकास विभागांना या प्रक्रियेसाठी जो निधी उपलब्ध करुन दिला जातो तो निधी संबंधितांपर्यंत पोहोचत नाही. मधल्या मध्ये हजारो कोटी रुपये गायब होतात, भ्रष्टाचार होतो असा आरोप केला तर तो अनाठायी ठरु नये.

सभापती महोदय, गोंदिया आणि भंडारा जिल्हयामध्ये आदिवासी समाजाचे प्रमाण फार आहे. तेथील आदिवासी समाज चरितार्थासाठी विड्या वळण्याचे काम करतो. या समाजातील मुलांसाठी कामगार विभागाने बिझिनेस बिडी कार्ड योजना सुरु केली. फक्त गोंदिया जिल्हयामध्ये 3714 बिझिनेस बिडी कार्ड तयार करण्यात आले. अधिकारी वर्ग किती हुशार असतो याचे एक उदाहरण मी सभागृहाला देऊ इच्छितो. त्यांनी या संदर्भात तत्परता दाखविली. या योजनेत पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 250 रुपये, पाचवी ते सहावीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 840 रुपये, दहावीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 1880 रुपये आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 2440 रुपये मिळतात. मला खेदाने सांगावेसे वाटते की.....

नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

3714 कार्ड्समध्ये जवळपास निम्मे कार्ड्स बोगस असल्याचा निष्कर्ष शासनानेच काढलेला आहे....

उप सभापती : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ मी पाच मिनिटांसाठी वाढवित आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते की, या लोकांसाठी शासन सर्वच प्रकारे तरतूद करीत असते, त्यांचा विकास व्हावा म्हणून प्रयत्न करीत असते परंतु प्रशासन अणि अधिकाऱ्यांमध्ये अशा प्रकारच्या प्रवृत्ती बळावत चालल्या आहेत की, एखाद्या विभागासाठी तरतूद केल्यानंतर ती आपल्याकडे कशी येईल, त्यातील पैसे आपल्याला कसे मिळतील असाच विचार या पुरोगामी महाराष्ट्रात, शाहू फुले आणि आंबेडकरांच्या महाराष्ट्रात होत आहे हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. कष्टकरी, आदिवासी, सर्वसामान्य माणसाठी शासनाकडून जी तरतूद केली जाते ती कशी लुटता येईल असाच विचार प्रकर्षाने होताना दिसतो. समाज कल्याण आयुक्तांच्या माध्यमातून या बोगस कार्डांची सखोल चौकशी करुन त्यात जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर केवळ वार्षिक वेतनवाढ रोखणे एवढी मर्यादित कारवाई न करता निलंबनाची कारवाई करावी अशी मी विनंती करतो. जेणेकरुन इतर अधिकाऱ्यांमध्ये दबदबा निर्माण होईल व समाजात देखील असा संदेश जाईल की, भ्रष्टाचार करणाऱ्यांची हे शासन गय करीत नाही.

महोदय, अल्पसंख्यांक समाजाच्या बाबतीत सभागृहात विषय निघतो तेव्हा अत्यंत वाईट वाटते. सच्चर समितीच्या नावाने आपण नेहमीच बोलत असतो. मी असे म्हणणार नाही की, अल्पसंख्यांकांना 15 टक्के आरक्षण द्या किंवा 10 टक्के आरक्षण द्या. पण किमान एक टक्का देखील आरक्षण त्यांच्यासाठी असू नये ही खेदाची बाब आहे. एखाद्या वर्गासाठी आपण जी तरतूद करतो ती त्या वर्गाची लोकसंख्या, त्या समाजाची लोकसंख्या विचारात घेऊनच करीत असते, मग अल्पसंख्यांकाचा कोणत्याही बाबतीत विचार होऊ नये ही खेदाची बाब आहे. त्यांच्यासाठी केवळ कागदावरच योजना आखल्या जातात की काय अशीही शंका या निमित्ताने येते, म्हणून शासनाने आपल्या कारभारात संपूर्णत: पारदर्शकता आणण्याची गरज आहे. कारण या लोकांच्या बाबतीत वेगवेगळ्या योजना केवळ कागदावर न ठेवता भरीव अशी तरतूद केली पाहिजे. तसेच या तरतुदीचा योग्य प्रकारे विनियोग कसा होईल याचाही विचार झाला पाहिजे अशी विनंती करतो आणि मला संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

नंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक 11.45 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 11.35 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन 1991 ते सन 2000 या कालावधीत बिगर नेटसेट कार्यरत अधिव्याख्यातांना नेटसेटमधून कायमची सूट देवून त्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून गृहित धरण्याबाबत

(1) * 25585 श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण , डॉ.दीपक सावंत , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.दिवाकर रावते , श्री.परशुराम उपरकर , श्री.किसनचंद तनवाणी , श्री.गोपीकिसन बाजोरिया : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन 1991 ते सन 2000 या कालावधीत बिगर नेटसेट कार्यरत अधिव्याख्यातांना नेटसेटमधून कायमची सूट देऊन त्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून गृहित धरण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या पत्रानुसार कार्यवाही करण्याबाबत प्राध्यापक महासंघ, शिक्षक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत दिनांक 16 नोव्हेंबर, 2011 रोजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्या बैठकीत ठरविण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) तसेच राज्यातील किती प्राध्यापकांना या निर्णयाचा लाभ होणार आहे,

(4) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (1) होय.

(2) सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहेत :-

(i) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.16 व 26 ऑगस्ट, 2011 च्या पत्रान्वये सन 1991 ते सन 2000 पर्यंतचे बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना सरसकट नेट/सेट मधून सूट दिल्याचा निर्णय घेतला. या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त करण्याची कार्यवाही त्वरित करावी.

(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील बिगर नेट/सेट अध्यापकांना CAS चे लाभ त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अनुज्ञेय करावयाचे झाल्यास राज्य शासनावर किती आर्थिक भार येईल, याबाबतची माहिती संचालक उच्च शिक्षण यांनी त्वरीत सादर करावी.

(iii) उक्त माहिती प्राप्त होताच प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावी.

(3) सुमारे 4173 अध्यापकांना लाभ होणार आहे.

(4) व (5) बिगर नेट/सेट अध्यापकांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आयोगासोबत विचारविनिमय सुरु आहे. तसेच सदर निर्णयामुळे अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्यामुळे वित्त विभागाशी सल्लामसलत करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25585....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना मी प्रथम असे विचारू इच्छितो की, सदर लेखी उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री.राजेश टोपे : नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, 16 नोव्हेंबर 2011 रोजी बैठक झाली होती. जवळ जवळ 4 महिन्यांचा कालावधी झालेला आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, आम्ही वित्त विभागाशी सल्लामसलत करीत आहोत, आयोगाकडे विचारणा करीत आहोत. सरकार तोंडी सल्लामसलतीवर चालते काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. राज्यातील पाच हजार प्राध्यापकांचा प्रश्न आहे. विद्यापीठाच्या आज परीक्षा सुरू आहेत. बी.ए.बी.कॉम.च्या परीक्षा सुरू आहेत. हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आता त्यांनी उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार घातला आहे. गेल्या वेळी देखील त्यांनी 45 दिवस संप केला होता. सदर अधिवेशन संपण्यापूर्वी या सर्व प्राध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून धरण्यासबंधी आयोगाने 15 मार्चच्या पत्रानुसार कळविले आहे. त्यानुसार हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेणार आहात काय, असा माझा दुसरा प्रश्न आहे. प्राध्यापकांचे महिन्याला जवळपास 25 ते 30 हजार रूपयांचे नुकसान होत आहे. हा अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. तो मंत्रिमहोदयांना देखील माहिती आहे. यामध्ये त्यांची पोटतिडीक आहे. माननीय अर्थ मंत्री आपलेच आहेत. त्यांच्याकडे तातडीने फाईल घेऊन जावी. वाटल्यास, आम्ही आपल्या सोबत येऊ. तेव्हा या संबंधीचा जी.आर.अधिवेशन संपण्यापूर्वी शासन काढणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी 15 मार्च च्या UGC च्या पत्राचा उल्लेख केला आहे. पत्र आले आहे. या पत्रातील चार ओळी मी सभागृहाच्या पटलावर ठेवू इच्छितो. या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, "With reference to your letter No-MIS-2011, dated 2nd December, 2011 on the subject cited above, I am directed to inform you that the actual date of effect for grant of exemption to a particular candidate shall be the date of exemption actually granted by the Universities to the concerned candidate appointed on regular basis."या पत्राप्रमाणे आमच्या विभागावर फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार पाडणार आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्रं.25585....

श्री.राजेश टोपे....

त्यामुळे सदर प्रस्ताव आम्ही वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविला असून त्यानंतर या बाबत कॅबिनेटमध्ये मान्यता घेण्यात येईल. तद्नंतर या संबंधीचा जी.आर.निर्गमित करण्यात येईल.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना मला दोनच प्रश्न विचारावयाचे आहेत. दि. 16 व 26 ऑगस्ट, 2011 च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.19.9.1991 ते 30.9.2000 या कालावधीमधील सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने 15 मार्च रोजी शासनाला निर्देश देण्यात आले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासनामार्फत शासन निर्णयाव्दारे या शिक्षकांना कॅश इन ॲडव्हान्स स्किमचा (CAS) फायदा देण्यात येणार आहे काय, त्या बाबत तत्काळ निर्णय घेऊन सन 1991 ते 2000 या कालावधीतील त्यांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकामधून सूट देणार काय, त्याचप्रमाणे 35 हजार प्राध्यापकांची शासनाकडे असलेली थकबाकी केव्हा देणार आहात?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना मी सांगितले आहे. त्याला जोडून माननीय सदस्यांनी प्राध्यापकांच्या थकबाकीबाबत प्रश्न विचारला आहे. या दोन्ही प्रश्नांबाबत शासनाचे एवढेच म्हणणे आहे की, यामध्ये वित्तीय भार असल्यामुळे केवळ जी.आर. निर्गमित करुन हा प्रश्न सुटणार नाही. त्या करिता वित्त विभागाची सुध्दा मान्यता आवश्यक आहे. या संदर्भात मंत्री मंडळाने सुध्दा यापूर्वी निर्णय घेतले होते. या बाबत यु.जी.सी. कडून आलेल्या पत्रानुसार सेवा नियुक्ती दिनांकापासून किंवा नियमित सेवा नियुक्ती दिनांकापासून त्यांची सेवा ग्राह्य धरण्यासंदर्भात आणि थकबाकीची रक्कम देण्यासंदर्भात आज माझ्या विभागाच्या वतीने वित्त विभागाकडे आणि मंत्री मंडळाकडे हा प्रस्ताव नेण्यात येईल . या बाबत जेवढे लवकरात लवकर करता येईल ते करण्याचा माझा प्रयत्न राहील. सभापती महोदय, शेवटी यामध्ये मंत्री मंडळाचा अधिकार राहणार आहे. याचे कारण मंत्री मंडळामध्ये यापूर्वी या संदर्भात काही निर्णय घेण्यात आलेले आहेत. मंत्री मंडळाने असे निर्णय घेतले होते की, जे नेट सेट झालेले नाहीत त्यांनी दोन वर्षाच्या कालावधीत नेट सेट पूर्ण करावे, तोपर्यन्त त्यांच्या पे-स्केलमध्ये वाढ करु नये, तोपर्यन्त त्यांना नोकरीवरुनही काढण्यात येऊ नये.. त्यामुळे या प्रस्तावाला मंत्री मंडळाची जरुर मान्यता घ्यावी लागणार आहे. म्हणून शासनामार्फत मी या सभागृहाला आणि माननीय सदस्यांना जरुर सांगू इच्छितो की, शासनाला या गोष्टीचे महत्व वाटत असल्यामुळे मी स्वत: देखील या बाबतीत खूपच सकारात्मक भूमिका घेतली आहे. यु.जी.सी. ने जे निर्देश दिले आहेत त्यानुसार राज्य शासनाकडून कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, छापील उत्तर आणि माननीय मंत्र्यांनी आता सभागृहामध्ये दिलेले उत्तर यामध्ये फरक असल्यामुळे पुन्हा गोंधळ निर्माण झाला आहे. छापील उत्तरात असे म्हटले आहे की, "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.16 व 26 ऑगस्ट, 2011 च्या पत्रान्वये सन 1991 ते 2000 पर्यंतचे बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना सरसकट नेट/सेटमधून सूट दिल्याचा निर्णय घेतला". अशाप्रकारचा निर्णय कां घेण्यात आला, नेट/सेटमधून त्यांना सूट देणे शासनाला भाग पडण्यासारखी कोणती परिस्थिती निर्माण झाली? तुम्ही एकदा निर्णय घेतल्यानंतर त्यांना अर्धवट कपडे घालून कशासाठी फिरवीत आहात? तुम्ही आता सांगितले की, "त्यांनी दोन वर्षाच्या कालावधीत नेट/सेट करावे" म्हणजेच मंत्रिमंडळाने या बाबत ठोस निर्णय घेतलेला नाही. त्या करिता आपल्याला पुन्हा मंत्री मंडळाकडे प्रस्ताव घेऊन जावे लागेल. अशाप्रकारे अर्धांगवायू आल्यासारखे निर्णय कशासाठी घेत आहात? हे सभागृहाला समजले पाहिजे.

सभापती महोदय, आपणाकडून या सभागृहाला संरक्षण मिळाले पाहिजे. ज्यावेळी आपण मंत्री मंडळापुढे प्रस्ताव घेऊन जाणार म्हणून सांगत आहात त्यावेळी वित्त विभागाची मान्यता घेणे वगैरे सर्व सोपस्कार पूर्ण करुन मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन आजच्या आज त्याची अंमलबजावणी केली जाईल असे कां सांगत नाही? आपण आता मंत्रीमंडळाची मान्यता घेतल्यानंतर पुन्हा वित्त विभागाकडे प्रस्ताव घेऊन जाल त्यावेळी वित्त विभागाकडून त्रुटींची पाचर मारली जाईल, त्यांच्याकडून काही त्रुटी काढल्या जातील, म्हणूनच मंत्री मंडळाने घेतलेला निर्णय आजपासून अंमलात आणला जाईल अशाप्रकारचा निर्णय आपण कां घेत नाही? पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय घेतला तर पुन्हा थकबाकीचा प्रश्न निर्माण होतो. या बाबतीत आपण एकदा काही तरी निर्णय घेतला पाहिजे. या ठिकाणी 35 हजार प्राध्यापक अशा मानसिकतेला येऊन पोहोचले आहेत की, ते विद्यार्थ्यांना शिकविणे हा आपला व्यवसाय मानू लागले आहेत. तुम्ही आम्हाला देता कां? नाही तर आम्ही संपावर जाऊ, अशाप्रकारे सरकारला धमकीवजा इशारा देणारी परिस्थिती दुर्दैवाने निर्माण झालेली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यातून अत्यंत दुर्दैवी परिस्थिती विद्यार्थ्यांची तयार होईल म्हणून आपण याबाबतीत कशा प्रकारचा ठोस निर्णय घेणार आहात याची माहिती द्यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्येष्ठ आहेत. मी एवढेच सांगेन की, अध्यापक किंवा प्राध्यापक यांच्या संदर्भातील सेवाशर्ती आहेत. त्यांचे क्वॉलिफीकेशन यु.जी.सी.ठरवित असते आणि हा यु.जी.सी.चा अंतिम अधिकार आहे. हे 1991 ते 1999 चे प्रकरण असून ते का थांबले होते तर याला यु.जी.सी.ने त्यांना एक्झम्शन देणे आवश्यक आहे आणि ते यु.जी.सी.ने एक्झम्शन दिल्यामुळे त्याठिकाणी 431 कोटी रुपयांचा जो अंदाजित भार पडणार आहे त्याकरता या सगळया गोष्टींची मान्यता घ्यावी लागेल. त्यादृष्टीकोनातून आपण आज मंत्रिमंडळासमोर जाऊन ते लवकरात लवकर करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, याठिकाणी वित्त विभागामध्ये सल्ला मसलती बाबत म्हटलेले आहे. दुसऱ्या बाजूला महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघटना 16 तारखेपासून कामावर बहिष्कार टाकत आहेत. याबाबतीत अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी जर कदाचित अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेण्या बाबत आश्वासन दिले आणि ते जर झाले नाही तर एवढया मोठ्या सभागृहाचा तो अपमान होईल म्हणून मी लवकरात लवकर असे म्हटले आहे.पण अधिवेशन संपल्यानंतर 10-15 दिवसाच्या आत-बाहेर आपण लवकरात लवकर निर्णय घेऊ. कॅबिनेटला सभागृहाच्या कामकाजाबाबत प्राधान्य असते. पण जेथे या प्रश्नाला एवढा उशीर लागला आहे. ठीक आहे अजून महिना-दोन महिने लागतील पण ठीक आहे. याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भातील निर्णय यु.जी.सी.घेते. यु.जी.सी.ने आपल्याला 16 व 26 ऑगस्टच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे ज्या तारखेला कळविले असेल त्या तारखेपासून सूट देण्याबाबत कोणती अडचण येत आहे? जर नेमणुकीच्या दिनांकापासून सूट द्यावयाची झाली तर आर्थिक भार वाढतो. परंतु ज्या तारखेला सूट देण्याबाबत कळविण्यात आले आहे, त्या तारखेपासून सर्वांना सूट देण्यामध्ये काय अडचण आहे?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25585 . . ..

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्या पासूनच सूट देण्यामध्ये काही अडचण नाही. आमच्या समोर असा प्रश्न होता की, जर एक्झम्शन द्यावयाचे असेल तर ते कोणत्या तारखेपासून द्यावयाचे आणि त्यासाठी यु.जी.सी.ने 26 ऑगस्टच्या पत्रानुसार त्याबाबत क्लॅरिफीकेशन दिलेले आहे की, ते डेट ऑफ रेग्युलर अपॉईंटमेंटपासून द्यावे आणि आम्ही त्या अनुषंगाने प्रस्ताव पाठवित आहोत. प्रश्न फक्त एवढाच आहे की, याचा जो आर्थिक भार आहे त्यासाठी मान्यता लागेल आणि ती मान्यता घेण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे यामध्ये कोणताही निगेटीव्ह विषय नाही. फक्त यामध्ये आर्थिक भार असल्यामुळे त्याकरता मंजुरी घेण्यासाठी वेळ लागत आहे आणि प्रोसीजरप्रमाणे फायनान्स विभागाचा हा विषय आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या प्रश्नाबद्दल पोटतिडीक आहे याची आम्हाला जाणीव असल्याने याबद्दल आम्ही आपले आभारही व्यक्त करतो.परंतु पहिले पत्र येऊन देखील आता 9 महिने झाले. तसेच दुसरे पत्र येऊनही 15 दिवस झाले आहेत. त्यामुळे आज तरी सदरहू प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे काय ? आता अधिवेशन संपण्यास 20 दिवस राहिलेले आहेत, त्यापूर्वी माननीय मंत्री महोदय मंत्रिमंडळासमोर जाऊन याबाबतीत निर्णय घेणार आहेत काय ? तसेच या प्रस्तावाबाबत आजची स्थिती काय आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधातील सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या भावना, त्यांची पोटतिडीक कळते. याबाबत मी त्यांना एवढेच सांगेन की, 15 मार्च रोजी पत्र आले. यापूर्वी यु.जी.सी.कडून जी पत्रे आली होती, त्यामध्ये बरेचसे कन्फ्युजन होते. पण त्या सगळयांचा संदर्भ देऊन आमच्या विभागाने यु.जी.सी.ला विचारले आणि यु.जी.सी.ने त्याबाबतीत जो खुलासा केला, तो आमच्याकडे 15 मार्च रोजी म्हणजे आठ दिवसापूर्वी प्राप्त झाला. तोपर्यंत याचा एकंदर किती भार पडेल यादृष्टीने आम्ही अंदाज केलेला आहे. त्यामुळे आता आमचा विभाग यासंबंधातील पूर्ण प्रस्ताव पाठविण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचा आग्रह लक्षात घेऊन अधिवेशन संपण्यापूर्वी आमच्या विभागाकडून फायनान्स विभागाकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25585...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मागील पाच अधिवेशानत तत्कालीन ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी अनेकवेळा हा विचारलेला आहे. मला आठवते की, या पाच वर्षाच्या काळात बहुसंख्य वेळा माननीय मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर दिलेले आहे. मागील अनेक वर्षापासून प्राध्यापकांची ही मागणी आहे आणि त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी, माननीय मंत्री महोदयांची चर्चा देखील केलेली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविल्यास तो रिजेक्ट होऊ शकतो. आता माननीय मंत्री महोदय उत्तर देऊन वेळ मारुन नेतील. कारण या पूर्वी देखील त्यांनी अनेकदा आश्वासन दिलेले आहे. तेव्हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, पुढील अधिवेनशापूर्वी शासन आदेश निर्गमित करेल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्ना संदर्भात सभागृहाच्या भावना तीव्र आहेत, जिव्हाळ्याच्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पुढील अधिवेशनाच्या आत निर्णय व्हावा. तेव्हा त्या दृष्टीने निश्चितपणे 100 टक्के प्रयत्न केले जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय सरकारच्या वतीने उत्तर देतात. तेव्हा माझा विभाग संबंधित विभागाकडे फाईल पाठवेल असे सांगणे योग्य नाही. कारण माननीय मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांनी एकदा सांगितले होते की, मंत्री महोदयांना असे उत्तर देता येणार नाही. त्यांनी सरकार म्हणून एकत्र उत्तर दिले पाहिजे. त्यांना असे तुटक तुटक उत्तर देता येणार नाहीत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सरकार म्हणून आम्ही ते करु असे सांगितले पाहिजे. तेव्हा या बाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्ना बाबत शासनाकडून पुढील अधिवेशनाच्या अगोदर निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील कष्टकरी विद्यार्थ्यांकरिता रात्र कनिष्ठ महाविद्यालय चालू करण्याबाबत

(2) * 25673 श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील कष्टकरी विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडीत होऊ नये यासाठी रात्रशाळांना जोडून अनुदानित रात्र कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी रात्र प्रशाला मुख्याध्यापक संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(2) या मागणीचे स्वरुप काय व त्याबाबत शासनाने काय विचार केला आहे,

(3) शासनाने याबाबत निर्णय न घेतल्यामुळे दिवसा काम करणारी मागासवर्गीय, दुर्बल आणि अल्पसंख्य वर्गातील मुलांचे शिक्षण संपुष्टात येत आहे हे खरे आहे काय,

(4) असल्यास, ते खंडीत होऊ नये याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) व (2) अशा प्रकारची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(3) व (4) मुंबई मध्ये एकूण 40 रात्र उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिक्षण घेत असून पुरेशी विद्यार्थी संख्या आहे. सन 2011-12 या शैक्षणिक वर्षात नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना परवानगी देण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रात्रशाळांना जोडून अनुदानित रात्र ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यास परवानगी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरात 150 हून अधिक रात्रशाळा आहेत. या शाळांमध्ये कष्टकरी मुलांसाठी पुढील शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली ज्युनिअर कॉलेजेस नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, मुंबईमध्ये एकूण 40 रात्र उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. म्हणजे आणखी शाळांची गरज आहे हे सरकारने मान्य केलेले आहे. माझा प्रश्न आहे की, ज्या रात्रशाळांनी अनुदानित ज्युनिअर कॉलेजेसची मागणी केलेली आहे त्यांची मागणी जून पूर्वी मान्य करण्यात येईल काय ? शासनावर याचा जास्त भार पडणार नाही. कारण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25673....

श्री.कपिल पाटील....

सकाळच्या कॉलेजसाठी 100 रुपये द्यावे लागत असतील तर रात्रीच्या कॉलेजसाठी 50 रुपये द्यावे लागणार आहेत. अर्ध्या खर्चामध्ये रात्रीची ज्युनिअर कॉलेजेस चालतात. त्यामुळे शासनाचा खर्च निम्म्यावर येतो. तेव्हा शासन माझ्या मागणीचा विचार करेल काय ? तसेच खालच्या इयत्तामधील तुकड्यांतील गळतीमुळे त्या इयत्ता बंद झालेल्या आहेत. दुसरी बाब म्हणजे अनेक रात्र विद्यालयांमधील शिक्षक हे ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकविण्यासाठी पात्र आहेत. पूर्वी आपण त्यांना शिकविण्यासाठी परवानगी दिली होती. तेव्हा या शिक्षकांना तशी परवानगी दिली तर शासनाच्या खर्चामध्ये आणखी बचत होऊ शकेल. तेव्हा रात्री शिकणाऱ्या आणि दिवसा आपले कुटुंब चालविणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पुढे सुरु रहावे यासाठी रात्रीची ज्युनिअर कॉलेज देण्याची व्यवस्था सरकार करेल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मुंबईमध्ये एकूण 40 रात्र उच्च माध्यमिक शाळा/ कॉलेजेस आहेत. त्यापैकी 24 शाळा अनुदानित असून त्या शाळांमध्ये 104 तुकड्या आहेत. 16 शाळा कायम विनाअनुदानित असून त्या शाळांमध्ये 36 कायम विनाअनुदानित तुकड्या आहेत. या सर्व शाळांमध्ये एकूण 7 हजार 271 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु त्या शाळांची कपॅसिटी 8 हजार 320 आहे. उच्च माध्यमिक शाळांतील अनुदानित 104 तुकड्यांमध्ये 5 हजार 884 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तेव्हा मागणी जास्त आणि पुरवठा कमी असे नाही. अनुदानित विद्यालये उपलब्ध आहेत आणि रात्रीच्या शाळा कॉलेजेसमध्ये कपॅसिटीप्रमाणे विद्यार्थ्यांची संख्या पूर्णपणे भरलेली नाही. तेव्हा ती कॉलेजेस पुरेशी आहेत असे शासनाचे मत आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25673. . . .

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, 24 संस्थांना अनुदान देण्यात येत आहे आणि 16 संस्थाना अनुदान देण्यात येत नाही. या 16 संस्थांना अनुदान देणार काय? मुंबई बाहेर देखील रात्रशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्याच्या संदर्भात शासन विचार करील काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक 24 नोव्हेंबर, 2001 ला कायम विनाअनुदान तत्वावर शाळा आणि उच्च प्राथमिक शाळा देण्याच्या संदर्भात निर्णय झाला होता. त्यानंतर सन 2009 मध्ये प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचा 'कायम' हा शब्द काढण्यात आला पण उच्च माध्यमिक शाळांचा 'कायम' हा शब्द काढण्यात आलेला नाही. कारण हे विद्यार्थी 6 ते 14 वयोगटातील नसल्यामुळे तसा निर्णय घेण्यात आलेला नाही. ज्युनिअर कॉलेजेसचा बृहत आराखडा तयार होत आहे. या निर्णयाला जोडून उच्च माध्यमिक शाळांचा निर्णय घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे त्या संदर्भातच मी आज नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यामुळे मी या विषयाच्या संदर्भात प्रश्न विचारण्याची विशेष अनुमती मागतो. या निमित्ताने माझ्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचे उत्तर मिळू शकेल.

सभापती : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचे उत्तर आता मिळाले तर नियम 289 अन्वये देण्यात आलेली प्रस्तावाची सूचना रद्द करणे गरजेचे आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कोणत्याही आयुधाच्या माध्यमातून हा विषय मार्गी लागणे आवश्यक आहे. मुंबईत ज्या रात्रशाळा खाजगी संस्थांकडून चालविल्या जात आहेत त्यांना स्वत:च्या इमारती नसल्यामुळे या रात्रशाळा महापालिकेच्या इमारतींमध्ये भाडयाने सुरु आहेत. वेतनेत्तर अनुदान बंद झाल्यामुळे या रात्र शाळांचे भाडे थकलेले आहे साधारणत: 28 लाख रुपयांची ही थकबाकी आहे. एका बाजूला शसनाकडून पैसे मिळत नाही आणि दुसऱ्या बाजूला या संस्थाजवळ पैसे नाहीत त्यामुळे त्या हे भाडे भरु शकत नाहीत. म्हणून महानगरपालिका प्रशासनाने या सर्व शाळांना या शाळा बंद करण्याच्या संदर्भात किंवा तातडीने भाडे भरण्यात यावे अन्यथा आम्ही भाड्याने दिलेली जागा काढून घेऊ अशा प्रकारच्या नोटिसेस दिलेल्या आहेत. या निमित्ताने मी सन्माननीय मंत्री महोदयांकडून जाणून घेऊ इच्छितो की, महापालिका प्रशासनाने रात्र शाळा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ D/

ता.प्र.क्र.25673. .

श्री. रामनाथ मोते...

बंद करण्याच्या संदर्भात किंवा भाडे वसुलीच्या संदर्भात ज्या नोटिसेस दिलेल्या आहेत त्या तातडीने थांबविणार का, त्यांचे वेतनेत्तर अनुदान रखडले असल्यामुळे त्यांना अशा प्रकारच्या नोटिसेसना सामोरे जावे लागत आहे, या संदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या बाबतीत माहिती घेण्यात येईल आणि उचित कार्यवाही करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, इतर शाळांना जो नियमित अभ्यासक्रम आहे तशाच प्रकारचा अभ्यासक्रम रात्र शाळांना आहे का ? रात्र शाळेत शिकणारी सर्व कष्टकरी व श्रमकरी मुले आहेत त्यामुळे त्यांना पासिंगच्या मार्क्समध्ये सवलत देण्यात येणार आहे का?

प्रा. फौजिया खान : सर्व शाळांसाठी एकच अभ्यासक्रम असल्यामुळे अशी काही सवलत देता येणार नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्याप्रमाणे रात्र शाळांमध्ये जागा उपलब्ध आहेत पण त्या दादर, गिरगाव भागात उपलब्ध आहेत. आता या ठिकाणचे कामगार उपनगरामध्ये स्थलांतरित झालेले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या शाळांना मान्यता देणार का? सभापती महोदय, थोडया वेळापूर्वीच सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी आपल्या दालनात सांगितले की, त्यांच्या पत्नीचे संपूर्ण शिक्षण रात्र शाळेत झालेले आहे. त्या त्यावेळी दादरमध्ये रहात होत्या पण आता सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब हे अंधेरी येथे रहावयास गेले आहेत. अशा पध्दतीने कामगार उपनगरांमध्ये शिफ्ट झालेले आहेत. या रात्र शाळामध्ये कामगार वर्ग किंवा कामगारांची मुले जातात या दृष्टीकोनातून शासन याचा विचार करील काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25673 .....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आज मुंबईच्या सर्व भागामध्ये रात्रशाळा आहेत. उत्तर भागामध्ये 8 शाळा आहेत. पश्चिम भागामध्ये 6 शाळा आहेत. दक्षिण भागात 10 शाळा आहेत. या शाळा अनुदानित आहेत. तसेच कायम विनाअनुदानित शाळा सुध्दा सगळ्या ठिकाणी आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सगळ्या मराठी शाळा आहेत. या कष्टकऱ्यांच्या शाळा आहेत. एक तर दिवसभर श्रम करावयाचे आणि कोठे तरी शिक्षण घ्यावयाचे आहे या करिता या शाळा आहेत. सरकार ठामपणे असे का सांगत नाही की, या शाळा बंद होणार नाहीत याची आम्ही जबाबदारी घेऊ ? काय आहे ते तपासून पाहू आणि शक्य तो लवकरात लवकर अनुदान देऊ असे शासन का सांगत नाही ? तपासून पाहू असे उत्तर मंत्री महोदय, देत आहेत. या शाळा बंद होणार नाहीत याची हमी शासन घेणार असे उत्तर शासनाकडून यावयास पाहिजे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शाळा बंद होणार नाहीत आणि आज तशी परिस्थिती सुध्दा नाही.

श्री. दिवाकर रावते : 28 लाख रुपयांची थकबाकी भरण्याबाबत त्यांना नोटिसेस दिलेल्या आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारला. त्यांच्या सुविद्य पत्नी रात्रशाळेतच शिकलेल्या आहेत. सन्माननीय मंत्री महोदय श्री. राणे साहेब हे रात्रशाळेचे विद्यार्थी होते. या रात्र शाळेने राज्याला त्यांच्या रुपाने एक मुख्यमंत्री दिलेला आहे. या रात्रशाळा जर नीट चालवावयाच्या असतील तर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी रात्रशाळांकडून कोणतेही भाडे घेऊ नये या संबंधीचे आदेश दिले होते. तत्कालीन आयुक्त श्री. जॉनी जोसेफ यांनी त्यांच्याकडून एक रुपया सुध्दा भाडे घेऊ नये असे आदेश खाली दिले होते. त्यामुळे सन 2002 ते 2009 पर्यंत त्यांच्याकडून एक रुपया सुध्दा भाडे घेतले गेले नाही. नंतर मात्र सवलतीचा दर निश्चित करण्यात आला आणि 50 रुपये प्रमाणे भाडे निश्चित

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आले आणि आम्ही 50 रुपये भरण्यास तयार आहोत असे मान्य केले. पण मागची सगळी थकबाकी द्यावी असे आता सांगण्यात आले. आयुक्त असे म्हणतात की, थकबाकी द्या नाही तर शाळा बंद करु. माझ्या या संदर्भात आयुक्तांकडे दोन बैठका झाल्या. आयुक्त चांगले प्रशासक आहेत पण ज्यांच्यावर हातोडा चालवावयाचा त्यांच्यावर न चालता गरिबांवर हातोडा चालतो. या संदर्भामध्ये शासनाने पुढाकार घेऊन कोणतीही जुनी थकबाकी घेतली जाणार नाही या बाबतीत ताबडतोब निर्णय घेणे आवश्यक आहे. एकूण 27 ते 28 हजार रुपये थकबाकी आहे आणि या शाळा इतक्या गरीब आहेत की त्यांची कोणतीही मोठी संस्था नाही. कष्ट करणारी मुले फी देऊ शकत नाहीत. फी देऊ शकत नाहीत म्हणून अर्धी मुले परीक्षेला सुध्दा बसत नाहीत. अशी अवस्था या रात्र शाळांची आहे. त्यामुळे या संदर्भामध्ये ताबडतोब निर्णय घेणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदय श्री. राणे साहेबांनी या बाबतीत पुढाकार घ्यावा. मघाशी मंत्री महोदयांनी पश्चिम भागात 8 शाळा आहेत असे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, या ठिकाणी ज्युनियर कॉलेज उपलब्ध नाही. म्हणून कष्टकरी विद्यार्थी ज्या भागात गेले, कामगार ज्या भागात गेले त्या ठिकाणी ज्युनियर कॉलेजेस सुरु केली गेली पाहिजेत. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी आकडेमोड सांगितली परंतु त्यातून उत्तर मिळणार नाही. या बाबत शासनाची काय भूमिका आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मुबई महानगरपालिकेने जर या पध्दतीच्या नोटिसेस दिलेल्या असतील तर त्याची माहिती घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल हेच मी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत मला सन्माननीय सदस्यांचे सहकार्य पाहिजे. मुंबई महानगरपालिकेने जर नोटिसेस दिल्या असतील तर शासनाच्या वतीने त्याची दखल घेण्यात येईल असे मी ठामपणे सांगू इच्छिते. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छिते की, एखाद्या ठिकाणी गरज आहे असे जर आढळून आले तर त्या ठिकाणी ते सुरु करण्यात येईल.

सभापती : या ठिकाणी सन्माननीय राज्य मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे पण यामध्ये एक गोष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अनेक क्षेत्रामध्ये रात्र शाळांमध्ये शिकलेले असे विद्यार्थी आहेत की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25673 ..... **सभापती** .....

ज्यांना दिवसा शिक्षण घेणे शक्य झाले नाही. असे अनेक विद्यार्थी त्या काळात रात्र शाळेत शिकले. आज सुध्दा अशी परिस्थिती आहे की, काही विद्यार्थ्यांना दिवसा नोकरी करणे आणि नंतर रात्र शाळेमध्ये शिकणे या व्यतिरिक्त अन्य पर्याय नाही. हा पर्याय आपण खऱ्या अर्थाने अनेक पध्दतीने मदत करुन वाढविला पाहिजे. त्या दृष्टीने शासनाने याकडे पहावे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आपण आता जी इच्छा व्यक्त केलेली आहे त्यानुसार शासन रात्रशाळेचे शिक्षण सर्वत्र उपलब्ध करुन देण्यासाठी लागेल तो खर्च करील, ते भाडे देईल आणि रात्र शाळेचे शिक्षण उपलब्ध करील एवढे सांगू इच्छितो.

सभापती : धन्यवाद.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील उच्च माध्यमिक शाळांतील तुकड्या टिकविण्यासाठी पटसंख्येच्या निकषात बदल करण्याबाबत.

(3) * 25037 श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.विजय सावंत : दिनांक 1 ऑगस्ट, 2011रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतांराकित प्रश्नोत्तराच्या पहिल्या यादीतील प्रश्न क्रमांक 13712 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील उच्च माध्यमिक शाळांतील वर्ग 11 व 12 वी च्या तुकड्या टिकविण्यासाठी पटसंख्येच्या निकषात बदल करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णयावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय,

(3) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) सदरहू प्रस्ताव विचाराधीन आहे.
(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. विदर्भात भेडसावणारा हा प्रश्न आहे. राज्यामध्ये अकरावी व बारावीच्या शाळांमधील ज्या तुकड्या आहेत त्यापैकी काही तुकड्या वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या आहेत, काही माध्यमिक विद्यालयांना जोडलेल्या आहेत. तुकडी टिकविण्यासाठी दिनांक 6.5.1976 सालात जी.आर.काढलेला आहे तो वेगळ्या कारणासाठी काढलेला आहे. वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न महाविद्यालयातील किमान अपेक्षित पटसंख्या पहिली तुकडी टिकविण्यासाठी 50 ते 120 विद्यार्थ्यांची संख्या पाहिजे. दुसरी तुकडी टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या 121 ते 240 असावयास पाहिजे. माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक शाळा...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपला प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाबाबतची पार्श्वभूमी सांगितली नाही तर मंत्री महोदयांना माझा उपप्रश्न समजणार नाही. मी एकच उपप्रश्न विचारणार आहे. त्याशिवाय मला काही विचारता येणार नाही.

सभापती :ठीक आहे. मी सर्व शिक्षक मतदार संघातील सन्माननीय सदस्यांना वारंवार सांगत असतो की, आपण प्रश्न डेव्हलप करण्यासाठी अधिक वेळ घेऊ नये.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शासनाने ज्याप्रमाणे दुसरी तुकडी टिकविण्यासाठी माध्यमिक विद्यालयाचे निकष बदलेले आहेत. त्याप्रमाणे इयत्ता अकरावी व बारावीतील दुसरी तुकडी टिकविण्यासाठी शासन निकष बदलणार आहे काय, कारण त्यासाठी शासनावर आर्थिक बोजा पडणार नाही. शासनाच्या शिक्षण खात्याचा कारभार योग्य पध्दतीने चालण्यासाठी शासन हे निकष बदलणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय,सध्या असलेले निकष योग्य आहेत. हा शासनाने घेतलेला निर्णय आहे, त्यामध्ये बदल होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिवाजी विद्यापीठ (जि.कोल्हापूर) येथील एका विद्यार्थिनीचा प्राध्यापकाकडून करण्यात आलेला लैंगिक छळ

(4) * 25940 श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , ॲड.उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिवाजी विद्यापीठ (जि.कोल्हापूर) येथील प्राध्यापकाने विद्यार्थीनींचा लैंगिक छळ केल्याची घटना दिनांक 11 जानेवारी, 2012 रोजी वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्राध्यापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (1), (2), (3) व (4) विद्यापीठातील एका प्राध्यापकांने विद्यार्थीनींचा लैगिंक छळ केल्याची तक्रार विद्यापीठास दि. 11/1/2012 रोजी प्राप्त झाली असून सदर तक्रारीची चौकशी लैगिंक छळ प्रतिबंधक समितीकडून करण्यात येत आहे.

संबंधित प्राध्यापकास निलंबित करण्यात आले आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, शिक्षक व प्राध्यापक यांच्या प्रतिमेला काळिमा फासणारी ही घटना आहे. राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये ही प्रवृत्ती बोकाळलेली आहे. परमेश्वरानंतर शिक्षकांना विद्यार्थी आपल्या मनामध्ये पूजत असतात. प्रश्नातील विद्यार्थीनीने या प्राध्यापकाकडे पीएचडीसाठी प्रबंध सादर केला होता. दोन वर्षानंतर या प्राध्यापकाकडे त्या प्रबंधावर सही मागण्यासाठी ही विद्यार्थीनी जात होती. त्या प्राध्यापकाने या विद्यार्थीनीचा वेळोवेळी लैंगिक छळ केला. ही एकच घटना नाही तर असे अनेक प्रकार या राज्यात घडलेले आहेत. शासनाने प्राध्यापक राव यांना निलंबित करुनही 1-2 महिने झालेले आहेत. या प्रकरणामध्ये पुढे कोणती कारवाई सुरु आहे ते समजलेले नाही. राज्यात विद्यार्थीनीवर असे प्रसंग येऊ नयेत, यासाठी शासन सध्याच्या कायद्यात कडक सुधारणा करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. या संदर्भात विद्यापीठाच्या प्रशासनाने सुध्दा ताबडतोब कारवाई केलेली आहे. साधारणपणे 11 जानेवारी, 2012 रोजी हा प्रकार घडला आहे. त्यानंतर यासंबंधी तक्रार करण्यात आल्यावर लैंगिक प्रतिबंध समितीच्या 9

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बैठका झालेल्या आहेत. मी ब्रिफिंगच्या वेळी याबाबत माहिती घेतलेली आहे. दिनांक 15 एप्रिल पूर्वी कोणत्याही परिस्थितीत अंतिम अहवाल दिला जाणार आहे. प्राध्यापक राव यांना निलंबित करण्यात आलेले आहे. दिनांक 15 एप्रिलपूर्वी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ही घटना अतिशय लांच्छनास्पद आहे. अगदी शाळेपासून कॉलेजपर्यंत वर्गशिक्षक व प्राध्यापक विद्यार्थीनीचा छळ करतात. या मुलीने स्वत: सांगितले आहे की, मी अतिशय संयम बाळगला आहे. कारण तिच्या प्रबंधकावर त्या प्राध्यापकांची सही व्हावयाची होती. तिला अनेक आमिषे दाखविण्यात आली होती. तिला कधी सोन्याची चैन देण्याचे, कधी परफ्युम देण्याचे आमिष दाखविले जात होते. शाळेमध्ये सुध्दा अशा प्रकारचे अत्याचार विद्यार्थीनीवर होत असल्याचे हल्ली सर्रास वाचण्यात येते. या प्रकरणात या विद्यार्थीनीवर प्राध्यापकांनी अत्याचार केले आहेत. मंत्री महोदय येथे सांगत आहेत की, या प्राध्यापकांना निलंबित केलेले आहे. हे प्राध्यापक निवृत्त झाले आहेत अशी आमची माहिती आहे. त्यामुळे त्यांचे निवृत्तीवेतन थांबविण्यात यावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे प्रकार होत असतील तर संबंधितावर कडक कारावाई झाली पाहिजे. या प्रकरणी शासन काय कारवाई करणार आहे ? असे प्रकार वारंवार घडत असतात, परंतु विद्यार्थीनी लाजेखातेर पोलीस स्टेशनला तक्रार करण्यासाठी जात नाहीत. हे प्राध्यापक निवृत्त झालेले असताना त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. या प्राध्यापकांवर शासन कोणती कडक कारवाई करणार आहे ? त्याचे निवृत्ती वेतन थांबवून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : अशा प्रकारचे जे गुन्हे घडतात त्याबाबतीत कारवाई करण्याबाबत विद्यापीठीय कायद्यामध्ये तरतूद आहे. प्रत्येक महाविद्यालयामध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक समिती स्थापन करणे नियमानुसार अनिवार्य आहे. समितीच्या वर्षातून दोन बैठका व्हायला पाहिजेत. यामध्ये आरोपी किंवा फिर्यादीच्या बाजूने जो काही निर्णय असेल त्या बाबतीत अपिल करण्याची तरतूद आहे. अशा प्रकरणी जास्तीत जास्त कडक कारवाई व्हावी यादृष्टीने विद्यापीठीय कायद्यामध्ये बदल करण्याची राज्य शासनाची निश्चितच तयारी आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे राव याच्या बाबतीत निश्चितपणे कडक कारवाई केली जाईल. चौकशी समितीच्या अहवालानुसार कडक कारवाई होते की नाही हेही शासनातर्फे पाहिले जाईल.

श्री. भगवान साळुंखे : मी शिवाजी विद्यापीठाचा विद्यमान सदस्य आहे. लैंगिक छळाच्या ज्या घटना होतात त्याची योग्य रितीने चौकशी व्हायला पाहिजे. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या अंतर्गत राजकारणातून मोठे कुभांड रचण्याचे प्रयत्न होत असतात. तर याची देखील समिती चौकशी करणार आहे काय ?

श्री. रमेश शेंडगे : म्हणजे ही घटना खोटी आहे असे सन्माननीय सदस्यांना म्हणायचे आहे काय ?

श्री. भगवान साळुंखे : मला तसे बिलकूल म्हणायचे नाही आणि मी तसे म्हटलेलेही नाही. लैंगिक छळाबाबत चौकशी झाली पाहिजे, त्याची शहानिशा होऊन कडक कारवाई झाली पाहिजे या मताचा मी आहे. परंतु काही ठिकाणी हा महाराष्ट्राच्या बाहेरचा आहे, अमक्या जातीचा आहे, अमक्या जातीच्या बाहेरचा आहे, असे कुभांड रचण्याचे काम शिवाजी विद्यापीठामध्ये चालू असते. या गोष्टींची देखील चौकशी केली जाईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25940...

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.

सभापती : माझी माननीय मंत्री महोदयांना सूचना आहे की, एकूणच हे प्रकरण गंभीर आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अचूक उत्तराची अपेक्षा होती. लैंगिक छळाच्या संदर्भात विद्यापीठामध्ये कमिटी आहे. त्या कमिटीच्या दोन-चार बैठका झाल्या. परंतु लैंगिक छळाच्या अनुषंगाने कायद्यामध्ये बदल करता येईल का हे पहाणे आवश्यक आहे. असा गुन्हा झाला असेल तर त्याबाबतीत एफआयआर नोंदविता येईल का या दृष्टीने तपासणी करणे गरजेचे आहे जेणेकरुन निष्पाप मुलीवर झालेल्या अन्याय अत्याचाराबाबत निश्चितपणे कारवाई होईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांना अनुदान देण्याबाबत

(५) * २५६७९ ***श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.संदिप बाजोरिया , श्री.अनिल भोसले , श्री.जयवंतराव जाधव***

: तारांकित प्रश्न क्रमांक २२९४३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :

सन्माननीय ***शालेय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांना टप्याटप्याने अनुदानावर घेण्यासाठी शासनाचा विचार झाला आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विद्यार्थ्यांची फी ची परिपूर्ती करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) व (२) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

...नंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील कायम विनाअनुदानित तत्वावरील कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबतचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न प्रत्येक अधिवेशनात उपस्थित होत असतो. आज राज्यात 11 वी व 12 वी वर्गाच्या एकूण किती तुकड्या सुरु आहेत व त्या तुकड्यांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे? ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे वारंवार उत्तर दिले जाते. शासन किती वर्षे विचार करणार आहे? मंत्री महोदया स्वत: प्राध्यापिका असल्यामुळे बाणेदारपणा दाखवून हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा पुढील अधिवेशन सुरु होण्यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द वगळतील काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या 3190 असून कला शाखेच्या 5300, विज्ञान शाखेच्या 4545, वाणिज्य शाखेच्या 1890, संयुक्त 186 अशा एकूण 11821 कायम विनाअनुदानित तुकड्या आहेत. कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते, त्यावेळी जाहिरातीमध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता की, कायम विनाअनुदानित तत्वावरच मान्यता देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे सर्वच संस्था चालकांनी ॲफिडेव्हीट सादर करुन लिहून दिले होते की, आम्हाला कायम विनाअनुदानित तत्वावरच तुकड्या हव्या आहेत आणि आम्ही दुसरे काही मागणार नाही. तरीही सभागृहात आणि बाहेर माननीय लोकप्रतिनिधींनी मागणी केली त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांचा बृहत आराखडा तयार केला असून तो 21.11.2011 रोजी पब्लिक डोमेनवर ठेवला आहे. त्यावर आक्षेप, हरकती, सूचना मागविण्यात आल्या आहेत. ती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बृहत आराखडा तयार होईल. अनुदान देण्याबाबतची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे. यापूर्वी देखील मी सांगितले आहे, हे होणे कठीण आहे. याबाबत शासनाचा निर्णय होणे सोपे नाही हेही मी सांगू इच्छिते.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याला जास्त वेळ कायम विनाअनुदानित ठेवता येत नाही असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक-138/03 बाबत दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दिला आहे. कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता असा शब्दप्रयोग पत्रात वापरल्यामुळे कधीच अनुदान देता येणार नाही असा त्यातून अर्थ काढणे बरोबर नाही. दुसरी याचिका क्रमांक-8638/05 बाबत निकालपत्र दिनांक 23 जुलै, 2006 रोजी माननीय उच्च न्यायालयाने सर्व प्रयोजनासाठी कायम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विनाअनुदानित तत्वावर या शब्दाचा अर्थ विनाअनुदानित तत्वावर असाच वाचला पाहिजे असा निर्णय दिला आहे. शासनाला न्यायालयाचा अवमान करावयाचा आहे काय? तसे न करता 11 हजार तुकड्या आहेत, तेथे हजारो शिक्षक शिकविण्याचे काम करीत आहेत. दरवर्षी त्यांना आंदोलन करावे लागते. ते आज आर्थिक अडचणीत आहेत. शासनाने माध्यमिक शाळांबाबतचा कायम शब्द वगळला आहे आणि त्यांना अनुदान नंतर देण्यात येणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयांबाबत निर्णय घेऊन कायम शब्द वगळून न्याय देणार आहात काय?

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25679 .....

प्रा. फौजिया खान : महोदय, राज्यात तसेच देशात जेव्हा सक्तीचे आणि मोफत शिक्षण असा कायदा करण्यात आला त्यात 6 ते 14 वयोगटातील मुलांना हे सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याचे बंधन शासनावर आले आहे. त्याप्रमाणे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या बाबतीत शासनाने कायम हा शब्दा काढून टाकला. तसेच सन्माननीय सदस्यांनी कोर्टाचा जो उल्लेख केला या गोष्टी विचारात घेता शासन यासंबंधी विचार करीत आहे.

श्री. रामनाथ मोते : हा विषय अनेक वेळा सभागृहात चर्चेला आहे व त्याबर शासनाने उत्तरही दिलेले आहे. दरवर्षी मंत्री महोदय सभागृहात उत्तर देत असतात की, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीनन आहे. तसेच वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत आपल्या दालनात बैठकही झाली होती. या निमित्ताने माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाची मानसिकता हा कायम शब्द काढण्याबाबत झालेली आहे व तसा शासनाचा विचार आहे. फक्त विचाराधीन असे उत्तर देण्याऐवजी स्पेसिफिक चार महिन्यात, सहा महिन्यात किंवा आठ महिन्यात याबाबतीत धोरणात्मक निर्ण्णय घेऊन व माध्यमिक व प्राथमिक बरोबरच उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीतील कायम शब्द टाकण्याचा निर्णय घेऊ, असे शासन करणार काय ?

(काही शिक्षक आमदार एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी.

श्री. नारायण राणे : महोदय, सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असलेले उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांची असेल तर तसे उत्तर देता येणार नाही.

सभापती : शासनाने उत्तर दिलेले आहे, त्यामुळे आपल्याला हवे तसे उत्तर मिळावे अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी बाळगू नये.

(काही शिक्षक आमदार बहिर्गमन करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथे पेपर मिलमध्ये सुरू असलेला गॅस प्लँट त्वरित बंद करण्याबाबत

(6) * 26278 श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती अलका देसाई, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील पेपर मिलचे आपल्या गॅस प्लँटचे काम सुरु करताना शासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याचे तसेच या पेपर मिलमध्ये गॅस प्लँटमुळे अनेक ग्रामस्थांना बेघर होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पेपर मिलमध्ये सुरु असलेल्या गॅस प्लँट त्वरीत बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री.सचिन अहिर, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (1), 2) व 3) हे खरे नाही.

बल्लारपूर (चंद्रपूर) येथील पेपर मिलने आपल्या गॅस प्लँटचे काम सुरु करताना नगर परिषद बल्लारपूर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून परवानगी प्राप्त केलेली आहे. सदर गॅस प्लँटचे काम हे कंपनीच्या जागेत होत असल्यामुळे ग्रामस्थ बेघर होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : महोदय, हा प्रश्न नगरविकास आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी निगडीत असताना माननीय उद्योग मंत्र्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. तरी देखील मी असे विचारु इच्छितो की, या भागात मी गेल्या 25 वर्षांपासून आहे तसेच या बॉडीवर सदस्य व काही दिवस अध्यक्ष सुध्दा होतो. तसेच माझ्याकडे काही कागदपत्रे पुरावे म्हणून आहेत. या निमित्ताने मी एवढेच शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, बल्लारपूर ही एक मोठी इंडस्ट्रीज असून या ठिकाणी सातवा प्लांट सुध्दा टाकण्यात आला आहे. त्यात गॅस, इलेक्ट्रिसिटी आणि परडे 550 स्लत असा हा प्लांट आहे. ही जमीन पेपर मिलची स्वत:ची असून त्यात स्टेडियमसाठी असलेले आरक्षण सुध्दा आहे. असे असताना कोणतेही पेपर वर्क न करता या जागेत उद्योग सुरु केला आहे. यासंबंधी नगरपरिषद व जिल्हाधिकारी यांनी देखील कारवाई केली. तसेच नगरविकास विभागाकडे यासंबंधीचे प्रकरण सुरु आहे. या सर्व कामासाठी कोणतीही परवानगी घेतलेली नाही अशी माझी माहिती आहे. त्याला पुष्टी देणारे पेपर्स सुध्दा माझ्याकडे आहे. माझा प्रश्न असा आहे की, यासंबंधीचे प्रकरण नगरविकास विभागाकडे चालू आहे काय, व जिल्हाधिकारी आणि नगरपरिषदेने हे बांधकाम तोडण्याची कारवाई केली आहे पण पोलीस न मिळाल्याने तुर्तास ती कारवाई थांबली आहे. दुसरे म्हणजे प्रदूषण नियंत्रण मंडळाची या प्लांटला

.. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26278.. .. श्री. जैनुद्दीन जव्हेरी .. ..

परवानगी नाही, हे खरे आहे काय ? यासंदर्भातील कागदपत्रे व पुरावे मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांकडे पाठवितो.

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो एका प्लांट पुरताच मर्यादित आहे. एकंदर विचार केला तर 386 हेक्टरपैकी 96 हेक्टरमध्ये हे बांधकाम पूर्ण झाले असून त्यात गॅस प्लांटचा विषय फक्त 500 चौरस मीटर पुरताच आहे. जानेवारी, 2011 मध्ये नगर परिषदेने या कामासाठी परवानगी दिलेली असून प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुध्दा परवानगी नाकारलेली नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, या ठिकाणी गॅस प्लांटबरोबरच स्लतचा प्लांट सुध्दा टाकलेला आहे. हा प्लांट कायमस्वरुपी बंद असतो आणि त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर सुध्दा होण्याचा संभव असतो. त्याबाबत अनेक तक्रारी केल्या व सभागृहात प्रश्नही विचारले पण आजपर्यंत एमपीसीबी न अजिबात कोणतीच कार्यवाही केली नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

त्यामुळे या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी करुन तेथील जनतेला न्याय मिळवून दिला जाणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, यासंदर्भात या प्रकरणाची फेर पाहणी करुन योग्य ती कारवाई करण्यास एमपीसीबीला सांगितले जाईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर मी काळजीपूर्वक ऐकत होते. यामध्ये केवळ 500 मीटरचा प्रश्न आहे असे मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले होते. या ठिकाणची जागा मोठी आहे अशी माझी माहिती आहे. ठराविक एका जागेवर काम करण्याची परवानगी आपण दिली असेल. परंतु राहिलेल्या जी जागा आहे त्या जागेवर बांधकाम होईल की, रिझर्व्हेशनच्या जागेवर बांधकाम करण्यात येणार येईल ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रकरणातील संपूर्ण जमीन खाजगी मालकीची आहे. त्यामुळे नगरपरिषदेला जर रिझर्व्हेशन बदलावयाचे असेल तर तो प्रश्न नगरपरिषदेचा येतो. यामध्ये विभागाचा काही एक संबंध येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राजाराम विद्यालय, (मालखेड, जि. यवतमाळ) येथील मुख्याध्यापकपदी झालेली नियुक्ती रद्द करण्याबाबत

(७) * ***२५२४०*** ***डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार*** **:** सन्माननीय ***शालेय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन, अमरावती विभाग, अमरावती, यांनी राजाराम विद्यालय मालखेड, जि.यवतमाळ येथील मुख्याध्यापकपदी झालेली नियुक्ती रद्द करण्याबाबत दिनांक ११ डिसेंबर, २००९ व शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यवतमाळ यांना मुख्याध्यापकाची नियुक्ती रद्द करण्याबाबत निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा याच्यांकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत राजाराम विद्यालय मालखेड, जि.यवतमाळ येथील श्री.एस.ए.अल्ली हे श्री.सु.दे.खोडवे यांच्यापेक्षा मुख्याध्यापक पदावर अगोदर पदोन्नत झाल्याचे आढळून आल्याने त्यांना सेवाज्येष्ठता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्न हा राजाराम विद्यालय, मालखेड, जि.यवतमाळचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात शिक्षणाधिका-यांनी सुनावणी घेतली होती. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी वेगवेगळया तारखेला दोन सुनावण्या घेतल्या होत्या. या सुनावणीमध्ये परस्पर स्टेटमेंट देण्यात आले होते. पहिली सुनावणी दि. 1.7.2009 रोजी झाली होती व त्या सुनावणीमध्ये संस्था चालक व संबंधित कर्मचा-यांनी आपल्या स्टेटमेंटमध्ये असे सांगितले होते की, सदर नियुक्ती ही सेवा ज्येष्ठते प्रमाणे करण्यात आली होती व सरळ नेमणूक 1984 पासून करण्यात आली होती. परंतु दुसरी सुनावणी ही दि. 29.3.2010 रोजी झाली होती व सुनावणीत संबंधित मुख्याध्यापक, संचालकांनी असे स्टेटमेंट दिले होते की, 1984 साली संबंधित कर्मचा-याची नेमणूक झाली होती व ही नेमणूक सहाय्यक शिक्षक या पदावर पहिल्यांदा करण्यात आली होती व त्यानंतर त्यांनी बी.एड. चार वर्षांनी पूर्ण केल्यानंतर पदोन्नती झाली.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा. आपण नवीन सदस्य आहात म्हणून प्रश्न डेव्हलप केला परंतु प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्माननीय सदस्यांना नेमका प्रश्न डेव्हलप करण्याची सवय लागलेली दिसते ती योग्य नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी फक्त प्रश्न विचारावा .

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25240 .....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, संस्थाचालक व कर्मचारी हे दोन सुनावणीमध्ये वेगवेगळे स्टेटमेंट करीत असतील तर ते योग्य नाही. खाजगी शाळेची जी नियमावली आहे, सेवा शर्ती आहेत त्याप्रमाणे या प्रकरणात उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होऊन तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, नेर एज्युकेशन सोसायटी, तालुका नेर, जि. यवतमाळ यांच्या एकूण 4 शाळा आहेत. चार शाळांपैकी एका शाळेत श्री. सु.दे.खोडवे हे दि. 12.8.1977 पासून कॉलेज शिक्षक म्हणून नियुक्त झाले तसेच दि. 28.5 रोजी त्यांची पदोन्नती झाली होती व त्यांची दिनांक 8.5. रोजी राजाराम विद्यालयामध्ये बदली करण्यात आली होती. परंतु ते राजाराम विद्यालयात रुजू झाले नाहीत.

सभापती महोदय, दी इंग्लिश स्कूल, नेर या शाळेमध्ये श्री. एस.ए.अली म्हणून काम करीत होते परंतु त्यांची बदली नेर एज्युकेशन सोसायटीमध्ये म्हणजे श्री. खोडवे जेथे कार्यरत होते तेथे करण्यात आली होती व त्या प्रमाणे ते रुजूही झाले होते. श्री. अली यांच्या संदर्भात श्री. खोडवे यांनी आक्षेप घेतला होता व त्यासंदर्भात संचालकांनी सुनावणी घेतली होती. श्री. एस.ए.अली हेच सिनिअर असल्यामुळे त्यांनी मुख्याध्यापक म्हणून काम करावे असा निर्णय घेण्यात आला होता. श्री. खोडवे यांनी विदाऊट जॉईनिंग निवृत्ती घेतली असल्यामुळे यासंदर्भात आता काहीही प्रश्न राहिलेला नाही. जेथे मुख्याध्यपकाची पोस्ट होती त्या ठिकाणी श्री.एस.ए.अली जॉईन्ट झाले आहेत.

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, या प्रकरणात देण्यात आलेली माहिती पूर्णपणे चुकीची आहे. सेवा पुस्तिकेची प्रत माझ्याकडे आहे. श्री. एस.ए.अली हे मुख्याध्यापक म्हणून दि. 1.11.1984 च्या ऑर्डर प्रमाणे दि. 2.11. 1984 रोजी मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले होते. परंतु श्री. अली हे प्रत्यक्षात दि. 30.5.1988 रोजी बी.एड झाले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25240 l

श्री.नागो पुंडलिक गाणार. . . .

माझा पहिला प्रश्न असा आहे की, मुख्याध्यापक म्हणून सरळ सेवेने नियुक्ती करण्यासाठी शिक्षण उप संचालक,अमरावती विभाग यांची परवानगी घेतली होती काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, बी.एड.नसलेल्या व्यक्तीला मुख्याध्यापक म्हणून मान्यता देताना शिक्षणाधिकाऱ्यांनी जो गैरप्रकार केला त्याच्या विरूद्ध कारवाई शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, संचालकांनी सुनावणी घेतली आहे. एस.एस.कोडच्या 3.3 प्रोसिजरवर आक्षेप घेण्यात आला आहे. यामध्ये मुख्याध्यापकांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती दिलेल्या आहेत. त्यांचा आक्षेप असा आहे की, पाच वर्षाचा अनुभव अपेक्षित असताना तो नाही. दुसरा आक्षेप असा आहे की, कॉमन सिनिऑरिटी लिस्ट करण्यात आली नाही. तिसरा आक्षेप असा आहे की,... (अडथळा).... सभापती महोदय, मी त्याचेच उत्तर देत आहे. मुख्याध्यापकासाठी पाच वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. तसेच ते ग्रॅज्युएट असले पाहिजे. बी.एड.झाल्यानंतर त्यांना कमीतकमी 2 वर्षांचा अनुभव पाहिजे. त्यामध्ये श्री.एस.ए.अली बसतात. त्यामुळे संचालकांनी निर्णय दिलेला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती आणि शासनाच्या वतीने सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर यामध्ये फरक पडत आहे. उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, याची सुनावणी शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतली. सेवाज्येष्ठते संबंधातील सुनावणी घेण्याचे अधिकार शिक्षणाधिकाऱ्यांना आहेत हे मान्य आहे. परंतु, मंत्रिमहोदयांनी येथे सांगितले की, ती सुनावणी शिक्षणाधिकारी यांनी घेतली आहे. त्यातूनच तफावत, फरक दिसून येत आहे. सदर तफावत दूर करण्यासाठी, जो काही नियम असेल त्यानुसार निवाडा होण्यासाठी मी आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना विचारू इच्छितो की, सर्वांचे म्हणणे ऐकून घेऊन याची सचिव स्तरावर चौकशी होऊन निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याची काहीही आवश्यकताच नाही. श्री.खोडवे हे सेवानिवृत्त झालेले आहेत. सगळा कारभार व्यवस्थित सुरू आहे. त्यामुळे याची गरज वाटत नाही. श्री.खोडवे उच्च न्यायालयात गेले होते. त्यांची याचिका कोर्टाने खारिज केली आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा आहे की, सचिव पातळीवर निर्णय घेण्यात येईल काय ? किमान राज्यमंत्री महोदयांच्या पातळीवर अवलोकन करण्यात येईल काय, असे जरी म्हटले तरी काहीही हरकत नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्या स्तरावर मी अवलोकन करेन.

सभापती : ठीक आहे.

.....

<u>ता.प्र.क्र.25929 पुढे ढकण्याबाबत</u>

सभापती : ता.प्र.क्र.25929 संबंधी माननीय मंत्री महोदयांनी विनंती केली आहे की, मी आज सभागृहात नसल्यामुळे सदर प्रश्न पुढे ढकलण्यात यावा. त्यामुळे मी सदर तारांकित प्रश्न पुढे ढकलत आहे.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती मिळणेबाबत

(9) * 26365 प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आदिवासी दुर्गम व नक्षलग्रस्त क्षेत्रातील खाजगी शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व घरभाडे भत्ता मंजूर करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(2) दिनांक 14 ऑगस्ट, 2008 रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार आदिवासी नक्षलग्रस्त भागातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(3) तसेच शासन निर्णयातील जाचक अटींमुळे त्याचा लाभ फार कमी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करण्यात येणार आहेत काय ?

प्रा.फौजिया खान.,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) व (2) सदर शासन निर्णयान्वये आदिवासी नक्षलग्रस्त भागात बदलीने नियुक्त होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योजना लागू करण्यात आली आहे.

(3) व (4) सदर बाब विचाराधीन आहे.

प्रा.दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा असा हा प्रश्न आहे. 14 ऑगस्ट 2008 रोजीच्या शासन निर्णयामध्ये बदली पात्र असा शब्द समाविष्ट करण्यात आला आहे. त्यात सहा वर्षाची चुकीची अट टाकली आहे. ती अट रद्द करण्यात यावी,अशी मी विनंती करीत आहे. तसेच, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकेतर, शिक्षक कर्मचाऱ्यांना इतर विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याप्रमाणेच लाभ मिळेल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दुर्गम किंवा आदिवासी भागामध्ये बदली होऊन अधिकारी जात नसतील तर त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एकस्तर पदोन्नती देण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे. सन 2008 च्या शासन निर्णयाचा तो मूळ हेतू आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

याकरिता शासनाने हा निर्णय घेतलेला आहे. त्यांना एक स्तर पदोन्नती देण्यात येईल आणि जे बदलीस पात्र आहेत त्यांच्याकरिता हा शासन निर्णय आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासन सांगत आहे की, बदली करुन देखील जर तो जात नसेल तर त्याच्या दाढीला हात लावून सांगितले जात आहे की, "बाबा रे तू एकदा जा, तुला एवढे देतो" असे सांगणे बरोबर नाही.

(गोंधळ)

सभापती : या संदर्भात सन्माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या दालनामध्ये सन्माननीय शिक्षक प्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन त्या अनुषंगाने निर्णय घ्यावा.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चांदुर रेल्वे (जि.अमरावती) येथे महात्मा फुले जल भूमी अभियान अंतर्गत देऊळगाव, लोहगाव तलाव दुरूस्तीचे काम करण्याबाबत

(१०) * २५०७६ ***श्री.जयंत प्र. पाटील , श्री.कपिल पाटील*** : सन्माननीय ***जलसंधारण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे येथे महात्मा फुले जल भूमी अभियान अंतर्गत देऊळगाव व लोहगाव गाव तलावाच्या दुरुस्तीच्या कामांसाठी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १८ जुलै, २०११ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, देऊळगाव गाव तलावाच्या कामाचे अंदाजपत्रक केव्हा व किती रकमेचे तयार करण्यात आले,

(३) तसेच, लोहगाव तलाव योजनेच्या कामाचे सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, नसल्यास किती दिवसात पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

श्री. गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता : (१) व (२) देऊळगाव ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथील गाव तलावाच्या दुरुस्तीसाठी रु.२७,३८,७०३/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक दिनांक १७ सप्टेंबर, २०११ रोजी तयार करण्यात आले असून सदर दुरुस्ती कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. लोहगाव येथील गाव तलाव दुरुस्ती कामास अद्याप प्रशासकीय मान्यता अप्राप्त आहे.

(३) लोहगाव ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथील गाव तलावाचे दुरुस्ती करण्यासाठी सविस्तर सर्व्हेक्षण आवश्यक असून त्यासाठी रु.१.४५ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर केलेले आहे. अद्यापी निधी मंजूर नसल्याने सर्व्हेक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली नाही. निधी मंजूर केल्यानंतर तत्काळ सर्व्हेक्षण करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या गाव तलावाची दुरुस्ती करण्यासाठी सविस्तर सर्व्हेक्षण कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात आले, १ कोटी ४५ लक्ष रुपये किंमतीचे अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी केव्हा प्रस्ताव पाठविण्यात आला, या कामाकरिता आवश्यक असलेला निधी केव्हा प्राप्त होणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, देऊळगाव तलावाच्या कामाचे अंदाजपत्रक रु. २७ लक्ष ३८ हजार ७०३ इतके असून ते दिनांक १७.९.२०११ रोजी तयार करण्यात आले व त्याला प्रशासकीय मान्यता दिनांक १३.१२.२०११ रोजी घेण्यात आली आहे. संबंधित कामाला तत्काळ सुरुवात करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम २८९ अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : माझ्याकडे नियम २८९ अन्वयेच्या दोन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर प्रश्नोत्तरांच्या तासामध्ये माननीय सदस्यांनी उत्तर मिळविले असल्यामुळे मी त्यांची नियम २८९ ची प्रस्तावाची सूचना स्वीकारु शकत नाही.

त्यानंतर, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दुसरा नियम २८९ प्रस्ताव दिलेला आहे. त्या संदर्भात त्यांनी दोन-तीन मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्याच्या तहसीलदाराने अवैध रेती काढण्यास मज्जाव केला म्हणून तेथील एका नगरसेवकाने त्या तहसीलदारावर रात्री १२ वाजता पिस्तूल रोखले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माझ्या माहितीप्रमाणे तेथील सर्व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आजपासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये सक्शन ड्रेजरच्या माध्यमातून अवैधरित्या रेती काढली जाते. कायदेशीररित्या सक्शन ड्रेजरचा वापर करुन रेती काढणे बंधनकारक असतांना सुध्दा राजरोसपणे अवैध रेती काढली जात आहे. त्यावर बंधन घातले गेले पाहिजे. या बाबतीत तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने संरक्षण दिले पाहिजे. संबंधित नगरसेवकाने किंवा त्यांच्या साथीदारांनी त्या तहसीलदारावर व कर्मचाऱ्यांवर पिस्तूल रोखून दिलेल्या धमकीबाबत त्याच्याविरुध्द कडक कारवाई केली गेली पाहिजे. या करिता आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी आणि त्या संदर्भात शासनाने निर्णय जाहीर करावा अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे असा नियम आहे की, सूर्योदय झाल्यानंतर घुबडे आणि वटवाघळे आपल्या ढोलीमध्ये गुपचूप लपून राहतात. परंतु या ठिकाणी अधिवेशन सुरु असतांना हे तेलमाफिया, वाळूमाफिया सारखे तस्कर बाहेर पडत आहेत. आता बाहेर पडलेला वाळूमाफिया हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा शहराध्यक्ष आहे. त्याने तहसीदारावर पिस्तूल रोखले. अधिवेशन सुरु असतांना सुध्दा त्याला भीती वाटत नाही, त्याची हिंमत वाढली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. दिवाकर रावते....

आहे. त्याला कोण संरक्षण देत आहे, हा माझा प्रश्न आहे? तुम्ही कर्मचारी असा किंवा अधिकारी असा तुम्ही आमचे काहीही करु शकत नाही, आम्ही तुम्हाला बघून घेऊ नाही तर पालक मंत्र्यांकडे जाऊ अशाप्रकारची धमकी तो देत असल्याचे माझ्या ऐकिवात आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे प्रकरण गंभीर आहे. हा एवढ्यापुरता मर्यादित विषय नाही. विधान सभेचे अधिवेशन सुरु असताना एक रेती माफीया तहसीलदारावर सरळसरळ समोरुन बंदुक रोखत असेल आणि त्याला ठार मारण्याची धमकी देत असेल तर हे राज्यकर्ते आता राज्य करण्याच्या योग्यतेचे राहिलेले नाहीत. याबाबतीत प्रचंड भय निर्माण व्हावे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागतील परिस्थिती देखील अत्यंत गंभीर आहे. काल उस्मानाबाद मध्ये केवळ रस्ता होऊ शकत नाही ही बाब असह्य झाल्यामुळे एका कार्यकर्त्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली अशी परिस्थिती आहे. तसेच माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती गोळा करणाऱ्या कार्यकर्त्यांचे गोळ्या घालून खून केले जात आहेत अशी राज्यामध्ये स्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून ही परिस्थिती अशी आहे की, याबाबत सदनामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे आणि आता महाराष्ट्रामध्ये या सरकारने एक मिनिट देखील सत्तेवर राहू नये अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले असेल तर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे, त्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी. जेणेकरुन आम्हाला राज्यामध्ये मुक्त झालेल्या सर्व माफियांचा समाचार घेता येईल आणि याबाबतीत सरकारचे म्हणणे देखील ऐकून घेता येईल म्हणून सभागृहापुढील कामकाज थांबवून या विषयावरील चर्चा घेण्यात यावी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, मी माननीय पालकमंत्र्यांचे नाव घेतलेले नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सदरहू विषय नियम 289 अन्वये चर्चेसाठी कसा घेता येऊ शकतो या अनुषंगाने विवेचन केले आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील आपले विचार मांडून हा विषय कसा महत्वाचा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. मला वाटते की, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये हा विषय नसल्यामुळे तांत्रिकदृष्टया हा विषय स्वीकारणे मला शक्य नाही. पण एकूण ज्या पध्दतीचा हा प्रकार आहे तो अत्यंत गंभीर आहे. शासकीय यंत्रणेला त्यांचे काम करण्याच्या अनुषंगाने कोणी अडथळा निर्माण करीत असेल किंवा दहशतवाद निर्माण करीत असेल तर त्या प्रवृत्तीला रोखले पाहिजे यादृष्टीने देखील विचार करणे गरजेचे आहे. याठिकाणी माननीय संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतीत माननीय महसूल मंत्री आणि माननीय गृह मंत्री यांना जरुर सूचना द्याव्यात आणि अशा प्रकारांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

कठोर पध्दतीने हाताळण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी. सदर विषयाच्या अनुषंगाने नियम 93 अन्वये निवेदन करण्याच्या बाबतीत माननीय गृह मंत्र्यांना जरुर सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सूचित केल्याप्रमाणे नियम 93 अन्वये निश्चितपणे निवेदन करण्यात येईल.

सभापती : ठीक आहे.

. . .. 2 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2009-2010 चा तेरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2010-2011 चा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

. . . .2 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी "राज्यातील अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी ऐवजी मानधन दिले जात असून दिनांक 3 जानेवारी 2012 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी प्रस्ताव सादर करावयाचे निर्देश देणे, या विषयाकडे सामाजिक न्याय विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन 2000 पेक्षा अधिक वसतिगृह कर्मचाऱ्यांना न्याय हक्कांपासून वंचित ठेवल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती..

या नंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस व डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "दिनांक 1 एप्रिल, 2012 रोजी वा त्या सुमारास मुंबई पिंपरी-दिघी येथील इयत्ता दहावीतील विद्यार्थी शुभम महादेव शिर्के वय वर्षे 19, याचे दोन अल्पवयीन मुलांसह तिघांनी 50 हजार रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करुन नंतर त्याचा खून करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, वि.प.स.यांनी "गृहनिर्माण विभागाच्या वास्तूरचनाकार विभागाने गोराई जुहू विलेपार्ले स्कीम परिसरातील उच्च उत्पन्न गटातील इमारतींना 2.5 एफ.एस.आय.देणे" या विषयावर 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "दिनांक 23 मार्च, 2012 रोजी मालाड, कुरार व्हिलेज येथे एकतर्फी प्रेमातून कु.स्मिता परब हिची करण्यात आलेली निर्घृण हत्या, अशाप्रकारे एकतर्फी प्रेमातून झालेल्या हत्यांमध्ये होत असलेली वाढ" या विषयावर 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी " ठाणे जिल्ह्यातील मुरबे, सातपाटी, खारेकुरण,नवापूर, उच्छेळी, घिवळी, तारापूर, केळवे या खाडी किनाऱ्यावर रासायनिक प्रदूषणामुळे खाडीचे पाणी खराब होऊन मासे मरण्या बरोबर बोटीच्या लाकडाला कीड लागत असल्याने बोटीचेही होत असलेले नुकसान " या विषयावर 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती..

या नंतर सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी "गेल्या तीन-साडेतीन वर्षापासून म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासा बाबतच्या धोरणात वेळोवेळी बदल होण्यामुळे पुनर्विकासाची कामे पूर्ण न होणे, विकासकांकडून दिरंगाई होणे, परिणामी रहिवाशांचे होणारे हाल, म्हाडामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे" या विषयावर 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यानुसार आजचे 93 अन्वयेचे निवेदन क्रमांक चार प्रथम चर्चेसाठी घेण्यात येत आहे.

पृ.शी./मु.शी.: राज्यातील शेतकऱ्यांना एक लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज आणि एक लाख रुपयांपर्यंत तीन टक्के दराने कृषी कर्ज देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे या बाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या वर्षी सरकारने शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याचे अर्थसंकल्पामध्ये घोषित केले. तर गेल्या वर्षी 1 लाख रुपयांपर्यंत तीन टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा केली होती. या घोषणेची प्रत्यक्ष अंमजबजावणी झालेली आहे काय ? बँकांना व्याजातील फरकाची रक्कम पोहोचली नसल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांकडून पूर्ण व्याजाची वसुली केलेली आहे. या संदर्भातील आकडेवारी माझ्याजवळ आहे. ती मी आपणास देतो. माझा प्रश्न आहे की, सरकारकडून व्याजातील फरकाची रक्कम बँकांमध्ये कोणत्या तारखांना जमा करण्यात आली आणि ती रक्कम किती आहे ? आतापर्यंत शासनाने किती शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज दिले ? सरकारने अर्थसंकल्पामध्ये जी घोषणा केलेली आहे त्यासाठी सरकारला हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. तेव्हा ही घोषणा प्रत्यक्षात व्यवहारामध्ये येऊ शकते काय आणि त्यासाठी सरकारने तरतूद केलेली आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची योजना जाहीर केलेली आहे. कोणत्याही बँकांना पीक कर्जाच्या संदर्भात शेतकऱ्यांकडून मुदत संपण्यापूर्वी व्याज घेता येणार नाही असे शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, आमच्याकडे काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील काही सोसायट्यांनी माझ्याकडे सुध्दा तक्रार केलेली आहे. आम्ही आता तशा सूचना बँकांना दिलेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडून व्याज वसूल केले जाणार नाही.

सभापती महोदय, या योजनेसाठी राज्यातील एकूण 51 लाख शेतकरी पात्र आहेत. या वर्षी आपण 17 हजार कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. आपणास व्याजाचा कंपोनंट जास्त लागणार आहे. त्यासाठी आपण 300 ते 350 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ...

ही योजना दोन स्तरावर घेण्यात येणार आहे. 1) डी.पी.डी.सी.च्या स्तरावर या योजनेतून अनुदान देण्यात येते आणि 2) राज्य स्तरावरुन अनुदान देण्यात येते म्हणून या वर्षी पासून असा प्रयत्न करण्यात येणार आहे की, तीन ते चार महिने ॲडव्हान्समध्ये व्याजाची रक्कम देण्यात आली तर व्याज आकारण्याच्या संदर्भात कोणावरही अन्याय होणार नाही मात्र या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना मिळण्याकरिता त्या मुदतीच्या आत शेतकऱ्यांनी पैसे भरले तर एक लाख रुपयापर्यंत शून्य टक्के आणि तीन लाख रुपयापर्यंत दोन टक्क्यामधला एक टक्के रिबेट देण्यात येतो. त्यामुळे ही एक चांगली योजना आहे, असे मला वाटते. यामध्ये काही त्रुटी आहेत म्हणून मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना एवढीच ग्वाही देऊ इच्छितो की, हे अधिवेशन संपल्यानंतर या संदर्भामध्ये सर्व बँकांचे मॅनेजर, कन्सर्न ऑफिसर यांची मिटिंग घेऊन या वर्षीच्या वाटपामध्ये कोठेही त्रास होणार नाही याबद्दलची खबरदारी शासन घेईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातील आंबा बागायतदारांचे झालेले आर्थिक नुकसान याबाबत सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्य सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये विविध योजनांच्या संदर्भातील सविस्तर निबंध माननीय मंत्री महोदयांनी दिलेला आहे आणि तो चांगला आहे, त्यामुळे त्याला मार्क्स बरे मिळतील पण त्यातून शेतकऱ्यांना काही मिळालेले नाही. शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे ते झालेलेच आहे. कोकणातील बागायतदार शेतकरी नेहमी असे म्हणतो की, ऊस जास्त झाला तरी पैसे देण्यात येतात, द्राक्षाचे नुकसान झाले तरी नुकसान भरपाई देण्यात येते पण ज्यावेळी आंब्याचे प्रत्यक्ष नुकसान होते त्यावेळी आम्हाला प्रायोगिक स्तरावर एखादी पीक विमा योजना अशा तालुक्यात देण्यात येते की, ज्या तालुक्यात आंबा आणि काजूचे उत्पादन होत नाही, असे तालुके निवडण्यात येतात. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, हे शासन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार आहे का, असल्यास ती किती देण्यात येणार आहे? काही निवडक तालुक्यात प्रायोगिक तत्वावर ही विमा योजना लागू करण्यात आलेली आहे ती कोकणातील सर्व तालुक्यांना लागू करणार का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, शेवटच्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, सर्वसाधारपणे सातत्याने होणाऱ्या हवामान बदलामुळे या ठिकाणी विमा योजना लागू करण्यात आली आहे. तसेच ही विमा योजना प्रायोगिक तत्वावर लागू केली असल्यामुळे ती काही ठिकाणीच लागू करण्यात आली होती. त्या भागातील 11 सर्कलमध्ये बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. 11 सर्कलपैकी 8 सर्कलमधील बागायतदार शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये विम्याची रक्कम देण्यात येत आहे. 2 सर्कलमध्ये हेक्टरी 10 हजार रुपये विम्याची रक्कम देण्यात येत आहे. तर 1 सर्कलमध्ये हेक्टरी 20 हजार रुपये विम्याची रक्कम दिली जात आहे. या संदर्भात एक बैठक घेऊन बाकीच्या भागात झालेल्या नुकसानीच्या संदर्भात मदत देण्यात यावी, अशी विधानसभा आणि विधान परिषदेतील सर्व सन्माननीय सदस्यांची सातत्याने मागणी आहे. यासाठी लवकरच माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेऊन किती मदत करता येईल या दृष्टीने सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, गेल्या तीन-चार वर्षापासून सातत्याने शेतकऱ्यांच्या आंबा आणि काजू या फळांचे नुकसान होत आहे. या वर्षी पीक विमा योजना लागू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

करण्यात आलेली आहे परंतु या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, ही योजना निवडणूक काळात आल्यामुळे लोकांमध्ये प्रसार झाला नाही,त्यामुळे लोकांनी तिचा फायदा घेतला नाही. म्हणून या पीक विमा योजनेचा विचार न करता, सपूर्ण जिल्हयातील आंबा आणि काजूचे जवळ जवळ 35 टक्क्यापेक्षा उत्पादन कमी झालेले आहे. 50 टक्क्यापेक्षा कमी उत्पादन झाले तर दुष्काळ जाहीर करण्यात येतो. त्यामुळे या ठिकाणच्या आंबा, काजू, कोकम आणि जांभूळ या फळपिकांची नुकसान भरपाई देण्यात येईल का आणि ती कधी देण्यात येईल?

डॉ. विजयकुमार गावित : काजू, आंबा किंवा सन्माननीय सदस्यांनी बाकीच्या ज्या पिकांचा उल्लेख केलेला आहे त्यांच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल आणि त्या बैठकीला त्या भागातील सर्व सन्माननीय आमदारांना बोलावले जाईल्.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे असतील श्री. परशुराम उपरकर असतील आम्ही गेल्या चार वर्षापासून हा प्रश्न सातत्याने मांडीत आहोत. त्यामुळे या संदर्भातील बैठक आता पुढच्या वर्षी कधी घेणार आणि यासंबंधीचा निर्णय कधी होणार?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

या ठिकाणी बोलण्यास अवघड वाटते परंतु ही गोष्ट खरी आहे की, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड किंवा ठाणे जिल्हा या संपूर्ण कोकण पट्टयाच्या बाबतीत सापत्नभावाची भूमिका दुर्दैवाने शासन घेत आहे. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर बैठक घेऊ असे आपण सांगावे. त्या बैठकीला सगळ्यांना बोलवावे. तो निर्णय व्हावयास पाहिजे. कारण आमच्याकडे तेवढीच नगदी पिके आहेत. बाकी आमच्याकडे काही नाही. त्या पिकांवरच आमचे सर्व अर्थकारण चालते. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर सगळ्या संबंधितांना बोलवून बैठक घेऊन या बाबतीत निर्णय घेणार का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, भेदभाव केला जातो परंतु फलोद्यान विभागाच्या माध्यमातून अशा प्रकारचा भेदभाव केलेला दिसून येणार नाही. या ठिकाणी एक गोष्टी सांगितली पाहिजे की, आंबा आणि काजूच्या बाबतीत निवडणुका सुरु झालेल्या असताना सुध्दा मध्येच आम्ही निर्णय केलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तशी सापत्नभावाची वागणूक दिलेली नाही. परंतु हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर सन्माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात ताबडतोब बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांकडून या प्रश्नाचे अचूक उत्तर घेण्याकरिता दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्यापरीने प्रयत्न केलेला आहे. मला मंत्री महोदयांच्या उत्तराच्या बाबतीत एवढेच म्हणावयाचे आहे की, हे 12 सर्कल रेव्हेन्यू सर्कल आहेत का ?

डॉ. विजयकुमार गावित : हे रेव्हेन्यू सर्कल आहेत.

सभापती : या प्रश्नासंबंधी सन्माननीय सदस्यांच्या मनात जी भावना आहे त्यानुसार कोकण विभागातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे या चार जिल्ह्याच्या अनुषंगाने योग्य निर्णय जर घेतला तर या वर्षी फळांचे जे नुकसान झालेले आहे ते भरुन काढण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न होतील. मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, तातडीने ही बाब सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून या चार जिल्ह्यातील जी फळे आहेत त्या दृष्टीने तातडीने योग्य निर्णय होईल असा प्रयत्न फलोद्यान मंत्री म्हणून आपण करावा.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./ मु. शी. : राज्यातील खाजगी इंजिनिअरींग कॉलेजमधील दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशाच्या जटील झालेल्या प्रश्नामुळे विद्यार्थी व शिक्षण संस्था अडचणीत येणे याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या प्रश्नाच्या उत्तरासाठी ही नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे त्या संदर्भात निवेदनात दिलेली जी फॅक्ट आहे त्यावरुन ती गरज असल्याचे स्पष्ट होते. सभापती महोदय, मी आपले लक्ष निवेदनातील परिच्छेद 3 आणि 4 कडे वेधू इच्छितो. सन 2008-2009 पर्यंत थेट व्दितीय वर्षासाठी एकच फेरी घेतली जात होती आणि उरलेल्या जागा संस्था स्तरावर भरण्यात येत होत्या. नंतर आपण ही पध्दत बंद केली. त्यामुळे 2011-2012 मध्ये 15,987 जागा रिक्त राहिल्या. याच ठिकाणी मागणीची गरज आहे. कॅपच्या संदर्भात 16.2.2004 ला जो शासन निर्णय घेतला तो निर्णय आपोआप दुसऱ्या वर्गाला सुध्दा लागू होतो. त्यामुळे दुसऱ्या वर्गाला राहिलेल्या रिक्त जागा भरण्याला संस्थांना अनुमती देणार का आणि 20 टक्के जागांचा कोटा ठरविणार का ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे सांगितले तसा यातून अर्थबोध नक्कीच होत नाही. व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पूर्वी एक फेरी घेण्यात येत होती आणि एका फेरीनंतर संस्था चालकांना तो अधिकार असावयाचा. परंतु या संदर्भात विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी यावयास लागली. सर्व जागा मॅनेजमेंट कोट्यातून भरल्या जावयाच्या आणि त्या ठिकाणी पारदर्शकता नव्हती अशा तक्रारी सातत्याने येत होत्या. म्हणून 2008-2009 पासून कॅप पध्दतीने म्हणजे केंद्रीय प्रवेश प्रक्रियेव्दारे या जागा भरण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

एक फेरी होती त्याऐवजी तीन फेऱ्या केलेल्या आहेत. त्यामध्ये सामाजिक आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. या विद्यार्थ्यांना कॅपद्वारे प्रवेश दिला जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना दोन अधिकचे फायदे झालेले आहेत. कॅपद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते आणि आरक्षण सुध्दा लागू करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाबाबत मी एवढेच सांगेन की, त्यांचा प्रश्न विचाराधीन आहे. विधी व न्याय विभागाबरोबर सल्लामसलत करुन योग्य निर्णय घेण्याबाबत विचार करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

पृ.शी. / मु.शी. :दगडखाण कामगारांनी प्रलंबित मागण्यासाठी केलेले मुदत उपोषण याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याच अधिवेशनामध्ये या प्रश्नाविषयी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीची माहिती निवेदनात देण्यात आलेली आहे. माझे या प्रश्नाविषयी दोन प्रश्न आहेत. महाराष्ट्र राज्य खनिज विकास निधी (निर्मिती व उपयोजना) अधिनियम, 2011 अन्वये कामगार संघटना ज्या मागण्या करतात तो विषय कोणत्या विभागाच्या अंतर्गत येतो याची त्या कामगार संघटना माहिती असतेच असे नाही. घरेलू कामगारांसाठी कामगार विभागामार्फत महामंडळ सुरु केलेले आहे. त्या प्रक्रियेसाठी शासनाने गती दिलेली आहे. त्याबाबत एक महत्वाचा निर्णय झालेला आहे. मोलकरणींच्या पदरात काही सवलती पडल्या नसल्या तरी त्याची सुरुवात झालेली आहे. या निवेदनाच्या शेवटच्या ओळीमध्ये संबंधित विभागास विनंती करण्यात येत आहे. खनिकर्म विभागामार्फत ही मागणी पूर्ण होऊ शकणार नाही. 2005 सालापासून या कामगारांच्या मागण्या प्रलंबित आहेत. कामगार विभागामार्फत घरेलू कामगारांसाठी महामंडळ स्थापन केले आहे त्याच धर्तीवर दगडखाण कामगारांसाठी महामंडळ स्थापन करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दगडखाणीमध्ये काम करणारे कामगार फार उपेक्षित आहेत. त्यांच्यासाठी शासनाची कोणतीही कल्याणकारी योजना सुरु नाही. खनिकर्म विभागाकडून दगडखाणीची रॉयल्टी गोळा केली जाते. ही रॉयल्टी इन्फ्रास्ट्रक्चरसाठी खर्च केली जाते. या कामगारांच्या संदर्भात विभागाने शासनाला एक महत्वाची शिफारस केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या कामगारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे अशी सूचना केलेली आहे. परंतु त्यामुळे त्यांना फारसा लाभ मिळणार नाही. बांधकाम कामगारांचे कल्याण मंडळ शासनाने स्थापन केलेले आहे. त्यांच्याकडून 1 टक्का सेस घेतल्यामुळे वर्षाला 1 हजार कोटी रुपये उभे राहणार आहेत. 500 कोटी जमा झालेले आहेत. दगड, वाळू हे बांधकामासाठी लागणारेच साहित्य आहे. त्यामुळे दगडखाण कामगारांचा या मंडळामध्ये समावेश करता येईल का याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला जाईल. या मंडळात दगडखाण कामगारांचा समावेश झाला तर सगळ्याच कल्याणकारी योजना राबविता येतील. याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येत आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शाळा संतुलन संस्था या कामगारांसाठी काम करीत आहेत. या शाळा सुरु करण्यासाठी कामगार विभाग निर्णय घेऊ शकलेला नाही. परंतु किती कालावधीमध्ये या कामगारांच्या मागण्या पूर्ण होतील. 10 वर्षे हे कामगार आपल्या मागण्यांसाठी लढत आहेत. मी स्वत: दगडखाण कामगारांना भेटून त्यांच्या समस्या समजून घेतल्या आहेत. महिला व पुरुष वर्ग विपरित वातावरणात काम करीत आहे. या कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरु करण्यासाठी किंवा अन्य मागण्यांसाठी शासनाकडून काही कालबध्द कार्यक्रम जाहीर केला जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आता शिक्षणाचा हक्क कायदा लागू झालेला आहे. त्यामुळे 6 ते 14 वर्षे या वयोगटातील मुलांना शिकण्याचा अधिकार मिळाला असल्यामुळे त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. फक्त त्या ठिकाणी निवासी शाळा किंवा बोर्डिंग स्कूल कसे करता येतील हा प्रश्न आहे. बांधकाम कामगार मंडळामध्ये या कामगारांचा समावेश झाला तर हे काम निश्चितपणे केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पहिला औचित्याचा मुद्दा असा आहे की, शासनाने दोन वेगवेगळ्या विषयांसंबंधी निवेदन करण्याचे मान्य केलेले होते. बीड जिल्ह्यामध्ये जमादारांची हत्या झाली होती. त्यासंबंधी शुक्रवारी माननीय मंत्री महोदयांकडून निवेदन केले जाणार होते. परंतु त्यादिवशी ते करण्यात आले नाही. मी त्याबाबत पीठासीन अधिकाऱ्यांना आठवण करुन दिली होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्यांनी शासनाला आज निवेदन करण्यास सांगू असे म्हटले होते. म्हणून त्याबाबतीत निवेदन करण्यासाठी आपण शासनाला आठवण करुन द्यावी जेणेकरुन वस्तुस्थिती जनतेला कळेल.

माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीबाबत सात दिवसात निर्णय घोषित करु असे म्हटले होते. या संदर्भात बैठक झाल्याचे मला समजले आहे. आज 11 दिवस झालेले आहेत. तेव्हा गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमती बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा तत्सम विभागाच्या मंत्री महोदयांनी निर्णय घोषित करण्याविषयी त्यांना आदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती : बीड मधील पोलीस जमादाराच्या दुर्दैवी हत्येबाबत आणि गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीबाबतचे दोन औचित्याचे मुद्दे माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केलेले आहेत. या संदर्भात संबंधित विभागाचे जरुर लक्ष वेधावे असे मी माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांना सांगत आहे.

श्री. छगन भुजबळ : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकणात पर्यटनाला चालना देण्यासाठी विकास कामे करण्याची आवश्यकता

मु. शी. : कोकणात पर्यटनाला चालना देण्यासाठी विकास कामे करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री रामदास कदम,परशुराम उपरकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते व सय्यद पाशा पटेल,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याला लाभलेल्या ७२० कि.मी. लांबीच्या विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या कोकणातील निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक किल्ले, प्राचीन देवस्थाने यांचे दर्शन घेणे व जगप्रसिध्द हापूस, आंबा, काजू इत्यादी फळांचा आस्वाद घेण्यासाठी या भागात दिवसेंदिवस पर्यटकांची वाढ होत असणे, मात्र पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सोयी-सुविधांचा असलेला अभाव, शेजारील गोवा राज्यात भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याची निसर्गदत्त क्षमता असून देखील अद्यावत सुखसोयींनी युक्त अशा रिसॉर्टसचा अभाव, विजेसारख्या मूलभूत सुविधांचा विस्कळीतपणा, करमणुकीची साधने नसणे, इत्यादीमुळे पर्यटनातून उपलब्ध होणारा रोजगार, अर्थार्जन, इत्यादी सर्व लाभांपासून कोकण वंचित राहणे, परिणामी शासनाची कोकणाविषयी असलेली अनास्था पाहता कोकण वासीयांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाने तातडीने कोकणात पर्यटनाच्या दृष्टीने विशेष आराखडा तयार करुन आवश्यक तो निधी उपलब्ध करुन विकास कामे सुरु करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." "

श्री. छगन भुजबळ (पर्यटन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : कोकणाच्या पर्यटनाच्या संदर्भातील ही लक्षवेधी आहे. पर्यटनाच्या संदर्भात कोकण विकास कार्यक्रमासाठी शासनाने सन 2009-10, 2010-11 आणि 2011-12 या तीन वर्षामध्ये 190 कोटी रु. दिलेले आहेत. हा निधी कोठे आणि कसा खर्च करण्यात आलेला आहे ? कोकणाला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. या ठिकाणी बोंटीग, हॉटेल्स, मोठी रिसॉर्टस होऊ शकतात. परंतु यामध्ये सीआरझेडचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा पर्यटनाच्या दृष्टीने समुद्र किनारी आवश्यक त्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी सीआरझेडचा कायदा आड येऊ नये यादृष्टीने शासनाने काय प्रयत्न केलेले आहेत ? छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रामध्ये उभारण्यामध्ये सीआरझेडचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा जोपर्यन्त सीआरझेड बाबत निर्णय होत नाही तो पर्यंत कोकणाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास होणार नाही. तेव्हा या बाबतीत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की खेड नगरपालिकेने बोटींगची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव 2009मध्ये शासनाला सादर केलेला आहे. या प्रस्तावाला केव्हा मान्यता देण्यात येणार आहे ?

श्री. छगन भुजबळ : बोटींगच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आताच माझ्याकडे कागदपत्रे दिलेली आहेत. त्याचा पाठपुरावा करुन त्याबाबतीत लवकरात लवकर प्रयत्न करीन. 720 कि.मी.च्या किनारपट्टीवर आपण काय करीत आहात अशी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. हे खरे आहे की, कोकणातील निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक किल्ले, प्राचीन देवस्थाने अशा प्रकारच्या पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असणा-या गोष्टी कोकणामध्ये आहेत. कोकणातील पर्यटन वाढण्याच्या दृष्टीने राईल्स ॲण्ड हावर या आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या सल्लागाराच्या माध्यमातून कोकण किनारपट्टीचा 1990मध्ये आम्ही अभ्यास केला. त्या तज्ज्ञांनी जो अहवाल सादर केला त्यामध्ये कोकणातील 32 पर्यटन स्थळांची निवड केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ..... लक्षवेधी सूचना क्र.1....

या पर्यटनस्थळी विविध प्रकारच्या सोयी सुविधा पर्यटकांसाठी विभागामार्फत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने बरीच कामे हाती घेतली. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली असून काही कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत.

आतापर्यंत या सगळ्या कामांसाठी केंद्र पुरस्कृत योजनेच्या माध्यमातून 43.52 कोटी रुपये, प्रादेशिक पर्यटन योजनेच्या माध्यमातून 63.29 कोटी रुपये, 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून 225 कोटी रुपये, राज्य शासनाच्या विशेष पॅकेजच्या माध्यमातून 3.60 कोटी रुपये असे जवळजवळ 335 कोटी रुपये या भागातील पर्यटनाच्या विकासासाठी दिलेले आहेत. वेगवेगळ्या कामांपैकी सीआरझेडच्या अडचणी आहेत, वन विभागाच्या व पुरातत्व विभागाच्या अडचणी आहेत अशी कामे वगळता 90 टक्के कामे डिसेंबर, 2012 पर्यंत पूर्ण होतील. वन विभाग व पुरातत्व विभागांशी आम्ही संपर्क साधून त्यांना कळविले की, तुम्ही पर्यटन विभागाला काम करु देत नाही, त्यामुळे आम्ही तुमच्याकडे निधी वर्ग करतो, तुम्ही कामे पूर्ण करा. पुरातत्व विभागाला याच पध्दतीने आम्ही निधी देऊन सांगितले की, तुम्ही कामे पूर्ण करावीत. ते काम करायला देत नसल्यामुळे पर्यटन विभागाने निधी वर्ग करण्याची तयारी दाखविली आणि अनेक विभागाकडे निधी वर्ग देखील केला आहे.

सभापती महोदय, रायगडावरील पर्यटकांच्या सोयीसाठी उभारलेल्या शेडवरील पत्रे फयान वादळामुळे उडून गेले, तेथे नव्याने पत्रे बसविण्यासाठी आम्ही पुरातत्व विभागाकडे परवानगी मागितली आहे. पुरातत्व विभागाचे महासंचालक दिल्लीमध्ये बसतात, त्यांच्याकडून ती परवानगी घेतल्यानंतर नवीन पत्रे बसविण्यास अनुमती दिली जाणार आहे. अशा प्रकारच्या अनेक अडचणी आहेत. या संदर्भात पुरातत्व विभागाशी आम्ही दोन वेळा चर्चा केली आणि सांगितले की, पुरातत्व विभागाने नियम शिथिल केले पाहिजेत. अन्यथा कोणतीही कामे होणार नाहीत. त्यांचे कायदे अतिशय कडक आहेत. त्या पध्दतीने आपण कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्माण करणे आणि आर्थिक उलाढाल वाढविणे याबाबत वारंवार सरकारच्या वतीने चर्चा केली जाते. पर्यटनाचे प्रकल्प उभारल्याने कोकणातील इकॉनॉमी रोल होईल आणि तेथील विकास होऊ शकतो, या दृष्टीने पर्यटन विभागाचे परिपत्रक क्र.एमटीसी/2005/प्र.क्र.172, दिनांक 16 डिसेंबर, 2006 अन्वये पर्यटन स्थळांच्या दृष्टीने न्याहारी योजना व इतर व्यवसायांना वीज आकारणी,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पाणीपट्टी व मालमत्ता करामध्ये सवलत देण्याचे घोषित करण्यात आले आहे. पाच वर्षे उलटून गेली आहेत. परंतु वित्त विभाग पर्यटन विभागाच्या या परिपत्रकाला काडीमात्र किंमत देत नाही. वित्त विभागाकडून स्पष्टपणे सांगितले जाते की, अर्थ व नियोजन विभागाचे आम्हाला आदेश नाहीत त्यामुळे आम्ही सवलत देणार नाही. परिणामी या परिपत्रकाच्या आधारे ज्यांनी कोकणामध्ये गुंतवणूक केली ते सगळे व्यावसायिक आज तोट्यात गेले आहेत. या परिपत्रकाची अंमलबजावणी कशी होईल या दृष्टीने पर्यटनमंत्री श्री.छगन भुजबळ हे माननीय वित्तमंत्र्यांना केव्हा बळ दाखविणार याकडे कोकणातील माणसांचे लक्ष लागले आहे.

सभापती महोदय, दरवर्षी अलिबाग, हरिहरेश्वर, गणपतीपुळे या ठिकाणच्या समुद्र किनाऱ्यावर 50 ते 60 पर्यटकांचा समुद्रात बुडून मृत्यू होतो.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ..... लक्षवेधी सूचना क्र. 1...

जोपर्यंत कोकणातील समुद्र किनारा सुरक्षित नाही तोपर्यंत पर्यटकांमध्ये वाढ होणार नाही. आपल्या शेजारील गोवा आणि केरळ राज्यांमध्ये जरी हे प्रमाण जास्त वाटत असले तरी अशा प्रकारचे लाईफ गार्ड्स त्यांनी मोठ्या प्रमाणात ठेवलेले आहेत. आपल्या कोकणातील गणपती पुळे येथील समुद्र तर अतिशय खतरनाक आहे. या ठिकाणी होणाऱ्या अपघातांबाबत वेळोवेळी जाणीव करुन दिली तरी देखील संबंधित विभाग काहीच व्यवस्था करीत नाही. शासन यासंदर्भात स्वत:च पुढाकार घेऊन निर्णय घेणार काय ? तसेच सी-वर्ल्ड या योजनेकडे सर्वांचे डोळे लागलेले आहेत. त्याचा सर्व्हे वगैरे झालेला आहे की, नाही. वास्तविक मंत्री महोदय नेहमीच म्हणत असतात की, जेथे इच्छा असेल तेथे मार्गही सापडतो याप्रमाणे प्रत्यक्षात अमुक या तारखेपर्यंत "सी-वर्ल्ड" ही योजना अमलात आल्याचे कोकण वासीयांना दिसेल, असे प्रयत्न शासन करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, समुद्र किनाऱ्यावर अनेक अपघात होत असतात हे लक्षात घेऊन काही स्वयंसेवी संस्था या क्षेत्रात काम करीत आहेत. तसेच काही खाजगी कंपन्या सुध्दा कार्यरत आहेत. त्यांना पैसे उपलब्ध करुन देण्याचेही आपले नियोजन आहे. तसेच तेथे ॲम्बुलन्सची सोय, वेळोवेळी लक्ष ठेवणे, स्पीड बोट अशा अन्य सर्व सोईंचे पॅकेज तयार करुन या कंपन्यांना देणे, त्या बदल्यात त्यांचा रिकरिंग खर्च वगैरे त्यांना मिळाला पाहिजे म्हणून वाहनतळ वगैरे यातूनही त्यांना पैसे मिळतील यादृष्टीने अमलबजवणी करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. मी एका ठिकाणी जाऊन या कंपनीचे काम पाहिले, त्यात त्यांचे प्रशिक्षीत लोक अगदी तत्पर असतात, त्यांच्याकडे वॉकी-टॉकी सुध्दा असतात. तसेच संपूर्ण समुद्र किनाऱ्यावर ते गस्त ठेवत असतात. पण या कंपन्यांना आपल्याला कोणत्याही सोयी देता येतील, वीज बिलाच्या बाबतीत कोणती सवलत देता येईल याची चर्चा आपण करीत आहोत. तसेच मघाशी सांगितल्यानुसार संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन वीज बिलाच्या दृष्टीने आपण पाऊल टाकणार आहोत.

"सी-वर्ल्ड" च्या संदर्भात आपण मुद्दा उपस्थित केला. हा प्रकल्प आपण पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशन म्हणजेच पीपीपी च्या माध्यमातून तयार करीत असून सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क युनिव्हर्सिटी, पुणे यांनी 509 कोटीचा प्राथमिक अहवाल दिला आहे. त्यात त्यांनी जो खर्च काढलेला आहे त्यानुसार पुढील डीपीआर तयार केला व केंद्र शासनाच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

युनिव्हर्सिटीकडे हे काम सोपविलेले आहे. ते पूर्ण झाल्यानंतर पुढच्या कामाला सुरुवात करु या. त्याचबरोबर मी एक मुद्दा सांगू इच्छितो की, यात केंद्राने सुध्दा काही योजना घेतलेल्या असून आय अँड एफ.एस., गुडगांव-हरियाना या कंपनीची राष्ट्रीय पातळीवर सल्लागार म्हणून नियुक्ती केली होती.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ...

कोकणातील पर्यटनाचे महत्व लक्षात घेऊन मुंबई ते कोकण अशी मालिका आम्ही सल्लागारांना सुचवली होती तसेच कोकणातील अजून काही कामे सुध्दा सुचवली होती व त्यासाठी 300 कोटी रुपयांचा प्रकल्प व विकास आराखडा केंद्र शासनाला आपण सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये पर्यटकांसाठी अद्ययावत सुखसोयींनी युक्त असे रिसॉर्ट, करमणुकीची साधने या सगळया नैसर्गिक पर्यटनाच्या कामाचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. मला आशा आहे की, 300 कोटी रुपयांपैकी पहिला हप्ता या वर्षामध्ये निश्चितपणे मिळेल व यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. यासंदर्भात आयएलएफएसने जो आराखडा दिलेला आहे त्या प्रमाणे पुढील काम सुध्दा आपल्याला करावयाचे आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील निवेदन सविस्तर आलेले असून मंत्री महोदयांनी सुध्दा विस्तीर्ण उत्तर दिलेले आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये महत्वाचा गाभा हा सिंधुदुर्ग जिल्हा आहे. 1997 साली कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनासाठी जाहीर झाला होता. कोकण किनारपट्टीवरील जिल्हयांमध्ये निसर्ग, भरपूर वनसंपत्ती, दळणवळणाची साधने या सर्वांचा अभ्यासगट तयार करण्यासाठी कोकण पर्यटन विकास महामंडळाची स्थापना केली जाणार आहे काय ? सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यात सी-वर्ल्ड प्रकल्प होणार असून सर्वात मोठा अग्रगण्य प्रकल्प सिंगापूर तसेच लंडन येथे आहे. त्यामुळे सी-वर्ल्ड प्रकल्प आपल्याकडे केव्हा होणार आहे, मालवण तालुक्यातील केवळ एकच ठिकाण सी-वर्ल्डसाठी निश्चित करण्यात आलेले आहे काय, या प्रकल्पाची कालमर्यादा किती राहणार आहे, या सी-वर्ल्डची एकूण किंमत किती राहणार आहे ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, तुर्तास सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांनी मागच्यावर्षी या प्रकल्पाची कॉस्ट 509 कोटी रुपयांची सांगितलेली आहे. यासंदर्भातील डीपीआर तयार होत आहे. प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाल्यानंतर या प्रकल्पाची कॉस्ट निश्चितपणे वाढेल. परंतु एक लक्षात घेतले पाहिजे की, हा प्रकल्पासाठीचे पैसे व्हीजीएफच्या माध्यमातून दिले जाणार आहेत. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या माध्यमातून या प्रकल्पाचे काम पूर्ण केले जाणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कोकणाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या पर्यटन विषयावर आपण चर्चा करीत असून माननीय भुजबळ साहेब कोकणाच्या पर्यटनासाठी सर्व काही करण्याचा प्रयत्न करीत असतात. माननीय भुजबळ साहेब यासंदर्भात सक्षम आहेत याबद्दल कोणाचेही दुमत असणार नाही. मला सांगावेसे वाटते की, आपण ज्या प्रकल्पाच्या संदर्भात आपण येथे चर्चा करीत आहोत त्या प्रकल्पाचा सर्व्हे हा मुळातच 1990 सालामधील असून 1990 पासून कायद्यामध्ये बरेच काही बदल झालेले आहेत. परंतु या संदर्भात आपण काहीच बोलत नाही. 1990 साली या प्रकल्पाच्या संदर्भात जो सर्व्हे झाला होता त्याचा आता शून्य उपयोग आहे. 1990 नंतर पर्यटनाच्या कायद्यामध्ये सुध्दा बदल झालेले आहेत, सीआरझेडच्या कायद्यामध्ये सुध्दा बदल झालेले आहेत. त्यामुळे बदलत्या काळाप्रमाणे जे कायदे बदलले आहेत त्या बदलत्या कायद्या प्रमाणे आपण काम केले पाहिजे नाही तर आम्हाला या सी-वर्ल्डची केवळ प्रतीकृतीच पाहत राहावी लागेल. म्हणून सर्व कोकण वासियांची सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्यात धमक आहे. आपण एकदा जे काही ठरवता ते आपण नक्की करता असा आपला लौकिक आहे त्यामुळे सन्माननीय मंत्री महोदयांकडून आमच्या जास्त अपेक्षा आहेत. 1990 मध्ये कोकणात 32 ठिकाणी सर्व्हे झाला होता. परंतु बदलत्या काळानुसार हा सर्व्हे पुन्हा होईल काय, नाही तर आपण म्हणाल तेथे रिसॉर्ट होईल. परंतु बांधकामाला परवानगी मिळाली नाही तर रिसॉर्ट कोठून होईल ? त्यामुळे सीआरझेड-1, सीआरझेड-2 या सगळ्या कायद्यातून आपल्याला सूट मिळण्यासाठी किंवा कोकणाच्या विशेष पर्यटन क्षेत्रासाठी आपण काही प्रयत्न करणार आहात काय ?

श्री. छगन भुजबळ :सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले आहे की, आयएलएफएसने यासंदर्भात दुसरा रिपोर्ट तयार केला असून त्यासंदर्भात केंद्र सरकारकडे तो सादर करण्यात आला आहे. आयएलएफएसने आता पासूनच्या पुढील पाच वर्षाचा आराखडा दिलेला असून कायद्यामध्ये ज्या काही सुधारणा झालेल्या आहेत त्याचा समावेश यामध्ये निश्चितपणे करण्यात आलेला आहे. सी-वर्ल्डच्या बाबतीत आयएलएफएसला जो डिपीआर दिलेला आहे त्यामध्ये आयएलएफएसने यासंदर्भात संपूर्ण जबाबदारी घेतली असून केंद्र सरकारच्या सर्व परवानग्या सुध्दा त्यांनीच आणावयाच्या आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील जे तंत्रज्ञान आहे ते सुध्दा त्यांनीच आणावयाचे आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

त्या बदल्यात त्यांना जो काही खर्च येणार आहे तो प्रकल्पामधून देणार आहोत. सीआरझेड कायद्यामध्ये नवीन सुधारणा झालेल्या आहेत. त्यामुळे आपल्याला सीवर्ल्डसाठी निश्चितपणे परवानगी मिळेल, असे आम्हाला सायन्स टेक्नॉलॉजी पार्कने सांगितलेले आहे. सीआरझेड कायद्याचे नियम पाळूनच आपल्याला ठराविक रिसॉर्टच्या निर्माण करता येतील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मघाशी मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, दिनांक 24.2.2009 च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कोकण पॅकेजसाठी 190 कोटी रूपये राखून ठेवले होते. त्यापैकी 3 कोटी रूपये तीन वर्षात दिल्याचे सांगितले. तेव्हा उर्वरित 187 कोटी रूपये कधी मिळणार आहेत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी नवीन महामंडळ स्थापन करणार आहात. ते कधी स्थापन करणार आहात त्याच प्रमाणे टाटा कन्सल्टन्सीने सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी तयार केलेला अहवाल विचारात घेतला आहे काय ? सिंधुदुर्ग किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या मंदिराच्या दुरूस्तीसाठी आपण 1 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यावर आता पर्यंत पाच लाख रूपये खर्च झाले आहेत. सदर मंदिर पुरातत्व विभाग आणि बांधकाम विभागाच्या वादात अडकले आहे. सदर मंदिराची डागडुजी कधी होणार आहे आणि छत्रपती शिवाजी महाराजांची आपण कधी सुटका करणार आहात ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सांगितले की, आता पर्यंत आपण 335 कोटी रूपयांची तरतूद पर्यटनासाठी केली आहे. मला येथे सांगावयाचे आहे की, केंद्र सरकारकडून 225 कोटी रूपये आले होते. त्या निधीचा विनियोग झाला नाही. ज्यावेळी प्रश्न निर्माण झाला त्यावेळी मी या खात्याची नव्याने धुरा घेतली होती. त्यानंतर बैठका झाल्या. त्यातून या वर्षी व्यवस्थित काम सुरू झालेले आहे. 90 टक्के काम वेगवेगळ्या ठिकाणी सुरू झालेले आहे. अर्थात सीआरझेड व पुरातत्त्व विभागाचे काम सोडून सर्व ठिकाणी कामे सुरू झालेली आहेत. मी तेथे स्वत: जाऊन भेट दिलेली आहे. त्यांचे अधिकारी माझ्या बरोबर होते. मी त्यांना सांगितले आहे की, हे पैसे आम्ही आपणाला देणार आहोत. त्याप्रमाणे त्यांना पत्र दिले आहे. ते जुने मंदिर आहे. त्यामुळे ते त्याच पद्धतीने बांधले पाहिजे, असे मी त्यांना सांगितले. त्यांच्याकडे देखील अशा प्रकारचे काम करणारे इंजिनिअर्स आणि कारागीर फार कमी आहेत. लोणार येथे त्यांचे काम सुरू आहे. लोणार येथे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

प्राचीन मंदिर आहे. इंजिनिअर्स व कारागिरांची उपलब्धता पाहून पुरातत्त्व विभागाच्या नियमाच्या अधीन राहून काम होणार आहे. या केंद्र शासनाच्या संस्था आहेत. आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. दिल्लीमध्ये जाऊन सांगत आहोत. त्यांच्या डी.जीं.ना भेटत आहोत. ते आम्हाला काम करू देत नाहीत म्हणून त्यांना आपण काम करावे असे देखील सांगितले. पैसे सुपूर्द करतो असे देखील सांगितले. या बाबतीत आम्ही प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहोत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अत्यंत विस्तृत उत्तर दिलेले आहे. सरकारी पैशातून दुरूस्तीचे काम होणार आहे. हे काम पुरातत्व विभागाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर समुद्राच्या किनाऱ्याचे स्ट्रेंग्थनींगचे देखील काम आहे. स्वच्छता वगैरे सर्व करणार आहोत असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. हॉटेल्स, रिसॉर्ट, रेस्टॉरंट, बोटींगच्या सुविधा इत्यादी पर्यटनासाठी आवश्यक बाबी असून त्यासाठी खाजगीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी या सर्व भागतील विकास आराखडा तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. येथे वेगवेगळे उद्योग येण्यासाठी त्यांना विशेष आर्थिक सूट देणे गरजेचे आहे. हे सर्व काम सुसूत्रपणे समन्वयाने होण्यासाठी तसेच लवकर होण्यासाठी एखादी समिती स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ?

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न करणार काय, किंवा ग्रुप ऑफ मिनिस्टर्सकडून हा विषय पुढे जाण्यासाठी आपण तातडीने प्रयत्न करणार आहात काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, अशा प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांची एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली आहे. केंद्र शासनाने त्या संदर्भात आग्रह धरल्यामुळे ती समिती आपण नेमली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यटनाच्या संदर्भात समित्या स्थापन केलेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघापासून माननीय श्री. भुजबळ साहेबांचे उत्तर ऐकत आहे. त्यांच्या उत्तरामध्ये काही तरी चुकल्या चुकल्यासारखे वाटत आहे. त्यांच्या उत्तरामध्ये नेहमीचा असलेला आक्रमकपणा आता दिसत नाही. "आम्ही बघत आहोत, आम्ही सांगत आहोत," अशाप्रकारचे उत्तर ते देवू लागले आहेत. पर्यटन खात्याच्या बाबतीत नियोजन आणि अर्थखात्याच्या मंजूरीशिवाय कोणताही निर्णय होत नाही. या बाबतीत भुजबळ साहेबांचे बळ आम्हाला दिसले पाहिजे. जुन्या हिंदी चित्रपटामध्ये ए.के.हनगल नावाचे एक कलाकार होते, ते नेहमी अशाप्रकारची भूमिका साकारीत असत, आम्ही त्यांना ए.के. हतबल म्हणत असू. त्याप्रमाणे माननीय श्री. भुजबळ साहेब आम्हाला हतबल झाल्यासारखे दिसायला लागले आहेत.

माननीय श्री. भुजबळ साहेब आल्यानंतर कोकणामध्ये पर्यटनाच्या बाबतीत काहीतरी ठोस निर्णय होईल असे आम्हाला वाटले होते. परंतु, "मी बोलतो, मी सांगतो" अशाप्रकारचे उत्तर दिले जात आहे. आपल्यावर अधिकाऱ्यांबरोबर बोलण्याची वेळ कशी काय आली? हा माझा आदेश असून उद्यापासून तो पाळला गेला पाहिजे असे आपण त्यांना ठोस सांगितले पाहिजे. पर्यटन विभागाच्या निर्णयाची गेल्या पाच वर्षापासून अंमलबजावणी होत नाही. पर्यटन विभागाच्या दि.16 डिसेंबर, 2006 च्या एमटीडीसी-क्र.2005/2/172 पर्यटन, या परिपत्रकामध्ये जे काही घोषित केले आहे, ते केव्हापासून अंमलात येणार आहे? सन 2011 मध्ये 223.93 लाख इतकी रक्कम अर्थ विभागाने मंजूर केली, त्यापैकी 31 डिसेंबरपर्यन्त 148 लाख रुपये खर्च झाले. उरलेले पैसे खर्च कां झाले नाहीत? एक तर तुम्हाला कुणीही पैसे देत नाहीत आणि दिलेले पैसे देखील खर्च होत नाहीत. यामुळे आम्हाला असे वाटते की, आम्ही पाहिलेली माननीय श्री. भुजबळ साहेबांमधील तडफ कुणीतरी दाबली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. विनोद तावडे....

की दबलेली आहे हे माहीत नाही. याची अंमलबजावणी केव्हा होणार आहे हे आपण एकदा ठोसपणे सांगणार की नाही?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, कोकणातील पर्यटन विकासासाठी आलेल्या पैशामधील सर्वात मोठा हिस्सा सव्वा दोनशे कोटी रुपयांचा आहे. हे पैसे आल्यानंतर सुध्दा गेल्या दोन-चार वर्षामध्ये काम झाले नाही. या बाबतीत तेथील जिल्हाधिकारी आणि संबंधित लोकांकडून जी कामे होणे आवश्यक होते ती झालेली नाहीत. तेथील सर्व लोकप्रतिनिधींनी सुध्दा त्या बाबतीत लक्ष घालावयास हवे होते. मी स्वत: त्या ठिकाणी जावून अनेक वेळा बैठका घेतल्या आहेत, या विभागाच्या सचिवांनी सुध्दा बैठका घेतल्या आहेत. हे काम पहाण्यासाठी एमटीडीसीमध्ये एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक सुध्दा करण्यात आली. त्यांना इंजिनिअर्सची आवश्यकता होती म्हणून आम्ही 9 इंजिनिअर्स उपलब्ध करुन दिले. आमचे हे इंजिनिअर्स घ्या, आणि त्यांच्याकडून तुम्ही काम करुन घ्या असे त्यांना सांगितले. त्यामुळे मघाशी सांगितल्याप्रमाणे पुरातत्व खात्याचे काम सोडून आमचे 90 टक्के काम पूर्ण होत असून डिसेंबर महिन्यापर्यन्त 100 टक्के काम पूर्ण होईल. परंतु एक गोष्ट खरी आहे की, काही झाले तरी पुरातत्व खात्याच्या किंवा वन खात्याच्या बाबतीत मीच काय किंवा अन्य कुणी ज्येष्ठ किंवा श्रेष्ठ मंत्री असले तरी त्यांच्यासमोर ज्या अडचणी येत असतात त्या कायम आहेत. त्यामुळे या सभागृहामध्ये या खात्याचा मंत्री म्हणून सत्य परिस्थिती मांडणे हे माझे काम आहे. मोठया आवाजामध्ये मी हे करीन आणि ते करीन असे मी सांगणार, आणि मी नियमामध्ये अडकल्यानंतर तुम्हीच मला विचारणार. त्यानंतर चुकीची माहिती दिली म्हणून तुम्हीच माझ्याविरुध्द हक्कभंगाची नोटिस देणार. तेव्हा या ज्या काही अडचणी आहेत त्या सोडविण्याकरिता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या सुध्दा बैठका घेण्यात आल्या आणि त्यांना काम करण्यास सांगितले. त्यामुळे आता त्या ठिकाणी कामे होत आहेत. ही गोष्ट खरी आहे की, यापूर्वी कामे झालेली नाहीत परंतु आता ती होत आहेत त्याकरिता थोडा कालावधी आपल्याला थांबावे लागेल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, राज्याला उत्पन्न देणारा पर्यटनसारखा खूप चांगला व्यवसाय होऊ शकतो. त्याच दृष्टीने राज्याचे माननीय पर्यटन मंत्री कोकणाकडे पहात आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

या सगळ्या मोठ्या योजना कार्यान्वित करावयास पाहिजे हे नक्की आहे आणि यासाठी सुरु असलेले प्रयत्नही खूप महत्वाचे आहे. परंतु त्यामुळे एकंदरीतच यानिमित्ताने कोकणात पर्यटनाचा व्यवसाय वाढल्यानंतर रोजगाराची निर्मिती सुध्दा होणार आहे आणि ही रोजगार निर्मिती तयार होत असताना कोकणातील या भागामध्ये रहाणाऱ्या सर्व नागरिकांची एक चांगली मानसिकता होण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. तसेच पर्यटनाचा जो पट्टा आहे त्याठिकाणी असलेल्या फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये सुध्दा एक वैशिष्ट्य म्हणून ठिकठिकाणच्या लोकांना बोलावून होम कुक फूड म्हणजे घरी जेवण बनवून देण्याची पध्दत सुरु करण्यात आलेली आहे. कोकणातील अशा वेगवेगळ्या भागामध्ये जी छोटी घरे आहेत, ज्याचे गेस्ट हाऊस मध्ये रुपांतर होऊ शकते, जेथे चांगले जेवण मिळू शकते, जेथे चांगल्या प्रकारचे वातावरण तयार करता येते आणि कोकणच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे ज्या काही नैसर्गिकरित्या संपन्न गोष्टी आहेत त्यांना उठाव देता येतो आणि याबाबतीत पर्यावरण विभागाची अडचण येण्याची शक्यता नाही. मात्र त्याठिकाणी आपले रस्ते चांगले असावयास पाहिजेत, परिसर स्वच्छ पाहिजे, तेथील समुद्र किनारा चांगला असावयास पाहिजे आणि यासाठी तेथील लोकांची मानसिकताही तयार झाली पाहिजे. यादृष्टीने पर्यटन विभाग काही विशेष योजना हाती घेणार आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मला या योजनेच्या अंतर्गत असे सांगावयाचे आहे की, केवळ मालवणमध्ये लोकांनी आपापल्या घरामध्ये दोन रुम, तीन रुम, चार रुम, पाच रुम अशी छोटी-छोटी हॉटेल्स् म्हणजे लॉजिंग आणि बोर्डींग अशी एकूण 140 युनिटस् तयार केली आहेत. मघाशी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की, त्याठिकाणी विजेची सवलत किंवा इतर सवलत देणार आहात काय ? तर याबाबतीत आम्ही काम करु शकलो नाही. पण बाकीच्या विभागांच्या माध्यमातून परवानगी देणे आणि इतर सोयी देण्याचे जे काम होते ते आम्ही केलेले आहे. सन्माननीय सदस्य मानसिकतेबाबत सांगत आहेत.पण आता कोकणामध्ये अशा प्रकारची मानसिकता तयार होत आहे आणि तेथे हळूहळू हा व्यवसाय वाढत आहे. तेथील समुद्र किनाऱ्यावरुन किल्ल्या पर्यंत जाण्यासाठी पूर्वी 2-4-5 बोटी होत्या. परंतु आता तेथे अक्षरश: जागा शिल्लक रहात नाही एवढ्या लहान-मोठ्या बोटी लोकांना ने-आण करण्यासाठी असतात. तारकर्ली भागामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटन वाढलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय पर्यटन मंत्री श्री.छगन भुजबळ यांना स्पेसिफीक दोन प्रश्न विचारीत आहे. त्यांनी एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली की, त्यांच्यापूर्वी जे माननीय मंत्री होते, ते 250 कोटी रुपये खर्च करु शकले नाहीत. तेथील लोकप्रतिनिधींनी जे लक्ष द्यावयास हवे होते, ते दिलेले नाही. त्यांनी काही लोकप्रतिनिधींना उघडे पाडले . . ..

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : कोणत्या लोकांनी ?

श्री.रामदास कदम : त्याबाबतीत मी सांगतो. सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे आहे ते मला कळले.तसेच याबाबतीत माननीय पालक मंत्र्यांचे अधिकार असतात हे मला माहिती आहे. मी काही नवीन नाही. सहपत्र शासन निर्णय क्रमांक दि.25 ऑगस्ट 2009 मध्ये असे नमूद केलेले आहे की,"कोकणातील पर्यटन विकासासाठी केरळच्या धर्तीवर सीआरझेड मधून विशेष सवलती प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न"पण मागील तीन वर्षामध्ये केरळच्या धर्तीवर सीआरझेड मधून विशेष सवलती घेण्यासाठी आपण विशेष काय प्रयत्न केले आणि त्याला किती यश आले आहे ?

श्री.छगन भुजबळ (खाली बसून) : केरळच्या धर्तीवर ? केरळसाठी वेगळे सीआरझेड आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय. याठिकाणी तुमचेच परिपत्रक आहे, माझे नाही आणि जर आपल्याला याबाबत कल्पना नसेल तर कोकणवासीयांचे दुर्दैव आहे. मी माननीय श्री.छगन भुजबळ यांना सांगू इच्छितो की, दि.25 ऑगस्ट 2009 रोजी सदरहू परिपत्रक काढण्यात आलेले आहे. जोपर्यंत आपण सीआरझेड च्या बाबतीत निर्णय घेणार नाही, तोपर्यंत रिसॉर्टस् होणार नाहीत. आमच्या रत्नागिरीमध्ये एवढा मोठा समुद्र किनारा आहे. पण पर्यटनाच्या दृष्टीने आमच्याकडे कोणत्या सोयी आहेत तर काहीच नाही. म्हणून मला माननीय मंत्री महोदयांकडून ठोस उत्तर हवे आहे की, पुढच्या सहा महिन्यामध्ये किंवा 1 वर्षामध्ये किंवा दोन वर्षामध्ये आम्ही केंद्र शासनाकडे जाऊन केरळच्या धर्तीवर सीआरझेडच्या संबंधातील जो कायदा आहे त्याबाबतीत निर्णय घेऊ.

यानंतर श्री.अ.शिगम . ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

नॅशनल हाय-वे क्रमांक-17 मुंबई-गोवा महामार्ग या महामार्गाचे चौपदरीकरण होत नाही तो पर्यंत कोकणात पर्यटनाला चालना मिळणार नाही. सरकारने चौपदरीकरणाचे काम सुरु केलेले आहे आणि ते इंदापूरपर्यंत होईल. परंतु गोव्यापर्यंतच्या चौपदरीकरणाला किती खर्च येणार आहे आणि हे काम किती वेळात पूर्ण होणार आहे याची माहिती मंत्री महोदय देतील का ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये जयगड येथे उपहारगृह, वाहनतळ, जलक्रीडा इत्यादी कामे पूर्ण झालेली आहेत आणि इतर कोणकोणती कामे पूर्ण झालेली आहेत व कोणती कामे अपूर्ण आहेत याची यादी माझ्याजवळ आहे. ही यादी वाचण्यामध्ये वेळ जाईल म्हणून ही यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सन्माननीय सदस्यांनी नॅशनल हाय-वे संदर्भात प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, नॅशनल हाय-वेच्या पहिल्या फेजचे काम पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या,तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील कामांचा फिजिबिलीटी रिपोर्ट केंद्र शासनाला दिलेला आहे. जागा ॲक्वीझीशनसाठी जवळपास 800 ते 900 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. हे काम एनएचडीएफमध्ये नव्हते. ते पैस राज्य शासनाला भरावे लागणार होते आणि आपण तेवढे पैसे भरु शकणार नव्हतो. केंद्रीय मंत्री श्री.सी.पी.जोशी येथे आले होते. त्यावेळी आम्ही त्यांची भेट घेतली आणि सांगितले की, पुढचा रस्ता एनएचडीएफमध्ये घ्यावा. आनंदाची बाब अशी की, त्यांनी तो रस्ता एनएचडीएफमध्ये घेतला. तेव्हा आता ॲक्वीझीशनचे पैसे सुध्दा केंद्र सरकारकडून मिळतील. परंतु ही गोष्ट खरी आहे की, एकूण ॲक्वीझीशन झाल्यानंतर त्याचे टेंडर काढणे व इतर कामांसाठी वेळ लागणार आहे. आम्ही त्याचा फॉलो-अप ठेवत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ. शी. : पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यामध्ये झालेली कपात

मु. शी. : पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यामध्ये झालेली कपात या संबंधी श्रीमती दीप्ती चवधरी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहराच्या पाणीपुरवठ्यात पुणे महानगरपालिकेने एकवेळ कपात सुरु करणे, सरासरीच्या दीडपट पडलेला पाऊस, 1 ऑक्टोबर रोजी धरणात असलेला 28.27 टीएमसी पाणीसाठा, दरमहा शहराला साधारणत: सव्वा टीएमसी पाणी लागते हे गृहीत धरुन फेब्रुवारीपर्यंत लागणारे 6.75 टीएमसी पाणीसाठा कमी केला, तर धरणात 21.25 टीएमसी पाणी शिल्लक पाहिजे, मात्र धरणात आज केवळ 11.50 टीएमसी एवढेच पाणी शिल्लक राहणे, 9 टीएमसी पाणी नक्की वाटप कसे आणि कुठे झाले असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होणे, पुढील काळात त्यावर उपाययोजना न केल्यास शहराला गंभीर प्रश्नाला सामोरे जाण्याची शक्यता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." "

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणेकरांना फेब्रुवारी महिन्यापासून पाण्याच्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. आता पुणे महानगरपालिकेने पाण्याची कपात देखील सुरु केलेली आहे. मागील वर्षी चांगला पाऊस झाला असताना सुध्दा पाणी कपात करावी लागत आहे. निवेदनात नमूद केलेले आहे की, कृषीसाठी पाणी दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे पुणे शहरात पाण्याची 30 टक्के गळती होत आहे हे खरे आहे काय ? ही गळती थांबविण्यासाठी पुणे महानगरपालिका काही योजना आखणार आहे का, असल्यास त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, या खर्चातील काही भाग राज्य सरकार उचलणार आहे काय ? आज पुणे शहराची लोकसंख्या 40 ते 50 लाख आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये 20 ते 25 लाख लोकसंख्या आहे. मुंबई शहर प्रमाणे पुणे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी एक स्वतंत्र धरण असावे. तेव्हा तशा प्रकारचे नियोजन केलेले आहे काय किंवा करणार काय ?

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे शहराला खडकवासला प्रकल्पातंर्गत पानशेत, वरसगाव, टेमघर या धरणातून पाणी पुरविले जाते. या धरणांचा एकूण पाणीसाठा 29.16 टी.एम.सी. एवढा आहे. या संपूर्ण उत्तरामध्ये अत्यंत खुलासेवार आणि विस्ताराने माहिती दिलेली आहे. शहरांच्या बाबतीत पर माणसी 170 लिटर पाणी पुरवठा करावा असा नियम आहे. या परिमाणानुसार पुणे शहराची लोकसंख्या 40 लाख इतकी धरली तर साधारणपणे वर्षाला 9 टी.एम.सी. पाणी नियमाप्रमाणे द्यावयास पाहिजे परंतु प्रत्यक्षपणे पुणे शरामध्ये 14.75 टी.एम.सी. पाणी उचलले जात आहे. म्हणजे 170 लिटर पर माणशी ऐवजी 289 लिटर पर माणशी पाण्याचा वापर होत आहे. असे असताना सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, 30 टक्के पाण्याची गळती होत आहे का? तेवढया प्रमाणात पाण्याची गळती होत नाही पण पुणे शहर दिवसेंदिवस टेकडीकडे वाढत चालले आहे. टेकडीकडील लोकांना पाणी देण्याकरिता पाण्याचा फोर्स किंवा फ्लो कायम रहावा या करिता तेथील पाणीपुरवठा 24 तास सुरु राहतो त्यामुळे टेकडीच्या पायथ्याजवळ राहणाऱ्या लोकांना जवळ जवळ 24 तास पाणी मिळते आणि वरच्या लोकांना ठराविक वेळेत पाणी मिळते. अशा पध्दतीने मोठया प्रमाणात पाण्याचा गैरवापर होत आहे तो टाळण्याकरिता जुन्या पाईपलाईन बदलल्या पाहिजेत. टाक्या उंचावर बांधून त्यांचे डिव्हिजन केले पाहिजेत. या दृष्टीने पुणे महानगरपालिकेचा सर्व्हे झाला असून नियोजन सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे विचारले की, या एकंदर योजनेसाठी किती खर्च येणार आहे आणि त्यामध्ये शासनाचा काही सहभाग असेल का? या योजनेस अद्याप अंतिम स्वरुप न आल्यामुळे या योजनेसाठी निश्चित किती खर्च येईल हे आता सांगणे कठीण आहे, तशा स्वरुपाचा प्रस्ताव यावा लागतो. पण अशा प्रकारची व्यवस्था ही स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाची असते परंतु जेएनएनयुआरएम योजनेतून केंद्र शासनाकडून पैसे मिळतात त्यावेळी केंद्र शासन 50 टक्के, महानगरपालिका 30 टक्के ते 40 टक्के आणि शासन किंवा 10 ते 20 टक्के अशा पध्दतीने शेअर दिला जातो पण ती योजना कोणत्या योजनेतून राबविली जाणार आहे त्यावर हे सर्व अवलंबून राहणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यावेळी पाणी कपात करावी लागेल यासाठी डिसेंबर महिन्यात पालकमंत्री, पाटबंधारे विभाग आणि महापालिका आयुक्त यांची बैठक झाली होती का आणि त्या बैठकीमध्ये पाणी कपात करावी लागेल असे सांगून सुध्दा मधल्या काळात पाटबंधारे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे....

विभाग, महापालिका आणि शासनाने मौन पाळले आणि ज्या क्षणी निवडणुकीचे निकाल जाहीर झाले त्यानंतर पाणी कपात जाहीर करण्यात आली. माझा प्रश्न असा आहे की, निवेदनाच्या आठव्या ओळीत असे म्हटले आहे की, "फेब्रुवारी, 2012 अखेर उद्योगासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी 7.25 टी.एम.सी.इतका वापर झाला." अशा प्रकारे हे दोन्ही पाणी एकत्र कसे करता येईल. मुळामध्ये उद्योगासाठी सोडलेले पाणी त्यानंतर पुणेकरांनी पिण्यासाठी वापरलेले पाणी अशी माहिती द्यावयास पाहिजे होती. परंतु पुणे महानगरपालिकेमध्ये पाणी किती वापरले या संबधीचे मोजमाप करण्याची यंत्रणा अस्तित्वात नाही. फक्त एकच सेंटर चालू आहे अशा वेळी पुण्यामध्ये अमुक एवढे पाणी सोडण्यात आले असे सांगण्यात येत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी पाणी गळतीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे अशा वेळी उद्योगासाठी व पिण्याचे पाणी एकत्र का करण्यात येत आहे, म्हणून बैठक झाली होती का, त्याचवेळेला पाणी कपात का जाहीर करण्यात आली नाही, तसेच किती पाणी उद्योगासाठी देण्यात आले आणि किती पाणी पिण्यासाठी देण्यात आले यासंबंधीचे सुधारित उत्तर देण्यात येईल का? त्या शिवाय यासंबंधीचे चित्र स्पष्ट होणार नाही

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सिंचनाकरिता किती पाणी दिले याबाबत विचारणा केली. फेब्रुवारी, 2012 अखेर सिंचनासाठी 7.24. टीएमसी पाणी दिलेले आहे. पुढचे जे वाक्य आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, फेब्रुवारी, 2012 अखेर उद्योगासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी 7.25 टीएमसी पाणी दिले. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 40 लाख लोकसंख्येप्रमाणे प्रतिमाणशी 289 लिटर परिमाण धरले तरी सुध्दा हा केवळ काही ठराविक कालावधीपुरता भाग आहे. सन्माननीय सदस्यांना त्या कालावधीमध्ये पिण्याकरिता किती पाणी दिले आणि उद्योगाकरिता किती पाणी दिली याची माहिती अवगत करण्यात येईल.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये प्रतिमाणशी किती पाणी द्यावे लागते आणि 40 लाख लोकसंख्या आहे अशा पध्दतीचे उत्तर दिलेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आज पुणे शहरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची अतिशय भीषण परिस्थिती आहे. आपण आज रोज पुणे शहरातील माहिती घेतली तर असे दिसून येईल की, या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे पुणे शहरातील लोकांचा जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. असे असताना माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, शासनाने 40 लाख लोकसंख्येप्रमाणे नियोजन केलेले आहे. पुणे महानगरपालिकेने 1991 मध्ये साडेअकरा अब्ज घनफूट पाण्याची मागणी केलेली होती आणि जलसंपदा विभागाने 1997 साली पुणे महानगरपालिकेसोबत तसा लेखी करार केलेला होता. तो करार 2010 मध्ये संपलेला आहे. आपल्या म्हणण्याप्रमाणे मापदंड लावावयाचा असेल तर पुण्यातील 1991 मधील लोकसंख्या आणि 2012 मधील लोकसंख्या याचा हिशेब केला तर लेखी कराराप्रमाणे त्यावेळी एवढे पाणी देण्याचे मान्य केले होते आणि आज तो मापदंड लावत आहात तो चुकीचा आहे आणि हा पुणेकरांवर अन्याय आहे. 2010 मध्ये हा करार संपलेला आहे आणि आता 2012 साल चालू आहे. 2010 मध्ये पुणे महानगरपलिकेने जलसंपदा विभागाकडे नवीन करार करण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. अजूनपर्यंत तो करार केलेला नाही. 2010 ला करार संपलेला आहे आणि पुणे महानगरपालिकेने जो प्रस्ताव जलसंपदा विभागाला दिलेला आहे त्याप्रमाणे पुणे महानगरपालिका आणि जलसंपदा विभाग हा करार किती कालावधीमध्ये करणार ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी .....

निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 1 ऑक्टोबर, 2011 रोजी 27.28 टीएमसी पाणी धरणांमध्ये होते. म्हणजे 97 टक्के पाणी धरणांमध्ये होते. ऑक्टोबरपासून मार्चअखेरपर्यंत गेल्या सहा महिन्यांमध्ये पुणे शहराला आपण पिण्याच्या पाण्यासाठी 6.75 टीएमसी पाणी दिले. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, धरणात 28 टीएमसी पाणी होते आणि आज लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, धरणामध्ये साडेअकरा टीएमसी पाणी शिल्लक आहे. मग हे 9 टीएमसी पाणी कोठे गेले, हे पाणी कोठे मुरले याची चौकशी शासन करणार का ?

सभापती महोदय, जलसंपदा विभाग पुणे महानगरपालिकेला प्रतिदिन 1250 एमएलडी पाणी देत होते. आज त्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे आणि पाणीपुरवठा 1250 एमएलडीवरुन 1125 एमएलडीवर आणलेला आहे. आता 1125 एमएलडीमध्ये चार महिने भागवा असे सांगत आहात, ते शक्य होणार नाही. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. महेश पाठक यांनी चार दिवसांपूर्वी जलसंपदा विभागाला लेखी कळविले आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये 1125 एमएलडीशिवाय कमी पाणी आम्ही घेऊ शकत नाही., पुणे शहरातील नागरिकांच्या दृष्टीने हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी त्या संदर्भात जलसंपदा विभाग, पुणे महानगरपालिका आणि पुण्यातील सर्व पक्षांचे आमदार यांची एक बैठक या आठवड्यात माननीय पालकमंत्र्यांसह आणि आपल्या खात्यासह घेणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सदनाचे सदस्य आणि आमचे मित्र श्री. मोहनराव जोशी हे पुण्यातील असल्यामुळे पुण्यातील नागरिकांच्या व्यथा आणि वेदना त्यांनी त्यांच्या शब्दातून व्यक्त केलेल्या आहेत आणि त्याच्याशी शासन म्हणून आम्ही सहमत आहोत. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा विचारला की, 2010 साली करार संपला त्यामुळे पुन्हा महानगरपालिका व जलसंपदा विभाग करार करणार का ? तो करार काय होता, त्या कराराची व्याप्ती काय होती, अटी व शर्ती काय होत्या त्या तपासून बघितल्या जातील. त्याची माहिती घेतली जाईल आणि नंतरच या संदर्भात भाष्य करणे उचित होईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 9 टीएमसी पाणी कोठे गेले असा प्रश्न विचारलेला आहे. 9 टीएमसीच काय, 1-1 एमएलडीचा हिशोब ठेवला जातो. याबाबत मी निवेदनातील प्रत्येक परिच्छेदामध्ये माहिती नमूद केलेली आहे. 9 टीएमसी पाणी ही सामान्य गोष्ट नाही. हे पाणी कोठे जिरलेले नाही आणि कोणी अडविलेले सुध्दा नाही. पुढील 4 महिन्यांसाठी 4 एमएलडी पाणी पुरणार नाही असे सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नात सांगितले आहे. त्यासाठी पालक मंत्री, संबंधित विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी व महापौरांची एक बैठक आयोजित करण्याची त्यांनी सूचना केली आहे. मी त्याच्या पुढे जाऊन सांगेन की, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन याबाबत मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, शासनामार्फत व पुणे महानगरपालिकेमार्फत पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करणे गरजेचे होते. पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या योजनेची सुरुवात केली त्यावेळी पाईप लाईनचे टेंडर 10 कोटी रुपयांचे होते. आता अनेक कोटी रुपये खर्च केले जातात. पाईप लाईनमधून पाणी पुरवठा करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे, पुणे महानगरपालिकने 24 X 7 या पध्दतीने पाणी पुरवठा करण्याची योजना सुरु केलेली आहे. परंतु काही ठिकाणी 24 तास तर काही ठिकाणी दोनच तास पाणी पुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत महानगरपालिकेच्या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, पाणी पुरवठा करणे व नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे ही त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. शासनाची जबाबदारी नाही असा त्याचा अर्थ होत नाही. नवी मुंबई महानगरपालिकने एक धरण विकत घेऊन तेथील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविला आहे. मुंबईला मोडक सागर या जुन्या धरणातून पाणी पुरवठा केला जात होता. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने व एमएमआरडीएकडून नवीन धरण बांधण्याचा प्रयत्न केला. अशा पध्दतीने पुणे महानगरपालिकेने ही 4 धरणे बांधली त्यावेळी पुण्याची लोकसंख्या 9 लाख होती....

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

श्री.भास्कर जाधव.....

आज पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 45 लाखापर्यंत गेलेली आहे. पण धरणे तेवढीच आहेत. म्हणून पुणे शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र धरण बांधण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. ते धरण बांधण्यासाठी शासनाने व महानगरपालिकेने प्रयत्न सुरु केलेले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय अभ्यास करुन सभागृहात उत्तरे देत असतात. त्यांच्याकडे नगरविकास खाते आहे. हे खाते पिण्याच्या पाण्यासाठी दीर्घकालीन धोरण राबविणार आहे की नाही ? शेतीसाठी असलेले पाणी नागरिकरणासाठी वापरले जात आहे. या ठिकाणी नागरिकरणाचा बाऊ केला जातो, या व्यवसायाशी संबंधित असलेल्या लोकांचे लाड केले जातात. त्या भागाचा विकास शेतकऱ्यांच्या शेतीचे पाणी वापरुन केला जात आहे. नगरविकास खात्याकडून मेट्रो रेल्वेसाठी, रस्त्यांसाठी नियोजन केले जाते. परंतु पिण्याच्या पाण्यासाठी नगरविकास खात्याने नियोजन केल्याचे दिसून येत नाही. या खात्याने पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत शोधून पुढील 100 वर्षांत होणाऱ्या नागरिकरणाचा विचार करुन नियोजन करण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? त्याचप्रमाणे मंत्री महोदयांनी नवी मुंबईचे उदाहरण दिले आहे. खालापूर येथील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी बांधलेले धरण नवी मुंबई महानगरपालिकेने 200 कोटी रुपयात विकत घेतले आहे. शेतीचे पाणी नागरिकरणासाठी वापरले जाते. म्हणून शेतीचे पाणी नागरिकरणासाठी घेतले जाणार नाही असा धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सध्या प्रायॉरिटी बदललेली आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा दुर्लक्षित करुन चालणार नाही. पहिल्यांदा शेती आणि उद्योग बाजूला ठेवून पिण्यासाठी पाणी देण्याला प्रायॉरिटी आहे. एका बाजूला प्रचंड प्रमाणावर नागरीकरण वाढत आहे. शहरामध्ये जे मोठमोठे मॉल्स आणि इमारती उभ्या रहात आहेत त्या मॉल्सना आणि मोठ्या इमारतीमध्ये राहाणा-या रहिवाशांना लागणा-या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बिल्डरने करावी अशा प्रकारचा निर्णय करण्याची वेळ आलेली आहे. या संदर्भात नगरविकास विभागाने एक समिती गठीत केलेली असून पाण्याची व्यवस्था कशी करणार याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

श्री. हेमंत टकले : पुण्यासारख्या अफाट वेगाने वाढणा-या शहरातील पाण्याच्या प्रश्नासंबंधीची ही लक्षवेधी आहे. मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते की, पुण्यासाठी पाणी हे अधिक मोलाचे झालेले आहे. एकीकडे मूलभूत गरज भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असताना दुसरीकडे पाण्याचा गैरवापरही फार मोठ्या प्रामणावर होत असतो. त्यासंदर्भात एका शासकीय सभेमध्ये काही सूचना करण्यात आलेल्या होत्या. उदा. वाहन रोज धुण्याऐवजी एक दिवस आड धुवावे. पाणी कमी आहे हे खरे आहे. हे पाणी वाढविण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका आणि नगरविकास विभाग यांच्या तर्फे पाण्याचा योग्य वापर आणि पाण्याचे जतन या संदर्भात जनजागरण मोहीम हाती घेण्यात येणार आहे काय ? तसेच पाण्याच्या संदर्भात दीर्घकालीन उपाययोजना उदा, धरण बांधणे, पाईप दुरुस्ती करणे, पाण्याची चोरी थांबविणे यादृष्टीने शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे हे सर्व प्रश्न कायदा किंवा नियम करुन सुटत नसतात. या बाबतीत समाजप्रबोधन गरजेचे आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा निर्णय प्रत्येक माणसाने स्वत:पासून घेतला पाहिजे, तशी प्रत्येकाची मानसिकता तयार झाली पाहिजे. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाने एक समिती स्थापन केलेली असून प्रबोधनात्मक गोष्टींवर भर देण्यात येईल. तसेच पाणी रिसायकल करुन त्याचा वापर करण्याच्या दृष्टीनेही विचार करण्यात येत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईसह नागपूर, पुणे व ठाणे येथे रिक्षाचालकांची सुरु असलेली मनमानी

मु. शी. : मुंबईसह नागपूर, पुणे व ठाणे येथे रिक्षाचालकांची सुरु असलेली मनमानी यासंबंधी श्रीमती अलका देसाई, सर्वश्री. भाई जगताप, अनिल भोसले, जयप्रकाश छाजेड, रमेश शेंडगे, हेमंत टकले, व जयवंतराव जाधव,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईसह नागपूर, पुणे व ठाणे जिल्ह्यात रिक्षा चालकांची सुरु असलेली मनमानी, मुजोरी व अरेरावी, रिक्षा मिटर बंद ठेवण्यात येणे, त्यामुळे प्रवाशांची ऑटो रिक्षा चालकांकडून होत असलेली आर्थिक पिळवणूक लक्षात घेवून शासनाने दिनांक १ मार्च, २०१२ पासून मुंबईसह, पुणे, नागपूर, ठाणे, शहरातील ऑटो रिक्षामध्ये इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स बसविण्याची केलेली घोषणा, तसेच मीटर जलद करुन प्रवाशांना लुटणाऱ्या रिक्षा चालकांना वठणीवर आणण्याच्या उद्देशाने मुंबई-ठाण्यातील आरटीओ कार्यालयानी जोरदार कारवाई सुरु करणे, वांद्रे (पूर्व), चिता कॅम्प, वाकोला, कळवा, उल्हासनगर आदी ठिकाणी मीटर नसलेल्या आणि पिवळया ऐवजी पांढऱ्या नंबर प्लेट असलेल्या बोगस रिक्षा आढळणे, सीएनजीमध्ये रुपांतर करुनही पेट्रोलप्रमाणे दर आकारण्यात येत असणे, रिक्षा संघटनेने घेतलेला आक्रमक पवित्रा आणि भाडेवाढीसाठी सुरु केलेले आंदोलन, यासर्व घटनांमुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने बोगस रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : लक्षवेधीच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, महाराष्ट्र राज्यात ऑटोरिक्षाची तपासणी वायुवेग पथकाकडून करण्यात येते. मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदींचा भंग करणाऱ्या चालक/मालकाविरुध्द कारवाई करण्यात येते. हे राज्य शासनाचे उत्तर असत्य किंवा फसवे आहे असे मी म्हणणार नाही. सामान्य लोकांमध्ये काम करीत असताना सामान्य लोकांना कोणकोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागते हे माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्तीला कळू शकते. मी एक उदाहरण देते. रात्री 12.30 वाजता आमच्या कन्नमवार नगर येथील एका मुलाला तातडीने हॉस्पिटलमध्ये घेऊन जायचे होते. माझ्या गाडीचा ड्रायव्हर त्यावेळी घरी गेला होता. त्यावेळी रिक्षाचालकाला वारंवार विनंती करुन देखील तो रिक्षाचालक आला नाही. रिक्षाचालक संघटनेचे पिटीशन उच्च न्यायालयाने देखील फेटाळून लावलेले असल्याचे वृत्त कालच्या वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3.... श्रीमती अलका देसाई...

या सगळया समस्येवर शासनाने तोडगा काढला आहे. रिक्षा चालक युनियनचे प्रतिनिधी कोर्टात गेले होते, परंतु कोर्टाने त्यांचे म्हणणे नाकारले आहे. या निर्णयाबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. शासनामार्फत सर्व रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम सुरु होणार आहे. हे काम खाजगी कंपन्यांमार्फत केले गेले तर त्यामध्ये गैरप्रकार केले जाण्याची शक्यता आहे. सीएनजी रिक्षा असल्यास पेट्रोल रिक्षाप्रमाणे दर आकारले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने स्वत:च्या देखरेखीखाली हे इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम करावे, अशी माझी सूचना आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दिनांक 1 मार्च, 2012 पासून नवीन ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्याचा शासनाने निर्णय घेतला. मुंबई महानगर क्षेत्रात ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागातील क्षेत्र वगळून दिनांक 1 एप्रिल, 2012 पासून ज्या दिवशी योग्यता प्रमाणपत्र वितरित होईल त्या तारखेला ऑटो रिक्षांना नवीन इलेक्ट्रॉनिक मीटर लावले जातील अशा प्रकारचे आदेश काढण्यात आले आहेत. नवीन ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्यास सुरुवात झालेली आहे. माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी खाजगी कंपन्यांकडून हे काम करीत असताना गैरप्रकार केले जातील, म्हणून हे काम शासनाने करावे अशी सूचना केली आहे.

सभापती महोदय, एकूण 11 उत्पादक कंपन्यांना शासनाने या कामासाठी नियुक्त केले आहे, कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. शासनाने त्यांच्याशी करार केलेला आहे. 11 पैकी जो उत्पादक रिक्षा चालकांना सोयीचा असेल त्याच्याकडे जाऊन त्यांनी इलेक्ट्रॉनिक मीटर बसवून घ्यायचे आहे. पुढील काळात इलेक्ट्रॉनिक मीटरच्या माध्यमातून ग्राहकांसाठी भाडे आकारणी केली जाणार आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, परिवहन विभागाने दोन वर्षापूर्वी या राज्यातील ऑटो रिक्षा चालकांसाठी तामीळनाडू सरकारच्या धर्तीवर समाजकल्याणकारी बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. या संदर्भात अनेकदा बैठका झाल्या आहेत. नियमावली तयार झाली आहे. असे असताना दोन वर्षात हे समाजकल्याणकारी बोर्ड स्थापन करण्यास विलंब का होत आहे? शासन हे समाजकल्याणकारी बोर्ड किती दिवसात जाहीर करणार आहे?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या संदर्भात दोन-तीन बैठका झालेल्या आहेत. राज्याच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सुध्दा या संदर्भात बैठक घेतली होती. या संदर्भातील धोरण ठरविण्याचे काम सुरु आहे. लवकरच हे मंडळ करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मंत्री महोदय, आपण सांगितले की, 11 उत्पादक कंपन्यांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम दिले आहे. हे कॉन्ट्रॅक्ट 11 उत्पादक कंपन्यांपुरते मर्यादित का आहे? या स्पर्धेमध्ये अनेक कंपन्या असू शकतील.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, शासनाने जाहीर आवाहन करुन निविदा मागविल्या होत्या. ज्या उत्पादकांनी यामध्ये सहभाग घेतला, ज्यांनी टेंडर भरले, कोटेशन सादर केले अशा उत्पादकांसोबत जवळपास 4-6 वेळेला बैठका आयोजित केलेल्या होत्या. जास्तीत जास्त चांगल्या पध्दतीने काम कोण करुन देईल याबाबत शासनाने सविस्तर माहिती घेतली. हे टेंडर राज्यातील आणि देशातील सर्व उत्पादकांना ओपन ठेवले होते. ज्यांनी ज्यांनी अर्ज केले त्यांना काम देण्यात आले.

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी क्र. 3.....

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, रिक्षावाल्यांबाबत सर्वच ठिकाणी तक्रारी आहेत पण त्यांचेही काही प्रश्न आहेत ही वस्तुस्थिती आहे. रिक्षावाल्यांना भाडे आणि प्रवाशांना रिक्षा अशी दोघांची गरज असते यादृष्टीने एक फोन केल्यावर रिक्षा मिळेल असे बंधन आपण प्रत्येक रिक्षा स्टँडवर घालणार काय ? तसेच रिक्षावाल्यांसोबत बऱ्याच ठिकाणी वाद होतो आणि बहुतेक रिक्षा ड्रायव्हर हे हिंदी भाषेतून वाद घालतांना दिसतात. म्हणून शासन त्यांना परवाना देताना किमान मराठी भाषा येईल असे बंधन घालणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, दूरध्वनीवरुन रिक्षा बोलविता येईल काय यासंबंधी माहिती घेऊन काय निर्णय घेता येईल याचा जरुर विचार करण्यात येईल. तसेच रिक्षा ड्रायव्हरला मराठी भाषा अवगत पाहिजे त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, नियमानुसार लायसन्स मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना लायसन्स देतो पण भाषेचे बंधन घालणे शक्य होणार नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, राज्यात एकूण रिक्षाची संख्या 7.50 लाख पेक्षा अधिक आहे. या अधिकृत संख्येपेक्षा सुध्दा एकाच परमीटवर अनेक रिक्षा चालणे असेही प्रकार घडतात. पण सर्व सामान्य माणसाच्या दृष्टीने वेगवेगळ्या ठिकाणाहून जाण्या-येण्यासाठी उपलब्ध असलेल्या वाहन व्यवस्थेत रिक्षा हा फार महत्वाचा घटक आहे. असे असताना 326 ऑटोंना आपण इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स लावले आहेत. याचा विचार करता एक महिन्याला 400 मीटरप्रमाणे वर्षाकाठी फक्त 4800 मीटर्स लावले जातील. अशा गतीमुळे 7.50 लाख रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स बसविण्यास बराच अवधी लागेल. त्यातून पुढील वर्षात इलेक्ट्रॉनिक्स मीटरच्या रिक्षा आणि जुन्या मीटरच्या रिक्षा असा नवीन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारचे जे प्रश्न त्यातून निर्माण होणार आहेत त्यांची सोडवणूक करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, शासनाने अत्यंत स्पष्ट धोरण तयार केले आहे की, 1 एप्रिल 2012 पासून महानगर विकास क्षेत्र आणि ठाणे या भागातील शहरांमध्ये मीटरचे नुतनीकरण केले जाईल. त्यानंतर पिंपरी-चिंचवड व पुणे महापालिका क्षेत्रात 1 मे, 2012 पासून असे मीटर्स लावले जातील. हे दोन भाग सोडून राज्यातील इतर महापालिका क्षेत्र सोडून "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रात 1 जुलै पासून नवीन इलेक्ट्रॉनिक्स मीटर्स लावण्याचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

हाती घेतला आहे. त्यामुळे एकाच वेळेस लाड येणार नाही तसेच मीटर्सची कमतरता देखील भासणार नाही असे नियोजन आपण केले असल्याने सन्माननीय सदस्यांनी जी अडचण होण्याची शंका व्यक्त केली, ती अडचण निर्माण होणार नाही. पुढील वर्षापासून महापालिका क्षेत्रात व नगरपालिका क्षेत्रात 4 लाख रिक्षांना मीटर्स लावले जाणार आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : ज्यावेळेस माणसाकडे वेळ कमी असतो तेव्हा तो टॅक्सी किंवा रिक्षा शोधत असतो. तसेच रिक्षाची संख्या खूप कमी आहे असे आपण म्हणतो, अशा परिस्थितीत सर्वांचीच गरज भागेल म्हणून शेअर रिक्षा किंवा टॅक्सी असणे महत्वाचे आहे. काही ठिकाणी अशा प्रकारे शेअरने रिक्षा व टॅक्सी चालू असल्याचे पहायला मिळते. त्यांना शासनाने परवानगी दिली आहे काय, नसल्यास त्याशिवाय प्रश्न सुटणार नाही म्हणून अशी परवानगी शासन देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर :सभापती महोदय, काही ठिकाणी परवानगी दिलेली असून जास्तीच्या परवानग्या देण्यासाठी विचार केला जाईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, अनेक ऑटो रिक्षा चालक, टॅक्सी चालक मराठीतून न बोलता हिंदीतून बोलत असतात. ज्याला स्थानिक भाषा येते, जो 15 वर्षे महाराष्ट्राचा रहिवासी आहे त्यालाच ऑटो व टॅक्सीचे लायन्स दिले जावे अशी नियमात तरतूद आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते ते चुकीचे आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते तपासून घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे. ज्याला स्थानिक भाषा येते त्यालाच लायसन्स दिले जाईल काय ? तसेच जे रिक्षा चालक हिंदीतून बोलतात त्यांनी मराठीतूनच बोलले पाहिजे हे म्हणणे आपल्याला मान्य आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, होय.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वरळी नाका येथील मंडईच्या प्रस्तावित पुनर्विकासाच्या नावाखाली मच्छीमारांवर होत असलेला अन्याय

मु. शी. : वरळी नाका येथील मंडईच्या प्रस्तावित पुनर्विकासाच्या नावाखाली मच्छीमारांवर होत असलेला अन्याय यासंबंधी सर्वश्री.प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील वरळी नाका येथील कै.बाळकृष्ण रघुनाथ गावडे मंडईच्या प्रस्तावित पुनर्विकासाच्या नावाखाली मुंबईच्या मूळ रहिवाशी असलेल्या कोळी महिलांना जबरदस्तीने हटवून त्यांचा पारंपरिक मच्छी व्यवसाय बंद करण्याचा होत असलेला प्रयत्न, या मंडईत सुमारे 96 कोळी महिला असताना त्यापैकी 85 कोळी महिलांना पुनर्विकासात गाळे देण्यास पात्र ठरविले असून उर्वरित 11 कोळी महिलांना वाऱ्यावर सोडणे, या महिलांना विकासक व महानगरपालिका यांच्याबरोबर झालेल्या कराराच्या आराखडयाची प्रत न देता त्यांना अंधारात ठेवणे, परिणामी मच्छीमार बांधवांत पसरलेले चिंतेचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ही योजना राबवित असतांना जो काही सर्व्हे केला गेला त्यातून पात्र व अपात्र स्वरुपाचे जे काही मासळी विक्रेते होते त्यांच्या बाबतीत निर्णय घेतला गेला. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "12 विक्रेत्यांनी अनुज्ञापत्र न दिल्याबददल तक्रार केली आहे. ज्यावेळी 85 मासळी विक्रेत्यांना अनुज्ञापत्र देण्यासाठी सर्व्हेक्षण करण्यात आले तेव्हा अनुज्ञापत्र देण्याच्या निकषानुसार सर्व्हेक्षण समयी सदर विक्रेत्यांनी पुरावे सादर केले नाहीत व निकषानुसार ते पात्र ठरत नसल्याने त्यांना अनुज्ञापत्र देण्यात आले नव्हते".

सभापती महोदय, मुंबईतील अनेक मंडयांमध्ये लायसन्स विक्रेते मासळी विक्रीचा व्यवसाय करीत असतात तर काही मासळी विक्रेते रोज महानगरपालिकेला पावत्या फाडून पैसे देतात व मासळी विक्रीचा व्यवसाय करतात. या ठिकाणी मासे विक्री करणारे विक्रेते आहेत ते फार गरीब आहेत. हे गरीब मासळी विक्रेते गेल्या 20-25 वर्षापासून मंडईत मासळी विक्रीचे काम करीत आहेत. या मासळी विक्रेत्यांकडून रोज पावती फाडली जाते. त्यामुळे या मासळी विक्रेत्यांचा हक्क अबाधित राहिला पाहिजे, या मासळी विक्रेत्यांना पुनर्विकासामध्ये घेतले जाणार आहे काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पुनर्विकासाचा प्रकल्प होतांना त्या ठिकाणी अगोदर जे मटनाचे दुकान होते त्या मटन दुकानाला बाजूला करुन ते दुकान रस्त्याच्या कडेला सुरु आहे. परंतु या मटनाच्या दुकाना समोरच जैन धर्मीयांचे देरासर असून जैन धर्मीयांच्या या मटनाच्या दुकानाबद्दल अनेक तक्रारी येत आहेत. त्यामुळे जैन धर्मीयांच्या भावना दुखावणार नाहीत, त्यांना त्रास होणार नाही यासाठी सदर मटनाचे दुकान दुस-या ठिकाणी हलविले जाण्याच्या संदर्भात आपण काही निर्देश देणार आहात काय ?

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, मुंबई शहरात एक वर्षापूर्वी क्रॉफर्ड मार्केटच्या पुनर्विकासाच्या संदर्भात हरकती घेतल्या होत्या व तेव्हा पॉलिसीला स्थगिती देण्यात आली होती. गेल्या एक वर्षापासून पुनर्विकासाच्या संदर्भात क्रॉफर्ड मार्केटच्या संदर्भात महापालिकेची पॉलिसी अस्तित्वात नाही. त्यामुळे या पॉलिसीचा निर्णय तातडीने होण्यासाठी शासन आणि महानगरपालिका निर्णय घेणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. सन्माननीय सदस्यांनी मंडईत सुमारे 96 कोळी महिलांचा समावेश आहे असे सांगितले आहे. परंतु लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात एकंदर 97 कोळी महिलांचा समावेश आहे असे म्हटले आहे.

सभापती महोदय, 85 मासळी विक्री करणारे जे लोक होते त्यांना ज्या ठिकाणी मासळीचे मार्केट डेव्हलप होत आहे त्या ठिकाणी गाळे दिले जाणार आहेत. उरलेले जे 12 मासळी विक्री करणारे लोक आहेत त्यांना सामावून घेतले जाणार आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. ज्यावेळेला मार्केट डेव्हलप करण्यात आले होते त्यावेळेस या 12 मासळी विक्रेत्यांनी कागदपत्र सादर केली नव्हती. परंतु तरी देखील या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या 12 मासळी विक्रेत्यांचे म्हणणे व पुरावे गोळा करण्याची त्यांना संधी दिली जाईल.

सभापती महोदय, या मंडईत एक मटन विक्री करणारा व्यावसायिक होता त्याला तेथून बाहेर काढल्यामुळे तो आता जैन धर्मीयांच्या देरासरच्या समोरच व्यवसाय करीत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

याबाबतची माहिती घेऊन त्याला तेथून बाजूला करून दुसऱ्या ठिकाणी व्यवसाय करण्यास सांगण्यात येईल. क्रॉफर्ड मार्केट जळल्यानंतर त्या मार्केट पॉलिसीला स्थगिती दिलेली आहे. ती पॉलिसी शासन आणि महानगरपालिका एकत्र येऊन लवकरात लवकर अमलात आणेल काय, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होतो. त्यास "होय" असे उत्तर आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना या निमित्ताने एवढेच विचारावयाचे आहे की, आज मुंबईतील सर्व मंडईंचा विकास करण्यात येत आहे. कोळी बांधवांचा परिशिष्ट-2 मध्ये समावेश करण्यामध्ये बरीच का-कू केली जाते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे म्हणाले की, कोळी बांधवांकडून पावत्या फाडल्या जातात. त्यांचा गाळा अधिकृत असतोच असे नाही. तेव्हा परिशिष्ट-2 मध्ये त्यांचा समावेश करण्यासंबंधीचे धोरण नगरविकास खाते ठरविणार आहे काय ? पुनर्विकासाच्या काळात त्यांना खूप कमी भाडे दिले जाते. अन्य व्यापाऱ्यांना जास्त भाडे दिले जाते. ते फक्त पावती फाडून बसतात म्हणून कमी भाडे दिले जाते. त्या पावतीवर त्यांना दुसरीकडे कुठेही बसता येत नाही. इतर व्यापाऱ्यांना जे भाडे दिले जाते ते कोळी महिलांना देण्यासंबंधीच्या सूचना नगरविकास विभागाकडून देण्यात येतील काय ? कोळी बांधवांनी वेळोवेळी नगरविकास विभाग आणि महानगरपालिकेकडे आपले म्हणणे मांडलेले आहे. तेव्हा याबाबत आपण संबंधित विभागांना आदेश द्याल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई अनेकांची आहे. मुंबईचे मालक म्हणून आपण कोळी बांधवांचा उल्लेख करतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सर्वांच्या नजरेस आणून दिला आहे की, कोळी बांधव हे पारंपरिक पद्धतीने तेथे बसतात. त्यांच्याकडे कायदेशीर कागदपत्र नसतील, पण त्यांचा हक्क अबाधित राहिला पाहिजे. ही सर्व मंडळी वर्षानुवर्षे येथे राहणारी आहेत. समुद्र किनारी राहणारी आहेत. वर्षानुवर्षे व्यवसाय करणारी आहेत. ते काही कागदपत्रांची पूर्तता करण्यामध्ये कमी पडत असतील तर त्यांना संधी देऊन त्यांचा त्या संबंधातील हक्क अबाधित ठेवण्यात येईल. मुळामध्ये त्यांना भाडे कमी असते व जेव्हा पुनर्विकासाची वेळ येते तेव्हा त्यांना ती जागा मिळत नाही. त्यामुळे त्यांची पंचाईत होते. असा दुसरा प्रश्न येथे विचारण्यात आला. या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यास भाग पाडण्यात येईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मराठवाड्यातील अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या मुलांवर जीवनदायी आरोग्य योजनेतून शस्त्रक्रिया करण्यासाठी अन्य योजनेतून निधी देणे

मु.शी.: मराठवाड्यातील अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या मुलांवर जीवनदायी आरोग्य योजनेतून शस्त्रक्रिया करण्यासाठी अन्य योजनेतून निधी देणे या संबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, केशवराव मानकर, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोगय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्या बाबत त्यांनी निवेदन करावी अशी विनंती करतो.

"मराठवाड्यातील वेगवेगळया ठिकाणच्या अंगणवाड्यांमध्ये शिकणाऱ्या 439 मुलांवर हृदयशस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असणे, एका शस्त्रक्रियेसाठी किमान दीड ते दोन लाख रुपयांची असलेली आवश्यकता, जीवनदायी योजनेतून या मुलांच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक मदत व्हावी म्हणून दिलेले अनेक प्रस्ताव आरोग्य विभागात प्रलंबित असणे, परभणी जिल्ह्यातून सर्वाधिक 84 प्रस्ताव असणे, औरंगाबाद 76, जालना 33, हिंगोली 69, नांदेड 51, बीड 32, लातूर 32 व उस्मानाबाद 59 या दाखल करण्यात आलेले प्रस्ताव प्रलंबित असणे, या मुलावंर शस्त्रक्रियेसाठी अन्य योजनेतून निधी दिला जावा असा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी वरिष्ठांकडे पाठविणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मराठवाड्यातील अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या शून्य ते सहा वयो गटातील मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण अशी ही लक्षवेधी सूचना आहे. मराठवाड्यातील अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या 439 मुलांवर हृदयशस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता आहे. जीवनदायी योजनेतून या मुलांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक मदत व्हावी म्हणून दिलेले प्रस्ताव आरोग्य विभागात धूळ खात पडून आहेत. मजुरी किंवा शेती करणाऱ्या गरीब पालकांना मुलाच्या आरोग्याचा दीड लाखाचा हृदय शस्त्रक्रियेवरील खर्च झेपत नसल्यामुळे व शासन त्यांचे आर्थिक प्रस्ताव मंजूर करीत नसल्यामुळे आज ही मुले उपचारा अभावी त्रस्त झाली आहेत. उत्तरामध्ये दिले आहे की, कुठलाही प्रस्ताव प्रलंबित नाही. सर्व प्रस्ताव मंजूर झाले आहेत. खुलताबाद तालुक्यातील कु.रोहित चंपालाल गोमुलाडू या मुलाच्या शस्त्रक्रियेसाठी जीवनदायी योजनेतून दीड वर्षापूर्वी प्रस्ताव पाठवून सुद्धा अद्याप मंजूर झालेला नाही अशी माझी माहिती आहे. त्याच बरोबर जालना जिल्ह्यातील विरेगाव येथील कु.ऋषीकेश विलास बागल या मुलाची देखील अशीच अवस्था आहे. त्याला देखील दीड वर्ष झाले आहे. याचा सुद्धा प्रस्ताव शासनाकडे दीड वर्षे धूळ खात पडला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझे दोन तीन महत्त्वाचे प्रश्न आहेत. या शस्त्रक्रिया तातडीने न झाल्याने त्या मुलांचे जीवन धोक्यात आले आहे किंवा येऊ शकते. त्यामुळे सदर प्रस्ताव एक महिन्याच्या आत मंजूर करण्यासंबंधी शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

मराठवाडयामधील अंगणवाडीतील 436 मुले हृदय विकारांनी त्रस्त असतांना काही कारणांमुळे त्यांचे प्रस्ताव आले नसले तरी त्या मुलांचे फेर सर्व्हेक्षण करुन त्यांच्यावर उपचार करण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय? जीवनदायी योजनेमध्ये 1 लाखापर्यन्तच्या मंजुरीचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सकांना असून ते दीड लाखापर्यन्त वाढवून देण्याची आवश्यकता आहे. याचे कारण दीड लाखापर्यन्तचे अधिकार संचालक, आरोग्य सेवा यांना आहेत. जिल्हा शल्य चिकित्सकांकडून आरोग्य संचालकांकडे मंजुरीचे प्रस्ताव जाण्यामध्ये बराच वेळ जातो. याकरिता दीड लाखापर्यन्त मंजुरीचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सकांना देण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शहरामधील अंगणवाडयांमध्ये शून्य ते 6 वयोगटातील मुले आहेत. त्यांची वैद्यकीय तपासणी वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते व त्यानुसार त्यांची यादी तयार करण्यात येते. त्या यादीनुसार 439 मुले आयडेंटिफाय झालेली आहेत. त्यामध्ये शस्त्रक्रियेसाठी 251 मुले आयडेंटिफाय करण्यात आली आहेत, त्याचप्रमाणे 34 मुलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, 85 मुलांवर शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता नव्हती, तसेच 17 मुलांवर कोणत्याही वैद्यकीय उपचाराची आवश्यकता नव्हती अशा एकूण 136 केसेस आहेत. सभापती महोदय, यामध्ये दोन प्रकारचे प्रस्ताव अपेक्षित आहेत. एक म्हणजे शस्त्रक्रिया करण्याकरिता मुलांच्या पालकांकडून संमती मिळण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असते. परंतु 174 पालकांकडून कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही. त्याबाबत त्यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे. त्याचप्रमाणे नांदेड, हिंगोली आणि जालना या तीन जिल्ह्यातील खाजगी इस्पितळांकडून एस्टिमेट तयार होऊन आमच्याकडे अजूनपर्यन्त आलेले नाहीत असे एकूण 129 प्रस्ताव आहेत. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या बाबतीत लातूर व औरंगाबाद विभागाच्या उपसंचालकांनी आपल्या स्तरावर डीएचओ, सी.एस. यांना सांगून मघाशी सांगितलेल्या केसेसचे प्रस्ताव ताबडतोब प्राप्त करुन घेऊन त्यांच्यावर तत्काळ शस्त्रक्रिया करण्याबाबत त्यांना सूचना दिलेल्या आहेत. हे अधिवेशन संपल्यानंतर तत्काळ मी स्वत: या संदर्भात औरंगाबाद येथे बैठक घेणार आहे. ज्याप्रमाणे विदर्भामध्ये एक मोहीम हाती घेऊन आपण शस्त्रक्रिया केल्या आहेत त्याप्रमाणे या ठिकाणी देखील एक मोहीम हाती घेऊन तीन महिन्याच्या आत आपल्याकडे असलेल्या 111 रुग्णालयांमध्ये सर्व शस्त्रक्रिया पूर्ण करण्याचे आपण नियोजन करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हिंगोली, नांदेड व उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये एकही शस्त्रक्रिया झालेली नाही असे निवेदनात म्हटले आहे. 51 पैकी 34 शस्त्रक्रिया न होण्याची कारणे कोणती? नांदेड व जालना जिल्ह्यामध्ये शस्त्रक्रिया करण्यास लायक असलेले 129 रुग्ण असतांना त्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत म्हणून एकही शस्त्रक्रिया करण्यात आली नाही. या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन त्यांच्या शस्त्रक्रियांची व्यवस्था करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, नांदेड जिल्ह्यामध्ये शस्त्रक्रिया करण्यासाठी 48 केसेस इलिजिबल आहेत. त्यांच्या बाबतीत हॉस्पिटलमधून शस्त्रक्रियेचे एस्टिमेट न आल्यामुळे उशीर झालेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : त्यांनी एस्टिमेट कां पाठविले नाही याबाबत त्यांच्यावर कारवाई करणार काय?

.प्रा. फौजिया खान : मी हे मिशन नोडबाबत सांगितले आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे आठ जिल्ह्यांमध्ये शस्त्रक्रिया करण्यासाठी मी स्वत: बैठक घेणार असून त्याप्रकारचे नियोजन करण्यात येत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांच्या लक्षवेधी सूचनेतील दोन विषय फार महत्वाचे आहेत. माननीय मंत्री महोदयांनी एक गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे की, 20 तारखेला लक्षवेधी सूचना दिल्यानंतर ती 29 तारखेला चर्चेला येण्यापूर्वी उरलेली प्रकरणे आपल्या विभागाने घाईघाईने मंजूर केली. पण ही प्रकरणे कधी मंजूर केली? ही लक्षवेधी सूचना खालच्या स्तरापर्यंत केव्हा गेली? याबाबतीत जर आपण बैठक घेतली तर ते आपल्याला कळेल आणि अशा गोष्टींसाठी जर लक्षवेधी सूचना मांडण्यात आली तर या बाबी क्लिअर होत असतात आणि ही बाब चिंताजनक आहे. माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत स्पेसिफीक माहिती घ्यावी आणि मग बैठकीच्या वेळी ही प्रकरणे पेडींग का रहातात याबाबतीत संबंधितांना जाब विचारावा. दुसरे म्हणजे आपल्या विहित हॉस्पिटलमध्येच या शस्त्रक्रिया व्हावयाच्या आहेत. यासाठी विभागाकडून छोट्या हॉस्पिटलसाठी एक लाख रुपयांची आणि मोठ्या हॉस्पिटलसाठी दीड लाख रुपयांची तरतूद केली जाते.परंतु ती तरतूद उपलब्ध होण्यामध्ये एवढा कालावधी जातो की त्यामुळे संबंधितांचा आजार बळावतो. तसेच हा खर्च खाजगी हॉस्पिटलसाठी करावयाचा नाही ते आपल्याच हॉस्पिटलमध्ये खर्च व्हावयाचे आहेत. त्यामुळे त्याचे ऑडीट होणार आहे. तेव्हा खालच्या स्तरावर जी छोटी हॉस्पिटल्स् आहेत त्याठिकाणी दीड लाख रुपये खर्च करण्याचे अधिकार दिले तर तेथे सर्व प्रकारचे आवश्यक ते उपचार लगेच सुरु होतील. तशा प्रकारे दीड लाख रुपये खर्च करण्याचे अधिकार छोट्या हॉस्पिटलसाठी देणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे बैठक घेऊन त्यामध्ये ही बाब कशासाठी पेंडींग आहे, याला का उशीर लागला आहे? याची निश्चितपणे माहिती घेण्यात येईल. पण त्याही पेक्षा मुलांवर हृदयशस्त्रक्रियेची ऑपरेशन्स् होण हे जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे ती लवकरात लवकर करण्यात येत आहेत. तसेच याबाबतीतील जी एस्टीमेटस् असतात, ती प्रायव्हेट आयडेन्टीफाय हॉस्पिटल्स्कडून देण्यात येतात. तसेच त्या बाबतीतील पाठपुरावा सिव्हील सर्जनकडून होत असतो आणि याबाबतीत टाईम टू टाईम लक्ष देण्याची जबाबदारी त्यांची असते. तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दीड लाखापर्यंतच्या अधिकाराबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे तो तपासून घेण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, याठिकाणी आम्ही महत्वाच्या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत भरपूर आकडेवारी दिलेली आहे.याठिकाणी निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, 51 रुग्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

बालकांचे प्रस्ताव संबंधित उपसंचालकांकडे प्राप्त झाले,त्यापैकी 47 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून 34 रुग्ण बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत आणि अजूनही 13 जणांवरील शस्त्रक्रिया व्हावयाची आहे. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये याबाबतीत खूप मोठा गाजावाजा करण्यात आला आणि मग बाकेही वाजविण्यात आली. पण माझी अशी माहिती आहे की, जीवनदायी योजनेकरता 116 कोटी रुपयांची तरतूद होती आणि आपण 114 कोटी रुपयेच दिले आणि त्यातील देखील 109 कोटी रुपयेच खर्च केले. तसेच आपल्याकडे जीवनदायी योजनेसाठी 58 कोटी रुपयांच्या बाबतीत मागणी आली आहे काय ? जर तशा प्रकारची मागणी आली असेल तर अशा प्रकारच्या अजून किती केसेस पेंडींग आहेत ? याची सदनाला माहिती द्यावी.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, यासंबंधात वित्त विभागाकडे 70 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे आणि ती मान्य होईल असे अपेक्षित आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी एकच स्पेसिफीक प्रश्न विचारला होता की, या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी दीड-दीड, दोन-दोन वर्षे लागतात. अशा वेळी शासन सदरहू प्रस्ताव एक महिन्यामध्ये मंजूर करण्यासंबंधी निर्णय घेणार आहे काय ? याचे उत्तर मला माननीय मंत्री महोदयांकडून मिळालेले नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, याबाबतीत अजून गती कशी देता येईल या दृष्टीने या संबंधात बैठक घेऊन ही बाब तपासून पहाण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अंगणवाडीमध्ये मोठ्या संख्येने मुलांना हृदयाचा विकार असून त्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असणे ही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब आहे. केवळ ही बाब कोणत्या योजनेमध्ये बसवावी आणि त्यासाठी सदरहू योजनेमध्ये निधी आहे किंवा नाही याच्या पलीकडे जाऊन जर आपण विचार केला तर राज्य शासनच काही संस्थांना निर्देश देऊ शकते. उदाहरणार्थ सिध्दीविनायक ट्रस्ट किंवा साई संस्थान आहे, ज्यांच्याकडे निधीची उपलब्धता आहे आणि कदाचित यातील काही ठिकाणे अशी आहेत, उदाहरण द्यावयाचे तर साई संस्थानमध्ये जाऊन सुध्दा तेथे अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया होऊ शकतात. यासाठी जर आपण विशेष कॅम्प आयोजित केला, साई संस्थानबरोबर चर्चा केली तर मला अशी निश्चित खात्री वाटते की, या सगळ्या शस्त्रक्रिया एका महिन्यामध्ये साई संस्थानमार्फत देखील करता येऊ शकतात.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

हा प्रश्न तातडीने सुटला पाहिजे असे आपल्या अधिकाऱ्यांना मनापासून वाटेल तेव्हाच हा प्रश्न सुटू शकेल. हृदयविकार असलेल्या मुलांवर लवकरात लवकर शस्त्रक्रिया करुन त्यांचे नेहमीचे आयुष्य पुन्हा सुरु करावे. तेव्हा मानवतेच्या भावनेतून पुढील एक-दोन महिन्यात हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने विचार होईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कॅगच्या अहवालाबाबत</u>

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचेकडून प्रकाशित होणारा अहवाल विधिमंडळाच्या अधिवेशनात मांडला जातो. हा अहवाल अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहासमोर ठेवण्यात येतो त्यामुळे त्यावर येथे चर्चा करता येत नाही. शासनाच्या एकूण कारभारा बाबत कॅगचा अहवाल असतो आणि त्यावर सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे असतात. तेव्हा माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, कॅगचा अहवाल या आठवड्यात मांडावा जेणेकरुन आम्हाला त्यावर चर्चा करता येईल.

उप सभापती : या बाबत शासनाने निवेदन करावे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी.: मुंबईतील कुर्ला परिसरात गेल्या दोन वर्षात 29 मुलींवर झालेले बलात्कार तर 4 खुनाच्या घडलेल्या घटना या बाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, मुंबईतील कुर्ला परिसरात गेल्या दोन वर्षात 29 मुलींवर बलात्कार आणि चार खुनाच्या घटना घडल्या आहेत. राज्यात अल्पवयीन मुलींवर बलात्कार व त्यांची निर्घृण हत्या होण्याच्या प्रकारात मोठी वाढ झालेली आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे महिला व मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेव्हा या बाबत शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राज्यातील अध्यापक विद्यालयातील प्रवेशासाठी शासकीय कोट्यातील रिक्त जागा प्रथम वर्षात न भरल्यास त्या जागा दुसऱ्या वर्षी संस्थेस भरण्यास परवानगी देणे या बाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील अध्यापक विद्यालयातील (ज्याला आपण डी.एड.कॉलेज म्हणतो आता नवीन नाव डी.टी.एड. कॉलेज आहे) प्रवेश केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून दिले जातात.

शासन स्तरावरील प्रवेश प्रक्रिया 17 नोव्हेंबर, 2011 रोजी संपली आहे. या वर्षासाठी डी.एड. प्रवेशासाठी 89 हजार 525 इतक्या जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी 59 हजार 879 जागा शासकीय कोट्यातील असून एकूण 46 हजार 462 जागा भरल्या आहेत. आता शासकीय कोट्यातील 13 हजार 417 इतक्या जागा रिक्त आहेत. या रिक्त जागा शासनाकडून भरल्या जात नाहीत आणि संस्थाचालकांना देखील भरण्याची परवानगी मिळत नाही. परिणामत: काही अध्यापक महाविद्यालयामध्ये 15 ते 18 जागा रिक्त आहेत. पहिल्या वर्षी जागा रिक्त राहत आहेत आणि दुसऱ्या वर्षातही जागा रिक्त राहत आहेत. त्यामुळे संस्थांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. तेव्हा रिक्त जागांवर शासनाकडून उमेदवार उपलब्ध होत नसतील तर त्या जागा संबंधित संस्थांना भरण्याची परवानगी देण्या बाबत शासनाने विचार करावा. कारण मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात अशी परवानगी देण्यात आली होती. तेव्हा या बाबत लवकर निर्णय घेऊन ही पदे भरण्याची परवानगी मिळावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व दवाखाने इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या मदतनीसांच्या मानधनात वाढ करणे या बाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्ले्खाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आरोग्य खात्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व दवाखाने इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या मदतनीसांना मासिक रुपये 900 इतके मानधन देण्यात येते. राज्यात रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुरास दर दिवशी 141 रुपये इतकी मजुरी दिली जाते. तसेच खाजगी काम करणाऱ्या मजुराला देखील दर दिवशी 200 रुपये इतकी मजुरी मिळते. याचा विचार करता आरोग्य खात्यातील आरोग्य सेवेचे काम करणाऱ्या मदतनीसांना मात्र महिना 900 रुपये मानधन देण्यात येते, ही बाब सध्याच्या महागाईच्या दृष्टीने अत्यंत अपुरी आहे. तेव्हा आरोग्य खात्यातील मदतनीसांना दरमहा किमान 5 हजार रुपये इतके मानधन मिळावे व यासाठी शासनाने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखद्वारे शासनास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :विधानमंडळात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या सुमारे 94 कर्मचाऱ्यांची 15 वर्षापेक्षा जास्त सेवा होऊनही त्यांना सेवेत कायम न करणे या बाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या आमदार निवास उप विभाग, मुंबई येथील आमदार निवास येथे सन 1994 पासून 15-15 दिवसांच्या सेवा खंड पध्दतीने रोजंदारी आस्थापनेवर काम करणाऱ्या स्थापत्य शाखेतील 444 विद्युत शाखेतील 64 अशा 508 कर्मचाऱ्यांना चारी-ढाकणे समितीच्या शिफारशीच्या निर्णयाच्या कक्षेत राहून शासकीय सेवेत सामावून घेतले जाणे,

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

मात्र विधानमंडळात सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत कार्यरत असणाऱ्या सुमारे 94 कर्मचाऱ्यांना 15 वर्षापेक्षा जास्त सेवा होऊनही अद्याप त्यांना 15-15 दिवसाच्या सेवाखंड पध्दतीने काम करावे लागत असल्याने त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत सदर कर्मचाऱ्यानां तातडीने कायम करण्याची आवश्यकता याबाबत मी या विशेष उल्लेखाद्वारे सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यांत यावे अशी शिफारस करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:देवरी येथील आदिवासी विकास प्रकल्पाचा कारभार चिमूर येथील प्रकल्प अधिकाऱ्याकडे असल्यामुळे भंडारा व गोंदिया जिल्हयातील आदिवासींना होणारा त्रास याबाबत श्री. केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आदिवासी विकास विभागाचा अत्यंत महत्वाचा विषय विशेष उल्ले□ाच्या सूचनेच्या माध्यमातून या ठिकाणी मांडतो.

"आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोचविण्याकरिता आदिवासी विकास विभागाकडून प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालयाची स्थापना करण्यात येणे, परंतु पूर्व विदर्भातील तीन जिल्ह्यांचा कारभार एकाच अधिकाऱ्याकडे असल्याचे निदर्शनास येणे, गोंदिया आणि भंडारा या दोन्ही जिल्हयाचे आदिवासी विकास विभागाचे कार्यालय गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे सुरु असणे, त्यामुळे भंडारा जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना जवळपास शंभर किलोमीटरचे अंतर कापून देवरी येथे कार्यालयात जावे लागत असणे, तसेच देवरी येथील प्रकल्प अधिकाऱ्याचा कारभार चंद्रपूर जिल्हयातील चिमूर येथील अधिकारी गेल्या दिड वर्षापासून सांभाळत असणे, त्यामुळे भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना कार्यालयीन कामासाठी कमालीचा त्रास सहन करावा लागणे, तसेच सदर अधिकारी देवरी येथील कार्यालयात उपस्थित असल्यास चिमूर येथील कार्यालयातील कामाचा खोळंबा होणे, त्यामुळे चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या तिन्ही जिल्ह्याचा कारभार एकाच अधिकाऱ्याकडे असणे, त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता, प्रत्येक जिल्ह्यात आदिवासी विकास विभागाचे स्वतंत्र कार्यालय तातडीने स्थापन करुन त्यामध्ये स्वतंत्र प्रकल्प अधिकाऱ्याची तत्काळ नियुक्ती करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया,"

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.52 ते दुपारी 3.30 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ. शी./मु. शी. : बांदा, जि.सिंधुदुर्ग येथील नळ पाणीपुरवठा योजना बंद पडल्यामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मला महत्वाच्या विषयावर एक विशेष उल्लेख मांडण्याची परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करते.

उप सभापती : ठीक आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"बांदा, जिल्हा सिंधुदुर्ग येथील तुळसान पुलाखालील तेरेखोल खाडीचे पात्र उन्हाळ्यापूर्वीच कोरडे पडल्यामुळे बांदा शहराची नळ पाणीपुरवठा योजना बंद पडली असल्यामुळे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे उन्हाळी शेती व बागायती धोक्यात आली असल्यामुळे शेतकरी संकटात सापडलेले आहेत. त्यामुळे या शहरासाठी पिण्याच्या पाण्याची तसेच उन्हाळी शेतीच्या बागायतीसाठी पाणी पुरवठा करणे अत्यंत गरजेची बाब आहे. या बाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. कृपया या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

सन्माननीय सदस्यांचे निलंब रद्द करण्याबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती आहे. आपल्या सदनातील दोन सन्माननीय सदस्य निलंबित झाले होते. खरे म्हणजे ज्यावेळी आपल्या दालनात बैठक झाली त्यावेळी आम्ही विनंती केली होती की, आपल्याला जे काही करावयाचे असेल ते संध्याकाळपर्यंत करावे, बाकी काही एवढे गंभीर नाही. आम्हाला असे सांगण्यात आले की, आम्ही यावर निर्णय घेतो. त्यानंतर आम्ही निघून आलो. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांना आतापर्यंत जी शिक्षा झाली आहे ती पुरेशी आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी सभागृहात परत आले याबद्दल आनंद आहे. त्यांचे स्वागतच आहे. खरे म्हणजे मी असा प्रश्न विचारु शकतो की, आपण निलंबन का केले ? त्याबाबत आपण सांगू शकत नाही कारण जे काही झाले होते ते आपण कामकाजातून काढून टाकले होते. मग जे कामकाजातच नाही त्याच्याबद्दल निलंबन कसे काय ? सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना मी समजावले. ते म्हणाले की, आता आम्ही काय बोलणार ? आमची अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना झाली तेवढी शिक्षा खूप झाली. आपल्याला वाटले म्हणून ती शिक्षा केली पण आमच्या दृष्टीने ती बरोबर नाही. कारण नसलेल्या गोष्टीची एवढी शिक्षा केलेली आहे. त्यांचे निलंबन मागे घेण्यासंदर्भात आमची विनंती आहे. इतर सन्माननीय सदस्य माझ्याशी सहमत होतील.

काही सन्माननीय सदस्य : आमचा पाठिंबा आहे.

श्री. दिवाकर रावते : आमच्या वतीने या सदनातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांच्या करिता आपले जे काही वजन असेल ते आपण वापरावे. आम्ही आपल्यावर ही जबाबदारी सोपवतो. आदरणीय सभापती महोदयांना आपण या बाबत सांगावे अशी आमची विनंती आहे.

उप सभापती : आपणा सर्वांच्या भावना मी माननीय सभापती, माननीय संसदीय कार्य मंत्री यांच्यापर्यंत पोहोचवीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 14 महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उप सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थितीत)

उप सभापती : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहासमोर हे जे विधेयक मांडण्यात आले आहे त्याच्या उद्देश व कारणामध्ये शासनाची भूमिका विशद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, राज्यातील नगरपालिकांमध्ये पाणी पुरवठा व जलनिस्सारण या विषयांसाठी स्वतंत्र बजेट नसते, त्याचे स्वतंत्र ऑडिट सुध्दा होत नाही. बऱ्याच वेळा प्रत्येक नगरपालिकेला पाणी पुरवठ्याच्या कामामुळे आर्थिक तोटा होत असतो. हा आर्थिक तोटा भरुन काढण्यासाठी नगरपालिकांच्या इतर विभागांकडून आर्थिक तरतूद करावी लागते. याच्या उलट महानगरपालिकांमध्ये पाणी पुरवठा व जलनिस्सारणाच्या कामासाठी स्वतंत्र बजेट असते. त्यासाठी वेगळे अकाऊंट ओपन केले जाते. त्याचे स्वतंत्र ऑडिट केले जाते. त्याचे वेगळी लेखाशीर्ष आहे. त्याच धर्तीवर नगरपालिकांमध्ये पाणी पुरवठा व जलनिस्सारणाच्या कामासाठी स्वतंत्र बजेट करण्याची तरतूद या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भास्कर जाधव.....

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी नगरपालिकांच्या माध्यमातून छोटे छोटे प्रकल्प राबविण्यात येत होते. आता नगरपालिकांमार्फत मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविले जातात. त्यामुळे नगरपालिकांमध्ये स्वतंत्र अकाऊंट किंवा स्वतंत्र बजेट करण्याची गरज भासू लागली आहे. जेणे करुन त्यांच्याकडून आर्थिक शिस्तीचा पुरेपुर अवलंब केला जावा. हे विधेयक मांडण्यामागचा दुसरा उद्देश असा आहे की, नगरपरिषदा राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाच्या मान्यतेने वित्तीय संस्थांकडून या अधिनियमाच्या तरतुदीच्या अधिन राहून खर्च करण्यासाठी कर्ज उभे करु शकतील आणि स्वतंत्र भागासाठी कर्ज उभारुन ते फेडण्यासाठी, त्याचे स्वतंत्र अकाऊंट ठेवण्यासाठी एक स्वतंत्र व्यवस्था करावी असा एक विषय या विधेयकामध्ये अंतर्भूत केलेला आहे.

त्याचप्रमाणे नगराध्यक्षांचा कालावधी संपला असेल किंवा नगराध्यक्षांची निवड झाली नाही तर त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून तहसीलदारांकडे किंवा नायब तहसीलदारांकडे नगरपालिकेचा कार्यभार सोपविला जातो. परंतु नगरपालिकेमध्ये उपाध्यक्ष हे पद अस्तित्वात आहे. वास्तविक अध्यक्षांचा कार्यभार उपाध्यक्षांकडे सोपविला पाहिजे. परंतु उपाध्यक्षांकडे कार्यभार सोपविला जात नाही. एका शासकीय अधिकाऱ्यांकडे कार्यभार सोपविला जातो. त्यामुळे एक प्रकारे त्या उपाध्यक्षांची मानहानी होते.

सभापती महोदय, यामध्ये एकूण दोन तरतूद केलेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

एक म्हणजे अध्यक्ष पदाचा कालावधी संपण्यापूर्वी 8 दिवस तशा प्रकारची निवडणूक ठेवावी. 8 दिवसानंतर जसा कालावधी संपेल त्याप्रमाणे नवनिर्वाचित अध्यक्षाच्या हाती कार्यभार सोपवावा किंवा उपाध्यक्षाच्या हाती कार्यभार सोपवावा. अध्यक्ष पदाची निवडणूक झाली पाहिजे, नसेल तर अधिका-याकडे कार्यभार देण्याऐवजी उपाध्यक्षाकडे द्यावा अशा प्रकार तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे. आपल्याकडे अ, ब, क, नगरपालिका आणि ड वर्ग नगरपालिका आहे. 3 लाख लोकसंख्येनंतर ड वर्ग नगरपालिका असते. अ वर्ग नगरपालिकेची लोकसंख्या ही 3 लाखापर्यन्त येऊन पोहोचते. ज्या प्रमाणे महानगरपालिकेमध्ये अडिशनल कमिशनर असतो तशा प्रकारे अ वर्ग नगरपालिकेमध्ये अतिरिक्त मुख्य अधिकारी नमेमण्याची या विधेयकामध्ये तरतूद आहे. नगरपरिषदेमध्ये शिक्षण समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. त्या ऐवजी शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती अशी समिती करण्यासंबंधीची तरतूद विधेयकात करण्यात आलेली आहे.

तिसरी तरतूद अशी आहे की, गणपूर्ती अभावी सभा घेतली जात नाही. आता गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाली तर ती सभा पुन्हा घेण्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असू नये अशी छोटीशी तरतूद विधेयकामध्ये केलेली आहे. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यानंतर पुन्हा जेव्हा गणपूर्ती होते त्यावेळी तो विषय घेतला जातो. यामध्ये कालापव्यय फार होतो. अशा छोट्या छोट्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. नगरपालिका मोठ्या होत चालल्या आहेत, नागरीकरण आणि लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. या नगरपालिकांना राज्य आणि केन्द्र शासनाकडून निधी मिळत असतो. स्वतंत्र ऑडिट आणि बजेट करण्याची तरतूद महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये आहे. परंतु नगरपालिकेच्या कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. ही तरतूद करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. तेव्हा हे विधेयक सभागृहाने विचारात घेऊन संमत करावे अशी मी विनंती करतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याच्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार मांडत आहे.

या विधेयकाच्या संदर्भात मला प्रामुख्याने दोन मुद्दे मांडायचे आहेत. सगळीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांना आपण विकासाचे अधिकार दिलेले आहेत. सन 2008मध्ये नगरविकासाचे धोरण आणले गेले. दुसरीकडे नगरपालिका आणि नगरपरिषदा यांचे अधिकार राज्य सरकार कशा पद्धतीने स्वत:कडे केन्द्रीत करीत आहे याचे हे एक उदाहरण आहे. हे एक शुगरकोटेड अशा प्रकारचे विधेयक नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी मांडलेले आहे. गणपूर्ती अभावी सुध्दा सभा चालणार आहे. काही प्रस्ताव 60 दिवसांच्या आत निकाली काढणे नगरपरिषदांना अनिवार्य केलेले आहे. याबाबतीत नगरपरिषदांमध्ये काम लोकांचे म्हणणे लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणून या विधेयकावर तपशीलवार चर्चा होणे आवश्यक आहे. या विधेयकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी मग त्या गणपूर्तीच्या संदर्भातील असतो, उपाध्यक्षांकडे कार्यभार सोपविण्याच्या संदर्भातील असोत किंवा अन्य तरतुदी असोत, या तरतुदीवर दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे मत घेणे आवश्यक असल्यामुळे हे विधेयक सर्वंकष चर्चेसाठी दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठवावे व त्यानंतर अंतिम निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 14 संयुक्त समितीकडे पाठविण्याच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, क व ब वर्ग नगरपरिषदांचा कारभार व्यवस्थित चालत नाही. तेथील लोकांना न्याय मिळत नाही. कर भरमसाठ वाढले आहेत. लोकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्यांची पूर्तता होत नाही. नगरपरिषदांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात कराचा बोजा सर्वसामान्य नागरिकांवर पडला आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून सेवाकर लागू करण्यात आला. शासनाने विक्रीकर लागू केला आहे. सेवाकरामध्ये वाढ केल्यामुळे नागरिकांना भूर्दंड सहन करावा लागत आहे. अगोदरच महागाईने होरपळत असलेल्या नागरिकांना आता नगरपरिषदांच्या माध्यमातून भूर्दंड सहन करावा लागणार आहे. महाराष्ट्र सरकारने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून कर वाढविला आहे. अगोदरच कराच्या ओझ्याखाली असलेल्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांवर कर वाढविण्यासाठी नवीन क्लुप्ती शोधून काढण्यात आली आहे.

सभापती महोदय, नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा योजना योग्यरित्या चालत नाहीत. अनेक महिने योजना बंद असतात. त्यांची वेळेवर दुरुस्ती होत नाही. शहरातील साफसफाई केली जात नाही. दैनंदिन गरजांची कामे करण्यासाठी लोकांकडून तगादा लावला जातो. त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. नगरपरिषदेच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांकडून पाणीपट्टी भरली जाते, घरपट्टी भरली जाते. वीज कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर, पर्यावरण कर आदी करांच्या माध्यमातून नगरपरिषदेच्या तिजोरीत मोठया प्रमाणात निधी गोळा होत असतो. सरकारच्या माध्यमातून अशा प्रकारचे विविध कर लावले जातात. असे असताना पुन्हा पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह सुविधा लाभ कर आणि नव्याने पथकर लागू करण्याकरिता तरतूद करण्यासाठी हे विधेयक सभागृहापुढे मांडण्यात आले आहे.

सभापती महोदय, सर्वच नगरपरिषदांचे बजेट एकत्रितपणे सादर होत असताना यापुढे बजेटचे दोन भाग केले जाणार आहेत. पाणीपट्टी, पथकर, वीज कर याबरोबर पुन्हा पाणी पुरवठा लाभ कर लागू केला जाणार आहे. नवीन बजेटचे दोन भाग करण्याचे प्रस्तावित केले आहे. पाणी पुरवठा लाभ कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर या नवीन करांचा त्यामध्ये समावेश असणार आहे. हा कर किती प्रमाणात असावा याचा कुठेही उल्लेख नाही. सर्वसामान्य नागरिकांवर याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:45

श्रीमती शोभा फडणवीस.....

किती बोजा पडणार आहे याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. हे वेगळे कर बसविल्यानंतर यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा कोणत्या पध्दतीने वापर केला जाणार आहे हेही सभागृहाला सांगितले पाहिजे. आज अस्तित्वात असलेले कर गोळा होत असताना मोठया प्रमाणात त्या निधीचा वापर पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती यासाठी केला जातो. पाण्याचे शुध्दीकरण केले जाते. नाल्यांची सफाई केली जाते. परंतु यापुढे बजेटचे दोन भाग केले जाणार आहेत. शासनाने जे नवीन कर प्रस्तावित केले आहेत त्याचा बोजा सर्वसामान्य नागरिकांवर पडणार आहे. नगरपरिषदांकडून आम्हाला न्याय मिळणार नाही. जे कर प्रस्तावित केले आहेत त्याला आमचा विरोध आहे. याबाबत दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

या विधेयकात शासनाने म्हटले आहे की, गणपूर्तीअभावी सभा रद्द झाली तर पुन्हा सभा घेत असताना पुरेसे सदस्य असावेत, पण हे पुरेसे सदस्य किती असावेत हे स्पष्ट केलेले नाही. समजा मला एखादा विषय मांडावयाचा आहे आणि त्यासाठी गणपूर्ती होत नसेल तर गणपूर्ती अभावी ती सभा स्थगित करुन पुन्हा तोच विषय मांडण्याचा अधिकार नाही. अशा प्रकारे बऱ्याच गोष्टी यामध्ये स्पष्ट होणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींची प्रोसिजर करण्याकरिता हे विधेयक नियम 35 सदस्यांच्या समितीसमोर पाठवून चांगल्या प्रकारचा निर्णय व्हावा अशी सूचना मांडते आणि नंतर पुन्हा या विधेयकावर बोलण्याची संधी मिळेल अशी अपेक्षा करते आणि येथेच थांबते.

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या विधेयकावर ऑन लेग राहतील. आता या विधेयकावरील चर्चा थांबविण्यात येत असून यानंतर नियम 260 अन्वये शिक्षणासंबधीच्या प्रस्तावावर माननीय शिक्षण मंत्री उत्तर देतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे

मु.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे या विषयावर

सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत,प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील,सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस,सर्वश्री रामनाथ मोते,केशवराव मानकर,भगवानराव साळुंखे, पाशा पटेल, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : महोदय, शिक्षणासारख्या अत्यंत महत्वाच्या विषयावर विधान परिषद नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांची चर्चा उपस्थित करुन आपले मौलिक विचार मांडले, त्यातून या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाची भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. गेली अनेक वर्षे या सभागृहात येण्याची संधी मिळाली. याच सभागृहात मला दोन वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचीही संधी मिळाली. तसेच अर्थ व नियोजन राज्यमंत्री, गृह राज्यमंत्री, उद्योग मंत्री आणि आता शालेय शिक्षण मंत्री अशा विविध खात्यांचा कारभार सांभाळत असताना परवा मात्र या विभागावरील चर्चेला जी उंची मिळाली आणि सदस्यांनी जो सक्रीय सहभाग घेतला त्याबद्दल खरोखरच मला आनंद होतो. काही सन्माननीय सदस्यांनी शिक्षण मंत्री म्हणून गेल्या काही दिवसात मी केलेल्या कामाबद्दल प्रशंसाही केली.....अडथळा.....माझी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना विनंती आहे की, मला किमान अर्धा तास तरी सलग बोलण्याची संधी दिली तर मी चांगल्या प्रकारे उत्तर देऊ शकेन, कृपया माझ्या चर्चेत व्यत्यय आणू नये.

श्री. दिवाकर रावते : मी एवढेच म्हणालो की, माननीय उप मुख्यमंत्र्यांना कदाचित निवेदन करावयाचे असावे.....

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बेदाणे व मनुका यांच्या विक्रीवरील मूल्यवर्धित कर स्थगित ठेवणे

मु.शी.: बेदाणे व मनुका यांच्या विक्रीवरील मूल्यवर्धित कर स्थगित ठेवणे यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

बेदाणे व मनुका यांच्या विक्रीवर दिनांक 1.4.2012 पासून 5 टक्के मूल्यवर्धित कर आकारणी करण्यात येईल. तसेच राज्यात उत्पादित होणाऱ्या बेदाणे व मनुकांकरिता काजूसाठी असणारे औद्योगिक विकास अनुदान योजना लागू करण्याचे मी अर्थसंकल्पीय भाषण भाग-2 मध्ये प्रस्तावित केले होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

बेदाणे व मनुकाचे उत्पादन शेतकरी स्वत: करतात व व्यापा-यांना विकतात. शेतक-यांना विक्री कर लागू होत नाही. त्यामुळे काजू उत्पादकांसारखीच औद्योगिक विकास अनुदानाची योजना बेदाणे व मनुकांसाठी राबविणे कठीण असल्याचे निवेदन प्राप्त झाले आहे. यावर विचार विनिमय करण्यासाठी मी आज लोकप्रतिनिधीची संबंधित अधिका-यांसमवेत बैठक घेतली आहे. बैठकीत असे ठरले की, बेदाणे व मनुका या वस्तूवर आकारण्यात आलेला 5 टक्के मूल्यवर्धित करासंबंधीचा विषय मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येईल व मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाबाबत सभागृहास अवगत करण्यात येईल यास्तव बेदाणे व मनुकांवर दिनांक 1/4/2012 पासून 5 टक्के मूल्यवर्धित कर आकारणी तूर्त स्थगित ठेवली आहे.

सभापती महोदय, याच विषयाबरोबर मी तेलबिया व कापसाच्या कराच्या संदर्भातील विषय सुध्दा सभागृहाला सांगितला होता. त्याही बाबतीत सभागृहाच्या दोन्ही मान्यवरांची बैठक घेण्यात आली होती व या बैठकींमध्ये सर्वश्री भाऊसाहेब फुंडकर, दिवाकर रावते, अरुणभाई गुजराथी, विनायक मेटे तसेच देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या विषयाच्या संदर्भात अधिका-यांशी चर्चा केलेली असून या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित करावा लागणार असून यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत जो काही निर्णय होईल त्याची माहिती सभागृहाला अवगत करण्यात येईल. तेलबिया व कापसाच्या संदर्भात योग्य तो निर्णय राज्य सरकार घेईन एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने बेदाण्याला जशी तूर्त स्थगिती दिलेली आहे तशीच स्थगिती कापसाच्या संदर्भात घेऊन त्यांसदर्भात निर्णय जाहीर केला जाणार आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, कापसाच्या संदर्भात निवेदन तयार झाल्यानंतर त्यासंदर्भातील निर्णय सभागृहाला अवगत केला जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माननीय उपमुख्य मंत्री श्री. अजित पवार यांनी बेदाणे व मनुकाच्या संदर्भात जो निर्णय जाहीर केलेला आहे त्यासाठी मी महाराष्ट्र राज्यातील बेदाणा उत्पादक व द्राक्ष उत्पादक शेतक-यांच्या वतीने आभार मानतो व अभिनंदन करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बेदाणे व मनुक्याच्या विक्रीवरील 5 टक्के मूल्यवर्धित कर आकारणीला तूर्त स्थगिती देण्यात आलेली आहे परंतु उद्या बेदाणा व मनुक्यावरील स्थगिती उठवली गेली नाही तर काय करणार ?

उप सभापती : ठीक आहे. आता माननीय शिक्षण मंत्री शिक्षणावरील चर्चेचे उत्तर पुढे सुरु करतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे

मु.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे या विषयावर

सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत,प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील,सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस,सर्वश्री रामनाथ मोते,केशवराव मानकर,भगवानराव साळुंखे, पाशा पटेल, नागो पुंडलिक गाणार,वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सभापती महोदय, शिक्षणाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, दिवाकर रावते, जयंत पाटील, विनायक मेटे, कपिल पाटील, नागो गाणार, हेमंत टकले, विक्रम काळे, भगवान साळुंखे, डॉ. सुधीर तांबे श्रीमती विद्याताई चव्हाण या सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. शासनातर्फे होत असलेल्या चांगल्या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले व त्याच वेळेला अनेक बाबतीत शिक्षणावर घणाघाती टीका देखील करण्यात आलेली आहे. टीका होत असतांना त्यामध्ये कोठेही वैयक्तिक आकस नव्हता तसेच राजकीय अभिनिवेश मला पहावयास मिळाला नाही.

सभापती महोदय, चर्चेमध्ये सहभाग घेतलेल्या सदस्यांना मनापासून धन्यवाद देत असतांना शिक्षण हे भावी पिढया घडविणारे माध्यम असल्याने त्याबद्दल भाष्य करतांना माझ्या भाषणामध्ये कोणताही राजकीय अभिनिवेश बाळगणार नाही. सन्माननीय सदस्यांनी शालेय शिक्षणाच्या अनेक समस्यांचा या चर्चेच्या माध्यमातून ऊहापोह केलेला आहे त्या प्रत्येक मुद्याच्या अनुषंगाने मी शासनाची भूमिका विशद करणार आहे.

सभापती महोदय, प्रत्येक व्यक्तीत विविध प्रकारच्या सुप्त क्षमता असतात व त्या क्षमतेचा शोध घेऊन त्याचा अत्युच्च विकास साधता यावा हेच शिक्षणाचे परमोच्च साध्य आहे. औपचारिक व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

अनौपचारिक शिक्षण पद्धतीतून बाहेर पडलेले विद्यार्थी देशाचे तसेच राज्याच्या विकासात रचनात्मक भर टाकणारे नागरिक झाले पाहिजे यावर शासनाचा भर आहे. शिक्षण क्षेत्रासमोरील नव्या युगातील आव्हाने पेलण्यासाठी राज्यातील पिढी सक्षम बनविण्याचे आव्हान आम्हा सर्वांसमोर आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.राजेंद्र दर्डा..

उपलब्ध संसाधने व शिक्षण विषयक लोकांच्या आकांक्षा यांचा योग्य मेळ घालून वैयक्तिक विकासा सोबत राज्य आणि राष्ट्र यांचा विकास साधणे हे शिक्षण व्यवस्थेचे मुख्य साध्य आहे.

सभापती महोदय, शिक्षण मंत्री या पदाचा कार्यभार सांभाळल्या नंतर त्यावेळी माझ्या पाठीशी शाळा व्यवस्थापनेचा कोणताही अनुभव नव्हता. परंतु, मानवी विकासाचे शिक्षणातील अनन्य साधारण महत्व विचारात घेऊन दीड वर्षाच्या कालावधीत सातत्याने शिकण्याच्या प्रक्रियेतून मी गेलो आहे. मला हे सांगितले पाहिजे की, याच सभागृहाने वेगवेगळे आयुधे वापरून जे प्रश्न उभे केले त्यातून मला शिक्षणाच्या बाबतीत खूप शिकता आले, याचा निश्चितपणे मी उल्लेख करू इच्छितो. त्यामुळेच शिक्षण मंत्री ही मिळालेली फार मोठी संधी आहे असे मी मानतो. त्यामुळे या विभागाला पुढच्या काळामध्ये दिशा देऊ शकलो नाही तर इतिहास मला माफ करणार नाही, याची सुद्धा मला कल्पन आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्तावाची सूचना देऊन राज्याच्या शिक्षण क्षेत्रात असणाऱ्या अनेक मुद्यांचा येथे उहापोह केला आहे. त्यावर त्यांनी चर्चा ही घडवून आणली. सर्व मंडळी शिक्षण क्षेत्रातील अनुभवी आहेत. जाणकार असून त्यांनी केलेल्या सूचना राज्य शासनास शिक्षण विषयक धोरण निश्चित करताना उपयोगी येणार आहे.

महाराष्ट्राने शिक्षणाच्या क्षेत्रात संख्यात्मक मोठी प्रगती साधली आहे. राज्यात आज दहावी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण आणि बारावी पर्यंत सर्व मुलींना मोफत शिक्षण उपलब्ध करून राज्य शासनाने आपले घटनात्मक दायित्त्व स्वीकारले आहे. राज्यात साधारणपणे 1 कि.मी.अंतरावर प्राथमिक शाळांची सोय आणि 5 कि.मी.च्या आत माध्यमिक शाळांची सोय उपलब्ध करून करून दिलेली आहे. राज्यात शिक्षणाच्या गुणात्मक विकासावर भर देण्याची आता आवश्यकता आहे. गुणात्मक शिक्षणा शिवाय शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी मुले विकासाच्या मुख्य प्रवाहा बरोबर जाऊ शकणार नाही, याची आम्हाला कल्पना आहे.

शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकांचे स्थान अनन्यसाधारण आहे. नव्या युगाची आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थी सक्षम व्हावेत यासाठी शिक्षकांच्या ज्ञानात्मक कक्षा सुद्धा विस्तारित करण्याची गरज आहे. त्यामुळेच विद्यार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि राज्य शासन यांच्या 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...

सुसंवादातूनच शिक्षण विषयक समस्यांवर आपण मात करू शकू.

सुरूवातीलाच गेल्या दीड वर्षात जे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले ते मी अत्यंत थोडक्यात सांगणार आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जावे आणि विद्यार्थी-पालकांच्या हिताचे रक्षण व्हावे या व्यापक भूमिकेतून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था विधेयक 2011 विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आले आहे. अपेक्षा अशी आहे की, येत्या दीड महिन्याच्या आत माननीय राष्ट्रपतींची मान्यता मिळून ते या ठिकाणी येऊ शकेल.

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 आपण स्वीकारला. राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीरित्या करण्यासाठी नियमावलीची आवश्यकता आहे. त्याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केला. ती नियमावली तयार झाली असून 11 ऑक्टोबर 2011 च्या राजपत्रात अधिसूचित करण्यात आले आहे.

शिक्षण मंत्री म्हणून आल्यानंतर सर्वात आधी शिक्षण सेवकांचा प्रश्न मांडण्यात आला होता. मला सांगण्यास आनंद होतो की, 7 सप्टेंबर 2011 रोजी झालेल्या बैठकीत शिक्षक सेवकांचे सहा हजार, 8हजार आणि 9 हजार असे सुधारित मानधन करण्यात आले असून शिक्षण सेवक या पदा ऐवजी सहायक शिक्षक करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सभापती महोदय, कायम विनाअनुदानित तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळांचा कायम शब्द वगळण्याचा निर्णय 16 जूल 2000 रोजी घेण्यात आला.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा....

या शाळा अनुदानावर आणण्यासाठी सुधारीत निकषानुसार मूल्यांकन निर्धारीत करण्यात आले असून त्या प्रमाणे या शाळांचे मूल्यांकन तातडीने करण्यात येईल.

सभापती महोदय, काही माननीय सदस्यांनी परवा या ठिकाणी मूल्यांकनाचे निकष कठोर असल्याची टीका केली. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, आयटीची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करावायची असेल तर शैक्षणिक गुणवत्ता आणि भौतिक सुविधा या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणे शक्य नाही. आज आपण गुणवत्तेशी तडजोड केली तर कदाचित या शाळांमधून निर्माण होणारे विद्यार्थी पुरेसे सक्षम होणार नाहीत. ते भविष्यातील आव्हाने पेलण्यामध्ये कमी पडतील, त्याचा दोष आपणा सर्वांच्या माथी लागेल हे मला विनम्रपणे सांगितले पाहिजे. अनेक वर्षे अत्यंत महत्वाचा असलेला विषय या सभागृहात परवा मांडण्यात आला. या राज्याच्या सीमा भागामध्ये मराठी शिकण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे सीमा भागात मराठी भाषेतून शिकण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन शाळांना परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून येत्या जून 2012 पासून या शाळा निश्चितपणे सुरु होतील.

सभापती महोदय, शिक्षणाचा गुणात्मक विकासाचा भाग म्हणून दहावी आणि बारावीच्या परिक्षांमध्ये होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले आहे. परवा या ठिकाणी त्या कॉपीमुक्त अभियानाची सर्वांनी प्रशंसा केली आहे. गेल्या वर्षी आपण एक अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीमध्ये दहावी आणि बारावीची परिक्षा अत्यंत महत्वपूर्ण असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाचे नियोजन करता यावे म्हणून शैक्षणिक वर्ष सुरु होतांना दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षेचे वेळापत्रक देण्याचे आम्ही जाहीर केले होते. मला सांगण्यास अत्यंत आनंद होतो की, या बाबतीत देशामध्ये आपण पहिल्या क्रमांकावर असून एक वर्ष अगोदर आम्ही वेळापत्रक जाहीर केले व ते आपण पाळले असून त्यानुसार परिक्षा सुध्दा झाल्या आहेत.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून मागील वर्षात 68 कोटी रुपयांचे 1 लक्ष 65 हजार डयुएल डेक्स, 15 कोटी रुपयांचे 1 लाख 42 वॉटर फिल्टर आणि 43 कोटी रुपयांचे ग्रीन बोर्ड या शाळांना प्रथमच देण्यात आले आहेत. अनेक शाळांमधून बोगस विद्यार्थी दर्शवून अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती करीत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/

श्री. राजेंद्र दर्डा....

विचारात घेऊन नांदेड जिल्ह्यात प्रथम आणि नंतर संपूर्ण राज्यामध्ये आपण जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पट पडताळणीची विशेष मोहिम हाती घेतली. शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांना आळा घालीत असतांना त्यामधून भविष्यात आवर्ती स्वरुपाची मोठी बचत होणार आहे. त्या बाबत परवाच्या दिवशी असा उल्लेख झाला की, 2 कोटी 16 लाख विद्यार्थी इयत्ता 1 ली ते 12 वीपर्यन्त शिक्षण घेत आहेत. आपल्याला कल्पना आहे की, 2 कोटी 16 लाख विद्यार्थ्यांची तपासणी झाली प्रत्यक्षात ते 2 कोटी 2 लाख असल्याचे आढळले. त्यानंतर ज्यावेळी फेरतपासणी झाली त्यावेळी ही संख्या 1 कोटी 82 लाखावर आली. यामुळे भविष्यामध्ये आपली फार मोठी रक्कम वाचणार आहे. त्याचबरोबर ज्या संस्थांनी यामध्ये चुका केल्या आहेत त्या संस्थेला निश्चितपणे कारवाईला सामोरे जावे लागेल एवढेच मी याठिकाणी निश्चितपणे सांगू इच्छितो. त्या बाबत एक आठवडयाच्या आत कॅबिनेटपुढे प्रस्ताव नेण्यात येईल.

सभापती महोदय, आज हे विज्ञानाचे, तंत्रज्ञानाचे युग आहे. मानवी श्रम आणि वेळ वाया जावू नये हे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणूनच शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व्हर्च्युअल क्लासरुम, संगणक रुम तयार करण्याचे आम्ही ठरविले असून त्याची सुरुवात येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रायोगिक तत्वावर करणार आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी भाषण करतांना एक चांगली सूचना केली की, आपल्याकडे उपलब्ध असलेल्या वेगवेगळया विषयातील तज्ज्ञ मंडळींना पाचारण करुन त्यांची तंत्र क्षेत्रातील हुशार विद्यार्थ्यांशी भेट घडवून आणावी. त्यावेळी त्यांनी सन्माननीय श्री. जयंत नारळीकर साहेबांचा उल्लेख केला.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला सांगितले पाहिजे की, महाराष्ट्र राज्याचा शिक्षण विभाग हा एकमेव असा विभाग आहे की, मुंबई पासून किंवा कोणत्याही ठिकाणापासून प्रत्येक तालुका हा व्हिडिओ कॉन्फरसिंगने जोडला गेला आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून जे तज्ज्ञ आहेत म्हणजे श्री.जयंत नारळीकरजी हे विज्ञानाबद्दल अत्यंत चांगल्या प्रकारे समजावून सांगू शकतात. त्याप्रमाणे कोणी भूगोलाबाबत समजावून सांगू शकतील. तेव्हा या व्हिडिओ कॉन्फरन्सिगचा वापर करुन तज्ज्ञांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण देण्याचा आपण निश्चितपणे याठिकाणी करणार आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक शिक्षक आमदार आहेत. आपल्या सर्वांना कल्पना आहे की, 3 वर्ष शिक्षण सेवक पदावर काम केल्यानंतर जे नियमित शिक्षक व्हावयाचे आणि त्यांनी अधिक चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन जेव्हा ते प्राथमिक मधून माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक कडे जात होते तेव्हा त्यांना परत शिक्षण सेवक या पदावर काम करावे लागत असे. परंतु वारंवार विधान परिषदेमध्ये आणि विधान सभेमध्ये मागणी करण्यात आली आणि आता शासनाने याबाबतीत घेतलेल्या निर्णयामुळे त्यांची नियुक्ती शिक्षक या पदावरच होणार आहे. ब्रिटीश कौन्सिलच्या मदतीने शाळांमध्ये इंग्लिश इम्प्रुव्हमेंटचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या ठिकाणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा विनियमन याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्रामध्ये या क्षणाला 3 हजार शाळांमध्ये केंद्र शासनाच्या मदतीने आय.सी.टी. म्हणजे माहिती तंत्रज्ञानासंबंधीचा कार्यक्रम सुरु आहे.

मला हे सांगावयास आनंद वाटतो की, यावर्षी केंद्र सरकारने पाच हजार शाळांमध्ये आय.सी.टी.योजना किंवा कॉम्प्युटर लॅबोरेटरीज् संबंधातील आपली योजना मान्य केलेली आहे. यावर्षी पाच हजार माध्यमिक शाळांमध्ये आय.सी.टी.ची योजना कार्यान्वित होईल. याशिवाय सर्वशिक्षा अभियानातून 4479 संगणक प्रयोगशाळा उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या आहेत. एक अशी मागणी होती की, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या बाबतीत कायम हा शब्द काढलेला आहे. पण ज्या अतिरिक्त तुकड्या आहेत तेथील हा शब्द काढलेला नाही. पण आता याबाबतीत देखील निर्णय घेण्यात आलेला आहे.शालेय शिक्षणाची व्याप्ती मोठी आहे. याठिकाणी एकंदर सुमारे 2 कोटी मुले शिकतात आणि 7 लक्ष शिक्षक मुलांना शिकवितात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा . . . .

त्यांच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने या विभागाचे व्यवस्थापन सुरु आहे. अनेक प्रश्न अजूनही बाकी आहेत, मी त्या प्रश्नांबद्दल बोलणार आहे आणि त्याबाबत शासनाची भूमिका देखील येथे मांडणार आहे. या विषयाच्या बाबतीत परवा जी चर्चा झाली, त्यावेळी बहुतेक सन्माननीय सदस्यांनी वेतनेतर अनुदानाचा उल्लेख केला आहे. आपल्या सर्वांनाच कल्पना आहे की, राज्यासमोर असलेल्या आर्थिक अडचणींवर विचार करुन एप्रिल 2004 पासून शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करण्यात आले होते. पण प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचा भौतिक विकास साधावयाचा असेल तर निश्चितपणे शाळांना वेतनेतर अनुदान उपलब्ध करुन दिले पाहिजे ही आमच्या विभागाची धारणा आहे आणि म्हणून वेतनेतर अनुदान मंजूर करावयाचे झाल्यास दरवर्षी 266 कोटी रुपयांचा भार पडणार आहे. मंत्रिमंडळ उप समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतनेतर अनुदानाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणण्याची कार्यवाही शेवटच्या टप्प्यामध्ये आलेली आहे. तसेच हे मराठी शासन, मराठी शाळा उपलब्ध करुन देत नाही अशी टीकाही शासनावर करण्यात आलेली आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : कोणी केली ? ज्या सन्माननीय सदस्यांनी टीका केली त्यांची नावे सांगण्यात यावीत.

श्री.राजेंद्र दर्डा : सभपती महोदय, त्यादिवशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, आपण बोलताना एका गोष्टीचा उल्लेख केलेला आहे की आपण मराठी शाळा देत नाही, त्या लोकांना बेड्या ठोकणे अशा प्रकारचा शब्द आपण वापरलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय येथे सरकार म्हणून बोलत आहेत. परंतु कृपा करुन माननीय मंत्री महोदय, थोडावेळ खाली बसले तर बरे होईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदय सरकार म्हणून बोलतात आणि आम्ही विरोधी पक्ष म्हणून सरकारच्या ज्या काही उणिवा आहेत त्या निदर्शनास आणून देतो. शासन मराठी शाळा उपलब्ध करुन देत नाहीत असे मी म्हणालो नव्हतो. मी असे म्हणालो की, इंग्रजी माध्यमांच्या शाळा काढणाऱ्यांना मुक्तहस्ताने परवानगी दिली जात आहे. ज्यांनी मराठी शाळा काढल्या आणि त्यांच्याकडे भरपूर विद्यार्थी आहेत त्या शाळा बंद करण्याच्या आणि त्यांना तुरुंगात टाकण्याच्या नोटीसा सरकारमार्फत दिलेल्या आहेत. राज्यात मराठी भाषेचे राज्य असताना मराठी शाळा काढणाऱ्यांना बंदी व तुरुंगवास आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मात्र मुक्त प्रवेशद्वार असे मी म्हणालो होतो. मी शासनावर आरोप केला नव्हता.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, राज्यात 75 हजार 466 प्राथमिक शाळांपैकी 65 हजार 324 शाळा या मराठी माध्यमाच्या आहेत म्हणजे ही टक्केवारी 87 टक्के आहे. तर 19 हजार 767 माध्यमिक शाळांपैकी 15 हजार 466 मराठी शाळा आहेत. म्हणजे मराठी शाळांचे प्रमाण माध्यमिक शाळांमध्ये 78 टक्के आहे. सन 2002 ते 2011 या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून 8 हजार 318 नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यात आल्या असून 489 उच्च प्राथमिक शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या मराठी शाळांशिवाय एखाद्या संस्थेला वाटते की, मी एखादी चांगली मराठी शाळा सुरु करु शकतो. त्यांच्यासाठी शासनाने एक निर्णय घेतलेला आहे. सेल्फ फायनान्स स्कूल म्हणजे स्वयं अर्थसहाय्यित शाळा अशा विषयाचे विधेयक याच अधिवेशनात आणत आहोत. ज्यांना मराठी शाळा सुरु करावयाची आहे त्यांना याचा फायदा निश्चितपणे मिळणार आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठी भाषा आणि मराठी शाळा या बाबत पोडतिडिकीने विचार मांडलेले आहेत. मराठी भाषेचा विकास झाला पहिजे, ती कसदार झाली पाहिजे, ती ज्ञान भाषाही झाली पाहिजे आणि माझेही तसे मत आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, मराठी ही ज्ञान भाषाच आहे. शालेय शिक्षणामध्ये ती ज्ञान भाषा म्हणून आली पाहिजे. मराठी ही ज्ञान भाषाच आहे, झाली पाहिजे असे नाही. आपण ज्ञान भाषा करणारे कोण ? थोर व्यक्तींनी ती ज्ञान भाषा केलेली आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत असताना त्यांचे विचार येथे उधृत करणे येथे औचित्याचे ठरेल. त्यांनी असे म्हटलेले आहे की, "जमिनीतील पाणी, जमिनीतील सत्वे आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल ती घेऊन, पिऊन ऊस जसा वाढत जातो तशी भाषा ही जीवंत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊ वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल आणि अधिक्राधिक उत्कर्ष पावेल." ते पुढे असेही म्हणाले होते की, "ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. त्यामुळेच मराठी मातीचा जीवन रस संत साहित्यात भरभरुन वाहतो." म्हणूनच महाराष्ट्र शासनाने राज्यातील शिक्षक, विद्यार्थी व लोकांना करता समग्र संत साहित्याचा अभ्यास यावा या उद्देशाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातून "संत साहित्य आकलन आणि अध्यापन" हा ग्रंथ नुकताच प्रकाशित केलेला आहे. ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी संताबद्दल काहीच बोललो नाही आणि माझी ती योग्यता नाही. आपण बोललात त्याबद्दल आपल्याला धन्यवाद.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मी एवढेच म्हणालो की, 1977 सालापासून असा नियमच करण्यात आलेला आहे की, इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांना विज्ञान हा विषय मराठीतून लिहिता येईल परंतु आजपर्यंत ती झाकली मूठ राहिली, त्यामुळे लोकांना ते कळले नव्हते. या संदर्भात पुण्याच्या एका संस्थेने प्रयत्न केले आणि हजारो विद्यार्थ्यांनी विज्ञान या विषयाची मराठीतून परीक्षा दिली व ते पास झाले. नापास झालेले विद्यार्थी ज्यावेळी मराठीतून परीक्षा देतात त्यावेळी ते मोठया संख्येने पास होतात. मी या ठिकाणी एवढीच विनंती केली की, इयत्ता बारावीमधील विद्यार्थ्यांनी मराठीतून उत्तरपत्रिका लिहिल्या तर चालतात या प्रकारचा प्रचार विविध माध्यमातून दूरचित्र वाहिनीवरुन, सर्व शाळांच्या माध्यमातून प्रवेश घेताना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात यावा जेणेकरुन जे विद्यार्थी इंग्रजीमध्ये अडखळतात आणि नापास होतात ते विद्यार्थी मराठीतून पास होतील. ज्यावेळी मराठी विद्यार्थ्यांची संख्या वाढेल त्यावेळी इतर राज्यात स्थानिक भाषेत जसे उच्च शिक्षण दिले जाते त्यापध्दतीने महाराष्ट्रात देखील मराठी भाषेतून उच्च शिक्षण देता येईल अशा प्रकारचा विषय मी या ठिकाणी मांडला होता. परंतु मंत्री महोदयांनी मला संतापर्यंत घेऊन गेले.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत आहेत. ते त्यांच्या पध्दतीने अतिशय अभ्यास करुन चांगल्या पध्दतीची माहिती आणि निर्णय देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते असतील किंवा अन्य कोणतेही सन्माननीय सदस्य उत्तरामधून नवीन निर्माण होणारे अनुत्तरीत प्रश्न या ठिकाणी मांडतात त्याबद्दल दुमत नाही, ते चांगले आहे, त्या प्रश्नांचे निरसन झालेच पाहिजे. पण सभापती महोदय, आपल्या माध्यमातून एवढीच विनंती आहे की, सन्माननीय मंत्री महोदय, या ठिकाणी अतिशय चांगले उत्तर देत आहेत ते उत्तर त्यांना देऊ द्यावे, त्यांनतर आमच्या सर्वांच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी या ठिकाणी प्रश्न विचारावेत पण अशा प्रकारे मंत्री महोदयांच्या उत्तरात अडथळे आणू नयेत.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षांकांना नियमित वेतन 1 तारखेला मिळावे या दृष्टिकोनातून मुंबई आणि बीड जिल्हयामध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन हे राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमतून करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि हा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला आहे त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यामुळेच शासन आणखी एक प्रयत्न करु

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा.....

इच्छिते.जेवढे डिव्हिजनल प्लेसेस आहेत त्या ठिकाणी असलेल्या मुख्यालयातून त्या जिल्हयामध्ये राष्ट्रीय बँकेच्या माध्यमातून वेतन देण्याबद्दलचा निर्णय लवकर घेण्यात येईल ही त्यातील अत्यंत आनंदाची बातमी आहे.

राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या वेतनवाढी बद्दलचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. या बाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, आगाऊ वेतनवाढ देण्यासंदर्भात राज्य शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी अद्याप निर्णय घेतला नसल्याने म्हणजे त्याची पध्दत कशी असली पाहिजे या बद्दलचा निर्णय घेतला नसल्यामुळे त्या निर्णयानंतरच शिक्षण विभाग शिक्षकांसाठीचा हा निर्णय घेऊ शकेल. सभापती महोदय, नगरपालिका आणि महानगरपालिकेतील माध्यमिक शिक्षकांच्या सहाव्या वेतन आयोबाद्दलचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सुध्दा हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या माध्यमिक शाळांमीधल शिक्षकांना सहावा वेतन आयोग देण्यात आलेला नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा .....

खरे म्हणजे प्रशासकीय वादात हा प्रश्न सोडविण्यामध्ये इतका वेळ जावयास नको होता, हे मलाही मान्य आहे. म्हणून सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, शालेय शिक्षण विभाग आणि नगरविकास विभाग या सर्व विभागांच्या सचिवांची एकत्र बैठक घेऊन तातडीने हा प्रश्न सोडविण्यात येईल.

सभापती महोदय, पुनर्रचित अभ्यासक्रमातून हिंदी विषय वगळल्याबाबतचा विषय सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केला. महाराष्ट्राने राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेतून त्रिभाषासूत्र स्वीकारलेले आहे. त्यामुळे हिंदी ही राष्ट्रभाषा असून तिचे स्थान....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हिंदी ही राष्ट्रभाषा नाही.

श्री. राजेंद्र दर्डा : आपल्याला जर वाटत नसेल तर वाटू देऊ नका. मी हे रेकॉर्डवर बोलत आहे. सभापती महोदय, ही गोष्ट बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांना जर हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा नाही असे वाटत असेल तर ती गोष्ट वेगळी आहे.

श्री. दिवाकर रावते : हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये ते कसे काय येते ? ती संपर्क भाषा आहे. घटनेमध्ये हिंदी भाषेला राष्ट्र भाषेचा दर्जा दिलेला नाही. हे मी अधिकृत बोलत आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या पूर्वी हिंदी भाषा हा विषय ज्या पध्दतीने इयत्ता पाचवीपासून सुरु होता त्याच पध्दतीने भविष्यामध्ये सुध्दा इयत्ता पाचवीपासून हिंदी हा विषय राहील हे मी या सभागृहाला निश्चितपणे सांगू इच्छितो. वाढीव तुकड्यांना गेल्या आठ वर्षात मान्यता मिळालेली नाही या बाबतचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. या आधी वेगवेगळ्या माध्यमातून या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले आहे की, 9500 वाढीव तुकड्यांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता परंतु पटपडताळणीनंतर आम्ही नवीन प्रस्ताव मागितला होता. त्याप्रमाणे संचालक (माध्यमिक) यांनी 5472 तुकड्यांचा प्रस्ताव नुकताच सादर केलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : म्हणजे 4 हजार तुकड्या कमी झाल्या. ज्यांनी प्रस्ताव पाठविले होते त्यांच्यावर कारवाई करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात मी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले होते की, 9 हजार वाढीव तुकड्यांचा प्रस्ताव आला होता पण पटपडताळणीचा अहवाल येऊ द्या, या तुकड्या मोठ्या प्रमाणामध्ये कमी होतील आणि ते खरे ठरलेले आहे. आता 5472 वाढीव तुकड्यांचा प्रस्ताव कालच सादर करण्यात आलेला आहे आणि नवीन शैक्षणिक वर्षापासून या तुकड्यांना मंजुरी देण्यात येईल. क्रीडा सवलतीबद्दल या ठिकाणी सांगण्यात आले.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, पुढील वर्षापासून या तुकड्यांना मान्यता देणार. या तुकड्या चालू होऊन तीन वर्षे, चार वर्षे, पाच वर्षे झालेली आहेत. त्यांना पुढील वर्षात मान्यता देता येणार नाही. त्यांना आताच पूर्वीलक्षी प्रभावाने मान्यता देण्याची आवश्यकता आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भगवानरावजी साळुंखे यांचा आज वाढदिवस आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. काही सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांचा काल वाढदिवस होता त्याबद्दल मी त्यांचेही अभिनंदन करतो. सभापती महोदय, इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेमध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांमध्ये 25 गुण देण्याची व्यवस्था होती. परंतु असे लक्षात आले की, यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत होते, असत्य प्रमाणपत्रे देण्यात येत होती, पैशांचा व्यवहार होत होता त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, सन 2012-2013 पासून सदर गुणांचा विचार फक्त उत्तीर्ण होण्यासाठीच केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चर्चेच्या अनुषंगाने अनेक विषय उपस्थित केलेले आहेत. बहुतेक मुद्यांच्या संदर्भात मी शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. शिक्षणासारख्या मुलभूत विषयावर गांभीर्यपूर्वक चिंतन होण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे परवा बोलत असताना मी त्यांचे भाषण काळजीपूर्वक ऐकत होतो. आपण दरवेळी शिक्षकांचे पगार किंवा इतर गोष्टींबद्दल बोलतो पण

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

परवा ते सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यांकन या विषयावर बोलले होते. कारण त्यांनी अनेक वर्ष शिक्षक म्हणून काम केलेले आहे. शिक्षण विषयक धोरण हे विद्यार्थी केंद्रीभूतच असले पाहिजे. राज्य शासन शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार व गुणात्मक विकास घडविण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलत आहे. शाळेमध्ये जाणाऱ्या मुलांमध्ये ज्ञानात्मक अभिवृध्दीबरोबरच त्यांच्यामध्ये मूल्य संस्कार संक्रमित होत आहेत काय, त्यांच्या प्रतिभेचा विकास साधला जात आहे काय, ज्ञान निर्मिती करण्यामध्ये मुले योगदान करण्यामध्ये सक्षम आहेत काय, जगातील वैचारिक विविधतेचे आकलन त्यांना होत आहे काय व त्याच्यातून त्याचा सर्वांगीण विकास साधला जात आहे काय हे पाहण्याची शासनाची जबाबदारी आहे. शासनाचे शिक्षण शाळेच्या चार भिंतीच्या पलीकडे जायवयास पाहिजे यासाठी मी हे वाक्य बोलत आहे

सभापती महोदय, कालच पुण्यातील घटनेची बातमी सर्वांच्या वाचनामध्ये आली असेल. एका इंग्रजी माध्यमातील मुलांने आपल्याच सवंगड्याला खंडणीसाठी किडनॅप करुन त्याचा खून केल्याची घटना पुण्यात घडली आहे. हे वाचल्यानंतर या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे चिंता वाटली असेल. विद्यार्थ्यांवर बाहेरच्या माध्यमांचा परिणाम होत असेल तर शिक्षण हे मूल्याधिष्ठीत असले पाहिजे. त्या दृष्टीने शासन निश्चित प्रयत्न करणार आहे. शिक्षणाची प्रक्रिया ही 4 भिंतीच्या आत बंदिस्त होऊ नये. शिक्षणाकडे पाहत असताना व्यापक व निकोप दृष्टीकोनातून पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, 'राईट टू एज्यूकेशन' या कायद्यामुळे शासनावर निश्चितपणे जबाबदारी येऊन पडलेली आहे. शासनाला ठराविक वर्षामध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. परंतु त्याचबरोबर शाळेमध्ये आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला गुणात्मक शिक्षण दिले जाईल, शिक्षण ही रुचीहिन प्रक्रिया न राहता ती आनंददायी कशी ठरेल आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे दिले जाईल याचे दायित्व शिक्षकांवर सुध्दा निश्चितपणे आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.राजेंद्र दर्डा....

सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे बारकाईने ऐकत होतो. काल सभागृहामध्ये मराठी भाषेतील कविता कशा होत्या आणि आजच्या कविता कशा आहेत याचा उल्लेख करण्यात आला होता. आजच्या मराठी कवितांमध्ये लय नाही असे मत मांडण्यात आले होते. मराठी भाषेमध्ये असलेले लेख व कवितांबाबत विभागामार्फत पूर्ण विचार करण्यात येईल. मी शिक्षकांबद्दल बोलत होतो. ही प्रक्रिया आनंददायी करणे महत्वाचे आहे.

अर्भकाचेसाठी पण ते हाती धरीली पाटी

असा संत तुकारामांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रामध्ये शाळेमध्ये येणाऱ्या मुलांमधील सूप्त क्षमतांचा विकास साधू शकलो नाही तर आपण आपल्या कर्तव्यात तर कसूर केली असे होईल. या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सकल गुणीजनांना मी आवाहन करु इच्छितो की, महाराष्ट्राला जी संतांची, विचारवंतांची परंपरा लाभली आहे. त्याचे आपण पाईक होऊ, संतांच्या हृदयातील असीम कळवळा आपल्या हृदयात यावा अशी अपेक्षा आहे.

बुडते हे जन
न देखवे डोळा
येतो कळवला म्हणोनि या

ज्ञानेश्वरांनी असे म्हटल्या प्रमाणे

ये हदयिचे ते हृदयी घातले

या दृष्टीकोनातून शिक्षकांनी कार्य केले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची अभिवृध्दी घडेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री.शिगम....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले बोलताना असे म्हणाले की, साहित्यातून वावरणारे चितळे गुरुजी आज शाळेमध्ये कुठे दिसतात ? असे चितळे गुरुजी कालबाह्य होणार आहेत काय, अशी चिंता सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. परंतु मी सांगू इच्छितो की, सर्व गुरुजनांवर माझा विश्वास आहे. आज आम्ही या ठिकाणी आहोत याचे कारण आम्हाला आमच्या गुरुजनांनी घडविलेले आहे. आमच्या शिक्षकांनी आम्हाला घडविलेले आहे. सभापती महोदय, जेव्हा मी माझ्या 11वी मध्ये शिकत होतो त्यावेळी 75 वर्षाच्या आमच्या दामले गुरुजींना माझ्या बद्दल असे वाटले की हा मुलगा बोर्डामध्ये काही तरी कामगिरी करु शकेल. मी तेव्हा शेतावर रहात होतो. दामले गुरुजी हातात टॉर्च घेऊन 10 कि.मी.वरुन चालत येऊन मला उठवायचे. अशा त-हेने त्यांनी मला तयार केले. या सगळया शिक्षकांना फक्त मोटिव्हेट करण्याची आवश्यकता आहे आणि ते करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी शिक्षणाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी केली. त्यांची मागणी मी स्वीकारतो. शिक्षणासारख्या विषयावर सन्माननीय सदस्य किती जागरुक आहेत याची ही प्रचीती आहे. शिक्षणाच्या बाबतीत आज महाराष्ट्र नेमका कुठे आहे याचे वास्तव श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून लोकांसमोर मांडले जाणे आवश्यक आहे. 1960 साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेव्हा पासून आता पर्यन्त राज्याने शिक्षणाच्या क्षेत्रात केलेली प्रगती, शिक्षण क्षेत्रातील गुणवता विकासामध्ये गाठावयाचा पल्ला,शिक्षण क्षेत्रातील विषमता, भौतिक संसाधनांचा अभाव, शाळाबाह्य मुले, गळतीचे प्रमाण इत्यादीचे वास्तव चित्र या श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून आपल्याला देता येईल. या बाबतीत सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना, या राज्यातील सर्व शिक्षण तज्ज्ञांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी विचारविनिमय करुन येणा-या हिवाळी अधिवेशनामध्ये मी श्वेतपत्रिका मांडीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी तीन-चार मुद्दे मांडले. गुणवत्ता टिकविण्याचे काम हे शिक्षकांचे आहे असे त्यांनी सांगितले. डीएडसाठी 12+2 ही शैक्षणिक अर्हता ठेवलेली आहे. त्याऐवजी ग्रज्युएशन अशी शैक्षणिक अर्हता डीएड साठी असावी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

असे त्यांनी सांगितले. शासनाने या बाबतीत निर्णय घेतलेला आहे की, उच्च माध्यमिकसाठी डीएड झाल्यानंतर तो पदवीधर असला पाहिजे, हा झाला पहिला टप्पा. सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे. त्या दिवशी त्यांनी अतिशय विदारक चित्र मांडले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे त्या दिवशी सभागृहामध्ये नव्हते. आज भरतीसाठी 18 ते 20 लाख रुपये घेतले जातात असा आरोप त्यांनी केला.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

निश्चितपणे मी सांगू इच्छितो की, शिक्षकांना त्रास होणार नाही आणि कोणत्याही संस्थेच्या माध्यमातून जर काही गैरप्रकार होत असतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

सभापती माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी ज्या खाजगी शाळा आहेत त्यांपैकी 4000 शाळा वगळता इतर ठिकाणी शासनाकडून वेतनाचा खर्च दिला जातो. तेव्हा या शाळा शासनाने ताब्यात घ्याव्यात असे त्यांचे म्हणणे होते. सभापती महोदय, हे करणे शक्य होणार नाही. माननीय सदस्यांच्या मताशी मला सहमत होता येणार नाही. जर या शाळांमध्ये काही गैरप्रकार होत असतील तर त्या शाळा ताब्यात घेण्याचे काम शासन निश्चितपणे करेल एवढे मी सभागृहाला सांगू इच्छितो. सर्व सन्माननीय सदस्यांनी शिक्षण या विषयावर चांगली चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि माझे बोलणे पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून नेहमीच कायदा आणि सुव्यवस्था, वीज टंचाई असे विषय अधिवेशन काळात प्रस्तावाच्या रुपाने उपस्थित केले जातात. मुद्दाम या अधिवेशनात शिक्षण हा विषय आम्ही उचलून धरला. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना आदी आयुधाच्या माध्यमातून शिक्षणाविषयी जे प्रश्न सभागृहात उपस्थित होतात त्या संदर्भात माननीय शिक्षक प्रतिनिधी आपली भूमिका मांडण्याचे काम करीत असतात. परंतु शिक्षण क्षेत्रातील ॲकॅडमिक विषयाचा विचार व्हावा या दृष्टीने उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, चंद्रकांत पाटील आदींनी आग्रहाने आपली भूमिका मांडली आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांचे भाषण मी बारकाईने ऐकत होतो. त्यांनी भाषण संपण्यापूर्वी प्रा.शिवाजीराव भोसले यांच्या एका वाक्याचा उल्लेख केला असता तर बरे झाले असते. आतापर्यंत आम्ही जे काही बोललो ते तुम्हाला कळून चुकले की चुकून कळले हे सांगायला विसरु नका. शिक्षणमंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षा आहे, मराठी शाळांना शासन परवानगी देणार की नाही? की देणारच नाही हे स्पष्टपणे जाहीर करावे. रात्रशाळांचा विषय अनेकदा मांडला जातो. रात्रशाळांबाबत शासनाचे काय धोरण आहे? हे सांगण्याची मंत्री महोदयांना संधी होती. परंतु धोरण सांगू शकले नाहीत. "कायम विनाअनुदानित"मधील कायम शब्द काढण्याचा विषय होता. तुकड्यांबाबत कायम शब्द काढण्यात येईल असे म्हटले होते. परंतु स्पष्टपणे कायम शब्द काढू किंवा काढणार नाही हे एकदा जाहीर करावे. शिक्षण विषयाबाबत स्पष्टता असली पाहिजे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाचा विषय आहे. त्या विषयी काहीही भाष्य केले नाही. राज्यातील आजचे शिक्षण क्षेत्रातील ॲकॅडमिक विषय आहेत त्याला हात घातला नाही. आम्ही व्हर्च्युअल शाळा सुरु करणार आहोत असे सांगितले.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे हे ज्या तालुक्यामधून निवडून येतात त्या तालुक्यात पावसाळ्यातील तीन महिने नदीच्या एका तीरावरुन दुसऱ्या तीरावर तार जोडली जाते. त्या तारेवर हूक टाकून त्या हुकाला धरुन लोंबकळत शिक्षण घेण्यासाठी नदी पार करुन विद्यार्थ्यांना ये जा करावी लागते. अशी परिस्थिती असताना मंत्री महोदय व्हर्च्युअल शाळेच्या गोष्टी करीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी वेतनेतर अनुदानाचा मुद्दा मांडला होता. दरवर्षी 2500 कोटी रुपये देऊ असे अर्थमंत्र्यांनी घोषित केले होते. गेल्या वर्षी 2422 कोटी रुपये तरतूद केली असताना प्रत्यक्षात 1847 कोटी रुपये वितरित केले. या वर्षी 3400 कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात ती रक्कम 1600 ते 1700 कोटी रुपयांपर्यंत खाली येईल. असे असताना शिक्षण क्षेत्रातील योजना मंत्री महोदय कशा पूर्ण करणार आहेत. मंत्री महोदयांकडून आमच्या काही अपेक्षा आहेत. राजकारणाच्या पलीकडे जाऊन शिक्षण खात्याकडे ते पाहतात असे आम्ही समजतो. श्वेतपत्रिका काढणार असे मंत्री महोदयांनी जाहीर केले आहे. या महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांनी शिक्षणाचा वटवृक्ष लावला. महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तो वटवृक्ष वाढविला. परंतु राईट टू एज्युकेशनबाबत काय अडचण आहे?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

मग त्याची अंमलबजावणी का होत नाही याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. मला वाटते शिक्षणासारख्या विषयाच्या बाबतीत शासनाने उगाच लपवालपवी करु नये तर आम्ही हे नक्की करणार, मग ते टप्प्याटप्प्याने केले तरी हरकत नाही असे ठाम पणे व निक्षून सांगितले पाहिजे की पुढील पाच वर्षाचे शासनाचे शिक्षणाच्या संदर्भात अशा प्रकारचे धोरण आहे. शिक्षणाला या दिशेने आम्हाला न्यावयाचे आहे असे स्पष्ट करण्याची संधी मंत्री महोदयांना या प्रस्तावाच्या निमित्ताने मिळाली होती पण त्यांनी तसे स्पष्ट केले नाही. माझी विनंती अशी आहे की, शासन शिक्षणाच्या बाबतीत अधिक स्पष्टता आणण्याचा विचार करणार काय ?

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, शिक्षणावर विचार मांडत असताना येत्या जून महिन्यापासून ज्या शाळा अनुदानावर येणार आहेत त्यांना अनुदान दिले पाहिजे अशी मी मागणी केली होती. तसेच माननीय अर्थ मंत्र्यांसोबत माझी चर्चा सुध्दा झाली की, अशा शाळांमध्ये जे जे शिक्षक 10-15 वर्षांपासून काम करीत आहेत त्यांना कमी करण्याचे काम काही संस्था करीत आहेत, त्यांचे रेकॉर्ड माझ्याकडे आहे. कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांमध्ये ज्यांनी एवढी वर्षे काम केले त्यांच्या जागी 15-15, 20-20 लाख रुपये घेऊन नवीन शिक्षकांची भरती करण्यात येते. आणखी एक मुद्दा असा आहे की, विद्यार्थ्यांची गुणवत्त जे शिक्षक टिकवून ठेवू शकत नाही त्यांच्यावरही कारवाई करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला पाहिजे. ज्या शाळांवर शासन लाखो-करोडो रुपये खर्च करते त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना वाचता येत नसेल, त्यांचा रिझल्ट 25 ते 30 टक्के लागत असेल तर अशा शिक्षकांवर कारवाई झाली पाहिजे, यादृष्टीने मंत्री महोदयांनी ठोस निर्णय घ्यावा असे मला वाटते. त्याचबरोबर गाईडलाईन्स सुध्दा घालून दिल्या पाहिजेत की अशा प्रकारे काम केले नाही तर वेतनवाढ अथवा पगारच थांबेल अशी भीती निर्माण झाल्याशिवाय शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्येही सुधारणा होणार नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, आमची माहिती अशी आहे की, हिंदी भाषा ही केवळ संपर्काची भाषा असून त्यातून वादविवाद करण्याचे कारण नाही, यादृष्टीने तपासणी करुन योग्य नसल्यास ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, या सभागृहात खरोखरच उत्तम प्रकारची चर्चा नेहमी होत असते. त्याचे मुख्य कारण म्हणजे या सभागृहात शिक्षकांमधून निवडून आलेले सन्माननीय सदस्य आहेत, अशा प्रकारची सखोल चर्चा विधानसभेत कधी होत असेल असे मला वाटत नाही. माननीय उध्दवजी यांनी व्हर्च्युअल क्लासेसच्या संदर्भात सुतोवाच केले असता सर्वच स्तरातून व शासनाकडून देखील त्यावर टीका-टिप्पणी केली होती. पण आता त्याच शासनाने माननीय उध्दवजींचे अनुकरण केले व व्हर्च्युअल क्लासेसची संकल्पना स्वीकारली त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. यावरुन मी सांगतो की, आमच्या सारख्यांकडून देखील काही तरी शिकण्यासारखे असते, म्हणून "तेही नसे थोडके" प्रमाणे पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, आपले राज्य हे उच्च शिक्षणाच्या बाबतीत 10 व्या क्रमांकावर गेले, कारण इतर राज्यांमध्ये प्रांतीय भाषेत, त्यांच्या मातृभाषेतूनच वरपर्यंतचे शिक्षण दिले जाते. याचा अर्थ इंग्रजीमध्ये शिकण्याचा त्यांना अधिकार नाही असे नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे तिकडचे विद्यार्थी आपल्या विद्यार्थ्यांपेक्षा पुढे जात असतात. मराठी माध्यमातून विज्ञानाचे पेपर लिहिले तर ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठया प्रमाणात उत्तीर्ण होतील व पुढे झेप घेऊ शकतील त्यामुळे हा निर्णय प्रचारात आणून तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला पाहिजे. मराठी माध्यमातून तुम्हाला विज्ञान शाखेचेही पेपर लिहिता येतील हे कळविण्याचे काम शिक्षण विभागाचे असून ते काम त्यांनी करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, नांदेड जिल्हयातील काही शाळांची पटपडताळणी केली परंतु पटपडताळणीचा व शिक्षण खात्याचा काही एक संबंध नव्हता तर ते अधिका-याचे कौशल्य होते. या पटपडताळणीतून आपल्याला जे काही दिसून आले ते आपण सभागृहात मांडले व त्यामध्ये 2.16 लाखावरुन 1.86 लाखापर्यंतची असत्य पटपडताळणी असल्याचे आपण सांगितले आहे. खोटी पटपडताळणी करुन जे अनुदान घेंतले तसेच त्या ठिकाणी शिक्षकांनी काम केलेले नसतांना पैसे घेतले त्यांच्या संदर्भात काय कारवाई केली जाणार आहे ? या सभागृहाचे शिक्षक मतदार संघाचे सन्माननीय सदस्य शिक्षकांच्या संदर्भात रात्रंदिवस भाडत असतात व या सभागृहाचा 1/3 वेळ शिक्षकांच्या पगारावर, भत्त्यावर, रजेवर, पगारवाढीवर खर्च करीत असतात. सन्माननीय सदस्य शिक्षकांच्या संदर्भात सभागृहाचा वेळ खर्च करतात यासंदर्भात सभागृहाने चुकीचा गैरसमज करुन घेऊ नये.

सभापती महोदय, या चर्चेवर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले होते की, सहा मुलांना पाच शिक्षक शिकवण्याचे काम करतात. त्यामुळे यासंदर्भात विभाग कारवाई करेल असे मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्रावरील प्रशासकीय वचक माननीय मंत्री महोदयांकडून मला अपेक्षित आहे. हा वचक तातडीने निर्माण करावयाचा असेल तर अशा प्रकरणांमध्ये कारवाया केल्या पाहिजेत. माणूस कितीही मोठा असू दे, राजकारणातील कितीही मोठया पदावर गेलेला असू दे तो या बनवाबनवीमध्ये सामील असेल तर त्याला शासन झाले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी जो प्रश्न मांडला होता तो प्रश्न मी एकदा मागे मांडला होता. परंतु माझा प्रश्न थोडा वेगळा होता. शाळेतील शिक्षकांना शासन पगार देत असते, शाळांना अनुदानही शासन देत असते. त्यामुळे शिक्षकांच्या भरत्या संस्था चालकांनी का करावयाच्या ? मागच्या एका शिक्षणमंत्र्यांच्या 150-200 संस्था असल्यामुळे त्यांनी यासंदर्भात निर्णय घेतला नव्हता. परंतु आपली एकही शिक्षण संस्था नाही, आपण त्यातले नाहीत तसेच स्वत:चे काही नसल्यामुळे तसेच असले तरी असे काही करणारे नसल्यामुळे मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, शिक्षकांच्या निवडीची प्रक्रिया शासनाकडे असावी. सर्व शिक्षक शासनाच्या माध्यमातून निवडले गेले तर शिक्षकांच्या संदर्भातील जे काही प्रश्न आहेत ते राहणार नाहीत. शिक्षक नेमण्याच्या संदर्भात शासनाने मध्यवर्ती पॅनल नेमावे, निवड समिती नेमावी, अर्ज ऑनलाईन मागवून निवड करावी. तसेच शिक्षकांच्या बदल्याच्या संदर्भातही मोठया प्रमाणात जरब बसू शकेल तसेच संस्था शिक्षकांची निवड करतांना जे काही देणे घेणे करतात ते सुध्दा थांबेल तसेच शिक्षकांना एक वेगळया प्रकारची शासकीय मान्यता मिळेल.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणात सांगितले होते की, घटनेने एकूण बजेटच्या 60 टक्के खर्च शिक्षणावर केला पाहिजे तसेच आदिवासी जनतेवर 9.82 टक्के खर्च केला पाहिजे. त्यामुळे शिक्षणाला आपल्याला पुढे न्यावयाचे असेल तर शिक्षणावर किमान 60 टक्के खर्च झाला पाहिजे असे बंधन असतांना अर्थसंकल्पात शिक्षणावर 60 टक्के तरतूद केली जात नाही त्यामुळे विभागाच्या अधिका-यांचे अडचणीचे काम झालेले आहे. सर्व शिक्षा अभियानावरील पैसा तसेच आपल्या राज्याच्या तरतुदी अशा मिळून आपण 60 टक्के खर्च शिक्षणावर केला तर अत्यंत ताकदवान आणि सबळ असे शिक्षण राज्यातील विद्यार्थ्यांना मिळू शकेल त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी मार्गदर्शन केले तर बरे होईल.

धन्यवाद.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षण मंत्री महोदयांनी संत वचनासह आम्हा शिक्षक आमदारांना थोडी खुशी थोडा गम अशा पध्दतीने या चर्चेच्या निमित्ताने सभागृहात उत्तर दिलेले आहे. मी एकच प्रश्न विचारु इच्छितो की, इयत्ता 9 वी व 10 वी साठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजना केंद्रशासनाच्या मार्फत राबविली जाणार असून या योजनेमार्फत जिल्हा परिषदा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनाच निधी मिळणार आहे ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. राज्यात जेवढया काही शासन मान्य शाळा आहेत त्या सर्व शाळांना हा निधी मिळाला पाहिजे. सर्व शाळांना निधी मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहे व केंद्र सरकारमध्ये सुध्दा आपले वजन असल्यामुळे आपले वजन वापरून शाळेंच्या संदर्भातील निधी राज्यातील मान्यता प्राप्त शाळांना मिळवून देणार आहात काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

माननीय मंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये श्वेतपत्रिका आणू असे अत्यंत पोटतिडकीने सांगितल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी हे देखील सांगायला पाहिजे होते की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मागे घेणार आहोत, कनिष्ठ महाविद्यालयातील कायम हा शब्द आम्ही काढणार आहोत. कनिष्ठ महाविद्यालयांचा 1.1.1996 चा प्रश्न आम्ही सोडविणार आहोत. 42 दिवसांच्या संपाचा प्रश्न सोडविणार आहोत. कायम शाळांचे मूल्याकंन जून पासून सुरू करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुद्दा मांडला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांना सहकारातील चांगले कळते त्याप्रमाणे शिक्षणातील देखील चांगले कळते. त्यांचा सांगण्याचा असा उद्देश होता की, कायम शाळेमध्ये जे शिक्षक गेल्या 10-15 वर्षापासून काम करीत आहेत त्यांना त्यावेळचे आरक्षणाचे जे धोरण लागू होते त्याप्रमाणे शिक्षणाधिकाऱ्याने मान्यता दिलेली आहे त्यांना सुद्धा आज तेथे ठेवले पाहिजे व अनुदान दिले पाहिजे ही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ती शासन घेणार आहे काय ? येतो कळवळा.... हे संत ज्ञानेश्वरांचे वचन माननीय मंत्र्यांनी वाचून दाखविले आहे. मला वाटते त्यांना निश्चितच कळवळा येईल. हिवाळी अधिवेशनात श्वेतपत्रिका काढण्यासाठी आपणच शिक्षणमंत्री असाल अशी अपेक्षा शिक्षक प्रतिनिधींतर्फे व्यक्त करतो आणि येथेच थांबतो.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. ते योग्य पद्धतीने दिले जात नाही. 5 हजार शाळेमध्ये संगणक देणार आहात असे आपण सांगितले आहे. आपण जिल्ह्यातील प्रत्येक शाळेमध्ये गेलात तर तेथे संगणकासाठी सलगता नाही हे दिसून येते. आठ दिवसातून एकदा या, असे सांगण्यात येते. त्याला शिकविण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. बरेच ठिकाणी संगणक नसतात. पिण्याच्या पाण्याची सोय नसते. विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर शिक्षकांना चांगले प्रशिक्षण द्यावे, अशी मी मागणी करीत आहे.

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. माजी शिक्षण मंत्री श्री.सुधीर जोशी यांनी एक चांगला निर्णय घेतला होता. प्रत्येक शाळेमध्ये एम.सी.सी.असावे. हा अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. तो आता बंद पडलेला आहे. स्काऊट आणि गाईड मुळे विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभावना निर्माण होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे.....

विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होत होते. काल पुण्याला जो प्रकार घडला तो घडणार नाही. त्यामुळे स्काऊट आणि गाईड हे विषय वगळलेले आहेत. ते पुन्हा घ्याल काय हा माझा महत्त्वाचा प्रश्न आहे.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, मी मघाशी देखील बोललो आहे आणि आता एका मिनिटातच मुद्दा मांडतो. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी केला आहे. खाजगी शैक्षणिक संस्था, शाळा आपण ताब्यात घेऊ शकत नाही. त्यासाठी अडचणी आहेत हे मी समजू शकतो. परंतु, तेथील शिक्षक भरती ही जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली एखादे मंडळ स्थापन करून करावी. संस्थाचालकाला काही अडचण वाटत असेल तर लिपिक, शिपाई किंवा अन्य भरती त्यांच्याकडे सोपवावी. शिक्षक नेमण्याकरिता आपल्याला काही मंडळ निर्माण करता येईल काय, याचा जरूर विचार करावा.

दुसरा मुद्दा असा आहे की, कोचिंग क्लासेस संबंधी आपण अवाक्षर काढले नाही. ते का काढले नाही, हे मला माहिती नाही. आज कोचिंग क्लासचे सगळी कडे वाढते पेव फुटले आहे. यासंबंधी आपण काय करणार आहात ? अनेक शिक्षक कोचिंग क्लासेस घेतात. मी येथे परत विनंती करणार आहे की, डी.एड.साठी बारावी पात्रता आहे त्या ऐवजी पदवी करण्यात यावी.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी अतिशय सविस्तरपणे आणि अत्यंत प्रामाणिकपणे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे हे त्यांच्या उत्तरामधून आम्हा सर्वांना जाणवले आहे त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन-तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी इयत्ता 12 वीच्या विज्ञान शाखेतील परिक्षेच्या उत्तर पत्रिका मराठी भाषेमधून लिहिण्याची सोय महाराष्ट्रामध्ये असून सुध्दा दुर्दैवाने प्रशासकीय यंत्रणेमध्ये असलेल्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता येत नाही. त्याचप्रमाणे पालकांना त्या बाबतीत असलेल्या कमी माहितीमुळे मातृभाषेमधून उत्तर लिहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर गेल्या अनेक वर्षापासून अन्याय होत आहे, तो यापुढे होणार नाही याची आपण प्रामाणिकपणे काळजी घेतली पाहिजे. माननीय सदस्यांच्या या मताशी मी सहमत असून शासनाने त्याची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय शिक्षक प्रतिनिधींनी सांगितलेली गोष्ट बरोबर आहे. पूर्वी प्राथमिक शाळेमध्ये स्काऊट आणि गाईड ही संस्था अत्यंत महत्वाची होती, त्यांचे नियमित कँप होत होते, त्यांचे प्रबोधन होत होते, प्रशिक्षण होत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर चागले संस्कार हेात होते. ही एक उत्तमप्रकारची असलेली चळवळ दुर्दैवाने आता कमी होत चालली आहे. या चळवळीला प्रोत्साहन कसे देता येईल याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या पृष्टयर्थ माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी शिक्षकांच्या भरती प्रक्रियेमध्ये आपल्याला कशी सुधारणा आणता येईल या बाबत आपले विचार व्यक्त केले. यामध्ये शिक्षकांच्या गुणवत्तेचा मुद्दा फार महत्वाचा आहे. या ठिक्राणी उपस्थित असलेल्या शिक्षक प्रतिनिधींना या बाबत अजिबात वाईट वाटणार नाही. याचे कारण ते समाजामध्ये उत्तम प्रकारे काम करणारे लोक प्रतिनिधी आहेत. शिक्षकांची गुणवत्ता उत्तम असली पाहिजे असे त्यांनाही वाटते. मी आपल्याला प्रामाणिकपणे एक उदाहरण देतो. आपण आदिवासी दऱ्या-खोऱ्यातील, खेडयातील शिक्षकांचा विषय बाजूला ठेवू परंतु मुंबईच्या एका शिक्षण संस्थेतील शिक्षकाचे "आधी बिजे अंकुरले, रोप वाढीले" या अभंगवजा गीताच्या संदर्भात दोन वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या लेखाबाबत मी त्या वर्तमानपत्रांच्या संपादकांना पत्र लिहिले. आपणास माहीत आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KTG/

श्री. उल्हास पवार....

की, संत तुकाराम या चित्रपटामध्ये "आधी बिजे अंकुरले,रोप वाढीले" हा संत तुकोबा यांचा अभंग नाही. त्या चित्रपटामधील सर्व अभंग तुकोबांचे आहेत, परंतु हा एकमेव अभंगवजा गीत कवि शांताराम आठवले यांचे आहे. असे असतांना देखील त्या शिक्षकांने वर्तमानपत्रातील लेखामध्ये संत तुकोबांचा उल्लेख केला होता. अशाप्रकारे जर विद्यार्थ्यांना शिकविले जाणार असेल तर त्या विद्यार्थ्यांचे पुढे काय होणार आहे? म्हणून माननीय सदस्यांनी शिक्षकांच्या गुणवत्तेबाबत उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. मुळात शिक्षकांची निवड करीत असतांना ज्या संस्थांमध्ये ही प्रवेश प्रक्रिया पार पाडली जाते ती गुणवत्तेला अनुसरुन नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रवेश शुल्काच्या आणि कॅपिटेशन फीच्या बाबतीत सन्माननीय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांनी ज्या धाडसाने निर्णय घेतलेला आहे. तशाचप्रकारचा धाडशी निर्णय या प्रक्रियेमध्ये देखील त्यांनी घ्यावा अशी विनंती करुन व त्यांचे मनापासून अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सभागृहामध्ये शिक्षणाच्या प्रस्तावावर माननीय सदस्यांनी चांगल्या प्रकारची चर्चा केलेली आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला उत्तर दिले असले तरी दोन-तीन महत्वाच्या मुद्यांकडे सन्माननीय मंत्री महोदयांचे मी लक्ष वेधू इच्छितो. शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांच्या संदर्भात मी मुद्दा मांडला होता. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करीत असतांना शिक्षकांच्या दृष्टीने अशैक्षणिक कामांचा मुद्दा अत्यंत अडचणीचा आणि महत्वाचा आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने जरी परिपत्रक, जी.आर. काढला असला तरी खालच्या पातळीवरील महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी त्याची अंमलबजावणी करीत नाहीत. ते आमचे ऐकत नाहीत, मुख्याध्यापकांना दाद देत नाहीत. सर्व शिक्षकांना जेलमध्ये टाकण्याची भाषा करतात. म्हणून या अशैक्षणिक कामांच्या संदर्भात शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शाळाबाह्य मुलांचा विषय या सभागृहात चर्चेला आला असून त्या संदर्भात मंत्री महोदयांकडून उत्तर मिळाले पाहिजे. शेवटचा मुद्दा असा की, शिक्षकांच्या निवड प्रक्रियेसंदर्भात अनेक माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास दादा पवार यांचे मी अभिनंदन करतो. कोणत्याही क्षेत्रामध्ये गुणवत्ता महत्वाची असल्यामुळे शिक्षकांमध्ये देखील गुणवत्ता असली पाहिजे हा मुद्दा महत्वाचा आहे. या विचारामध्ये बदल होता कामा नये. परंतु आजकाल शिक्षकांची निवड करतांना गैरप्रकार होतात, पैसे दिल्याशिवाय नेमणुका दिल्या जात नाहीत, पैसे दिल्यानंतरच नेमणुका दिल्या जातात. हे गैरप्रकार थांबविणे आवश्यक आहेत, आणि ते थांबविण्यासाठी शासनाकडे उपाय योजना आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

शासनाचा निर्णय आहे की, प्राथमिक शाळेमध्ये किंवा माध्यमिक शाळेमध्ये शिक्षक नेमताना केवळ जे अर्ज आले असतील त्यामध्ये गुणवत्तेनुसारच निवड करावयाची आहे.ज्याला सर्वात जास्त गुण असतील त्याचीच निवड करावयाची आहे हा शासन निर्णय आहे. एका संस्थेने 70 टक्के गुणवत्ता असलेल्या शिक्षकाला डावलले आणि 66 टक्के गुणवत्ता असलेल्या शिक्षकांला घेण्यात आले. मग याबाबत संबंधितांनी चॅलेंज केले आणि हाय कोर्टाने असा निर्णय दिला आहे की, केवळ मेरिट, केवळ गुणवत्ता यावर आधारीत नेमणूक व्हावयास हवी होती, पण ती झाली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य काहीही सांगत आहेत . . ..

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, निवड प्रक्रियेच्या . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षकांच्या टक्केवारीवर हुशार शिक्षक कसे ओळखतात ? महाराष्ट्रात उच्चशिक्षित मुख्यमंत्री होते पण त्यांना जे करता आले नाही ते न शिकलेल्या कै.वसंतदादा पाटील यांनी करुन दाखविले. त्यांनी तांत्रिक शिक्षणासाठी शेकडो शाळा काढल्या व हे सिध्द करुन दाखविलेले आहे. किती मार्क मिळाले यावर गुणवत्ता ठरत नसते तर हिंमतीवर असते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले त्याला मी पाठिंबा देतो. त्यावेळी डी.एड.नाहीतर तेव्हा डी.डी.होती. आज जर कै. वसंतदादा असते तर कुलपती झाले असते. डी.एड.शिक्षक आहेत. या राज्यात काहीही होऊ शकते.

डॉ.पतंगराव कदम (खाली बसून) : सभापती महोदय, मी आज डी.एड.झालो, एम.ए.झालो, एल.एल.बी. झालो, पी.एच.डी.झालो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आपल्याला दुहेरी भूमिका घेता येणार नाही. एका बाजूला संस्था चालकांकडून ज्या पध्दतीने निवड केली जाते त्यालाही आमचा आक्षेप आहे. पण शासनाने आता जी.आर . . .

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलतात.)

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, तुम्हाला विरोध नाही. शासनाचा निर्णय आहे आणि संस्था चालकांच्या पातळीवर जो गैरप्रकार होत आहे तो रोखण्यासाठी राज्य शासनाचा निर्णय आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की,निवड प्रक्रियेच्या वेळी वेगवेगळया एजन्सीच्या प्रतिनिधींना बोलवावयाचे आहे.पण तसे होत नाही. जर तसे झाले आणि योग्य त्या पध्दतीने निवड प्रक्रिया राबविली तर गैरप्रकार होणार नाहीत त्याबाबतीत शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, खरे म्हणजे वेळेचे भान ठेऊन मी काही मुद्दे मांडावयाचे टाळले होते आणि याचे कारण असे होते की, प्रश्नोत्तराच्या माध्यमातून, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून, अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून वारंवार जे विषय उपस्थित केले जातात ते मुद्दे टाळण्याचा मी खरेतर प्रयत्न केला होता. पण आम्ही ज्या चर्चेमध्ये एकत्र होतो आणि काही विषयांच्या बाबतीत मी पाहिले की, सभागृह सुध्दा दुभंगले आहे, हरकत नाही. पण या प्रश्नाच्या माध्यमातून सुध्दा खूप चांगली चर्चा झालेली आहे.याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अ-शैक्षणिक कामाचा उल्लेख केलेला आहे की, शासनाने आपल्या शासन निणर्याच्या माध्यमातून राष्ट्रीय जनगणना आणि राष्ट्रीय निवडणुका हे दोन विषय घेऊन इतर अ-शैक्षणिक कामे शिक्षकांना देऊ नयेत असे स्पष्टपणे सांगितले आहे.

याठिकाणी मला एक महत्वाची गोष्ट दिसते की, जेव्हा सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून काम होते त्यावेळेला त्या शिक्षकावर जबाबदारी येते आणि मध्यंतरी विशेषत: अहमदनगर जिल्ह्यातील एका प्रकरणामध्ये त्या शिक्षकांनी आत्महत्या केल्याची बातमी वाचली आहे. त्यामुळे माझे स्वत:चेही असे मत झाले आहे की, जी कामे टाळता येतात, ती कामे टाळली पाहिजेत, अ-शैक्षणिक कामे टाळली पाहिजेत. या ठिकाणी सर्वशिक्षा अभियानाचे एस.पी.डी.आहेत. मी त्यांच्याशी चर्चा केली असून आम्ही लवकरच असा विचार करीत आहोत की, आपण दरवर्षी 700 कोटी रुपये बांधकामावर खर्च करीत आहोत आणि त्यासाठी अनेक शिक्षक आपापल्या शाळेमध्ये त्या बांधकामावर लक्ष ठेवत आहेत. त्याऐवजी एखादे कॉपोर्रेशन तयार करुन जर आपण या शाळा बांधू शकलो तर अ-शैक्षणिक काम निश्चितपणे कमी होऊ शकेल. फक्त एकच गोष्ट आहे की, हा केंद्र शासनाचा पैसा असल्यामुळे इतर राज्यात काय परिस्थिती आहे हे पहाण्याचे काम देखील निश्चितपणे सुरु आहे.

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा..

सभापती महोदय, या ठिकाणी शाळा बाह्य विद्यार्थ्यांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. "असर"च्या अहवालानुसार 6 ते 14 वयोगटातील शाळाबाह्य मुलांचा प्रमाण देशामध्ये 3.3 टक्के आहे तर महाराष्ट्रामध्ये 1.1 टक्के आहे. एक टक्का विद्यार्थी सुध्दा शाळेच्या बाहेर का असावेत असा प्रश्न आहे. तेव्हा एकही विद्यार्थी शाळेच्या बाहेर नसावा या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शासनाने मागील तीन वर्षात जे काही धोरण राबविले त्यामुळे शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली आहे एवढे मी नम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून राज्याला निधी येतो त्याच प्रमाणे आरएनएसएचच्या माध्यमातून सुध्दा निधी येणार आहे. या निधीचा उपयोग शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे तसेच सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी देखील अशी सूचना केलेली आहे की, आरएनएसएचचा निधी खाजगी शाळांसाठी सुध्दा वापरण्यात यावा. त्यांचा मुद्दा बरोबर आहे. महाराष्ट्राची परिस्थिती देशातील इतर राज्यांपेक्षा भिन्न आहे. कारण महाराष्ट्रामध्ये माध्यमिक शिक्षण मोठ्या प्रमाणावर खाजगी संस्थाकडे आहे. मागे केपस्ची बैठक सुरु झाली होती त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये परिस्थिती वेगळी आहे असा मुद्दा उपस्थित केला होता. तेव्हा महाराष्ट्रामध्ये माध्यमिक शिक्षण खाजगी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे आरएनएसएचचा निधी खाजगी शाळांसाठी वापरण्यात आला पाहिजे. मला खात्री आहे की, या बाबत केंद्र सरकार निश्चितपणे निर्णय घेणार आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा उल्लेख येथे केला. मी येथे प्रामाणिकपणे सांगतो की, सध्या शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाबद्दल किंवा शालेय समित्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाबद्दल समाधानी आहे अशातला भाग नाही. भोजनावळीसाठी प्रशिक्षण नसते. या संदर्भात आम्ही खूप चर्चा केलेली आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून आपणास प्रशिक्षणाबाबत निश्चितपणे फरक जाणवेल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनायक मेटे, उल्हास पवार आणि इतर सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, खाजगी शाळांमध्ये होणाऱ्या शिक्षक भरतीमध्ये जे काही प्रकार होतात ते आपण टाळले पाहिजेत. त्या बाबत सांगू

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा..

इच्छितो की, मागील पावसाळी अधिवेशनात मी एक मुद्दा मांडला होता की, सीईटीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थातील शाळांतील शिक्षकांची भरती होते. ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आहे. तेव्हा खाजगी शाळांतील शिक्षक्ांची भरती जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून करण्याचा शासनाचा विचार चालू आहे आणि त्या बाबतचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी एक मुद्दा मांडला की, मुंबईतील अनेक मराठी शाळा बंद पडत आहेत. महानगरपलिकेमार्फत कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना त्या शाळा बंद पडत आहेत. त्या बाबत सांगू इच्छितो की, ज्या संस्था चांगल्या शाळा चालवित आहेत त्यांना त्या शाळा चालवू द्यायच्या. दादरमध्ये एक खाजगी संस्था आहे त्या शाळांमध्ये एकेका वर्गात दोनशे मुले आहेत. तर दुसरीकडे महानगरपालिकेची एक शाळा विद्यार्थ्यां अभावी बंद आहे. जर त्या संस्थेला महानगरपालिकेच्या शाळेची इमारत उपलब्ध करुन दिली तर त्या संस्थेने एका शिफ्टमध्ये महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यायचे आणि दुसऱ्या शिफ्टमध्ये आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षण द्यायचे जेणेकरुन महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील चांगले शिक्षण मिळू शकेल.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

सन्माननीय सदस्य श्री. रावते या ठिकाणी विज्ञान विषया बद्दल बोलले. विज्ञान विषयाची उत्तरपत्रिका मराठी भाषेतून लिहू शकतो ही गोष्ट खरी आहे. परंतु या संबंधीची माहिती अधिकाऱ्यांनी दिली नसेल, पालकांपर्यंत पोहचली नसेल त्यामुळे येणाऱ्या काळात विज्ञान विषयाची उत्तरपत्रिका मराठी भाषेतून लिहिता येईल याबद्दल मोठया प्रमाणात निश्चितपणे जनजागृती करण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या डी.एड. ग्रॅज्युएटच्या मुद्याची मी निश्चितपणे चांगल्या प्रकारे नोंद घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. एक मुद्दा गणवत्तेबद्दलचा होता आणि दुसरा मुद्दा एखाद्या संस्थेमध्ये अनेक वर्षे काम करणाऱ्या शिक्षकांना काढून टाकण्यात येते या बद्दलचा होता. सभापती महोदय, या शासनाचा गुणवत्तेवरच जोर आहे. माझ्या भाषणात मी वारंवार गुणवत्ता हा शब्द वापरलेला आहे आणि त्यामुळेच मूल्यांकनाच्या निकषाला विरोध होत असताना सुध्दा शासनाने ठाम भूमिका घेतलेली आहे की, शासनाला शाळा चालू ठेवावयाच्या आहेत पण गुणवत्तेच्या बाबतीत कोणतेही कॉम्प्रोमाईज किंवा कोणताही समझोता करण्यात येणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी याबाबत खात्री बाळगावी की गुणवत्तेच्या बाबतीत काळजी घेण्यात येईल. या ठिकाणी एक विषय आता या ठिकाणी मांडण्यात आला आणि तो सकाळीसुध्दा मांडण्यात आलेला आहे. काही ठिकाणी एखाद्या संस्थेमध्ये भरती केल्यानंतर काही वर्षे ते त्या संस्थेमध्ये काम करतात आणि अचानकपणे त्यांना काढून नवीन भरती करण्याबद्दलचे एक प्रकरण मला एका तासाभरापूर्वी मिळालेले आहे. अशा पध्दतीने कोणालाही करता येणार नाही. त्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आरटीई ॲक्टच्या अंमलबजावणीचा आणि शाळांबद्दलचाही उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. खरे म्हणजे त्याच वेळा उत्तर देता आले असते तर अधिक चांगले झाले असते. सभापती महोदय, मला हे सांगितले पाहिजे की, आरटीई अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्य आज देशामध्ये चांगल्या प्रकारे काम करीत आहे, हे कोणत्याही मुद्याच्या बाबतीत आपण तपासू शकतो. आरटीईप्रमाणे तीन वर्षात प्राथमिक शाळा एक कि.मी., उच्च प्राथमिक शाळा 3 कि.मी. आणि माध्यमिक शाळा पाच कि.मी.च्या अंतराच्या आत द्यावयास पाहिजे. आज सुदैवाने महाराष्ट्रामध्ये अशा शाळा मोठया प्रमाणात आहेत. उरलेल्या ठिकाणी जिओग्राफीकल इन्फॉर्मेशन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

सिस्टिमच्या माध्यमातून गुगलच्या माध्यमातून आपण त्या आणल्या आहेत, अशा ज्या काही शाळा आहेत त्या कमी प्रमाणात आहेत पण ज्या शाळा हव्या आहेत त्याचा बृहत आराखडा तयार झालेला आहे. याच शैक्षणिक वर्षापासून या बृहत आराखडयाचा वापर करुन काही ठिकाणी शाळा देण्यत येतील. आरटीई मध्ये आणखी एक मुद्दा आहे. विद्यार्थ्यांची संख्या आणि शिक्षकांची संख्या याचा रोशियो सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला आहे. प्राथमिक असेल तर 1:30, 30:1 आणि उच्च प्राथमिक असेल 35:1 असा रेशियो आहे. मला सांगण्यास आनंद होतो की. महाराष्ट्र या बाबतीत क्रमांक एक चे राज्य आहे. इतर राज्यात प्रशिक्षित शिक्षक सापडत नाहीत त्यामुळे त्यांचा रेशियो बिघडलला आहे. पण महाराष्ट्रामध्ये हा रेशियो जवळपास 30 आणि 35 शासनाने सांभाळलेला आहे. मी या बाबतीत एकच सांगू इच्छितो की, आरटीईच्या बाबतीत महाराष्ट्राची अंमलबजवणी चांगली आहे. पण गुणवत्तेच्या बाबतीत खूप करणे आवश्यक आहे. त्यामुळे बृहत आराखडा तातडीने नवीन वर्षापासूनच येईल. आरटीई ॲक्टची अंमलबजावणी चांगली झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. खोटरे आणि श्री. उल्हास पवार यांनी स्काऊट आणि एन.सी.सी. बद्दलचा एक मुद्दा मांडलेला आहे. ती गोष्ट खरी आहे की, स्काऊट सारख्या संस्था लहान वयात चांगले विचार बिंबविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या आहेत. याची दखल सुध्दा मी घेतलेली आहे. परत एकदा मी संपूर्ण सभागृहाचे आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे .

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला होता त्यावरील चर्चा आता आपल्याला पुढे सुरु करावयाची आहे. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह एका तासामध्ये ही चर्चा पूर्ण संपवावयाची आहे. श्री. रमेश शेंडगे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागास वर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे

मु.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे या विषयावर सर्वश्री. सुभाष चव्हाण, हेमंत टकले,भाई जगताप,विनायम मेटे,उल्हास पवार,रमेश शेंडगे, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे,राजन तेली,सतीश चव्हाण,मोहन जोशी, किरण पावसकर, प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री एम.एम.शेख, एस.क्यू.जमा, ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे चालू)

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी आज सकाळी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चा आता पुढे सुरु होईल. ही चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह एका तासात पूर्ण करावयाची आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे बोलतील.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. हेंमत टकले, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आणि आम्ही सर्वांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी आणलेला आहे त्यामध्ये राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, भटक्या जाती व विमुक्त जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होऊन त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शासनाने शिष्यवृत्ती तसेच अन्य विविध योजना राबविणे या संदर्भातील हा प्रस्ताव आहे. सभापती महोदय, आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

दुग्धशर्करा योग आहे असे म्हणावयास पाहिजे. राज्याचे शिक्षण मंत्री सन्माननीय श्री. राजेंद्र दर्डा साहेबांनी आताच शिक्षणाच्या प्रस्तावावर उत्तर देत असताना या राज्यातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्वच बाबींचा आढावा घेतलेला आहे. बऱ्याच महत्वाच्या घोषणा सन्माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या आहेत. अतिशय महत्वाचे म्हणजे याच प्रस्तावाला अनुसरुन शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांची गुणवत्ता, शिक्षक शिकवित असलेल्या शिक्षणाचा दर्जा अशा अनेक बाबींचा उल्लेख सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी केलेला आहे.

सभापती महोदय, राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये सर्वांना समान संधी मिळावी, सर्व समाज घटकांना विकासाच्या माध्यमातून समान पातळीवर येता यावे यासाठी या राज्यामध्ये मागासवर्गीय, भटके विमुक्त, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक या सर्व समाजासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून या सर्व गोरगरीब घटकांना समोर ठेऊन त्यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना तयार केल्या आणि प्रामुख्याने त्या योजनांच्या माध्यमातून या गोरगरीब घटकांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केलेला असतो. या विषयावर बोलत असताना ज्यांची जन्म शताब्दी आपण साजरी करीत आहोत ते आपल्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री सन्माननीय स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारुन तसेच संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारुन जेव्हा कार्याला सुरुवात केली त्यावेळी खऱ्या अर्थाने विकास करताना या महाराष्ट्रातील या सर्व वर्गांना आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते, त्यांचा विकास आपल्या डोळ्यासमोर ठेवलेला होता.

हे सर्व राबवित असताना मला या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो की, या देशाचे आदरणीय कृषी मंत्री श्री. शरद्चंद्र पवार साहेब जेव्हा या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे पहिले असे राज्य होते की, ज्या राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये अर्थसंकल्पात तेवढी टक्के तरतूद केली. आज आपण पाहतो की, जवळजवळ 8595 कोटी रुपयांची वेगळी तरतूद या वर्गांसाठी आपल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासन करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

श्री. शरदचंद्रजी पवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी हा निर्णय घेतला म्हणून मुद्दाम या ठिकाणी त्याचा उल्लेख करावासा वाटतो. त्याचप्रमाणे ओबीसी असतील किंवा बाकीचे समाजघटक असतील त्यांच्या विकासामध्ये सुध्दा गती यावी म्हणून या देशामध्ये मंडल आयोगाची अंमलबजावणी पहिल्यांदा महाराष्ट्र राज्याने केली आणि त्यावेळी सुध्दा आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब हे या राज्याचे मुख्यमंत्री होते.

सभापती महोदय, राज्यात आपण ज्या वेगवेगळ्या योजना आखतो आणि वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांचे ज्यावेळी नियोजन करतो त्याचा खऱ्या अर्थाने या गोरगरीब समाजघटकांपर्यंत फायदा पोहोचतो की नाही हे पाहणे अतिशय महत्वाचे आहे. आता नुकतीच महत्वाच्या विषयावर एक चर्चा झाली. भटके विमुक्त, मागासवर्गीय यांच्या शिष्यवृत्तीच्या बाबतीतील रक्कम अनेक वर्षे त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलीच नाही. वेगवेगळ्या माध्यमातून, आंदोलनाच्या माध्यमातून मागणी करुन सुध्दा ज्यावेळी हा निधी आपल्या गोरगरीब विद्यार्थ्यांना मिळत नाही त्यावेळी नाईलाजास्तव न्यायालयामध्ये जावे लागले आणि खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील मागासवर्गीय व अन्य मागासवर्गीय जाती जमाती, भटके विमुक्त जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे आदेश सन्माननीय उच्च न्यायालयाला द्यावे लागले.

यानंतर श्री. खंदारे .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

हे आदेश दिलेले असताना सुध्दा त्यावेळी शिष्यवृत्तीचे वाटप न झाल्यामुळे सुप्रीम कोर्टामध्ये जावे लागले. सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचे आदेश कायम ठेवून विद्यार्थ्यांची रोखून ठेवलेली शिष्यवृत्ती देण्याचे महाराष्ट्र शासनाला आदेश दिले. मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देत असताना या विषयावर प्रकाश टाकताना असे म्हटले होते की, समाजकल्याण योजनेतील 2 कोटी रुपयांचा निधी सरकारने कधीच वापरला नाही. राज्य घटनेतील तत्वांचे सरकारने पालन केलेले नाही. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटके, मागास यांचे शालेय शिक्षण थांबू नये यासाठी कोणत्याही परिस्थितीत शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. फी भरली नाही म्हणून दहावी पास झालेल्या विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला अडवून धरणाऱ्या शाळेविरोधात कारवाई करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त समाजाचा विकास होण्यासाठी मंत्रिमंडळामध्ये शासन निर्णय घेण्यात येतो. निर्णयाचे जी.आर.बाहेर येतात त्यावेळी जी.आर.ची अंमलबजावणी मात्र चांगल्या पध्दतीने होताना दिसत नाही. शासनाच्या जी.आर.चा प्रत्येक विभागातील अधिकारी आपापल्या परीने अर्थ काढतात. त्या जी.आर.च्या माध्यमातून अनेक वर्षांची आंदोलने, अनेक वर्षांची मागणी, अनेक वर्षापासून झालेला अन्याय दूर करुन कुठे तरी शासन निर्णय घेते. पण त्या निर्णयाची अंमलबजावणी होताना दिसत नाही. बरीच वर्षे त्या पदांची भरती किंवा पदोन्नती होताना दिसत नाही. काही वेळा असे दिसून येते की, त्या जी.आर.ची अंमलबजावणी होण्यासाठी काही अधिकारी जाणीवपूर्वक टाळतात. ज्यांनी आपल्या पदोन्नतीची मागणी केलेली असते ते दोन वर्षानंतर सेवानिवृत्त होतात. त्यामुळे तो विषय आपोआपच बाजूला जातो.

सभापती महोदय, अनुसूचित व जमाती प्रमाणेच या राज्यात भटके विमुक्त हा वर्ग सुध्दा मोठ्या प्रमाणात आहे. स्व.यशवंतरावजी चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री असताना 1961 साली ओबीसीतील जे गरीब घटक आहेत. ओबीसी या घटकाबरोबर स्पर्धा करुन आपली प्रगती साधू

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

शकत नाही. अशा गोरगरीब समाजाला वेगळे सारुन त्यांच्यासाठी भटके विमुक्तांची सूची तयार केली. 1961 साली भटक्या विमुक्त या वर्गासाठी या देशामध्ये प्रथम महाराष्ट्र राज्याने 4 टक्के आरक्षण दिले. या समाजासाठी वेगवेगळ्या योजना शासनाने जाहीर केल्या. परंतु सांगण्यास खरोखरच खेद होत आहे की, ज्या काही योजना भटक्या विमुक्त समाजासाठी आखलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी मी राज्याच्या मुख्य सचिवांना भेटलो होतो. भटक्या विमुक्त वर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत 2-3 वेळा निवेदने दिलेली आहेत. परंतु त्याबाबत निर्णय झाल्याचे मला दिसत नाही.

मुंबई महानगरपालिकेत भटक्या व विमुक्त वर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती मिळण्याबाबत असाच अन्याच होत असल्याचे दिसून येते. विधिमंडळात मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्या प्रमाणे शासन निर्णय दिनांक 2.8.11 मध्ये निर्देश दिल्याप्रमाणे मागासवर्गीयांचा पदोन्नती व सरळ सेवामधील अनुशेष मार्च, 2012 पर्यंत भरण्याचे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी दिले होते. मार्च, 2012 पर्यंत हा अनुशेष शासन भरुन काढत आहे का, याचेही उत्तर मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहे. खरोखरच सर्वच खात्यातील अनुशेष भरुन काढला जात नसेल तर त्या कारणांचा शोध घेऊन लवकरात लवकर अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ते सांगणे आवश्यक आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून सुध्दा महानगरपालिकेने हा अनुशेष भरुन काढण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

मी एक उदाहरण देतो. मुंबई महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी सेवेमध्ये 2008 सालापसून भटक्या विमुक्त जातीसाठी असलेली राखीव पदे भरण्यासाठी कोणतेही विशेष प्रयत्न करण्यात आले नाहीत. मार्च 2012 पर्यन्त उप मुख्यअभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांची 6 पदे रिक्त होती. एक उपायुक्ताचे पदही रिक्त होते. ही रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. अतिरिक्त आयुक्त श्रीमती म्हैसकर यांच्या अध्यक्षेखाली पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदासंबंधी समिती गठीत करण्यात आली होती. श्रीमती म्हैसकर या अत्यंत कार्यक्षम अधिकारी आहेत. सांगली जिल्ह्यामध्ये त्यांनी खूप चांगले काम केलेले आहे. परंतु त्यांनी भटक्या विमुक्त जातीची पदोन्नतीची पदे भरण्याकडे का दुर्लक्ष केले हे मला कळत नाही. खुल्या प्रवर्गातील पदे भरण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला. परंतु भटक्या विमुक्त जातीसाठीसाठी, अ, ब, क, ड साठी, राखीव असलेली पदोन्नतीची पदे भरण्याच्या बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. सभापती महोदय, भटक्या आणि विमुक्त जातीमधील अधिका-यांवर दिवसेंदिवस अन्याय व्हायला लागल्याचे दिसत आहे. 2008मध्ये भटक्या आणि विमुक्त जातीसाठी आरक्षित असलेल्या पदांच्या संदर्भात काही अन्य प्रवर्गाचे अधिकारी उच्च न्यायालयात गेले होते. परंतु आम्ही ती लढाई सर्वोच्च न्यायालयापर्यन्त लढतो. सर्वोच्च न्यायालयाने स्टे व्हॅकेट करुन भटक्या आणि विमुक्त जातीमधील लोकांसाठी पदोन्नती देण्याचे निर्देश दिले. म्हणजे शासनाच्या सेवेमध्ये असलेले कोणी झारीतील शुक्राचार्य हे भटक्या विमुक्त जातीमधील लोकांना पदोन्नती नाकारण्याचा प्रयत्न करतात. शासनाने काढलेल्या जी.आर.चा चुकीचा अर्थ लावून भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा भटक्या विमुक्त जातीसाठी भरती व पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्यासाठी शासनाने जाणीवपूर्वक लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, भटक्या विमुक्तांसाठी आश्रमशाळा देण्यात येतात. या आश्रमशाळा कोणत्या ठिकाणी देण्यात येतात ? तर जेथे भटक्या विमुक्त लोकांची संख्या जास्त आहे अशा ठिकाणी आश्रमशाळा देण्यामध्ये दुर्लक्ष केले जाते. तेव्हा आतापर्यन्त भटक्या विमुक्तांच्या मुलांसाठी जेवढया आश्रमशाळा दिलेल्या आहेत त्या कुठे कुठे दिलेल्या आहेत, त्या आश्रमशाळांमध्ये भटक्या विमुक्तांची किती मुले शिक्षण घेत आहेत याचे सर्वेक्षण करावे. जेथे भटक्या विमुक्तांची संख्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

मोठ्या प्रमाणावर आहे त्या ठिकाणी आश्रमशाळा न दिल्यामुळे या समाजाला त्याचा फायदा होत नाही. देशातील एकूण लोकसंख्येच्या 15 टक्के भटका विमुक्त समाज हा महाराष्ट्रामध्ये आहे. या समाजाला जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी 1960 सालापूर्वीचे पुरावे मागितले जातात. हा भटकंती करणारा समाज आहे. आज एका ठिकाणी तर उद्या दुस-या ठिकाणी असतो. असा समाज 1960 पूर्वीचे पुरावे कोठून देणार ? तेव्हा जात पडताळणी प्रमाणपत्राच्या बाबतीत इतर जाती जमातीसाठी जसे नियम शिथिल करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे भटक्या विमुक्तांसाठी देखील ते शिथिल करण्यात यावेत अशी माझी शासनाला विनंती आहे.

मेंढपाळ करणारा मेंढपाळी समाज हा सारखा भटकंती करीत असतो. भटकंती करीत असताना त्याच्या बरोबर एक घोडा असतो. त्या घोड्यावर त्यांचा संपूर्ण संसार असतो. घोड्यावरुन जात असताना कोंबड्याचे पिल्लू त्याच्या घोड्यावर असते, त्याच्या सोबत कुत्रा असेल तर कुत्र्याचे पिल्लू त्याच्या घोडयावर असते, शेळी-मेंढीचे पिल्लू त्याच्या घोड्यावर असते आणि लहान मुल असेल तर ते देखील त्याच्या घोड्यावर असते. अशा प्रकारे 8-8 महिने घोड्यावरुन मेंढपाळी करणारा समाज राज्यामध्ये आहे. हा समाज मुख्य प्रवाहात येण्यासाठी शासनाने अर्थसंकल्पामध्ये काय तरतूद केलेली आहे, त्याच्यासाठी कोणत्या वेगळया योजना केलेल्या आहेत ? अशा प्रकारे भटकंती करणा-यांच्या मुलांना आश्रमशाळामध्ये प्रवेश दिला जातो. परंतु अशी भटकंती करणा-यांची किती मुले आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेत आहेत याचे शासनाने सर्वेक्षण केलेले आहे काय ? 1961 साली त्यावेळच्या खाडे नावाच्या अधिका-यांनी असे सर्वेक्षण केले होते. त्यानंतर मात्र सर्वेक्षण झालेले नाही. तेव्हा भटक्या विमुक्तांच्या संदर्भात आरोग्य, शिक्षण आणि आरक्षण याबाबतीत सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. वासुदेव, गोंधळी, कडकलक्ष्मी हे लोक दारोदारी फिरुन उदरनिर्वाह करीत असतात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

आज सुध्दा कडकलक्ष्मीचा खेळ करणाऱ्यांना रस्त्यावरुन फिरताना बघितले तर त्याला स्वत:च्या अंगावर कोरडे ओढावे लागतात. कोरडे ओढून त्याच्या अंगावर रक्ताचे थेंब सांडावे लागतात. त्यानंतर चार पैसे त्याला मिळतात आणि त्या आधारे ते आपला उदरनिर्वाह करतात. कडकलक्ष्मीचा खेळ करणाऱ्यांना आपल्या अंगावर कोरडे ओढून रक्त सांडावे लागते. अशा लोकांकडे 1960 पूर्वीचा पुरावा मागितला तर तो पुरावा आणणे त्यांना शक्य होणार नाही. राज्यातील मेंढपाळ हे आठ महिने भटकंती करतात, त्यांच्याकडे पुरावा मागितला तर ते पुरावा देऊ शकत नाहीत. अशा समाजाचा मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात भटक्या विमुक्तांचा वेगळा वर्ग आहे हे लक्षात घेऊन गुजरात राज्याने देखील भटक्या विमुक्तांचा वेगळा वर्ग निर्माण केला. संपूर्ण देशात भटक्या विमुक्तांचा वेगळा वर्ग असणारी गुजरात आणि महाराष्ट्र ही दोनच राज्य आहेत. गुजरात राज्याने भटक्या विमुक्तांसाठी 1500 कोटी रुपयांचे वेगळे नियोजन केले. आपल्या राज्याने एक रुपयाचे सुध्दा नियोजन भटक्या विमुक्तांसाठी केलेले दिसत नाही. राज्य सरकारने अनेक महामंडळे निर्माण केली आहेत. काही महामंडळांना निधी दिला जातो, जी महामंडळे काम करतात त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात निधी दिला पाहिजे. धनगर समाजासाठी राज्य सरकारने अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ स्थापन केले. परंतु या महामंडळाला पुरेसा निधी दिला जात नाही. वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळाला निधी दिला पाहिजे. त्या महामंडळाच्या मार्फत धनगर समाजाची किती प्रकरणे मंजूर केली? इतर महामंडळांना किती निधी दिला? महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या समाजासाठी कोणत्या योजना राबविल्या जातात, हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये केंद्र सरकारने 36 व्या क्रमांकावर "धनगड" म्हणून उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये धनगर आहेत, त्यांचा उल्लेख धनगड असा केला जात नाही. म्हणून अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये धनगर असा उल्लेख झालेला नाही. एण्डॉकॉलॉजीमध्ये धनगड असा उल्लेख आहे, परंतु धनगर असा उल्लेख झालेला नाही. आपल्याकडे नावाचा अपभ्रश झाल्याने "देवरा" या नावाचा उल्लेख "देवडा" असा केला जातो, "जाखर" नावाचा उल्लेख "जाखड़" केला जातो, शिवरी या नावाचा उल्लेख "शिवडी" असा केला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

जातो त्याच धर्तीवर "धनगर" चा उल्लेख "धनगड़" असा केला जातो. त्यामुळे धनगर आणि धनगड हे दोन्ही शब्द एकच आहेत असे दाखविण्याचा प्रयत्न झाल्यामुळे त्या वर्गाला सवलतीपासून वंचित ठेवले गेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्यात याव्यात.

सभापती महोदय, रेणके आयोगाच्या शिफारशी शासनाला प्राप्त झालेल्या आहेत. रेणके आयोगाने सर्व्हे करुन शिफारशी सादर केलेल्या आहेत. सगळ्याच शिफारशी लागू कराव्यात असे मी म्हणणार नाही. सगळया शिफारशी राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाहीत. परंतु काही शिफारशी राज्य शासन मान्य करु शकते, ज्या राज्य शासनाच्या अखत्यारित येतात, त्या शिफारशी त्वरित लागू करुन सुरु कराव्यात अशी विनंती करु माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: महाराष्ट्र विधिमंडळ आणि राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे ज्येष्ठ पत्रकार श्री.मधुकर भावे लिखित "महाराष्ट्र : काल, आज आणि उद्या" या पुस्तकाचे प्रकाशन व "यशवंतराव महाराष्ट्रातले व यशवंतराव दिल्लीतले" या विषयावर मध्यवर्ती सभागृह, विधानभवन, मुंबई येथे आयोजित केलेले व्याख्यान.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आपणा सर्वांना विदित आहे, महाराष्ट्र विधिमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष सन 2012-2013 या कालावधीत साजरे केले जात आहे. त्या निमित्त महाराष्ट्र विधिमंडळ आणि राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे ज्येष्ठ पत्रकार श्री.मधुकर भावे लिखित "महाराष्ट्र : काल, आज आणि उद्या" या पुस्तकाचे प्रकाशन व "यशवंतराव महाराष्ट्रातले व यशवंतराव दिल्लीतले" या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन माननीय मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अन्य मान्यवरांच्या सन्माननीय उपस्थितीत मंगळवार, दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी सकाळी 9.00 वाजता मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधानभवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे. पुस्तक प्रकाशन समारंभानंतर श्री.मधुकर भावे यांचे व्याख्यान होईल. या संबंधीचे निमंत्रण पत्र सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या टपाल खणामध्ये वितरित करण्यात आले आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागास-वर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे

मु.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण,हेमंत टकले,भाई जगताप,विनायक मेटे,उल्हास पवार,रमेश शेंडगे, जयप्रकाश छाजेड,प्रकाश बिनसाळे,राजन तेली,सतीश चव्हाण,मोहन जोशी, किरण पावसकर, प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी,श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री.एम.एम.शेख, एस.क्यू.जमा, ॲड. उषाताई दराडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु....

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण या सभागृहात केले आहे, ते अत्यंत अभ्यासू नेते आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

त्यांच्याकडे दृष्टी आहे. दूरदर्शी दरवेशी म्हणून सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचे नेहमी दोन विषय महत्वाचे असतात. एक म्हणजे "धामापूर" आणि दुसरा विषय "मागासवर्गीयांचा उत्कर्ष". धामापूरला तर त्यांनी घाम आणलेला आहे पण प्रत्येक घामाच्या थेंबामध्ये धामापूर आणि मागासवर्गीयांचा उत्कर्ष हेच त्यांचे स्वप्न राहिलेले आहे. मला वाटते राज्य शासनाने ते स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील रहावे. सन्माननीय सदस्य हे महात्मा फुले यांचे अनुयायी आहेत, मी सुध्दा आहे. महात्मा फुले यांचे स्वप्न होते "सत्य धर्म" एकाच कुटुंबाच्या छताखाली बायबलचे पठन व्हावे, भगवद् गीतेचे स्मरण केले जावे, कुराणाला मानणारा मुलगा त्याच छताखाली असावा. अशा प्रकारे तीन भावंडांनी तीन धर्म स्वीकारावेत पण गुण्या-गोविंदाने नांदावे, तोच खरा सत्य धर्म होता. पण दुर्भाग्याने हा सत्य धर्म अस्तित्वात येऊ शकला नाही. आज आपण शहरात गेलो तर कांबळ्यांची वसाहत वेगळी, भोसल्यांची वसाहत वेगळी, कुलकर्णी आणि देशपांड्यांची वसाहत वेगळी दिसून येते. त्यामुळे जी अपेक्षा होती, जे स्वप्न महात्मा फुल्यांनी पाहिले होते पण दुर्दैवाने राज्यातच नव्हे तर संपूर्ण भारतात सुध्दा ते साकार होऊ शकले नाही. आरक्षणाविषयीचे त्यांचे स्वत:चे मत होते पण त्याविषयी घटनेत काय सांगितले ते नमूद करणे आवश्यक आहे. भारतीय घटनेत आरक्षण विषय तरतुदी ज्या आहेत त्याबाबत अनुच्छेद 16 (4) 46, 330, 332, 334, 335 आणि 338 द्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी, त्यांच्याकरिता राखून ठेवावयाच्या जागा, त्यांच्या फक्त लोकसंख्येच्या प्रमाणातच राखून ठेवल्या पाहिजेत आणि मागासलेल्या वर्गांना योग्य व पुरेसे प्रतिनिधीत्व देण्याच्या कारणासाठी नोकर भरतीत राखून ठेवावयाच्या जागा पुरेशा आहेत, किंवा समाधानकारक आहेत किंवा नाहीत यासाठी खास तरतुदी केल्या आहेत. दुसरा कोणताही दंडक किंवा पर्याय ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे मागासवर्गीयांना समाजातील इतर लोकांप्रमाणेच समाजात स्थान व दर्जा प्राप्त करुन देणे शक्य व्हावे, हा त्यामागील उद्देश आहे. जात, धर्म या आधारे त्यांचा भेदभाव न करता अशा घटनात्मक तरतुदीमुळे त्यांना समान वेतन व समान आर्थिक स्थान व दर्जा मिळावा हा त्यामागील हेतू आहे. म्हणून अनुच्छेद 16 (4) व 335 मध्ये विस्तृत व व्यापक स्वरुप स्पष्ट करण्यात आले आहे आणि त्यामध्ये नागरिकांच्या कोणत्याही मागासलेल्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

वर्गाचा आणि राज्यांतर्गत लोकसेवामध्ये, ज्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व नाही अशा मागासलेल्या वर्गाचा आणि राज्यांतर्गत लोकसेवामध्ये ज्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व नाही अशा मागासलेल्या नागरिकांसाठी, त्यांचे पुरेशा प्रमाणात प्रतिनिधीत्व नाही, अशा मागासलेल्या नागरिकांसाठी, त्यांचे पुरेशा प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यासाठी जागा राखून ठेवल्याच पाहिजेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

अनुच्छेद 16/4 मध्ये नागरिकांचा मागासलेला वर्ग असा उल्लेख करण्यात आलेला आहे. अनुच्छेद 335 मध्ये अनुसूचित जाती व जमाती असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे हे दोन अनुच्छेद, अनुच्छेद 46 बरोबर वाचल्यास अर्थबोध बरोबर होतो. अनुच्छेद 46 नुसार दुर्बल, विशेष अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हीत संबंधाचे राज्य खास संवर्धन करेल.

सामाजिक न्याय विभागाच्या निदर्शनास मला काही आकडेवारी आणून द्यावयाची आहे. 50 टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळवणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दि. 29 ऑगस्ट,1966 पासून शिष्यवृत्ती दिली जाते. सन 2005 च्या अर्थसंकल्पात 34.50 लक्ष नोंद होती परंतु प्रत्यक्षात 28.10 लक्ष रुपये खर्च झाले. सन 2006-2007 मध्ये 34.50 लक्ष रुपयांची तरतूद होती परंतु तरतुदीपेक्षा प्रत्यक्षात कमी खर्च झाला. सन 2007-2008 मध्ये 2.75 कोटी रुपयांची तरतूद होती परंतु प्रत्यक्षात 97.53 लक्ष रुपये एवढाच खर्च झाला. सन 2008-2009 मध्ये 2.27 कोटी रुपयांपैकी 86.50 लक्ष रुपये खर्च झाले.

सभापती महोदय, सन 2006 ते 2011 पर्यंत 7 कोटी,65 लक्ष 68 हजार रुपयांची तरतूद होती परंतु त्याच्या अगेन्स्ट फक्त 2 कोटी 47 लक्ष 92 हजार रुपये खर्च करण्यात आला. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला माझी विनंती आहे की, शिष्यवृत्तीवर रक्कम खर्च करण्यासाठी आवश्यक असलेल्या सूचना विभागाला देण्यात याव्यात.

सभापती इयत्ता 5 वी ते 7 वीच्या मुलींना शिष्यवृत्ती दिली जाते तसेच आदिवासी भागातील गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे.

सभापती महोदय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला सन 1906 पासून 110 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात केवळ 80 कोटी रुपये खर्च झाले. सन 2011 पर्यंत महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाला 203.33 कोटी रुपयांची तरतूद होती. परंतु प्रत्यक्षात 130 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : या चर्चेसाठी जो एक तासाचा वेळ देण्यात आलेला आहे त्यामध्ये मंत्रीमहोदयांना उत्तर सुध्दा द्यावयाचे आहे. या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदयांना 35 मिनिटे लागणार आहेत. आतापर्यंत 25 मिनिटांची चर्चा झालेली आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, अल्पसंख्यांकाच्या संदर्भात शासनाने धोरण जाहीर केलेले आहे. सच्चर समितीने एकूण अर्थसंकल्पाच्या 15 टक्के खर्च अल्पसंख्याकावर करण्याचे अपेक्षित केलेले आहे. परंतु अल्पसंख्याकांच्या संदर्भात केवळ 0.75 टक्के खर्च करीत आहोत. अल्पसंख्याकांचा खरोखरच उत्कर्ष करावयाचा असेल तर बजेटच्या किमान 5 टक्क्यावर खर्च केला पाहिजे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्यांकांची संख्या किती व त्यांच्यावर होणारा खर्च किती याचा विचार केला तर यामध्ये मोठया प्रमाणात विसंगती आढळून येते. केंद्रशासनाच्या वतीने अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या वर्षी अल्पंसंख्यांक समाजाच्या 8 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

सभापती महोदय, त्यांची खाती उघडायला बँकांनी नकार दिला आहे. यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र बँकेचा समावेश आहे. या बँकांनी 8 हजार मुलांची खाती उघडण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. बँकेने नकार का दिला आहे, बँकेच्या मनामध्ये काय आहे ? या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे शिक्षण व्हावे किंवा होऊ नये या विषयाचे स्पष्ट मत राज्य शासनाने समजून घेऊन त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने वाटते.

सभापती महोदय, मुस्लिम समाजातील मेहतर, खाटीक, मुकरी, गारूडी, या जमातींना अनुसूचित जातीची सवलत मिळण्यासाठी राज्य शासनाने खऱ्या अर्थाने पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील ओबीसींमधील काही जातीची नोंद केंद्र सरकारच्या यादीमध्ये नाही. ती केंद्र सरकारच्या यादीमध्ये यावी म्हणून राज्य सरकारने प्रयत्न केले पाहिजेत.

सन 2011-2012 चे राज्याचे वार्षिक बजेट रूपये 41500 कोटीचे आहे. या वर्षी अल्पसंख्याकांसाठी 275 कोटी रूपयांची तरतूद आहे. शिष्यवृत्तीसाठी 48 कोटी रूपयांची तरतूद आहे म्हणजे एकूण 333 कोटी रूपयांची तरतूद आहे. याची जर टक्केवारी काढली तर त्याचे प्रमाण एक टक्क्यांपर्यंत देखील जात नाही. सन 2010-2011 चा विचार केला तर अल्पसंख्याकसाठी 210.03 कोटी आणि सामाजिक न्याय विभागासाठी 2652 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. येथे पण अल्पसंख्याकांसाठी एक टक्क्यांपर्यंत तरतूद केलेली नाही.

प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत अल्प उत्पन्न गट, बी.पी.एल.कुटुंबासाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता वाटते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन अत्यंत अल्प आहे. त्यामध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे प्रयत्न केला पाहिजे.

महाराष्ट्रातील चर्माद्योग हा महत्त्वाचा आहे. यामध्ये काम करणाऱ्यांना कच्च्या मालाची उपलब्धता आणि पुरवठा याच्या व्यवस्थेचे समन्वयन राज्य शासनाच्या वतीने होणे आवश्यक आहे. त्यांना स्वदेशी व विदेशातील बाजारपेठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

मी शेवटचे दोन मुद्दे मांडतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. इंदिरा आवास घरकूल योजना आहे. ज्यांच्याकडे दारिद्र्य रेषेचे प्रमाणपत्र आहे अशा सगळ्या लोकांना घरे द्यावीत असा मंत्रिमंळाचा निर्णय आहे. पण येथे गुणवत्तेची इयत्ता लावली आहे. त्यामुळे यादी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. ती न लावता महाराष्ट्र शासनाने जो काही निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी करावी, एवढा आग्रह मी या निमित्ताने करतो.

मी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या जनतेसमोर अतिशय महत्त्वाचा, तातडीचा, तळमळीचा, तगमगीचा विषय या सभागृहाच्या माध्यमातून आणल्या बद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो आणि येथेच थांबतो.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आता आपण मला बोलण्यास संधी द्यावी.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आपल्या पक्ष प्रतोदांकडून माझ्याकडे आपल्या पक्षातील सन्माननीय सदस्यांची नावे आलेली नाहीत. त्यामुळे मी आपणास बोलण्याची संधी देऊ शकत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. चेअर वरून आम्हाला सांगितले जाते की, नावे द्यावीत. त्यानुसार आम्ही नावे देतो. काही वेळा असे होते की, सभागृहात सन्माननीय सदस्य हात वर करतात. तेव्हा त्यांना सभापतीस्थानावरून बोलण्यास अनुमती दिली जाते. आता आपण आम्हाला सांगत आहात की, आमच्याकडून कोणाचीही नावे आलेली नाहीत म्हणून बोलायला देणार नाही. नावे देण्यात यावीत असे आपण घोषित केले होते काय ? आमचे या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी हात वर आहेत. त्यामुळे आपण आम्हाला बोलायला संधी दिली पाहिजे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायकराव मेटे) : नियम 260 अन्वये किंवा अन्य कोणत्याही प्रस्तावावर चर्चा होते त्यावेळी प्रत्येक पक्षाच्या प्रतोदांमार्फत बोलू इच्छिणाऱ्या माननीय सदस्यांच्या नावांची यादी पीठासीन अधिकाऱ्यांकडे पाठविली जाते. त्यानुसार माननीय सभापतींकडे सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून नावे पाठविण्यात आली. त्यामध्ये विरोधी पक्षाकडून माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांचे नाव आले असल्यामुळे त्यांना बोलण्याची संधी देण्यात आली. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कुणाही माननीय सदस्यांचे नाव आलेले नसल्यामुळे माननीय सभापतींनी ठरवून दिलेल्या क्रमानुसार माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे भाषण संपल्यानंतर माननीय मंत्री उत्तराचे भाषण सुरु करतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहातील सर्व माननीय सदस्य सांगत आहेत की, आपण नावे मागितली नाहीत म्हणून आम्ही आमची नावे दिली नाहीत. आपण जर नावे मागितली असती तर आम्ही नावे दिली असती.

तालिका सभापती : ठीक आहे, या नंतर आपल्यापैकी कुणीतरी एक माननीय सदस्य बोलतील.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी 23 माननीय सदस्यांची नावे जाहीर केली होती.

तालिका सभापती : आता यानंतर विरोधी पक्षातर्फे एक माननीय सदस्य बोलतील, त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल. आता माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अतिशय महत्वाचा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. खऱ्या अर्थाने कोणत्याही समाजाचा विकास हा शिक्षणावर अवलंबून असतो. याचा अर्थ शिक्षण हा सर्वप्रकारच्या विकासाचा पाया आहे. हे मी आता आपल्यापुढे सांगत नाही तर 100 वर्षापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले यांनी देखील त्यावेळी सांगितले होते. या गोष्टीला 100 वर्षे झाल्यामुळे त्यांचे शताब्दी वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत. "विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले" अशा एका सूत्रबध्द शब्दामध्ये महात्मा फुले यांनी शिक्षण न मिळाल्यामुळे शूद्र, अतिशूद्र आणि महिलांचे कसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

श्री. विक्रम काळे....

खच्चीकरण झाले याचे अचूक निदान केले होते. त्याची जाणीव करुन देण्याचे काम माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी त्यांच्या ठरावामधून केले. मी त्यांच्या शेजारी बसत असल्यामुळे गेल्या आठवडाभर दहा-बारा पुस्तकांचा अभ्यास करुन आणि त्यामधील संदर्भ एकत्रित करुन अतिशय अभ्यासपूर्ण असे भाषण त्यांनी केले. एखादा प्रश्न हातात घेतल्यानंतर त्याची अभ्यासपूर्ण मांडणी करणे हे देखील एकप्रकारचे कौशल्य आहे, ते मांडण्याचे काम माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी केले. त्याबद्दल सर्व शिक्षकांच्या वतीने आणि सर्व माननीय सदस्यांच्या वतीने मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या ठिकाणी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी, अल्पसंख्याक, भटक्या जाती व विमुक्त जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रामध्ये जी परवड होत आहे त्यासाठी शासनाने शिष्यवृत्ती जाहीर करावी असा महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. त्यांच्या प्रस्तावातील हा महत्वाचा गाभा आहे. म्हणून मला असे वाटते की, देशामध्ये महाराष्ट्र हे पहिले राज्य असून मोठया प्रमाणात निधीच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्याचे काम आपण करीत आहोत. दरवर्षी सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना 2200 कोटी रुपयांची शिष्यवृत्ती देण्याचे काम आपले सरकार करीत आहे. ही रक्कम थोडी थोडकी नसून एवढी मोठी रक्कम आपण या कामासाठी खर्च करीत असतांना तिच्या अंमलबजावणीमध्ये आपण कुठे तरी कमी पडत आहोत काय, याचाही आपल्याला गांभीर्याने विचार करावा लागेल. मंत्री महोदय, आपण या मंत्री मंडळातील अत्यंत अनुभवी आणि ज्येष्ठ मंत्री आहात म्हणून आपल्याला एक महत्वाचे सामाजिक न्याय खाते दिले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने आपल्या नेतृत्वामधून या खात्याला न्याय देण्याचे काम मंत्री महोदय करीत आहेत. या करिता मंत्री महोदय आपण आपला बाणेदारपणा दाखवा.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्र्यांकडे जा.

आता सामाजिक न्याय विभागाकडील काम खूप वाढलेले आहे. कारण आता बऱ्याच योजना झालेल्या आहेत. लोकांना शेळ्या-मेंढ्या देणे, लोकांना पिठाची चक्की देणे, लोकांना नांगर देणे मग अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांना शिक्षणाकडे पहावयास कुठे वेळ आहे? मग या योजनांची अंमलबजावणी कोण करणार आहे? शिक्षणाकडे, आश्रमशाळांकडे कोण पहाणार? मग गुणवत्ता तरी कशी राहील हा प्रश्न आहे.आपण वर्तमानपत्रामध्ये रोज दोन-चार बातम्या वाचतो की,अमुक वसतीगृहातील अन्नामध्ये अळ्या निघाल्या किंवा वसतीगृहातील अन्न खाऊन मुलांना विषबाधा झाली.वसतीगृहामध्ये असे-असे प्रकार घडले अशा प्रकारे आपण सातत्याने वर्तमानपत्रामध्ये दोन-दोन, तीन-तीन बातम्या वाचत असतो.तसेच प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी सदनामध्ये चर्चा होत असते आणि ही गोष्ट शाहू-फुले-आंबेडकर यांच्या राज्यामध्ये आपल्याला भूषणावह नाही.

म्हणून या चर्चेच्या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांकडे पहिली मागणी आहे की, याचे दोन भाग करावेत. एक म्हणजे लोककल्याणकारी जन लोकांसाठी योजना आणि दुसऱ्या भागामध्ये शिक्षणाची योजना. मग त्यामध्ये वसतीगृह असतील,आश्रमशाळा असतील. आपल्याकडे अनेक प्रकारच्या आश्रमशाळा आहेत. व्ही.जे.एन.टी.च्या आश्रमशाळा आहेत, अनुसूचित जातींसाठी वेगळया आश्रमशाळा आहेत. या सगळया आश्रमशाळा, वसतीगृहे आहेत त्या सगळया शिक्षणाच्या अंतर्गत आणाव्यात. तसेच दुसऱ्या ज्या जनकल्याणकारी योजना आहेत, ज्या अनुदानाच्या योजना आहेत त्या संबंधित विभागाअंतर्गत आणा. मी यासाठी असे कधीही म्हणणार नाही की, या विभागाचे दोन भाग करण्यात यावेत, असे बिलकूल म्हणणार नाही. ते विभाग तुमच्याकडेच राहिले पाहिजेत याबद्दल दुमत नाही.एकच विभाग असू द्या.परंतु यामध्ये दोन भाग करावेत आणि वरपासून खालपर्यंत म्हणजे मंत्रालयापासून ते तालुका पातळीपर्यंत सर्व वेगळे अधिकारी नेमावेत. ज्याप्रमाणे शिक्षणाच्या बाबतीत संचालक आहेत, विभागासाठी उप संचालक आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण अधिकारी आहेत तशा प्रकारे स्वतंत्रपणे आश्रमशाळांच्या बाबतीत ही शिक्षण प्रणाली आणली तर मला असे वाटते की, खऱ्या अर्थाने आज आपण महात्मा ज्योतिबा फुले यांचे 100 वे वर्ष साजरे करीत आहोत, अशा वेळी त्यांना आदरांजली वाहिल्यासारखे होईल.त्यामुळे आपण याबाबतीत क्रांतीकारक निर्णय घ्यावयास पाहिजे अशाच प्रकारचे मत आमच्या शिक्षक आमदारांचे सुध्दा असू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकेल असे मला वाटते. म्हणून याबाबतीत माननीय मंत्री महोदय याबाबतीत बाणेदारपणे निर्णय घेऊ शकतील आणि त्यांनी तसा निर्णय घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, आपण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतो. पण कधी-कधी शिष्यवृत्ती देण्यामध्ये अनेक घोटाळे होतात. ती विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाही. आपण शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय का घेतला? कारण गोरगरिबांची मुले शिकावीत आणि त्यांनी स्वत:च्या पायावर उभे रहावे, पुढे जावे. पण वर्ष पूर्ण झाल्यावर सुध्दा,परीक्षा दिल्यावर सुध्दा, एप्रिल महिना संपल्यानंतर सुध्दा, उन्हाळ्याची सुट्टी लागल्यावर सुध्दा जर शिष्यवृत्ती मिळत नसेल तर शिष्यवृत्ती मिळण्याला काहीही अर्थ नाही, ते सगळे अर्थशून्य आहे. म्हणून जून-जुलै मध्ये प्रवेश मिळाल्यानंतर फारतर फार प्रथम सत्राच्या अगोदर विद्यार्थ्यांपर्यंत ही शिष्यवृत्ती कशी पोहोचेल याची व्यवस्था राज्य शासनाने तातडीने, प्रॉयॉरिटीने केली पाहिजे. मध्यंतरी आम्ही वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली की,आता शिष्यवृत्ती ऑन लाईन दिली जाणार, मग सगळयाच विद्यार्थ्यांनी गर्दी केली. अनेक वर्तमानपत्रामध्ये याबाबतीत लिहून आले. पण सगळयांनी याबाबत आवाज उठविला. दैनिक लोकमत या वर्तमानपत्राने काय म्हटले तर ऑन लाईन शिष्यवृत्ती पासून 25 लाख विद्यार्थी वंचित. ऑन लाईन अर्ज भरण्यासाठी रागांच्यारांगा लागल्या.माझे असे म्हणणे आहे की,हे विद्यार्थ्यांचे काम नाही.विद्यार्थ्यांनी आपला अर्ज महाविद्यालया मध्ये दाखल करावा आणि मग महाविद्यालयाने ती माहिती ऑन लाईन शासनाकडे पाठवावी.ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला किंवा तालुक्याच्या ठिकाणी इंटरनेटची सुविधा असेलच असे नाही आणि जरी ती सुविधा असली तरी तेथे वीज असेलच असे नाही. त्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांना त्रास झालेला आहे आणि पालकांनाही होत आहे. आज या ऑन-लाईनमुळे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले की काय अशा प्रकारची भीती निर्माण झालेली आहे. म्हणून मला असे वाटते की,ऑन लाईन शिष्यवृत्ती देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे,तो चांगला असून हा स्तुत्य उपक्रम आहे. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो.परंतु मला असे वाटते की,याच पध्दतीने सर्वकाही करावे.

सभापती महादय, माझा शेवटचा मुद्दा आहे. मी आपला आदर ठेऊन माझे भाषण संपविणार आहे. माझे असे म्हणणे आहे की, उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली पाहिजे.जे विद्यार्थी गुणवंत आहेत,जे दरवर्षी उत्तीर्ण होतात त्यांना देखील शिष्यवृत्ती दिली पाहिजे. आपण अनेक चांगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेतलेले आहेत. जे मागासवर्गीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छितात, अशा 25 विद्यार्थ्यांना पाठविले जाते आणि आता ही संख्या 50 केलेली आहे.परंतु माननीय श्री.चव्हाण साहेब अशी मर्यादित संख्या असू शकत नाही. महाराष्ट्रामधील शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जी संख्या आहे, ती मर्यादित ठेऊ नका. जो परदेशामध्ये जाऊ इच्छितो, ज्याला शिकण्याची इच्छा आहे त्याची गुणवत्ता पहावी आणि अशा विद्यार्थ्यांना आपण परदेशामध्ये शिक्षणासाठी पाठवावे अशा प्रकारचा क्रांतीकारक निर्णय सुध्दा सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघेसाहेब तुमच्या नावावर लिहिला गेला पाहिजे. त्या दृष्टीने उचित पावले उचलावीत अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यातील वस्तुस्थितीबद्दल जेवढे सांगावे तेवढे कमी आहे. मला त्यातील पाच मुद्दे मांडणे अनिवार्य आहे. त्याकडे मी आपले लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, आपण मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकाच्या उन्नतीसाठी महामंडळे स्थापन केली. या महामंडळाचे काम वर्षानुवर्षे सुरु आहे. मग यामध्ये महात्मा जोतिबा फुले विकास महामंडळ असेल, शाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ असेल, मौलाना अब्दुल आझाद महामंडळ असेल या महामंडळाच्या नेमक्या काय अडचणी आहेत त्या बाबत आपण वित्त मंत्री महोदयां बरोबर बसून किती वेळा चर्चा केली याचा रिव्हयू घेणे खरेच गरजेचे आहे. कारण ही महामंडळे कशा पध्दतीने बंद करावीत अशी येथे चर्चा होते. ही महामंडळे म्हणजे पांढरे हत्ती पोसल्यासारखे आहे अशी शासन आणि प्रशासनामध्ये सातत्याने चर्चा होत असते.

सभापती महोदय, ही महामंडळाने शासनाला अनेक शिफारशी करतात. त्या शिफारशींची शासनाकडून अंमलबजावणी झाली की नाही यावर विचार होताना दिसत नाही. समाज कल्याण विभागाच्या मंत्री महोदयांना मंत्रिमंडळात आणि निणर्यामध्ये किती राजकीय प्रतिष्ठा आहे हाच एक संशोधनाचा विषय आहे. जर एखाद्या मंत्री महोदयांचे काम चांगले होत नसेल तर लगेच म्हटले जाते की,त्यांच्याकडे महिला व बाल विकास विभाग देऊन टाका. म्हणजे जी अकार्यक्षम मंडळी आहेत त्यांच्याकडे अशा विभागांचा कार्यभार सोपविण्यात येतो किंवा अशा स्वरुपाची चर्चा थट्टेच्या स्वरुपात होत असेल तर मला वाटते की, त्या विभागाला राजकीय इच्छाशक्ती प्राप्त होत नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. हा विभाग कायम घेणाऱ्याच्या भूमिकेत असावा का, त्या विभागाच्या अपेक्षांचे प्रतिबिंब प्रत्यक्ष कृतीमध्ये पडते काय याचा आपण विचार कराल त्यावेळी सर्व गोष्टी सुस्पष्ट होतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, निवडणुकीचे निकाल लागून जवळपास अडीच वर्षे झाली. असे असताना अजूनही महामंडळावरील नियुक्त्या झालेल्या नाहीत. आम्ही येथे मुद्दा उपस्थित केला तेव्हा सांगण्यात आले की, "लवकरात लवकर नियुक्त्या करण्यात येतील." कार्यकर्त्यांची किती गुणवत्ता आहे यामध्ये न जाता जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांना महामंडळामार्फत मिळणाऱ्या लाभासाठी या नियुक्त्या होणे गरजेचे आहे. मग मागासवर्गीयांसाठीची हॉस्टेल्स असतील किंवा अन्य योजना असतील, आपल्या सोबत जे कार्यकर्ते काम करीत आहेत त्यांना अधिकारापासून वंचित ठेवून स्वत:कडे अधिक्रारांचे केंद्रीकरण केल्यामुळे कार्यक्षमता वाढते काय हा मूलभूत प्रश्न आहे. मग अशी उत्तरे दिली जातात की, इकडून फाईल तिकडे गेली आहे. तिकडून फाईल इकडे गेली आहे. केवळ बारा हजार कार्यकर्त्यांची वर्णी लावावयाची एवढा या महामंडळाचा हेतू नाही. आपल्याकडे असणाऱ्या कार्यकर्त्यापैकी 50 टक्के कार्यकर्ते प्रामाणिकपणे काम करणारे आहेत असे जरी गृहीत धरले तरी नियुक्त्या न केल्यामुळे फार मोठ्या मनुष्यबळास कामापासून वंचित ठेवत आहात. मागील पाच वर्षात आपण अशाच पध्दतीने वागलात. कार्यकर्ते पक्षासाठी काम करतात हा त्यांचा प्रश्न आहे. पण समाजातील जे लाभधारक घटक आहेत ते या सर्व सुविधांपासून वंचित राहत आहेत याची जाणीव ठेवून महामंडळावरील नियुक्त्या लवकर करण्यात याव्यात.

सभापती महोदय, विधिमंडळाच्या वेगळ्या समित्या आहेत त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची एक समिती आहे. या समितीवर सर्वपक्षीय सदस्यांची नियुक्ती होत असते. मागील दहा वर्षात अनुसूचित जाती / जमाती कल्याण समितीने अनेक सूचना शासनाला केलेल्या आहेत. अनेक योजनांचे मूल्यमापन या समितीने केलेले आहे. या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी शासनामार्फत का होत नाही ? त्या शिफारशींची अंमलबजावणी करताना कोणत्या अडचणी येतात त्या देखील समोर आल्या पाहिजेत याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी महामंडळावरील नियुक्त्या ताबडतोबीने करण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छिते की, आम्ही जरी विरोधी पक्षात असलो तरी एक चांगल्या प्रकारचे प्रशासन चालविताना कार्यकर्त्यांचा संच बरोबर घेतला पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा शुल्कमाफीच्या संदर्भातील आहे. या संपूर्ण प्रस्तावात कोणत्या पध्दतीच्या अडचणीत येतात या संबंधी आहे. आपण अभ्यास करुन येथे प्रश्न, सूचना मांडत असतो, ती कौतुकास्पद बाब आहे. परंतु आपण इतिहासाचे वर्णन किती करायचे ? त्यातील तत्व विचार किती मांडायचा ? आपण अंमलबजावणीसाठी प्रत्यक्ष किती वेळ देतो याचे स्वत: आत्मपरीक्षण करावे असे मला वाटते. कारण आपण परिस्थित्ीचे वर्णन करण्यामध्ये आपली आठ ते दहा मिनिटे जातात..

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .. .

अंमलबजावणीच्या संदर्भात आपल्या अपेक्षा पूर्ण झाल्या की नाही, या बद्दलची काँक्रीट माहिती सभागृहासमोर येत नाही. म्हणून या 1800 कोटी रुपयांच्या शुल्क माफीच्या संदर्भात अनेक संथांना कोर्टात जायची वेळ आलेली आहे.दिनांक 30 डिसेबंरपर्यंत आम्ही नक्कीच तुमचे शुल्क देऊ असे शासनाने सांगितले होते पण दर वेळेला एवढा विलंब होत असेल तर कळत न कळत त्या विद्यार्थ्याला अपमानास्पद वागणूक किंवा मागासवर्गीय विद्यार्थी असेल तर त्याला टाळलेले बरे हीच भूमिका विनाअनुदानित संस्थांच्या मनामध्ये येणार आहे. म्हणून शासनाच्या या भूमिकेमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांची किती अवहेलना होत आहे या संदर्भात सुध्दा विचार केला पाहिजे. ज्या कारणांमुळे उशीर होतो त्याला जे जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द कडक कारवाई झाली पाहिजे. मुलांची फी वेळेवर गेलीच पाहिजे. जेवढा विलंब होईल त्या संदर्भातील माहिती सभागृहासमोर मांडली गेली पाहिजे. न्यायालयापर्यंत जाण्याची वेळ का येते आणि याबाबत जनतेच्या मनामध्ये का नकारात्मक भावना आहे याचा विचार केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये अल्पसंख्याक मुलांचा उल्लेख केलेला आहे. अल्पसंख्य समाजातील लोकांपर्यंत लाभा पोहचलेला दिसत नाही. मला एका गोष्टीचा अतिशय खेद वाटतो. मागासवर्गीय असतील किंवा अल्पसंख्याक असतील या समाजाचा 50 टक्के घटक हा महिला आणि मुली आहेत. अल्पसंख्याक समाजातील मुलींची शिक्षणाच्या संदर्भातील, आरोग्याच्या संदर्भातील परिस्थिती पहिली तर मानव विकास निर्देशांकानुसार सुध्दा विकासापासून वंचित असलेला हा घटक आहे. अशा वेळेला अल्पसंख्याक समाजाच्या मुलींसाठी कायदे बदलण्याचा प्रश्न असेल, जुबानी तलाकचा प्रश्न असेल, अल्पवयीन असताना लग्न लादली जातात याबद्दलचा प्रश्न असेल, खूप मुले जन्माला घालण्यासाठी म्हणून त्यांच्या मातृत्वावर कुपोषणासारखे प्रश्न तयार होतील हा मुद्दा असेल यासाठी शासन काय विशेष फोकस देऊन लक्ष देत आहे, हेच मला समजत नाही. मी मौलाना अब्दुल कलाम महामंडळचे काम समजून घेण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्ये बचत गटाशिवाय दुसरी कुठलीही गोष्ट दिसली नाही. याचा अर्थ वेगळा वाद निर्माण करावा अशातला भाग नाही. पण ज्या समाजामध्ये खास करुन वेगळे शोषणाचे काही मुद्दे असतील त्याला ॲड्रेस न करता त्याच्यातून मार्ग न काढता, त्यावर कोणत्या पध्दतीने काम करण्यात येणार आहे, यासाठी कुठलाही दृष्टिकोन नसताना शासन कशा पध्दतीने न्याय देणार आहे? समाज म्हटले की, सगळे सर्व त्यात आले.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .. .

अल्पसंख्याक समाजाच्या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, महिला आर्थिक विकास महामंडळ असेल किंवा मौलाना अब्दुल कलाम आझाद महामंडळ असेल यांनी एकत्रितपणे काम करुन अल्पसंख्याक मुलींच्या संदर्भात खास लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. मागासवर्गीयांच्या वसतिगृहामध्ये किती गैरप्रकार झाले यावर सातत्याने या सभागृहात चर्चा होत असते. माझा मुद्दा असा आहे की, पोलीस स्टेशनला दक्षता समित्या नमलेल्या आहेत त्याप्रमाणे प्रत्येक मागासवर्गीय वसतिगृहासाठी दक्षता समिती नेमून त्या भागातील ज्या आमदारांना वेळ देणे शक्य आहे अशा विधानसभेच्या किंवा विधान परिषदेच्या आमदारांना या वसतिगृहात सहा महिन्यातून एकदा मुलांना भेटायला बोलावण्यात यावे. मी मान्य करीन की, दहापैकी पाच आमदार जाऊ शकणार नाहीत पण दोन तरी जातील.आज अशी परिस्थिती आहे की, कोणालाही वसतिगृहाला व्हिजीट करावयाची असेल तर तेथील अधिकाऱ्यांना वाटले तर ते जातात किंवा कोणी दुसरी व्यक्ती गेली तर त्यांचा ना त्या मुलांशी संवाद होतो ना मार्गदर्शन होते. मुलांच्या काय अपेक्षा आहेत हे समजून घेतले जात नाही. समाजकल्याण विभागाची कुठल्याही जिल्ह्यात आणि तालुक्यात जेथे-जेथे वसतिगृहे असतील त्या ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या लोक प्रतिनिधींना विश्वासात घेऊन, महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन यामध्ये लक्ष घालावयास पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये विशेषत: चेंबूर भागामध्ये वसतिगृहे आहेत. आपल्याला कल्पना आहे की, तिकडचा एफएसआय आणि तिकडच्या एक-एक बिल्डिंग रिकाम्या करुन पुनर्बांधणीच्या नावाखाली ती जागा गिळंकृत करण्याचा प्रश्न तयार झालेला आहे.काही वेळा अशी शंका निर्माण होते की, या इमारती बेचिराख होईपर्यंत त्यांची दुरुस्ती केली जात नाही, जेणे करुन ती जागा हडप करता येईल. म्हणून समाजकल्याणच्या ज्या ज्या ठिकाणी जागा आहेत त्या जागांचा पुनर्विकास करावयाचा असेल तर तो योग्य त्या पध्दतीने झाला पाहिजे अन्यथा त्या ठिकाणी काही दिवसांनी कोंडवाडयाच्या पलीकडे जाऊन काही तरी तयार झालेले दिसेल तेव्हा या बाबतीत योग्य ती पाऊले उचलण्यात यावीत अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी अतिशय चांगल्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. परंतु चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. त्यांनी असे उद्‌गार काढले की, जो काही कामाचा नाही, जो आवडत नाही त्याला समाजकल्याण खाते दिले जाते. अशी चर्चा या सभागृहामध्ये होऊ नये. सन्माननीय मुख्यमंत्री हे आपापल्या परीने उंच आहेत. तसेच माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे, माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र गावित सुध्दा आहेत आणि या सगळ्यांकडे वेगवेगळी खाती आहेत. आणखी कोणी असते तरी तो अधिकार सन्माननीय मुख्यमंत्र्यांचा आहे. सर्व मंत्री त्या त्या पात्रतेचे आणि उंचीचे आहेत.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, अशा पध्दतीची चर्चा काही लोकांमध्ये आहे. परंतु आपण जो मुद्दा उपस्थित केला ती बाब तपासून पाहिली जाईल आणि अयोग्य असेल तर कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे लावणी महोत्सवाची निमंत्रण पत्रिका आम्हा सगळ्यांना मिळालेली आहे. आजच तो महोत्सव सुरु होणार आहे. या पत्रिकेकडे पाहताना ती मला अभिरुचीशून्य वाटली. त्यामधील वरचे चित्र हे सांस्कृतिक खात्याला आणि राज्याला शोभा देणारे नाही. अशा प्रकारची चूक सांस्कृतिक खात्याकडून होऊ नये, अशी आमची इच्छा आहे. ही पत्रिका मी आपल्याकडे पाठवितो. या विषयावर चर्चाही होऊ नये असे मला वाटते. परंतु याची गंभीरपणे दखल घ्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्य शासनातर्फे दरवर्षी हा महोत्सव राज्य सरकारच्या खर्चाने घेतला जातो आणि दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना रीतसर निमंत्रणे दिली जातात. आता हा कार्यक्रम सुरु होण्यास 45 मिनिटे राहिलेली आहेत. तरी सुध्दा ही निमंत्रणे अद्याप सगळीकडे पोहोचलेली नाहीत. याची सुध्दा गांभीर्याने दखल घेतली पाहिजे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, ती पत्रिका अभिरुचीशून्य आहे. ती पत्रिका आम्हाला मिळालेली नाही त्यामुळे हा विषय औचित्याला धरुन होत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अभिरुचीशून्य पत्रिकेच्या बाबतीत म्हटले नसून वरच्या कव्हरबद्दल ते सांगितले आहे.

तालिका सभापती : या ठिकाणी माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे हे एकटेच उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची दखल शासनाने घ्यावी. जर निमंत्रण पत्रिका अभिरुचीशून्य असेल आणि सर्वांना निमंत्रणे मिळाली नसतील तर त्याची गांभीर्याने दखल घ्यावी.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या मुद्याची दखल घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागास वर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे

मु.शी.: राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व भटक्या व विमुक्त जाती व इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ वेळेत न मिळणे या विषयावर सर्वश्री. सुभाष चव्हाण, हेमंत टकले, भाई जगताप, विनायक मेटे, उल्हास पवार, रमेश शेंडगे, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे,राजन तेली, सतीश चव्हाण, मोहन जोशी, किरण पावसकर, प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री एम.एम.शेख, एस.क्यू.जमा, ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे चालू)

तालिका सभापती : आता माननीय मंत्री महोदयांनी या प्रस्तावावरील उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये अतिशय चांगल्या विषयावर या ठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावारील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांच्यासह सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे, सर्वश्री जयंत प्र. पाटील, भगवानराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, प्रा. दिलीपराव सोनावणे, सर्वश्री कपिल पाटील, भाई जगताप, रमेश शेंडगे, प्रा. सुरेश नवले, श्री. विक्रम काळे, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण भाषणे केलेली आहेत, चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्याचप्रमाणे काही टीकाही करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा विषय सुध्दा अतिशय मुलभूत आहे. पिढ्यान पिढ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे .....

दबलेली जी माणसे आहेत, जी मागासवर्गीय माणसे आहेत, ज्यांची सावलीही एकमेकांना चालत नाही अशा या समाजाचे उत्थान करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राने काय केले याबाबत बरीचशी पार्श्वभूमी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी मांडलेली आहे. हे वर्ष स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे आणि त्या मुहूर्तावर अशा प्रकारची चर्चा अतिशय उपयुक्त आहे. मी सांगेन की, महाराष्ट्र राज्य हे खरोखरच खूप मोठे आहे. त्याचे एक उदाहरण मी आपल्याला देईन. 2006 मध्ये नियोजन आयोगाने देशातील सर्व राज्यांना सूचना केल्या होत्या की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीची जेवढी लोकसंख्या असेल त्या प्रमाणात आपल्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी. त्या टक्केवारीप्रमाणे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. त्याबद्दल मला खूप अभिमान वाटतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी असे म्हटले होते की, या विभागाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. हा विभाग दुर्लक्षित आहे म्हणूनच शासनाने विशेष लक्ष दिलेले आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा शासनाला लाभलेला आहे. त्यांच्याकडून शासनाला स्फूर्ती मिळाली असल्यामुळे हे शासन चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत आहे. हे सभागृह गुरुजींचे प्रतिनिधीत्व करणारे आहे असे मला वाटते. त्यामुळे शिक्षण या विषयावर बहुतेक सन्माननीय सदस्यांनी भर दिलेला आहे. सामाजिक न्याय विभागाने 30-35 टक्के बजेट शिक्षण या विषयावर खर्च करण्याकडे लक्ष केंद्रित केलेले आहे. या विभागामार्फत या वर्गातील मुलांना राज्यात मोफत शिक्षण दिले जाते. परंतु मागासवर्गीय मुलांना परदेशामध्ये शिक्षणासाठी जाण्याची संधी सुध्दा उपलब्ध करुन दिली जाते. पूर्वी 25 विद्यार्थ्यांसाठी तरतूद होती. आता ही संख्या 50 पर्यंत वाढविलेली आहे. त्यासाठी 10 कोटींची तरतूद केलेली आहे.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राज्यात सुरु आहे. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरु आहे. आयटीआयमध्ये या वर्गातील मुलांनी प्रवेश घ्यावा यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नाशिक, अमरावती व नागपूर येथे विशेष आयटीआयच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. ते काम सुध्दा सुरु झालेले आहे. लातूर व औरंगाबाद येथे विशेष आयटीआयच्या इमारतींचे बांधकाम चालू होईल. तेथे 12 व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत. त्यासाठी आवश्यक तेवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

शासकीय वसतिगृहांसाठी खूप खर्च येतो. देशामध्ये फार कमी राज्यांमध्ये वसतिगृहे चालविण्याचे काम केले जात असेल. पूर्वी या राज्यामध्ये शासकीय वसतिगृहांची संख्या 271 इतकी होती. मागील 3 वर्षापूर्वी शासनाने 100 शासकीय वसतिगृहे चालू करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु ही कामे चालू होत नव्हती. त्याचे कारण असे की, इमारतीचे बांधकाम सुरु होत नव्हते. परंतु शासनाने असा निर्णय घेतला की, वसतिगृहाची इमारत उभी राहो की न राहो, परंतु राज्यात 100 वसतिगृहे सुरु करण्यात येतील. या वर्षी शासनाने 100 वसतिगृहे सुरु केलेली आहेत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.शिवाजीराव मोघे....

हे सांगण्यास मला अतिशय आनंद होत आहे. राज्यातील वसतिगृहांची एकूण संख्या 2,800 असून त्यामध्ये 1 लाख 36 हजार 517 मुले शिक्षण घेत आहेत. तेथे त्या मुलांची जेवणाची, राहण्याची व पुस्तकांची, गणवेशाची व्यवस्था केली जाते. पूर्वी सोयी सुविधा दिल्या जात होत्या त्यामध्ये तालुका स्तरावरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना महिन्याला 50 रुपये दिले जात होते. आता 250 रुपये दिले जातात. जिल्हा स्तरावरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना 50 रुपये दिले जात होते त्यात वाढ करुन ही रक्कम 500 रुपये करण्यात आली आहे. विभागीय स्तरावरील विद्यार्थ्यांना 500 रुपयांऐवजी 800 रुपये देण्यात येतात. विद्यार्थीनींसाठी 100 रुपये अतिरिक्त दिले जातात.

सभापती महोदय, या राज्याचे मुख्य सचिव वसतिगृहात शिकलेले आहेत. मी आणि सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावित हे देखील वसतिगृहात शिकून पुढे आलेले आहेत. कारण ग्रामीण भागामध्ये प्राथमिक शिक्षणाची सोय फक्त 7 वी पर्यंत, 10 वी पर्यंत असते. आमचे काका किंवा मामा वसतिगृहामध्ये राहून शिकलेले आहेत. शहरामध्ये आमचे कोणीही नव्हते. त्यामुळे आम्हाला या वसतिगृहांचा आधार होता.

सभापती महोदय, आश्रमशाळांच्या बाबतीत सांगेन की, विमुक्त भटक्या जातीच्या लोकांना कोठेच स्थान नव्हते. कै.वसंतराव नाईक यांच्या काळापासून या वर्गातील मुलांसाठी शासनाने काय केले असे विचारले होते. या शासनाने या वर्गातील मुलांसाठी वसतिगृहांबरोबरच आश्रमशाळा सुध्दा सुरु केल्या आहेत. या राज्यात विमुक्त भटक्या जमातींच्या 973 आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये 2 लाख 54 हजार 895 मुले निवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. या मुलांची जेवणाची, राहण्याची, पुस्तकांची, गणवेशाची व्यवस्था केली जाते. सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडत असताना असे सांगितले की, शासनाने प्रथम या वर्गातील मुलांची शिक्षणाची सोय केली पाहिजे. अनुसूचित जातीतील मुलांसाठी अनुदानित वसतिगृहांची संख्या फक्त 16 इतकी आहे. परंतु शासनाच्या 100 निवासी शाळा आहेत. याबाबत शासनाने निर्णय घेतला होता.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधित प्रत / शिघ्रलेखासाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

हा निर्णय शासनाने तीन वर्षापूर्वी घेतला परंतु स्टाफ नव्हता म्हणून त्याची अंमलबजावणी होत नव्हती. या संदर्भात आम्ही माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि 1900 पदे मंजूर करुन घेतली. 57 ठिकाणी इमारती पूर्ण झालेल्या असून 57 ठिकाणी अनुसूचित जातीच्या शाळा आम्ही सुरु केलेल्या आहेत. या प्रमाणे आम्ही शिक्षणावर भर दिलेला आहे.

सभापती महोदय, अपंग शाळांच्या बाबतीत एक महत्वपूर्ण असा निर्णय घेण्यात आलेला आहे. ज्याच्या बद्दल सहानुभूती आहे, निसर्ग ज्याच्यावर नाराज आहे त्याला सहका-र्य करण्याचे काम केलेले आहे. देशामध्ये कुठेही झाले नाही असे काम शासनाने केलेले आहे. अपंगासाठी राज्यामध्ये 737 शाळा आणि कार्यशाळा आहेत. तसेच व्हॉलेण्टीअर एजन्सीचे काम देखील राज्यामध्ये खूप चांगले आहे. अनुदान न मिळणा-या 980 संस्था आहेत. अपंगाच्या एकूण 1738 कार्यशाळा, कर्मशाळा आणि अंधशाळा राज्यामध्ये सुरु आहेत. 2002 पूर्वी ज्यांनी परवाने घेतले आहेत अशा 138 शाळा आहेत. या शाळा अनुदानावर आणण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असून एका महिन्यामध्ये त्या शाळा अनुदानावर येतील असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, माणसाला रहायला घर असणे ही मूलभूत गरज आहे. देश स्वतंत्र होऊन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन देखील गरीब माणसाला रहायला घर नाही यापेक्षा वाईट गोष्ट कोणती असू शकते. इंदिरा आवास नावाची घरकुल योजना आहे. दारिद्र्य रेषेखालील माणसाला मग तो कोणत्याही जाती जमातीचा अगर धर्माचा असो त्याला रहाण्यासाठी घरकुल दिले जाते. डीआरडीए मार्फत ही घरकुल योजना राबविली जाते. लाभार्थ्यांना घरकुलाचे पैसे दिले जातात आणि लाभार्थी चांगल्या प्रकारची घरे बांधतात. 2008-09 मध्ये 10 लाख घरकुलांचे उद्दिष्ट ठरलेले होते. या घरकुल योजनेसाठी केन्द्र आणि राज्य शासनाचा निधी मर्यादित असतो. म्हणून सामाजिक न्याय विभागाने या घरकुल योजनेसाठी तरतूद केली. ग्रामीण भागामध्ये 68,500चे टारगेट होते. नगरपालिकेमध्ये 15000 हजार आणि महानगरपालिकेमध्ये 500 टारगेट होते. मागच्या वेळी आम्ही ग्रामीण भागामध्ये 49000 घरे बांधलेली आहेत. यावर्षी 1 लाख 45हजार 955 घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. त्यासाठी 800 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. गरीब माणसाला रहाण्यासाठी घर मिळावे हा एकमेव उद्देश आहे. घरासाठी 70 हजार रु.ची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये लाभार्थी स्वत:चे 25-30 हजार रुपये टाकून चांगले घर बांधतात. पिढ्यान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे....

पिढया दबलेल्या, पिचलेल्या माणसाला न्याय मिळावा या दृष्टीने हे शासन काम करीत आहे. डीआरडीएवर या कामाचा अधिक ताण पडतो म्हणून आमच्या विभागाने तात्पुरत्या स्वरुपात 114 कनिष्ठ अभियंते त्या यंत्रणेकडे देऊन घरकुल योजनेला गती देण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीय महामंडळाच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपली मते मांडली. मागासवर्गीयांसाठीची 5 आणि 1 अपंगासाठीचे अशी 6 महामंडळे आहेत. या महामंडळांना भागभांडवल अतिशय कमी मिळत होते. या संदर्भात काही लोकप्रतिनिधींच्या समवेत माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली होती. त्यावेळी अन्य मार्गाने महामंडळासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती. याला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी संमती दिली आणि मुख्यमंत्र्यांनी ती बाब कन्फर्म केली. आज परिस्थिती अशी आहे की, महात्मा फुले विकास महामंडळासाठी 2011-12मध्ये 136 कोटी देण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाला 68 कोटी देण्यात आले.

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

संत रोहिदास चर्म उद्योग विकास महामंडळाला पूर्वी 10 कोटी रुपये दिले जायचे, आता 68 कोटी रुपये दिले. वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती विकास महामंडळाला पूर्वी 9 कोटी रुपये दिले जायचे, आता 17.83 कोटी रुपये दिले. ओबीसी विकास महामंडळाला 7 कोटी रुपये दिले जायचे, आता 44 कोटी रुपये दिले आहेत. या महामंडळाकडून तरुण पिढीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी सहाय्य दिले जाते. या महामंडळांना आम्ही कर्जाची मर्यादा वाढवावी असे सांगितले आहे. त्याचबरोबर कर्ज वसुलीचे प्रमाण सुध्दा वाढविले पाहिजे. पोस्ट डेटेड चेक पध्दत सुरु केली तर कर्ज वसुलीचे प्रमाण निश्चितपणे वाढू शकेल. मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाचा कारभार माझ्याकडे होता, त्या कालखंडात आम्ही 99 टक्के कर्जाची वसुली केली होती.

सभापती महोदय, या सभागृहात जे मुद्दे उपस्थित केले त्या मुद्यांचे स्पष्टीकरण देत असताना ज्या नवीन गोष्टी शासनाने केलेल्या आहेत त्या देखील सभागृहाच्या निदर्शनास आणणे महत्वाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार गेली चार वर्षे वितरित केले नव्हते. मागील वर्षी पूर्वीच्या तीनही वर्षांचे पुरस्कार वितरित केले असून 2012 मध्ये याच महिन्यात 14 तारखेला दलित मित्र पुरस्काराचे वितरण करण्याबरोबरच या पुरस्काराच्या मानधनामध्ये 10 हजारावरुन 15 हजार रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो. अनेक मान्यवरांनी या पुरस्काराचे नाव बदलण्याची मागणी केली होती. शासनाने आता या पुरस्काराचे नाव बदलण्याचा निर्णय घेतला असून तसा शासनाचा जी.आर.देखील काढण्यात आला आहे. यापुढे या पुरस्काराला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर भूषण पुरस्कार" या नावाने संबोधले जाणार आहे. या शासनामध्ये सर्वात जूने समाजकल्याण खाते आहे. या खात्यांतर्गत असलेल्या समाजकल्याण संचालनालयाचे प्रमुख हे संचालक होते. यापुढे या पदाची दर्जावाढ करुन संचालनालयाऐवजी आयुक्तालय केले असून यापुढे आयुक्त हे या विभागाचे प्रमुख असणार आहेत.

सभापती महोदय, दलित वस्त्यांबाबत तीन वर्षापूर्वी निर्णय झाला होता की, एका गावामध्ये 10 लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे काम करता येणार नाही. त्यामुळे 2 लाख रुपयांच्या वरील किंमतीचे काम केले जात नव्हते. नाल्याचे काम वगळता मोठे काम होत नव्हते. शासनाने आता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. दलित वस्तीमध्ये 10 ऐवजी 20 लाख रुपयांची मर्यादा घालून दिली आहे. आता 2 लाख नव्हे तर 7 लाख रुपये खर्चाची नळ पाणी पुरवठा योजना, समाज मंदिर अशी कामे घेता येऊ शकतील. हा महत्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सभापती महोदय, घरकुलाची एक योजना समाजकल्याण विभागामार्फत राबविली जाते. इंदिरा आवास योजना ही केंद्र शासनाच्या अर्थसहाय्यावर राबविली जाते. परंतु विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या घरकूल योजनेला कोणतेही नाव नव्हते. म्हणून शासनाने या घरकूल योजनेला "रमाई घरकूल योजना" असे नाव दिले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र देणाऱ्या कार्यालयामध्ये जे जे कर्मचारी काम करतात त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी अशी मागणी केली आहे. जरुर तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यांची एक मागणी मी अमान्य करतो. त्यांनी या समितीचे अध्यक्ष हे माजी न्यायाधीश असावेत अशी सूचना केली आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, सिनियर ग्रेडचे ॲडिशनल कलेक्टर अध्यक्ष म्हणून नेमण्यात यावेत. ते आम्ही करीत आहोत. कास्ट व्हॅलिडिटी ऑनलाईन करावी असे सुचविण्यात आले आहे. शासनाने या दृष्टीने पावले उचलली असून पुढील दोन महिन्यात काम दिले जाऊन ऑनलाईन व्यवस्था होणार आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती जमातीच्या मुला-मुलींसाठी तालुका निवासी शाळा पूर्वी 100 सु रु केल्या होत्या, परंतु त्या सुरु होत नव्हत्या. त्यातील 57 शाळा सुरु केलेल्या आहेत. ई-स्कॉलरशीपबाबत खूप टीका करण्यात आली. ई-स्कॉलरशीपचा फायदा 25 टक्के कॉलेजमधील मुले घेत होती. परंतु विद्यार्थी स्कॉलरशीपचे पैसे घ्यायला गेला की, फर्निचरसाठी पैसे द्या, इमारतीसाठी पैसे द्या अशी मागणी केली जायची.

नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे .....

पैसे द्यावयाचे शेवटी काय करणार असा प्रश्न निर्माण होतो. पण 25 टक्के लोक जेव्हा त्यांचा धनादेश घेण्यासाठी जातात तेव्हा त्यांना तो तात्काळ मिळत नाही, तसेच एक दोन फेरी केल्यानंतर व काही तरी दिल्यानंतरच मिळतो अशी परिस्थिती होती. म्हणून स्कॉलरशीपचे पैसे डायरेक्टली खात्यावर टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला व त्यातूनच ई-स्कॉलरशीप योजना सुरु केली. आज जवळपास 15 लाख मुलांनी स्कॉलरशीपसाठी अर्ज केला व राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडले. पुढील वर्षापासून ही योजना अमलात येणार असून आर्ट्स व कॉमर्स या शाखांमध्ये ॲडमिशन घेतील तसतसे त्यांना प्रत्येक महिन्यात स्कॉलरशीपची रक्कम देण्याचा विचार शासनाने केला आहे. त्याचप्रमाणे इंजिनिअरिंग व मेडिकलच्या बाबतीत सुध्दा अशीच परिस्थिती आहे. या ॲडमिशन्स सप्टेबरपर्यंत चालतात. एकदा ॲडमिशन झाली की त्यानंतरच्या महिन्यापासून दर महिन्याला ही रक्कम अकाऊंटवर जमा करण्यात येईल असा निर्णय शासनाने घेतला. त्याचप्रमाणे हे फॉर्म्स भरुन घेण्यासाठी आम्हाला कॉलेजकडून सहकार्य मिळत नव्हते म्हणून कोणत्याही कर्मचाऱ्याने फॉर्म भरुन दिला तरी त्याला 5 रुपये देण्याचा निर्णय घेतला व तसे अनेक लोकांना पैसे सुध्दा दिले आहेत.

महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, खाते उघडण्यासाठी खर्च येतो पण हा खर्च संपूर्ण आयुष्यात एकदाच येणार आहे, कारण त्याचे पूर्ण शिक्षण होईपर्यंत तेच खाते कायम राहणार आहे अशीही व्यवस्था शासनाने केली आहे.

महोदय, संपर्ण देशात आपले राज्य हे पहिलेच राज्य असेल की, ज्या राज्याने ॲट्रासिटी कायद्यानुसार ज्या केसेस होतात त्यांचा निपटारा लवकर व्हावा म्हणून 6 स्वतंत्र न्यायालयाची स्थापना केली असून त्या माध्यमातून या केसेसच्या यशस्वीतेचे प्रमाण वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या या केसेस फक्त 2 टक्केच यशस्वी होत होत्या. त्याचे कारण असेही सांगितले जाते की, आपल्या राज्यातील लोक कायम भांडणे करीत बसत नाहीत. एकदा भांडण झाल्यानंतर पुन्हा तो मुद्दा अथवा तो वाद विसरुन जातात म्हणून हे प्रमाण कमी असावे.

त्यानंतर आपल्या शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी एक उपयुक्त असे धोरण आखले असून त्यानुसार ओपन स्पेस, आरोग्याच्या सुविधा, कोर्टाच्या कामासाठी विधि व न्याय विभागाचे सहकार्य करणे, हॉस्पिटलसाठी प्राधान्य अशा वेगवेगळ्या गोष्टींचा त्यात समावेश आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

महोदय, जात पडताळणीच्या बाबतीत श्रीमती माधुरी पाटील विरुध्द महाराष्ट्र राज्य या केसच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की जात पडताळणी झालीच पाहिजे, कारण मौल्यवान नोकऱ्या, प्रमोशन्स तसेच आर्थिक सवलती इ. चा समावेश असतो म्हणून ही पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या राज्यात कोर्टाच्या निदेशानुसार नायब तहसीलदाराकडून जात प्रमाणपत्र अगोदर दिले जात होते त्याऐवजी वरिष्ठ उप जिल्हाधिकारी यांच्याकडून दिले जाते. तसेच जात पडताळणीसाठी राज्यात पूर्वी फक्त 15 समित्या होत्या पण आपण त्यात आता वाढ केलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जेवढया निवडणुका होतील त्यांच्या जात पडताळणी प्रमाण पत्राचे काम जिल्हाधिकाऱ्यांची कमिटी करीत असते. खरे म्हणजे आम्हाला अधिकारीच उपलब्ध होत नाहीत. अधिकारी कधी सुट्टीवर जातात तर कधी त्यांचे प्रमोशन होते त्यामुळे अधिकारी मिळत नसल्यामुळे अनेक वेळा प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात पूर्वी 15 समित्या होत्या परंतु आता त्या संदर्भात 34 समित्या करण्यात आलेल्या आहेत. परंतु ऑनलाईन करुन जातपडताळणी प्रमाणपत्राचे काम पूर्ण करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विमुक्त जाती व भटक्या जमातीचे लोक नेहमी स्थलांतरित होत असतात त्यामुळे त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे रेकॉर्ड नसते असे सांगितले आहे. घिसाडी समाज हा नेहमी पालामध्येच राहत असतो. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांसाठी अगोदर जे नियम करण्यात आले होते ते नियम आपल्याला बदलवता येणार नाहीत. परंतु यासंदर्भात आम्ही एसडीओ यांना, या लोकांच्या संदर्भात कँप घेऊन लोकांसमोर ते व्हेरीफाय करुन दुर्लक्षित माणसाला प्रमाणपत्र देण्याचे काम करा असे सांगितले आहे.

सभापती महोदय, आदिवासींना सुध्दा अनेक ठिकाणी अशाच प्रकारे जात पडताळणी प्रमाण पत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. प्रिमिटीव्ह ट्राईब्जचे देखील काम झालेले आहे.

सभापती महोदय, मागच्या वर्षी 4.5 लक्ष लोकांना जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्यामुळे काम होत नाही असे नाही परंतु प्रत्येक माणसाला तो नियमात बसत नसला तरी त्याला सर्टिफिकेट पाहिजे असते. परंतु असे सर्टिफिकेट दिले गेले तर गोंधळच गोंधळ होईल. नियमाने जे काही करावयाचे असते त्याला थोडा वेळच लागत असतो. परंतु आमचे अधिकारी बदमाशी करीत नाहीत असे नाही तर खालच्या लेव्हललाही थोडी बदमाशी केली जात असते. यामुळे जनतेला त्रास होतो याची मला माहिती आहे. मागासवर्गीय जनतेचा त्रास कमी कसा होईल यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु. कोणता अधिकारी किंवा कर्मचारी सर्टिफिकेट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

देण्याच्या संदर्भात त्रास देत असेल किंवा तसे ते प्रुव्ह झाले तर संबंधितांना शिक्षा केल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही. माझ्या भाषणात जो बदमाशी शब्द उच्चारला गेला आहे त्याच्या ऐवजी "अयोग्य" शब्द वापरण्यात यावा.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र सरकार मोठे का आहे याचे कारण मी आपल्याला सांगणार आहे. गरीब मागणसाला रहाण्यासाठी घर नसायचे, जमीन नसायची त्यामुळे या राज्यात गरीब व भूमिहीन माणसाला स्वत:च्या मालकीची जमीन मिळवून देण्याचे काम करण्यात आलेले आहे. यासाठी सरकारने 9-10 लॅन्ड रिफॉर्म केले, सिलिंगचा कायदा केला,भूदान चळवळीमुळे जमिनी मिळाल्या, कुळ कायद्यामुळे जमिनी मोठ्या प्रमाणात मिळाल्या व या जमिनी ज्यांना जमीन नव्हत्या अशा गरिबांना दिल्या गेल्या.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, भूदान चळवळीतील जमिनीचे काय झालेले आहे याची माहिती मंत्रीमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवली तर बरे होईल.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, भूदान चळवळीमध्ये जी काही जमीन मिळालेली आहे व जी काही जमीन दुस-यांना दिली गेली त्याचे रेकॉर्ड शासनाकडे आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये पंडित जवाहरलाल नेहरु आले होते त्यावेळेस भूदान चळवळीमध्ये 1 लाख एकर जमीन दान देण्यात आली होती. हे सर्व काम कॉंग्रेसनेच केलेले आहे.

सभापती महोदय, कॉन्झर्व्हेटीव्ह ॲक्ट 1980 मध्ये करण्यात आला होता. यामध्ये एक एकर जमीन जरी कोणत्या कामासाठी वापरावयाची असेल तर त्यासाठी केंद्रशासनाची परवानगी लागत होती. परंतु श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील माननीय पंतप्रधांनानी सन 2005 रोजी कॉन्झ र्व्हेटीव्ह ॲक्टमध्ये तरतूद केली व भूमिहीन माणसाने 2005 पूर्वी अतिक्रमण केले असेल तर त्या अतिक्रमणालाही रेग्युलराईज्ड करण्यात आले हे महाराष्ट्रातच नाही तर देशामध्ये झालेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सभागृहाची वेळ 6.45 पर्यंत वाढविण्यात आली होती. सभागृहाच्या अनुमतीने सदर चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, श्री.सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी असे म्हटले की, सरकारी जमीन मी कुठून देऊ. तेव्हा मी म्हणालो की, आपण काही तरी करावे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या सारखे सल्ला देणारे कोणी तरी असतील. ते म्हणाले की, जमीन विकत घेऊन द्यावी. तेव्हा त्यांच्या काळात दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजना आणली. एस.सी., एस.टी.साठी जमीन विकत घेऊन त्यांना देण्याचे काम या राज्यात झाले आहे. ती योजना आम्ही व्हीजेएनटीसाठी लागू करणार आहे. फक्त पैसा मिळवून देण्याकरिता आपण सर्वांनी मदत करावी. जमिनीच्या किंमती वाढल्यामुळे या योजनेची मागच्या वर्षी अंमलबजावणी झालेली नाही. रेडीरेक्नरच्या 20 टक्के भाव आपण जमिनी द्याव्या असे आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले होते. तरी पण त्यांना जमीन मिळत नाही. आता आम्ही सांगितले आहे की, भाव डबल केला तरी हरकत नाही. पण मर्यादा तीन लाखाच्या वर नको असे सांगितले आहे. याची पुढच्या काळात अंमलबजावणी होईल अशा प्रकारचा मला विश्वास आहे. याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय झालेला आहे.

काही काही लोकांचा गैरसमज आहे. धर्मांतर झाले असेल तर त्यांना फायदा मिळत नाही. ही चुकीची समजूत आहे. सुप्रीम कोर्टाचा आदेश महत्त्वाचा आहे. जन्माने कोण आहे ते पहावे. कुठल्या धर्मात गेला हे महत्त्वाचे नाही. त्याला देखील सवलती मिळतात हे देखील मी सांगू इच्छितो.

आता अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 52 टक्के ओबीसी आहेत. सवलती मात्र 27 टक्के आहेत. 50 टक्क्याच्यावर आरक्षण देऊ नये असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. कॅलक्युलेशनमध्ये 27 टक्के असल्यामुळे त्याच्यावर जाता येत नाही. 52 टक्के संख्या देखील अंदाजे आहे. सर्व्हेमध्ये हे सविस्तर दिसून येईल. त्यानंतर जे काही व्हायचे ते होईल.

यानंतर अनुशेषाचा प्रश्न आहे. मध्यंतरी वित्त विभागाने परिपत्रक काढले होते. परंतु, आता मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्याचा निर्णय झाला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यासाठी आम्ही विशेष मोहीम राबवू. विशेष मोहीमेद्वारे अनुशेष भरण्याचे काम पुढच्या काळामध्ये केले जाईल. ते झाल्याशिवाय राहणार नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांनी आयटीआयला विद्यावेतन कमी आहे असा प्रश्न उपस्थित केला आहे. ते वाढविण्याचे आमच्याकडून राहीले होते. या संबंधी बसून, चर्चा करून सदर वेतनवाढ डबल करण्याचा प्रयत्न करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

बीपीएल धारकांना आपण घर देतो. ग्राम विकास विभागाने बीपीएल धारकांची यादी मागविली आहे व त्यांना गुण दिले आहेत. ती यादी आमसभेमध्ये पास केली जाते. काही ठिकाणी 50 जणांची यादी पाठविली आहे, काही ठिकाणी 25 जणांची यादी पाठविली आहे. काही जणानी राजकारण करून आपल्या ओळखीच्याच लोकांची यादी पाठवून दिली आहे. आता आम्ही असा निर्णय घेतला आहे की, जो कोणी बीपीएल धारक असेल व ज्याच्याकडे पक्के घर नसेल तर व तो त्या यादीमध्ये असो वा नसो अनुसूचित जातीच्या माणसाला आम्ही घर देणार आहोत. हा निर्णय इतर विभागांना लागू करण्यासंबंधीचे प्रयत्न सुरू होणार आहेत.

आमच्याकडे व्हीजेएनटीच्या एक हजार आश्रमशाळा आहेत. 100 अनुसूचित जातीसाठी आश्रमशाळा आहेत. यावर कोणाचे नियंत्रण आहे ? समाजकल्याण विभागाचा शिक्षणामध्ये तसा काही संबंध येत नाही म्हणून स्वतंत्र यंत्रणा उभी करणार आहोत. स्वतंत्र संचालनालय उभे करणार आहोत. स्वतंत्र आयुक्तालय करणार आहोत. त्या दृष्टीने आमचे प्रामाणिक प्रयत्न राहणार आहेत. मुलांना नुसते खाऊ-पिऊ घालून चालणार नाही. त्यांची गुणवत्ता वाढविली पाहिजे. सभागृहातील शिक्षक सदस्य अशा मुलांना नुसते शिक्षण देऊ नका असे म्हणत आहेत. त्यांना गुण किती मिळाले हे महत्त्वाचे नाही. त्याचा सर्वांगीण विकास कसा होईल हे पाहावे अशी सूचना सदनातील सदस्य करीत आहेत. यासाठी या मुलांना मार्गदर्शन मिळाले पाहिजे. पण आमच्याकडे सुपरव्हिजनचा अभाव आहे. आमचा समाजकल्याण अधिकारी या मुलांना काय समजावून सांगणार ? त्यामुळे या पुढच्या काळात आम्ही स्वतंत्र यंत्रणा उभे करण्याचे काम करण्याचा प्रयत्न करू.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेली सूचना योग्य आहे. काही सन्माननीय सदस्यांच्या डोक्यात तशी कल्पना असते.

यानंतर श्री.सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे....

माझ्या डोक्यामध्ये असा समज आहे की, ते आम्हाला कमी समजतात काय? ते आम्हाला कमी समजत नाहीत. याचे कारण प्लॅनिंग कमिशनच्या मिटींगला माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री जातात. यानंतर आदिवासी खात्याचा मंत्री आणि सामाजिक न्याय खात्याचा मंत्री देखील प्लॅनिंग कमिशनच्या मिटींगला जाईल असे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी आम्हाला सांगितले आहे. इतकेच नव्हेतर ते आम्हाला त्या मिटींगला घेऊन गेले आहेत. या ठिकाणी पिढयान् पिढया शोषित असलेल्या समाजाचे अधिक शोषण होऊ नये अशी त्या मागील शासनाची भूमिका आहे. त्याकरिता एका स्ट्रोकमध्ये 1900 कर्मचारी माझ्या खात्यासाठी देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे, ही आमच्या खात्याला प्रतिष्ठा देणारी बाब आहे. माझ्या खात्याकडे जे काम आहे त्यासाठी त्यांनी हे एकप्रकारचे हत्यार दिले असल्याचे मी समजतो. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हेंना सांगू इच्छितो की, हे सुध्दा अतिशय महत्वाचे काम आहे. हे काम जर चुकीच्या पध्दतीने झाले तर त्यामधून अनेक प्रश्न निर्माण होतात. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी मला ते काम दिले असेल असे मला वाटते.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय सदस्यांकडून ज्या सूचना मांडल्या जातात त्या माझ्या अंत:करणाला भीडतात. या समाजाचे कल्याण करीत असतांना अनेक अडचणी भेडसावतात, त्या अडचणी सोडवून जास्तीत जास्त काम करण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. सभापती महोदय, समाज कल्याण खात्याच्या प्रश्नावर कुणीतरी बोलावे असे नाही. या प्रस्तावावर माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी महत्वाचे विषय मांडले त्याचप्रमाणे अनेक माननीय सदस्यांनी महत्वाचे विचार मांडले. या समाजामध्ये पिढयान् पिढया दुर्लक्षित राहिलेली माणसे आहेत त्यांना न्याय मिळाला पाहिजेत या दृष्टीकोनातून सर्व माननीय सदस्यांनी या ठरावाच्या चर्चेमध्ये भाग घेतला. त्याबद्दल सर्व माननीय सदस्यांना धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी अतिशय महत्वाचे व मनापासून उत्तर दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. माझी या निमित्ताने लहानशी सूचना आहे. आपण दलित मित्रऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण अशाप्रकारे पुरस्काराच्या नावामध्ये बदल केला. माझी अशी सूचना आहे की, दलितांची सेवा करणारे दलितांचे नेते असतील, त्यांना आपण जरुर पुरस्कार द्यावा परंतु जे दलितेतर असतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. उल्हास पवार....

त्यांना देखील पुरस्कार दिला गेला पाहिजे. आपला उद्देश असा आहे की, दलितेतर लोक दलितांची, आदिवासींची सेवा करतात त्या संस्थांना आणि व्यक्तींना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. त्याच क्षेत्रातील त्याच व्यक्तीला प्रोत्साहन देण्यास हरकत नाही. परंतु मूळ उद्देश असा आहे की, दलितेतर लोकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या सेवेचे मूल्यमापन झाले पाहिजे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, शासनाने या बाबतीत नियम केलेला नाही. या पुरस्कारामध्ये ब्राम्हण, मुस्लिम सर्व जाती-धर्माच्या लोकांचा समावेश आहे. परंतु हे प्रमाण वाढविले पाहिजे अशी आपली सूचना आहे ती मला मान्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण आणि इतर माननीय सदस्यांनी मांडलेल्या ठरावाच्या निमित्ताने अनेक महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याबद्दल माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण साहेबांना मी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांची शाळेतील गळती थांबविण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती देणे तसेच आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले . मला या बाबतीत सांगितले पाहिजे की, आदिवासी व ग्रामीण भागामधील विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्टया आकर्षित करण्यासाठी आणि त्यांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता 1 ली ते 4 थी मधील विद्यार्थ्यांना 1 हजार रुपये त्याचप्रमाणे इयत्ता 5 वी ते 7 वी मधील विद्यार्थ्यांना 1500 रुपये आणि इयत्ता 8 वी ते 10 वी मधील विद्यार्थ्यांना 2 हजार रुपये एवढी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. म्हणून इयत्ता 8 वी ते 10 वी मधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये रुपये 100 ते 200 इतकी वाढ करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली आहे. 2 हजार रुपये गुणिले दहा महिने केले तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीमध्ये 200 रुपयांची वाढ केलेली आहे. आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले पाहिजे या करिता आदिवासी उप योजनेंतर्गत शिक्षण विकास या शीर्षकाखाली जी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती दिली जाते त्यामध्ये शिक्षण फी असेल, परिक्षा फी असेल, अनुदानित आश्रमशाळेच्या संदर्भात असेल, शासकीय आश्रमशाळेच्या संदर्भात असेल...

(अपूर्ण यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा वसतीगृहाच्या बाबतीत असेल किंवा सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीच्या संबंधात असेल, यामध्ये जवळजवळ 1454.53 कोटी रुपयांची भरीव तरतूद केलेली आहे म्हणजेच मागील वर्षापेक्षा यावर्षी यात जवळजवळ 500 कोटी रुपयांची वाढ केलेली आहे.

कोणत्याही शासकीय आश्रमशाळा असोत किंवा वसतीगृहे असोत, ज्या ठिकाणी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेथील वातावरण जर स्वच्छ नसेल तर त्यांना शिक्षणाची आवड निर्माण होणार नाही आणि त्यासाठी तेथे चांगल्या प्रकारचे वातावरण असावयास पाहिजे. दुर्दैवाने आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून ज्या योजना राबविल्या जातात त्यामध्ये जरुर अशा प्रकारच्या बऱ्याचशा त्रुटी आहेत.परंतु आम्ही या त्रुटी हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.म्हणून यावर्षी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून आदिवासी उप योजनेच्या अंतर्गत जवळजवळ 525 शासकीय आश्रमशाळा आणि त्याच प्रमाणे 471 शासकीय वसतीगृहे सुरु करण्यात आली आहेत. एकंदर 525 आश्रमशाळांपैकी 455 आश्रमशाळांसाठी जमीन प्राप्त झालेली आहे. म्हणून यावर्षी बांधकामासाठी 430 कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. तसेच 2011-2012 या आर्थिक वर्षामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी 1884 कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. याठिकाणी ज्या समाजा- मध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे किंवा ज्या समाजाचा प्रशासकीय यंत्रणेवर विशेष दबदबा आहे, त्या समाजाची चांगल्या प्रकारे प्रगती होत असते.

सभापती महोदय, काही आदिवासी विद्यार्थी देखील पदवीधर आहेत. अशा वेळी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून अमरावती, नागपूर, ठाणे, नाशिक या चार विभागातून यावर्षी 125 विद्यार्थी याप्रमाणे एकूण 500 विद्यार्थ्यांसाठी ज्या नामांकित इन्स्टीट्युट आहेत त्याठिकाणी आय.ए.एस. आणि आय.पी.एस.चे कायम स्वरुपी कोचिंग क्लासेस सुरु करणार आहोत. जेणेकरुन 500 विद्यार्थ्यांपैकी जरी 100 ते 150 विद्यार्थी वर्ग-1 किंवा वर्ग-2 च्या पदांसाठी पास झाले तर निश्चितच ते त्या समाजातील प्रगतीचे द्योतक असेल. त्यामुळे आदिवासी समाजातील जर कोणी तहसीलदार किंवा प्रांत ऑफीसर किंवा एस.पी.लेव्हलचे वा कलेक्टर लेव्हलचे अधिकारी तयार झाले तर निश्चितच त्या समाजामध्ये चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण होईल. तसेच 2007 ते 2008 पर्यंत विदेशामध्ये शिक्षणासाठी जाण्याकरता आतापर्यंत 14 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिलेली आहे आणि त्याची मर्यादा आहे,कारण आदिवासींमध्ये परदेशामध्ये जाणारे जे विद्यार्थी आहेत, त्यांचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित . . . .

आई-वडील हे शिक्षक असतील किंवा वर्ग-1 किंवा वर्ग-2 या संवर्गातील अधिकारी म्हणून काम करीत असतील तर अशाच घरातील विद्यार्थी परदेशामध्ये जात असतात. परंतु यासाठी उत्पन्नाची मर्यादा अडीच लाख रुपये असल्यामुळे बरेचसे विद्यार्थी विदेशामध्ये शिक्षण घेण्यापासून वंचित होत आहेत. त्यामुळे आपण उत्पन्नाची मर्यादा जवळजवळ साडेचार लाखापर्यंत करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सगळयात महत्वाचे म्हणजे बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, आदिवासी विकास विभाग आणि समाजकल्याण विभागातील शिक्षणाच्या योजनांसाठी स्वतंत्र व्यवस्था असावयास पाहिजे. माझा स्वत:चा विश्वास आहे की, जर आदिवासी बांधवांचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल, प्रगती करावयाची असेल तर शिक्षण आणि सिंचन या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. परंतु दुर्दैवाने या गोष्टींकडे पाहिजे तसे लक्ष दिले गेलेले नाही.आतापर्यंत एकूण बजेटच्या नियतव्ययामध्ये जवळजवळ 9 टक्के रक्कम बजेटमध्ये असताना सुध्दा ज्यापध्दतीने त्याचा विनियोग व्हावयास पाहिजे तो दुर्दैवाने होत नाही. परंतु शिक्षणाच्या बाबतीत स्वतंत्रपणे एज्युकेशन संचालक किंवा शिक्षण निरीक्षक किंवा शिक्षण विस्तार अधिकारी आहेत. त्याच धर्तीवर स्वतंत्रपणे आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवत आहोत.कारण आदिवासी विकास विभागाअंतर्गत आदिवासी विकास आयुक्तालय आहे.त्यांनी विकासाची कामे करावयाची की शिक्षणाच्या संबंधातील कामे करावयाची हा प्रश्न आहे.त्यामुळे त्यांना फारसा वेळ मिळत नाही. म्हणून आपण स्वतंत्र खाते निर्माण करीत आहोत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित..

सभापती महोदय, आदिवासी विभागावर नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणांमुळेही टीका होत असते. परंतु काही चांगल्या योजना राबविण्याचा या विभागामार्फत प्रयत्न होत असतो. नंदूरबार आणि गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे स्थलांतर करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. हे स्थलांतर थांबण्यासाठी तसेच त्यांना इतर समाजा बरोबर मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठाणे जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांमार्फत मोगरा आणि हळदीची शेती प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली आहे. त्यास आदिवासींकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जवळपास 80 ते 90 आदिवासी शेतकरी मोगरा आणि हळदीची शेती करुन वर्षाला सुमारे 8 ते 10 लाख रुपये उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांनी इतरांबरोबर आर्थिक स्पर्धा केली पाहिजे त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी एका अनुदानित आश्रमशाळेची मान्यता काढून घेण्यात आली, तेव्हा आश्रमशाळांची कसून तपासणी करण्याची तसेच शासकीय आश्रमशाळांवर काही नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे असा मुद्दा येथे मांडला. ही गोष्ट खरी आहे की, त्या अनुदानित आश्रमशाळा आहेत त्या ठिकाणी अनियमितता आहे किंवा कसे हे आदिवासी विभागाने तपासले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे नेहमी आश्रमशाळां संबंधी येथे प्रश्न उपस्थित करतात. अनुदानित आश्रमशाळांमध्ये बऱ्याच त्रुटी आढळून आल्यामुळे शासनाने 59 आश्रमशाळांची मान्यता रद्द केलेली आहे. आश्रमशाळा नियमातील नियम क्रमांक 2.19 मधील तरतुदीनुसार सदर आश्रमशाळांच्या संस्थाचालकांनी शासनाकडे दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी देखील घेण्यात आलेली आहे. शासनाने एकूण तीन आश्रमशाळांची मान्यता रद्द केलेली आहे तर इतर आश्रमशाळांना सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वेळेवर मिळाले पाहिजे असा मुद्दा उपस्थित केला. आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश आणि शैक्षणिक साहित्य विहित वेळेत उपलब्ध करुन देण्या बाबत संबंधित अधिकाऱ्यांना निश्चितपणे सूचना देण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आदिवासी आश्रमशाळेत मायक्रोन्यूट्रीन टॅबलेट आणि ब्लँकेट खरेदीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्यांनी असे सांगितले की, आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मायक्रोन्यूट्रीन गोळ्यांची आवश्यकता नाही. कारण त्यांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या असताना या गोळ्या का पुरविल्या जातात असा प्रश्न उपस्थित केला. त्या बाबत सांगू इच्छितो की, आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्याची खरेदी जरुर केली पाहिजे. परंतु आदिवासी बांधवांसाठी उपयुक्त नसतील अशा खरेदीवर निश्चितपणे नियंत्रण ठेवले जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांनी धर्मांतर केले असेल तर त्यांना त्या जातीचे फायदे मिळतील काय या संबधी मुद्दा उपस्थित केला. आदिवासी बांधवाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला असेल किंवा दलित बांधवांनी बौध्द धर्म स्वीकारला असेल तर त्याला सवलती मिळतील काय ? त्याबाबत सांगू इच्छितो की, धर्मांतर केल्यानंतर त्याला सोयीसवलती मिळत नाहीत. परंतु एस.सी.असो वा एस.टी.असो त्याला सवलती मिळतात. मग आदिवासी असो वा कोणताही दलित बांधव असो, कोणत्याही जाती धर्मातील असो, त्या समाजाची जात बदलत नाही म्हणून त्यांना त्या सवलती कायम स्वरुपी दिल्या जातील.

सभापती महोदय, येथे नेहमी कास्ट सर्टीफिकेच्या संदर्भातील विषय चर्चिला जातो.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित...

आदिवासी समाज हा जागृत समाज नाही. म्हणून कोणीही यावे आणि आदिवासी बांधवांच्या नावाने सवलती घ्याव्या अशा प्रकारे मोठया प्रमाणात अनुसूचित जमातीच्या नावाने हजारो लोकांनी माझ्या माहिती प्रमाणे सवलती घेतलेल्या आहेत. मी सुध्दा एका शासकीय आश्रम शाळेत शिकलेलो आहे. त्या आश्रमशाळेची व्यथा काय आहे, दशा काय आहे, याची मला बऱ्यापैकी कल्पना आहे. आदिवासी विद्यार्थी संघटनेत काम करत असताना मी आतापर्यंत ज्यांनी आदिवासीचे बोगस प्रमाणपत्र मिळविलेले आहेत, ज्यांनी आदिवासींच्या सवलतीवर अतिक्रमण केलेले आहे, या बाबतीत लढा दिलेला आहे, बऱ्याच वेळा मोठी आंदोलने केलेली आहेत. उठसूठ कोणीही यायचे आणि आदिवासींच्या नावाने प्रमाणपत्र घ्यायचे अशा प्रकारे जवळ जवळ साधारणपणे 1 लाखाच्या आसपास बिगर आदिवासींनी आदिवासींच्या सवलतीवर अतिक्रमण करुन प्रमाणपत्रे मिळविलेली आहेत म्हणून यावर कायम स्वरुपी कंट्रोल असला पाहिजे. त्याला कुठेतरी पायबंद बसला पाहिजे म्हणून मी या ठिकाणी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून जात प्रमाणपत्र समितीला मनापासून धन्यवाद देईन. आता पर्यंत कधी नव्हे एवढी या आर्थिक वर्षात जवळ जवळ 81562 प्रकरणे निकाली काढलेली आहेत,हा सुध्दा एक रेकॉर्ड आहे. आणि म्हणून या ठिकाणी या राज्याच्या मुख्य सचिवांना सुध्दा धन्यवाद देऊ इच्छितो. त्यांनी सुध्दा वेळोवेळी बैठका घेतलेल्या आहेत त्यामुळे त्यांचे सुध्दा आदिवासी विकास विभागाला चांगले सहकार्य मिळालेले आहे. जी प्रकरणे शंकास्पद नसतील, जी खरोखर जेन्युईन असतील अशा प्रकरणांच्या संदर्भात दोन-तीन आठवडयात आदिवासी विकास विभागामार्फत वैधता प्रमाणपत्र दिले जाते. परंतु जी प्रकरणे शंकास्पद आहेत, अशा प्रकरणांच्या बाबतीत पोलीस चौकशी, सुनावणी इत्यादी कामासाठी थोडासा वेळ लागतो. अशी जवळ जवळ 16000 च्या आसपास प्रकरणे प्रलंबित आहेत, ती प्रकरणे लवकरच निकाली काढण्याचा आम्ही प्रयत्न करु.

सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या आठ समित्या आहेत या आठ समित्यांचे बळकटीकरण आणि सक्षमीकरण करण्यासाठी जवळ जवळ 87 नवीन पदांना नुकतीच मंजुरी मिळाली आहे.अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी ऑन लाईन पध्दतीचा वापर करण्याचे विभागाने ठरविले असून त्यासाठी यशदा सरख्या प्रख्यात संस्थेची मदत घेण्यात येत आहे. त्यासाठी जवळ जवळ 68 लाख रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. आदिवासी बांधवांची

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित. . . .

सावकारी कर्जापासून मुक्तता व्हावी आणि खऱ्या अर्थाने ते कर्जमुक्त व्हावेत यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आदिवासी बांधवाना लग्नासाठी साधारणत: 50 हजार ते 1 लाख रुपये खर्च येतो, ते कुठेतरी थांबावे आणि सावकाराच्या पाशातून त्याची मुक्तता व्हावी यासाठी कन्यादान योजनेसाठी जवळ जवळ 20 कोटी रुपये या वर्षी तरतूद करण्यात आलेली आहे.आता पर्यंत कन्यादान योजनेतंर्गत प्रती जोडप्यासाठी 10 हजार रुपये देण्यात येत होते आता 30 हजार रुपये रक्कम देण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. स्वातंत्र्यानंतर सुध्दा अजूनही काही आदिवासी पाडयांमध्ये वीज नाही, त्याचप्रमाणे त्यांना जाण्यासाठी रस्ते नाहीत म्हणून आदिसासी विकास विभागाने विजेच्या संदर्भात जवळ जवळ 20 कोटी रुपयांयी तरतूद केलेली आहे. ठक्करबापा योजनेचा जो कार्यक्रम आहे त्यासाठी 25 लाखावरुन 31.25 एवढी वाढ करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे घरकुलाच्या संदर्भात सन 2011-2012 या वर्षात जवळ जवळ 180.78 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने जो प्रिमिटिव्ह ट्राईब्ज आहे, मग तो कोरकु असेल, आंध समाज असेल, पारधी समाज असेल किंवा वारली समाज असेल ज्याला आपण प्रिमिटिव्ह ट्राईब्ज असे म्हणतो. ज्या ठिकाणी आदिवासी लोकप्रतिनिधी आहेत त्या ठिकाणच्या आदिवासी बांधवांची कामे बऱ्यापैकी होतात.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित .....

परंतु आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या बाहेर म्हणजे ज्याला आपण ओटीएसपी म्हणतो त्या क्षेत्रामध्ये आदिवासी लोकप्रतिनिधी नसल्यामुळे त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले जात नाही. दुसरे लोकप्रतिनिधी काम करीत नाहीत अशातील भाग नाही. ते काम करतात परंतु ज्या पध्दतीने त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यावयास पाहिजे तसे लक्ष नसल्यामुळे त्या ठिकाणी रस्त्याच्या संदर्भात किंवा आदिवासींच्या विकासाच्या संदर्भात ज्या गोष्टी वृद्धिंगत व्हावयास पाहिजे तसे होत नाही. या दृष्टीने पारधी बांधवांसाठी शासनाने 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. विस्ताराच्या संदर्भात सांगावयाचे तर बऱ्याच प्रकल्पाचा विस्तार भौगोलिक दृष्टया बरेच किलोमीटर लांब असल्यामुळे पाच नवीन प्रकल्प कार्यालयांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे 1985 चा जो जी.आर. होता त्यामध्ये समाजकल्याण विभागाच्या धर्तीवर बदल करुन आम्ही विभाग स्तरावर 800 रुपये, जिल्हा स्तरावर 600 रुपये आणि तालुका स्तरावर 500 रुपये याप्रमाणे आहार भत्त्यामध्ये भरीव वाढ केलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनुदानित आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परिपोषणाच्या दरात प्रतिलाभार्थी 630 रुपयांवरुन 900 रुपये अशी भरीव वाढ करण्यात आलेली आहे. आतापर्यंत वाघ हे हिंस्त्र श्वापद असल्यामुळे वाघाने हल्ला केला असेल त्याच माणसाला सानुग्रह अनुदान दिले जात होते. परंतु बऱ्याच आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी सर्पदंशामुळे दगावत होते. त्यांना फक्त 15 हजार रुपये दिले जात होते त्यामध्ये वाढ करुन या वर्षी हे सानुग्रह अनुदान 75 हजार रुपये करण्याचा शासनाचा मानस आहे. त्याचप्रमाणे आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून प्रत्येक आश्रमशाळेत बायोमेट्रिक प्रणाली बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे आदिवासी शेतकरी, आदिवासी कारागीर आणि आदिवासी भूमिहिन शेतमजूर यांची आर्थिक पिळवणूक नाहीशी करण्यासाठी प्रभावी साधन म्हणून आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी विकास महामंडळाच्या माध्यमातून आपण 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या महामंडळांच्या माध्यमातून आदिवासी तरुण-तरुणी यांच्यामध्ये असलेल्या कौशल्यावर आधारित कामांसाठी त्यांना कर्जाच्या स्वरुपात रक्कम दिली जाऊन त्यांच्या आर्थिक प्रगतीच्या बाबतीत यापुढे काम केले जाईल. बऱ्याचदा आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित .....

विकासाच्या ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत त्या दुर्लक्षित केल्या जातात. कोणतेही मंत्री असो किंवा विभाग असो, थोड्याफार चुका जरुर होतात. आदिवासी विकासाच्या संदर्भात ज्या काही त्रुटी असतील त्या कमी करण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना परत एकदा मनापासून धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान (अल्पसंख्याक विकास मंत्री) : सभापती महोदय, विधान परिषद नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्री. भाई जगताप यांनी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या संदर्भात या ठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी अल्पसंख्यांक मायनर विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या शिष्यवृत्तीच्या बाबतीत झिरो बॅलन्स अकाऊंट बँका उघडत नाहीत अशा प्रकारची तक्रार केलेली आहे. त्यांनी दुसरा मुद्दा असा उपस्थित केला की, अल्पसंख्यांक मुलींच्या विकासासाठी बचत गट योजना सुरु करावी. त्यांनी तिसरा मुद्दा महामंडळाच्या नियुक्तीबाबत उपस्थित केला. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या निधीमध्ये वाढ व्हावी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, जेव्हा अल्पसंख्याक विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली आणि ही योजना सुरु केली तेव्हा आमच्याकडे सुध्दा अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत की, मायनर मुलांचे किंवा मुलींचे अकाऊंट ज्या बँकांनी उघडावयास पाहिजेत त्या बँका तशा प्रकारे अकाऊंट उघडत नाहीत. म्हणून तशा प्रकारचे निर्देश संबंधित विभागाला सुध्दा देण्यात आलेले आहेत. सीएलबीसीकडे तशा प्रकारची सूचना सुध्दा दिलेली आहे की,

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान....

मायनर स्टुडण्ट व कुटुंब प्रमुख यांचे जॉईन्ट अकाऊंट उघडून त्या अकाऊंटमध्ये त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. महामंडळावरील नियुक्त्यांचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. महामंडळावरील नियुक्या लवकरात लवकर करण्यात येतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अल्पसंख्याक विकास विभागाच्या बजेटमध्ये वाढ होणे आवश्यक आहे असे म्हटले होते. आपल्याला माहीत आहे की, 2008 सालापासून या राज्यात अल्पसंख्याक विकास विभाग निर्माण करण्यात आले आहे. या विभागासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद केली जाते आणि त्यामध्ये दरवर्षी वाढ देखील केली जात आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी सुध्दा शासनाने या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. या महामंडळाच्या माध्यमातून अनेक योजना राज्यामध्ये सुरु करण्यात आलेल्या आहेत. या महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील बेरोजगार युवकांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी लोन देण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे. हे महामंडळ स्थापन करण्यात आले होते त्यावेळी या महामंडळाला खूपच कमी भागभांडवल देण्यात आले होते. त्यामुळे या महामंडळाला 250 कोटींचे भाग भांडवल देण्याचा निर्णय गेल्याच वर्षी घेण्यात आला होता. आतापर्यंत या महामंडळाला भागभांडवलापोटी 178 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. उर्वरित निधी लवकरच वितरित करण्यात येईल. या महामंडळामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. त्यानुसार 201.25 कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे, त्याचा लाभ 50 हजार 697 लाभार्थ्यांना मिळालेला आहे. या महामंडळाकडून लोकांच्या अपेक्षा खूप आहेत. त्यामुळे जवळपास 30 ते 40 हजार निवेदने महामंडळाकडे प्रलंबित आहेत. या लोकांना लवकरात लवकर व जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या माध्यमातून शासनाने अनेक योजना सुरु केलेल्या आहेत. राज्यातील बेरोजगार युवक व युवतींना स्वावलंबी होण्यासाठी 43 आयटीआय, 8 पॉलिटेक्निक सुरु केलेली आहेत. अल्पसंख्याक समाजाला न्याय मिळावा म्हणून अल्पसंख्याक आयोगाला कायदेशीर दर्जा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी राज्यात वसतिगृहे सुरु करण्याचा मुद्दा मांडला

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान....

होता. शासनाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार आतापर्यंत 14 जिल्ह्यांमध्ये वसतिगृहांसाठी जागेचा शोध घेऊन त्याला मान्यता देण्यामध्ये यश मिळालेले आहे. त्यासाठी निधीची तरतुदी सुध्दा केलेली आहे. त्यामुळे येणा-या काही कालावधीत ही वसतिगृहांचे काम सुरु होईल असा मला विश्वास वाटतो. या वसतिगृहांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजातील मुलींना मदत केल्यासारखे होईल.

सभापती महोदय, राज्यात केंद्र सरकारचा 15 कलमी कार्यक्रम अंमलात यावा यासाठी शासनाने अनेक निर्णय घेतलेले आहेत. या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. तसेच जिल्ह्यांमध्ये समित्या नेमलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावरुन वेगवेगळ्या विभागांमार्फत 15 कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला जातो.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी या वर्षाच्या बजेटमध्ये अल्पसंख्याक समाजासाठी घोषणा केलेली आहे. या समाजासाठी आणखी 2-3 योजना येणाऱ्या काही दिवसात सुरु केल्या जाणार आहेत. अल्पसंख्याक समाजातील ग्रामीण भागातील इयत्ता 8 वीच्या, 9 वीच्या व 10 वीच्या मुलींना सायकलचे वाटप केले जाणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान...

अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद स्तरावर अनेक प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या संदर्भातील योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अल्पसंख्याक वस्त्यांना त्याचा लाभ होणार आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याकाच्या शैक्षणिक संस्थामध्ये पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी अल्पसंख्याक संस्थाना दरवर्षी 2 लाख रुपये निधी दिला जातो. या निर्णयामुळे अल्पसंख्याकाच्या हजारो शाळांना लाभ होत आहे.

अल्पसंख्याक तरुणांना शासकीय सेवेमध्ये तसेच अन्यत्र रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी, एमपीएससी, आपीएस, आयएएस यासारख्या स्पर्धापरीक्षांमध्ये त्यांना चांगले यश मिळण्यासाठी त्यांना ट्रेनिंग देण्यास सुरुवात केलेली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी अल्पसंख्याक समाजातील विविध घटकासंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले त्याबद्दल मी त्यांना न्यवाद देतो. अल्पसंख्याक समाजामध्ये जेवढे घटक येतात, मग ते नवबौध्द असतील, जैन असतील, मुस्लीम असतील, पारसी असतील, ख्रिश्चन असतील त्या सर्वांचा विकास विकास अल्पसंख्याक विकास विभागाकडून होईल असा विश्वास मी सदनाला देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मी मांडलेल्या प्रस्तावाला सामाजिक न्यायमंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी दिलेल्या उत्तराने माझे पूर्णपणे समाधान झालेले आहे. त्यांनी अतिशय क्रांतिकारी अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सन 2003मध्ये श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या काळात मागासवर्गीयांना जमिनी देण्याच्या संदर्भात क्रांतिकारी निर्णय झालेला होता. मागासवर्गीयांना परदेशी शिक्षण घेता यावे म्हणून शासनाने शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. आतापर्यन्त 178 विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. ही मर्यादा वर्षाला 50 पर्यन्त ठेवलेली आहे. यामध्ये वाढ करावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी काही विश्लेषण केले तर बरे होईल.

सन्माननीय अल्पसंख्याक विकास विभागाचे माननीय मंत्री श्री. मोहम्मद आरिफ (नसीम) खान यांनी तसेच आदिवासी विकास राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराने माझे पूर्ण समाधान झालेले आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम.एम.शेख : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे, तसेच आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री श्री. राजेंद्र गावित आणि अल्पसंख्याक विकास विभागाचे मंत्री महोदय श्री. मोहम्मद आरिफ (नसीम) खान यांनी शासन मागासवर्गीयांच्या, आदिवासींच्या आणि अल्पसंख्याकाच्या विकासासाठी कोणकोणत्या योजना राबवित आहे याची माहिती सभागृहासमोर ठेवलेली आहे. या निमित्ताने माझी सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांना विनंती आहे की, अल्पसंख्याक विभागातील समाजाच्या ब-याचशा जाती ह्या समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत येतात. उदा. एसटीमध्ये तडवी पठाण ही जात येते, एससीमध्ये मदारी, मुस्लीम भंगी येतात. ओबीसीमध्ये पिंजारी, तांबोळी येतात. या लोकांना जातीची प्रमाणपत्रे मिळत नाहीत. ब-याच वेळा जातीच्या प्रमाणपत्रासाठी वडिलांच्या आणि आजोबाच्या दाखल्याची मागणी करण्यात येते. या संदर्भात समाजकल्याण विभागामध्ये एक अल्पसंख्याक विभाग सुरु करण्यासंबंधी शासनाने जी.आर.काढलेला आहे. त्यानुसार समाजकल्याण विभागामध्ये जातीचे प्रमाणपत्र देणारा जो विभाग आहे त्याठिकाणी अल्पसंख्याक विभाग सुरु करावा अशी माझी विनंती आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख.....

त्या ठिकाणी अल्पसंख्याक समाजाच्या लोकांना लवकरात लवकर प्रमाणपत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी. अल्पसंख्याक समाजाच्या लोकांना बजेटप्रमाणे सोयी व सवलती देण्यात येत आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. राज्यातील एस.सी.आणि एस.टी.च्या लोकसंख्येप्रमाणे बजेटमध्ये सामाजिक कार्य व आदिवासी विकास विभागासाठी तरतूद केली जाते त्याच धर्तीवर मुस्लीम समाजाची लोकसंख्या विचारात घेता अल्पसंख्याक विकास विभागासाठी केवळ 0.75 टक्के तरतूद बजेटमध्ये केली जात आहे. सच्चर समितीने मुस्लीम लोकसंख्या विचारात घेऊन कमीत कमी 15 टक्के बजेट तरतूद करावी अशी शिफारस केली होती. परंतु शासनाने अल्पसंख्याक विकास विभागासाठी बजेटमध्ये कमीत कमी 5 टक्के तरतूद करावी, अशी मी शासनाला विनंती करतो.

श्री.परशुराम उपरकर : मंत्री महोदयांनी सांगितले की, आश्रमशाळांसाठी 1900 लोकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. कोल्हापूर विभागातील ज्या आश्रमशाळांमध्ये 12 वर्षापासून तात्पुरत्या स्वरुपात नोकरी करीत आहेत त्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यात येईल काय?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी विभागातील आश्रमशाळांच्या संदर्भात राज्यमंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले आहे. त्यांची कामाची पध्दत सकारात्मक आहे. त्यांना विषय चांगल्या पध्दतीने माहिती आहे. आश्रमशाळांच्या वेळेचा विषय अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. ते या मताशी सहमत आहेत. आश्रमशाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी आसपासच्या भागात राहतात. त्यांना येण्याजाण्यासाठी लागणारा वेळ आणि अडचणी विचारात घेऊन वेळ बदलण्याची मागणी वर्षानुवर्षे केली जात आहे तिचा गांभीर्याने विचार करणार आहात काय? माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना प्रश्न आहे. आय.टी.आय.मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन फार कमी प्रमाणात मिळते. समाजकल्याण अधिकारी, ठाणे यांच्याकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मागील तीन वर्षाचे विद्यावेतन मिळालेले नाही. त्यांनी सांगितले की, कुटुंब उत्पन्नाची मर्यादा फक्त 12 हजार रुपये आहे. त्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न 12 हजारपेक्षा जास्त आहे म्हणून विद्यावेतन मिळण्यास ते पात्र नाहीत, हे म्हणणे चुकीचे आहे. हे म्हणणे नियमाच्या विरुध्द आहे. याची चौकशी करण्यात यावी. ठाणे जिल्हयाच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांना सांगून 12 हजार रुपयांपेक्षा उत्पन्न अधिक असले तरी विद्यावेतन मिळण्यास जे विद्यार्थी पात्र आहेत त्या आय.टी.आय.मधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत पुढाकार घेतला जाईल काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वारंवार हा मुद्दा सभागृहात उपस्थित झालेला आहे. प्रश्न असा आहे की, विविध महामंडळांच्या नियुक्त्या कधी होणार आहेत? या संदर्भात उत्तर दिलेले नाही. महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ आणि अन्य सामाजिक आर्थिक विकास महामंडळांच्या नियुक्त्यांबद्दल उत्तर दिले जाईल काय? वसतीगृहांसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणार असे सांगितले गेले आहे. ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण होईपर्यंतच्या काळात प्रत्येक वसतीगृहासाठी मदत, सेवा याबाबतच्या दक्षता समित्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहभागातून करण्याचा विचार करणार आहात काय?

(यानंतर हिंदी भाषण श्री.देवदत्त यांचेकडे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, आज माननीय एन.के. पी.साल्वे साहब की नागपुर में अंत्येष्टि थी तथा मुंबई आते समय हमारी फ्लाइट भी लेट हो गयी. इसीलिए मैं आज सदन में देर से उपस्थित हो सका तथा इस विषय पर मैं बोल नहीं पाया हमारे तीनों ही माननीय मंत्री महोदय ने इस प्रस्ताव पर बहुत अच्छा उत्तर सदन में दिया है. उन्होंने यहां पर इस बारे में शासन की नीति स्पष्ट की है. मैं अल्पसंख्यक विकास मंत्री माननीय नसीम खान जी को बताना चाहूंगा कि अभी तक अलपसंख्यकों के विकास के लिए बजट में कोई रकम स्पेसिफाय नहीं की गयी है. बजट में यह नहीं बताया गया है कि मॉयनारिटी डिपार्टमेंट को कितना फंड मिलेगा. हमने विनती की थी कि कम से कम 5 सौ करोड़ रुपए मिलने चाहिए. इसके अलावा मौलाना आजाद महामंडल का कॉर्पस फंड भी 5 सौ करोड़ रुपए किया जाना चाहिए. वहां पर बहुत सारे अल्पसेंख्यकों के अर्ज अभी पेंडिंग हैं. इस बारे में मैं माननीय मंत्री महोदय का उत्तर जानना चाहता हूं.

मेरा दूसरा प्रश्न यह है कि पिछले वर्ष नागपुर में वित्त राज्यमंत्री महोदय से हमने मांग की थी कि नागपुर में एक इस्लामिक रिसर्च सेंटर बनाया जाये. जिस प्रकार का यह सेंटर दिल्ली में है उसी आधार पर ही यह इस्लॉमिक सेंटर नागपुर में भी बनाया जाये और मंत्री महोदय ने हमारी मांग स्वीकार भी की थी. लेकिन इस बार भी बजट में इस इस्लॉमिक सेंटर के लिए कोई प्रावधान नहीं किया गया है. इन दो प्रश्नों के बारे में हम माननीय मंत्री महोदय का उत्तर चाहते हैं.

(इसके बाद श्री खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी परदेशात शिकण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीत वाढ करावी, अशी मागणी केली आहे त्यानुसार ही वाढ रु.75 लाख पर्यंत करण्यात येईल. तसेच यासाठी निधीची मर्यादा नसते. तसेच मुस्लीम अथवा अन्य धर्मात गेल्यानंतर जातीच्या दाखल्याबाबत शंका व्यक्त केली. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, जन्माने कोणत्या जातीत आहे ते पाहूनच दाखला दिला जातो. तसेच मुस्लीम मध्ये ओबीसी प्रवर्गाचे लोक आहेत पण त्यांना तसे प्रमाणपत्र मिळत नाही त्याचे कारण म्हणजे मुस्लीम मध्ये पोट जात नसते. तसेच त्यातून आणखी बैठक घेऊन यातून मार्ग काढण्यात येईल. पण सरसकट देता येणार नाही म्हणून ओबीसी असलाच पाहिजे याची काळजी घेण्यात येईल. त्यानंतर शासकीय आश्रमशाळांमध्ये रिक्रुटमेंटच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो तपासून घेण्यात येईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारल्यानुसार महामंडळाच्या बाबतीत अनेक ठिकाणी राज्यात अनुशेष असून त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. त्यासाठी विशेष मोहीम घेऊन ही भरती करण्यात येईल. प्रि-मॅट्रिकसाठी आपण शिष्यवृत्ती देत नव्हतो पण चुकून एकदा बृहन्मुंबईमध्ये असे एक प्रकरण झाले होते व ती केस कोर्टात गेली होती. त्यानंतर बीपीएल धारकांना ही प्रि-मॅट्रिकची शिष्यवृत्ती देतो. तसेच सामाजिक न्याय विभागाची तरतूद पूर्ण खर्ची पडत नाही अशी तक्रार करण्यात आली. त्यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, मागील वर्षी 93.61 कोटी इतका खर्च झाला होता आणि यावर्षी 2011-12 मध्ये 98.37 कोटी इतकी रक्कम आपण खर्च केली आहे. अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील निर्णय हा धोरणात्मक निर्णय असल्याने आता त्याची माहिती मला सांगता येणार नाही.

श्री. राजेंद्र गावित : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आदिवासी आश्रमशाळातील वेळेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. शासकीय आश्रमशाळातील कर्मचारी व विद्यार्थ्यांची अनुपस्थिती टाळण्यासाठी आपण आता बायो-मेट्रिक पध्दतीचा अवलंब बऱ्याच ठिकाणी सुरु केला असून पुढील शैक्षणिक सत्रापासून त्यांच्या वेळेत बदल करण्यात येईल.

श्री. नसीम खान : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एम.एन.शेख यांनी अल्पसंख्यांक विभागाच्या बजेटमध्ये वाढ करावी अशी मागणी केली. यासंदर्भात आम्ही प्रभारी मंत्री म्हणून वित्त व नियोजन विभागाकडे तरतूद वाढवून मिळणसाठी प्रयत्नशील आहोतच. तसा प्रस्ताव देखील आम्ही पाठविला होता, त्यासाठी माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर बैठक होऊन चर्चाही झालेली आहे, त्यांनी तसे आश्वासन दिलेले आहे. त्यानुसार ही वाढ करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान .....

सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सन 2012-2013 सालच्या बजेटमध्ये 243 कोटी रुपयांचा आऊटले आलेला असून मौलाना आझाद विकास महामंडळाला काही ठराविक रक्कम देण्याच्या संदर्भात तरतूद उपलब्ध करुन देण्याची प्रोसेस सुरु असून लवकरात लवकर ही तरतूद मौलाना आझाद विकास महामंडळाला उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अल्पसंख्याक समाजाच्या संदर्भात तरतूद करण्याच्या संदर्भात घोषणा केली असून त्यासाठी प्लॅनिंग व फायनांसकडे वेगळा फंड मागितला जाणार आहे. मला विश्वास आहे की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री अल्पसंख्यांक समाजासाठी नक्कीच बजेट वाढवून देतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी दिल्लीमध्ये इस्लामिक कल्चर सेंटर असून इस्लामिक कल्चर सेंटरच्या माध्यमातून वेगवेगळया प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात त्यामुळे दिल्लीतील इस्लामिक कल्चर सेंटरच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये इस्लामिक कल्चर सेंटर उभारले जाणार आहे का असा प्रश्न विचारला असून मी यासंदर्भात एवढे सांगू इच्छितो की, यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन असून येणा-या काळात यासंदर्भात नक्कीच विचार केला जाईल.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, अल्पसंख्यांक समाजातील जे गरीब लोक आहेत त्यांच्या सामूहिक विवाहासाठी अल्पसंख्यांक विभागाकडून काही मदत केली जाणार आहे काय ? तसेच ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न 25 हजार रुपयांपेक्षा कमी आहे अशा लोकांना अल्पसंख्यांक विभागाकडून मदत दिली जाणार आहे काय ?

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एम.एम.शेख यांनी खूप चांगली सूचना केली असून त्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात विभागाकडून सुध्दा तपासणी सुरु असून अल्पसंख्यांक समाजामध्ये जे गरीब लोक आहेत त्यांच्या मुलींसाठी अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून मदत देण्याचा प्रयत्न सुरु आहे. समाज कल्याण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान....

विभागाच्या माध्यमातून सर्वसामान्य गरीब लोकांसाठी अशा प्रकारची योजना आहेच परंतु अल्पसंख्यांक समाजाच्या मुलींसाठी ज्या संस्था पुढे येऊन लग्न करण्याचे काम करतील त्यंना काही विशिष्ट ठराविक रक्कम देऊ शकतो का असा प्रस्ताव अल्पसंख्यांक विभागाच्या विचाराधीन आहे. येणा-या काळात यासंदर्भात सविस्तर निर्णय घेण्यात येईल.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केलेला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 37 मिनिटांनी मंगळवार दिनांक 3 एप्रिल, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही